# शब्द रुची

सप्टेंबर २०१६
मूल्य १० रु.
पृष्ठे १२४

## कविता विशेषांक


अतिथी संपादक : किरण येले



काळ्यावरतीं
जरा पांढरें
या पाप्याच्या
हातुन व्हावें

फक्त तेधवां:
आणि एरव्ही
हेंच पांढऱ्यावरतीं
काळें!

बा. सी. मर्ढेकर


tours™
isha
Lets explore the world...
चला ईशा टूर्सच्या आकर्षक देशी - विदेशी सहलींना ..
लेह-लडाखमधील ईशा टूर्सच्या १४वर्षांच्या कार्याचा
गौरव तिबेटियन धर्मगुरू श्री. दलाई लामा यांच्या
लेह मधील भेटीने आणि आर्शिवादाने झाला.
स्कँडिनेविया
नॉर्वे, फिनलँड, स्वीडन
(नॉर्दन लाईट्स)
• १४ - २१ डिसें
भूतान
• ८ नोव्हे
• १९ मार्च • ९ एप्रिल • १४ मे २०१७
श्रीलंका
अंदमान
विंटर लडाख
• ७ जाने • २१ जाने
• ३ फेब्रु • १६ फेब्रु
नॉर्थ ईस्ट इंडिया
• २८ नोव्हे (हॉर्नबिल फेस्टिव्हल)
केनिया
• २ नोव्हेंबर, २४ डिसेंबर
ईशा टूर्सच्या इतर कौटुंबिक सहली :
• राजस्थान • केरळ • मनाली • सिक्किम
• नैनिताल • कर्नाटक • ओरीसा • सिंधुदूर्ग-कोकण
इतर वाईल्ड लाईफ सहली :
• पेंच • कान्हा • बांधवगड • रणथंबोर
• सुंदरबन • काबिनी • काझिरंगा
info@ishatours.net | ✆ 8080 144 000 | www.ishatours.net
संपर्क कार्यालये ठाणे - १ए, मुरलीधर सोसायटी, ब्राम्हण सोसायटी, गोडबोले हॉस्पिटलच्या मागे, नौपाडा, ठाणे. (प)
✆ ०२२ २५४३ ७४१७ / २५४३ ७४५८, ९३२०१ ३१९१० दादर - लक्ष्मी सदन, भारत पेट्रोलियम पंपाच्या शेजारी,
गोखले रोड (नॉर्थ), दादर, मुंबई २८ ✆ ९३२००३१९१० बोरीवली - १०३, साई आदर्श, लिंकविझू रेस्टॉरंटच्या मागे, ऑफ लिंक रोड,
सावली हॉस्पिटलच्या समोर, बोरीवली (प). ✆ ९३२४५३१९१० पुणे - गीतांजली : ९३२०१३१९१०
कुडाळ - उदय परब : ९९६९० २३२३४ गोवा - राजीव सिबल: ९८९०० १८७२०

४२

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

सप्टेंबर २०१६, वर्ष तिसरे
अंक पाचवा, मूल्य १० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर
अतिथी संपादक : किरण येले
मुखपृष्ठ संकल्पना : किरण येले

कार्यालयीन संपर्क
कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे
granthaliruchee@gmail.com
जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप / मधु भोसले
granthaliad@gmail.com
फेसबुक आणि वेबसाइट संपर्क
दर्शना पवार ९९२०७३२९१३
granthali01@gmail.com

केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.
वार्षिक वर्गणी १५० रुपये
डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६
संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठसमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

## संपादकीय

# कुणापुढे 'मुजरा' करण्याचा विचार मनात न येवो...

**मराठी** साहित्यात विशेषांकांची परंपरा नवी नाही. त्यातही कविता विशेषांक आजवर खूपच निघाले असताना, 'शब्द रुची'च्या कविता विशेषांकाची जबाबदारी सुदेशजींनी हक्काने माझ्यावर सोपवली, तेव्हा मनात विचार आला की, 'आपण नवे काय देणार?' कविता विशेषांकाच्या नावावर भाराभार कविता, परिक्षणे, समीक्षा असा पुन्हा तोच जुन्या साच्यातला गणपती करण्यात मला रस नव्हता. 'नवं काय करु शकतो?' असा विचार करताना वाटलं, विशेषांकातून कवितेच्या अभिसरणास साधक आणि बाधक अशा सगळ्याच बाबींचा कवी, प्रकाशक, वाचकरसिक यांच्या दृष्टिकोनातून विचार झाला तर कवितेचे अभिसरण कुठे कमी पडतेय, हे कळण्यास मदत होईल. कविता आपण नेहमीच वाचत असतो सगळ्या अंकांतून, पण विशेषांकातून कवितेच्या संवर्धनासाठी अशा बाबींवर परिसंवाद घडवले तर, आपल्या परिने कवितेचे ऋण काही अंशी फेडल्याचे समाधन मिळेल. आणि मग याच विचारांतून एक निर्णय घेतला की 'शब्द रुची'चा 'कविता विशेषांक' असा असेल, ज्यात एकही कविता नसेल, परंतु त्यात अशा बाबींवर चर्चा आणि उहापोह असेल, ज्यामुळे आज मराठी कविता तिचे संग्राह्यपण हरवून बसली आहे. ज्यामुळे कविता आज नव्या पिढीपर्यंत पोहचत नाहीय. आणि जी पोहचतेय ती चुकीच्या पद्धतीने आणि चुकीच्या स्वरुपात.

माझे हे विधान एखाद्यास आक्षेपार्ह वाटू शकेल. पण मला प्रामाणिकपणे वाटतं की पूर्वीच्या कवितांतील 'उक्ती वैशिष्ट्य' हा गुण आजच्या कवितात अपवादानं दिसतो. कविता टिकते, स्मरणात राहते, ती त्यातील अर्थ, लय आणि उक्ती वैशिष्ट्यामुळे. तुकाराम, कबीर, नामदेवांच्या खूप ओळी आज आपण रोजच्या जीवनात संवाद साधताना वापरतो. अगदी भा. रा. तांबे यांचे 'जन पळभर म्हणतील' कुसुमाग्रजांचे 'नुसते लढ म्हणा' पाडगांवकरांचे 'प्रेम म्हणजे प्रेम असतं', कोलटकरांचं 'काय डेंजर वारा सुटलाय' अशा कवितांच्या ओळी आपण रोजच्या जगण्यात बोलताना, सूचक वाक्य म्हणून वापरतो. वर्तमानपत्रातील बातम्यांचे मथळे म्हणूनही वाचतो. पण या नंतरच्या पिढीच्या कविता वा कवितेतल्या ओळी अपवादानेच जनसंवादात आढळून येतात. याची दोन कारणे असू शकतील. एक- त्या कविता जनमनात रुजल्या नसाव्यात, आणि दोन- जनमानसात या कवितांचे अभिसरण झाले नसावे. कविता जर जनमनात रुजल्या नसतील तर तो दोष कवीकडे जातो, मात्र कवितेच्या अभिसरणात काही न्यून राहून गेले असेल, तर मात्र हा दोष आपल्या सगळ्यांकडे जातो, असे मी मानतो. जसे 'वाचक नाहीत' हाही दोष आपलाच आहे. याचे कारण 'वाचक नाहीत' (विशेषत: मुंबई पुण्यात) अशी ओरड सगळे साहित्यिक, प्रकाशक, कवी, प्राध्यापक करताना दिसतात. मात्र वाचक निर्माण करण्याची जबाबदारी घेऊन शाळा, महाविद्यालयात त्या दृष्टीने काम करताना कुणी दिसत नाही. उलट साहित्यिक, कवी, मिळेल तेव्हा, मिळेल त्या शाळा-महाविद्यालयात कार्यक्रम करत श्रोते निर्माण करताना दिसतात. जी बाब वाचक निर्मितीबाबत, तीच कविता अभिसरणाबाबत.

म्हणूनच कवितेच्या आभिसरणातील अधिक-उणे तपासत विशेषांकातून आम्ही दोन गोष्टींवर चर्चा करण्याचे ठरवले. एक- मराठी कवितेच्या अभिसरणासाठी बाध्य असणाऱ्या बाबी आणि दोन- मराठी कवितेबाबत निष्ठा बाळगणाऱ्या बाबी.

वास्तवच मराठी कवितेला ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वाहिले आणि मराठी कवितेचं अढळपद दृढ केलं अशा दोन विभूतीचे मनोगत विशेषांकात घेतले गेले. या दोन विभूती म्हणजे ऋषितुल्य गुरुनाथ सामंत आणि कवितेतील आदरणीय माईलस्टोन, वसंत आबाजी डहाके. आदरणीय वसंत आबाजी डहाके सरांनी त्यांच्या व्यस्त दिनचर्येतून वेळ काढून लेख पाठवला आणि गुरुनाथ सामंतांनी मुलाखतीसाठी वेळ दिला, त्याबद्दल या दोन्ही विभूतींचे आभार. या दोन्ही सुस्वभावी गुरुजनांच्या शब्दांतून आपल्याला कवितेबाबत त्यांच्यात असलेली पोटतिडिक आणि कवितेच्या अभिसरणासाठी काही महत्त्वाचे मार्गदर्शक मुद्दे आढळतात.

मराठी कवितेला निष्ठेने वाहून घेणारा आणि पोषक ठरलेला दुसरा घटक म्हणजे नियतकालिक. मराठी कवितेत काही मोजकीच नियतकालिके अशी आहेत, जे फक्त कवितेला वाहिलेली आहेत. त्यांपैकी एक महत्त्वाचे नाव म्हणजे 'कविता-रती'. गेली कित्येक दशके सातत्याने प्रसिद्ध होणारे 'कविता-रती' हे नियतकालिक हा मराठी कवितेच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा आहे. 'कविता-रती'ने अनेक मराठी कवी घडविले आहेत, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. म्हणूनच या नियतकालिकाची वैचारिक बैठक आणि दिशा जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यास प्रतिसाद देऊन विद्यमान संपादक डॉ. आशुतोष पाटील यांनी अत्यंत गांभीर्याने लिहिलेला लेख दिला, त्याबद्दल त्यांचे विशेष आभार. त्यांच्या लेखातून, 'कवितेल्या वाहिलेल्या नियतकालिकांची गरज का आहे?', हे अधोरेखित होते. 'काव्याग्रह'चे संपादक, विष्णू जोशी आणि 'कुसुमाकर'चे संपादक, श्याम पेंढारी यांचेही आभार.

मराठी कवितेला पोषक ठरलेला तिसरा घटक म्हणजे कविता मंडळे. फक्त 'कविता' या प्रकाराला वाहून घेऊन सगळया आर्थिक, सामाजिक आणि वेळेच्या आव्हानांना तोंड देत किमान दहा वर्षांपेक्षा जास्त काळ सात्यत्याने काम करणाऱ्या कविता मंडळांचा आम्ही शोध घेतला. त्यातील मागील पन्नास वर्षे अव्याहत लयीत कवितापोषी कार्य करणारे डोंबिवलीचे 'काव्यरसिकमंडळ', सव्वीस वर्षे सातत्याने चर्चा, परिसंवाद, संमेलने आयोजित करणारे बेळगांवचे 'शब्दगंध कविमंडळ', पंधरा वर्षे अव्याहत चालणारे इंदौरचे 'आम्ही रचनाकार' आणि गेली तेरा वर्षे अथक चालणारे, नावाजलेले नाशिकचे 'नाशिक कवी मंडळ' या मंडळांचे 'कविता मंडळे का आणि कशासाठी?' या विषयावरील लेख आम्ही इथे समाविष्ट करत आहोत. विषयास अनुसरून त्यांनी कविता मंडळांची गरज का आणि कशासाठी आहे, हे उद्धृत केले. या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

यानंतर मराठी कवितेच्या अभिसरणात कमी पडणाऱ्या विषयांची यादी काढली तेव्हा अनेक विषय दृगोचर झाले. त्यांपैकी एक महत्त्वाचा विषय म्हणजे मराठी काव्यसमीक्षा. 'मराठी काव्यसमीक्षा वाचकाभिमुख आणि परिपूर्ण आहे का?' असा एक विषय आम्ही चर्चेसाठी घेतला आणि अनेकांना विनंती केली आणि थेट मुद्याला हात घालणारे आणि स्पष्ट विधान करणारे, चारच लेख या विशेषांकात घेतले. हे चारही लेख मराठी काव्यसमीक्षेतील सद्य:स्थिती दर्शवितात, याबाबत वाद नसावा. हे अभ्यासपूर्ण लेख लिहून देणारे डॉ. श्रीपाद जोशी, डॉ. राम पंडित, प्रा. संजय बोरूडे, आणि प्रा. राजश्री कुलकर्णी यांचे आभार. 'काही सन्माननीय अपवाद वगळता, आज मराठी काव्यसमीक्षा फक्त युनिव्हर्सिटीतच वाचली जाते, आणि युनिव्हर्सिटीसाठीच लिहिली जाते, या विधानात किती तथ्य आहे?' याविषयी मते घेतल्यास काय निष्कर्ष येईल, याची आपणा सगळ्यांनाच कल्पना आहे. कविता पुन्हा एकदा जनमानसात रुजवायची असेल तर ती रुजवण्यात लक्षणीय योगदान समीक्षकांचेच असेल, असे आमचे ठाम मत आहे.

मराठी कवितेला पोषक ठरतील असे पण सद्य:कालीन परिस्थितीत शंका वाटावी, अशी अवस्था असलेले दोन महत्त्वाचे घटक म्हणजे ग्रंथालय आणि कविसंमेलने. ग्रंथालयातून कवितासंग्रह वाचले जातात का? ते वाचले जात असतील तर कोणत्या कवींचे वाचले जातात? त्या कवितांचे विषय काय असतात? नव्या कवींच्या कविता वाचल्या जात नाहीत याची कारणे काय? हे जाणून घेण्यासाठी आम्ही महाविद्यालये, सार्वजनिक वाचनालय, शाळांची वाचनालये अशा अनेकांशी संपर्क साधला आणि पुण्यातील वाचनालयाच्या श्रीमती सुनीति लिमये, रामनिरंजन झुनझुनवाला महाविद्यालयाच्या प्रा. दीपा ठाणेकर आणि साहित्य संघाच्या पदाधिकारी, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे,



To be a poet is a condition, not a profession.

(ROBERT FROST)

कल्याणच्या सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष, श्री. राजीव जोशी यांनी त्यांच्या अखत्यारीत असलेल्या वाचनालयातील पुस्तकांचा धांडोळा घेत, नोंद करत ग्रंथालयातून कविता संग्रहाचे वाचन वाढीस लागण्यासाठी काय करणे शक्य आहे, यावर विचार दिले, त्याबद्दल त्यांचे आभार.

आज महाराष्ट्रात असलेली ग्रंथालये पाहिली तर त्याची दुर्दशा हा एक वेगळाच विशेषांक निघू शकेल. त्या ग्रंथालयातून असलेले ग्रंथपाल आणि पदाधिकारी किती वाचतात, काय वाचतात हा सुद्धा एक संशोधनाचा विषय होईल. इंग्रजांच्या काळातली ग्रंथालये काही अपवाद वगळता अजूनही तशीच आहेत. त्यातली कार्यपद्धती तशीच आहे. मांडणी तशीच आहे. आता डिजिटल युग आले आहे. मोबाइल, व्हिडिओ, टीव्ही यांचा वापर करून कवी, लेखकांची वाचनालयात थेट कॉन्फरन्स कॉलद्वारे, व्हिडिओ कॉलद्वारे भेट आणि मुलाखत आपण घडवू शकतो का? कवींच्या आवाजातल्या कविता, मुलाखती, लेखकांची भाषणे ग्रंथालयातून मंद आवाजात आठवड्यातील एखाद्या ठराविक दिवशी, ठराविक वेळेत ऐकवता येऊ शकतील का? अशा अनेक शक्यतांचा विचार करून, त्या शक्यता अमलात आणून नवा वाचक आणि नवी पिढी वाचनाकडे वळवायला हवी, असे आम्हाला वाटते.

कवीसंमेलने हा तसा सगळ्यांच्या आवडीचा विषय आणि कार्यक्रमही. गावोगावी, खेडोपाड्यात आणि शहरात हल्ली जागोजागी कवीसंमेलने होताना दिसतात. हजारोच्या संख्येने या संमेलनांना गर्दी दिसते. पण हीच गर्दी त्या कवींचे संग्रह विकत घेण्यास नाखुष असते, अशी परस्परविरोधी परिस्थितीही दिसते. याची कारणे आणि कवीसंमेलनाची गर्दी पुस्तकविक्रीकडे वळविण्यासाठी काय करावे लागेल, अशा गोष्टींवर आम्ही लेख मागविले. त्यात प्रा. उषा तांबे, डॉ. महेश केळुसकर. डॉ. बाळासाहेब लबडे, हर्षदा सौरभ, महेश पवार, लखनसिंह कटरे यांनी सहकार्य केले, त्याबद्दल विशेष आभार.

आज कवीसंमेलनात टाळ्यांसाठी कविता वाचल्या जातात, असा काहींचा आक्षेप आहे आणि काही अंशी तो खराही आहे. पण असा आक्षेप घेणारे कवीही स्वत:च्या कंपूतील रटाळ कवींसाठी कवीसंमेलने आयोजित करतात, असेही एक चित्र आहे. स्वच्छच सांगायचे तर सगळ्याच कवींना रसिकांची दाद हवी आहे. त्यांचे थेट प्रोत्साहन हवे आहे. अशा परिस्थितीत कवीसंमेलनात एका कवीला किमान पंधरा मिनिटे दिल्यास त्याच्या कवितांचा सलग आलेख श्रोत्यांना मिळेल आणि त्या कवीच्या कवितांबाबत उत्सुकता निर्माण होऊन श्रोत्यांचा कल त्या कवीच्या कवितासंग्रह खरेदीकडे वळू शकेल. सन २००० साली कवी सौमित्र आणि अरुण म्हात्रे यांच्या संकल्पनेतून झालेला ११ दिवसांच्या काव्योत्सवात असा यशस्वी प्रयोग करण्यात आला होता.

या शिवाय आम्ही प्रकाशकांनाही पत्रे पाठवून एका विषयावर त्यांचे विचार मागविले होते. विषय होता, 'आम्ही कवितासंग्रह का प्रकाशित करत नाही?' प्रकाशकांची थेट मते जर कळली असती तर कवींना प्रकाशकांची बाजू लक्षात आली असती. आणि या सगळ्यातून सुवर्णमध्य काढण्याचे काही विचार पुढे येऊ शकले असते. परंतू आमच्या आवाहनाला प्रतिसाद मिळाला नाही.

'शब्द रुची'चा कविता विशेषांक हा मराठी कविता एक पाऊल पुढे नेण्यासाठी एक छोटासा प्रयत्न आहे, याची जाणीव आम्हाला आहे. या प्रश्नोत्तरात, चर्चा परिसंवादात कुणाच्या मतांनी कुणी दुखावले गेले असतील तर त्यांची आम्ही माफी मागत, ही चर्चा सगळ्यांनी सकारात्मकपणे घ्यावी, अशी विनंती करतो. पुढे जायचे असेल तर मागे राहिलो हे मान्य करून त्याची कारणे शोधणे जरुरीचे असते. ती कारणे शोधण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. स्वीकारणे वा न स्वीकारणे, आपल्या हाती आहे.

न स्वीकारणं सोपं आहे. परंतु स्वीकारण्यासाठी दोन गोष्टी लागतील. आणि त्या म्हणजे कवितेसाठीचा जिव्हाळा (अफेक्शन) आणि कवितेशी निष्ठा (डेडिकेशन) आणि याच दोन गोष्टी, मला वाटतं मराठी कवितेच्या पुढील वाटचालीत महत्त्वाची भूमिका बजावतील. आपण मराठी कवितेसाठी झोकून देणार आहोत की आपले हितसंबंध आपण जपणार आहोत? मराठी कवितेसाठी ताठ मानेने उभे राहणार आहोत की पुरस्कार, आणि फायदे पदरात पाडून घेण्यासाठी, कुणापुढे 'मुजरा' करणार आहोत? यावर मराठी कवितेची पुढील वाटचाल ठरणार आहे, हे निश्चित. आणि मराठी कवितेची ही वाटचाल खडतर असेल, अशी दृश्ये आपल्याला आसपास दिसत आहेतच. तर या खडतर वाटचालीत किमान काही टक्के कवी-कवयित्रींचे, कवितेविषयी असलेले अफेक्शन आणि डेडिकेशन टिकून राहो आणि कुणापुढे 'मुजरा' करण्याचा विचार त्यांच्या मनात न येवो, या शुभेच्छांसह, 'ग्रंथाली'च्या सुदेश हिंगलासपूरकर आणि त्यांच्या सगळ्या समूहाचे विशेष आभार की या विशेषांकाच्या निमित्ताने मला पुन्हा एकदा स्वत:तल्या न्यूनतेकडे पाहण्याची संधी त्यांनी मला दिली. माझ्या नजरेतला डळमळलेला विश्वास मलाच दिसला, तेव्हा संपूर्ण स्वातंत्र्य देत, शेवटपर्यंत कुठेही हस्तक्षेप न करता, 'ग्रंथाली'चा दिवाळी अंकही १०० पानांच्या खालीच असताना '१२४ पानांचा कविता विशेषांक करू' म्हणत आत्मविश्वास दिला. त्यांच्या या विश्वासास मी पात्र ठरो, आपणा सगळ्या वाचकांस हा कविता विशेषांक वाचनीय ठरो, हीच कवितेच्या नसलेल्या पूर्णविरामाकडे प्रार्थना.


**– किरण येले**

अतिथी संपादक


भ्रमणध्वनी : ९८६९२६०७८०

kiran.yele@gmail.com


**'शब्द रुची' मासिकाचा पुढचा अंक दिवाळी अंक असेल. २५ ऑक्टोबर २०१६ रोजी तो प्रसिद्ध होईल. वाचक आणि वर्गणीदार यांनी याची नोंद घ्यावी.**

# अनुक्रम









मुलाखत : **गुरुनाथ सामंत**

कवितेचा रियाज म्हणजे स्वत:ला चॅलेज करत राहणं... / ८

संवादक : **किरण येले**

लेख : **प्रा. वसंत आबाजी डहाके**

त्यामुळे मी पुन्हा कथात्म साहित्याकडे वळलो नसेन... / १८


**मराठी काव्यसमीक्षा वाचकाभिमुख आणि परिपूर्ण आहे का?**

**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी** / २२

**डॉ. राम पंडित**

मराठी ग़ज़ल समीक्षा : काही प्रश्न / २८


**प्रा. संजय बोरुडे**

नुसता गळा काढुया / ३२

**प्रा. राजश्री पाटील-कुलकर्णी**

आजच्या मराठी काव्यसमीक्षेची गत / ३८




**कवितामंडळे का आणि कशासाठी?**

**डॉ. प्रल्हाद देशपांडे**

आपल्या हातात याशिवाय फार काही उरलेलेच नाही! / ४०

**पुष्कर ओगले**

शब्दगंध कविमंडळ : या दिंडीला अंत नाही / ४४

**शरद पुराणिक**

'नाशिक कवी' / ४६

**अलकनंदा साने**

'आम्ही रचनाकार', इंदौर : चार मैत्रिणींचा प्रवास / ४८






**ग्रंथालय/वाचनालयात कवितासंग्रह वाचले जातात का?**

**सुनीति लिमये**

वाचले जाणारे साहित्य ठेवणाकडे कल / ५०

**प्रा. दीपा ठाणेकर**

...तर कवितासंग्रहांचा खप वाढेल / ५२

**डॉ. उज्ज्वला मेहेंदळे**

काव्यानंद आज आणि पूर्वी

**राजीव जोशी**

कवितेचे वाचक : साठा उत्तराची कहाणी / ६०










**डॉ. आशुतोष पाटील**
'कविता-रती'चे संपादन : दृष्टी आणि दृष्टिकोन / ६४

**विष्णू जोशी**
कवितेच्या संवर्धनासाठी 'काव्याग्रह' / ७६

**श्याम पेंढारी**
फक्त कवितेला वाहिलेले नियतकालिकच का? / ७८

---

**कविसंमेलनातली गर्दी कवितासंग्रह खरेदीकडे कशी वळेल?**

**प्रा. उषा तांबे**
कविता, कवितासंग्रह आणि कविसंमेलने / ८२

**डॉ. महेश केळुसकर**
कवितासंग्रह आणि कविसंमेलने / ८४

**हर्षदा सौरभ**
कविसंमेलने आणि कवितासंग्रह विक्री / ८८

**महेश पवार**
कवितासंग्रह खरेदीत अनुत्साह का? / ९२

**लखनसिंह कटरे**
कविता - शब्दभ्रम की प्रतिभा? / ९४

**प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे**
अशा कवींचा लोकांना उबग येतो! / ९६

---

**कविता अभिसरणाचे नवे माध्यम**

**गीतेश गजानन शिंदे**
'कविता मना-मनातली' एक आधुनिक जडण-घडण... / १००

---

**डॉ. सिसिलिया कार्व्हालो**
मेंदूत गिरमीट फिरविणारी कविता / १०३

---

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
उण्या व्याजदराचं अर्थतांडव / १०६

**आत्माराम परब, नरेंद्र प्रभू**
हॉर्नबिल फेस्टिव्हल-नागालँड / १०९

**'ग्रंथाली' पुस्तक प्रकाशन वृत्तात** / ११२-११३

**ग्रंथपाने :** रोहन प्रकाशन, पद्मगंधा प्रकाशन, साधना प्रकाशन / ११६ ते ११८
**'ग्रंथाली' ग्रंथपाने :** चांगदेव काळे / ११९










# कवितेचा रियाज म्हणजे स्वत:ला चॅलेज करत राहणं...

मुलाखत
**गुरुनाथ सामंत**

संवादक
**किरण येले**

ग्रंथसंपदा : (काव्यसंग्रह)
गुरुचरित्र (१९८४, २००८)
प्लीज (२००८, २०१२)

**मी : तुमच्या कवितेची सुरवात कुठून झाली असं तुम्हाला वाटतं?**

**सामंत :** तसं खरंतर मलाच आठवत नाही पण कवितालेखनाची सुरवात होण्यासाठी जो बेस लागतो तो कसा तयार झाला ते आठवतं. काय झालं की माझा जन्म झाला आणि माझे वडील गेले. म्हणजे मला वडील माहीत नाहीत. मी त्यांना कधीच पाहिलं नाही. त्यामुळे मग माझे मामा माझ्या आईला आणि मला इथे घेऊन आले.

**मी : काय नाव त्यांचं?**

**सामंत :** पाटकर, विठ्ठल नारायण पाटकर. ते आम्हाला इथे गिरगावात घेऊन आले. म्हणजे आता आपण बसलोय ती खोली त्यांची. त्यांचं लग्न तेव्हा झालं नव्हतं. ते आम्हाला इथे घेऊन आले आणि मग माझं संगोपन इथेच सुरू झालं. माझ्या मामाचं खूप वाचन होतं. इथे ये दाखवतो एक गोष्ट. (सामंत मला बाहेरच्या हॉलवजा खोलीत घेऊन गेले. तिथे एक पुस्तकांचे लाकडी रिव्हॉलव्हिंग रॅक होतं. चार फुटी असावं ते!) हे बघ... या रॅकमध्ये मामांची पुस्तके हाती. त्यात टागोर, लुई पाश्चर, रामकृष्ण परमहंस, टॉलस्टॉय अशा सगळ्यांची पुस्तके होती. त्यांचं वाचन या पठडीतलं होतं. घरात देव नव्हते, देवाच्या तसबिरी नव्हत्या पण मला 'नवनीत', रामरक्षा म्हणावयास लावत. उच्चारण, पाठांतर यावर ते भर देत. कोऱ्या भिंतीकडे तोंड करून मला उभं करत आणि रामरक्षा, मंत्र वगैरे म्हणायला लावत. मग एक दिवस काका आले आणि त्यांनी मला तसं कोऱ्या भिंतीकडे तोंड करून रामरक्षा म्हणताना पाहिलं आणि मग एक देवाची तसबीर आणून लावली. तर मामांमुळे मला ही पुस्तके वाचायची सवय झाली. मला कळत काही नसे पण मी काही वाचत असे. घरी कुणी पाहुणे आले की मामा मला बोलवत. घरात एक छोटं टेबल होतं. त्या टेबलवर मला बसवत आणि पाठ्यपुस्तकातली एखादी कविता म्हणायला सांगत. माझ्यावर झालेला कवितेचा तो पहिला संस्कार असावा!

त्या वेळेस एक भंगारवाला नेहमी यायचा इमारतीत. त्याने ही बुककेस पाहिली. त्या वेळी मामा थकले होते. त्यांचा शेवटचा काळ होता तो. त्यांच्या पुस्तकांना कसर लागलेली. पाने पिवळी पडलेली. त्या भंगारवाल्याने एकदा मामांना विचारलं, 'मला ही पुस्तकांची रॅक देऊन टाका. पन्नास रुपये देतो.' त्या वेळी पन्नास रुपयेही खूप होते. मामा नाही म्हणाले तर त्याने पैसे वाढवले. पुढल्या महिन्यात त्याने पुन्हा विचारलं. असं करत करत पाचशे रुपये देतो म्हणाल्यावर मामा म्हणाले, 'पाच हजार रुपये दिलेस तरी मी ती रॅक देणार नाही.' मामांनी मलाही सांगितलं, 'ही रॅक कुणालाच द्यायची नाही मी गेल्यावर.' मी मामांना म्हटलं, 'पण तुमची पुस्तके खराब झालीत, मी माझी पुस्तकं त्यात ठेवू का?' तर मामा म्हणाले, 'अगदी खुशाल ठेव!' आणि मग त्या रॅकमध्ये माझी पुस्तके आली. तर असं सगळं.

बरं मला लहानपणी दमा होता. त्यामुळे माझं फारसं बाहेर जाणं होत नसे. मुलांमध्ये खेळणंही होत नसे. त्यामुळे मग घरातली पुस्तकं वाचण्याची सवय लागली. ही सवय ओळखून माझे काका दरवर्षी एक ट्रंक भरून पुस्तके आणत. तुला माहीत आहे त्या काळी पत्र्याच्या ट्रंका असायच्या, अजूनही आहेत. तर काका दरवर्षी तशी एक ट्रंक भरून पुस्तकं आणत आणि त्यातली पुस्तकं दरवर्षी वयोमानाप्रमाणे बदललेली असत. त्यामुळे वाचनाची रुची वयाप्रमाणे बदलत गेली.

त्यानंतर इथे समोरच चिकित्सक समूह विद्यालयात मी आठवी इयत्तेत प्रवेश घेतला. त्याआधी सातवीपर्यंत म्युनिसिपल शाळेत शिकलो. चिकित्सक समूह शाळेत तांडेल नावाचे एक शिक्षक होते. तांडेलसर शिकवताना एक फार वेगळी गोष्ट करत. मला वाटतं किरण, आताच्या शिक्षकांनी ते करायला हवं. तांडेलसर अप्रतिम मराठी शिकवत. तर तांडेलसर नेहमी नवा धडा, नवी कविता शिकवायला सुरू करताना पाठ्यपुस्तकाबाहेरील एका कवी वा लेखकाचा तक्ता कार्डबोर्डवर बनवून आणायचे. त्या कार्डबोर्डवर कवी वा लेखकाचं नाव, फोटो, माहिती व एखादा लेखनांश लिहिलेला असायचा. मग तांडेलसर त्या लेखक-कवीविषयी सांगत. त्यांचं काही लेखन वाचून दाखवत आणि मग नवा धडा शिकविणे सुरू करीत. त्यामुळे मुलांना पाठ्यपुस्तकाबाहेरील लेखक, कवींचीही ओळख होत असे. आणि पाठ्यपुस्तकाबाहेरील साहित्यिकांचंही वाचण्याची उत्सुकता वाढत

असे. परीक्षेत पाठ्यपुस्तकाबाहेरील प्रश्न नसत पण सहज जाता जाता काहीतरी छान कानावरून जाई आणि मग ते वाचावंसं वाटत असे. तांडेलसरांनी कधीही सांगितलं नाही की या लेखक-कवींची पुस्तके वाचा. पण पाठ्य-पुस्तकाबाहेरील त्या कवी-लेखकांचं लेखन ते असं रसाळपणे सांगत, की त्या लेखक-कवींची पुस्तके वाचावीशी वाटत.

**मी : माफ करा सर, मधेच एक प्रश्न विचारतो. तुमच्या तांडेलसरांसारखे किती मराठी शिक्षक आज आहेत असं तुम्हाला वाटतं?**

**सामंत :** तुला काय म्हणायचंय ते मला कळतंय किरण, आज खरंच असे शिक्षक फार कमी आहेत; जे मुलांना पाठ्यपुस्तकाबाहेरचंही शिकवण्याचा प्रयत्न आत्मीयतेने करताना दिसतात. त्या वेळच्या काळात आमच्या प्रत्येकाजवळ किमान एका शिक्षकाचे नाव आहे; जे असं काहीतरी वेगळं करण्याचा प्रयत्न करत. पूर्वी अध्यापन हे ज्ञानदानाचं कार्य मानलं जाई. आता अध्यापन हे अर्थाजनाचा स्रोत मानला गेलाय. त्यामुळे मुलांना जास्त देण्याऐवजी आपण जास्त कमावण्यासाठी काय करावे लागेल ते केलं जात आहे. अध्यापनाविषयीची निष्ठा कमी पडत आहे, असं मला वाटतं. काही शिक्षक आहेत; ज्यांच्यामुळे मराठी शिक्षणाचा स्तर अजून राखला गेला आहे पण अशा शिक्षकांची संख्या वाढीस लागायला हवी, असे मला वाटते.

**मी : खरंय तुमचं म्हणणं! पूर्वीसारखे शिक्षक जर मराठी शाळाशाळांतून झाले तर मराठी शाळांचा स्तर उंचावेल. तर आपण तांडेलसरांबद्दल बोलत होतो.**

**सामंत :** हं. तर तांडेलसरांमुळे पाठ्यपुस्तका-बाहेरील साहित्यिकांची ओळख झाली. बरं, त्या वेळी घरी राहून राहून मी पुस्तके वाचत होतो. आणखी एक छंद लागला होता मला तो म्हणजे सुरांचा. मी बुलबुल तरंग छान वाजवायचो. अजूनही आहे तो माझ्याकडे. मी थोडा तबला, थोडं हार्मोनियम असं वाजवायचो. आजही वाजवतो. ते बघ सगळं तिथे काढून ठेवलंय. गिटार आहे. त्याच्या तारा जुळवायच्यात. आता माझी नात आणि नातू थोडे मोठे झाले की मी त्यांच्याकडे हे सोपवीन. तर सांगत हे होतो की मला या सुरांचा छंद लागला तो खालून जाणाऱ्या मिरवणुकांतील बँडमुळे आणि आळीतील बँडपथकांमुळे. त्या वेळी आळीत एक बँडपथक होतं. ते नेहमी सराव करताना मी ऐकत असे. हळूहळू मला वाटू लागलं की आपल्यालाही वाद्य वाजवता आलं पाहिजे आणि मी मामांकडे हट्ट धरला तेव्हा त्यांनी मला एक क्लोरोनेटसारखं काहीतरी वाद्य आणून दिलं आणि मग मी हळूहळू बँडपथकातील सगळी वाद्य वाजवू लागलो. मी आठवी इयत्तेत असतानाची ही गोष्ट. तर एक दिवस शाळेत, आम्हाला सगळ्यांनाच 'एक निबंध लिहून आणा' म्हणून सांगण्यात आलं. विषय होता, 'मी मोठा झाल्यावर कोण होणार?' तर मी लिहिला निबंध आणि माझ्या निबंधाचं शीर्षक होतं, 'मी म्युझिक टीचर होणार.' माझा निबंध शिक्षक कक्षात वाचला गेला असावा. त्या वेळी प्राचार्यांनी मला बोलवलं आणि विचारलं, 'हे काय आहे?' तेव्हा आमच्या वर्गशिक्षिका म्हणाल्या, 'हा नेहमी असंच काहीतरी लिहीत असतो. सगळे पुस्तकातले विषय लिहीत नाही. सगळ्यांनी लिहिलंय, मी डॉक्टर होणार, मी इंजिनीयर होणार, याने लिहिलंय मी म्युझिक टिचर होणार.'

त्याच वर्षीची, म्हणजे मी आठवी इयत्तेत असतानाची दुसरी एकआठवण अशी की, चिकित्सकसमूह शाळेतून एक हस्तलिखित मासिक निघत असे. मुलेच ते मासिक काढत. त्यात लिहिलेले लेखही मुलांचेच असत. तर या मासिकासाठी मी एक स्वलिखित कविता पाठवली. त्यावेळी आमच्या शाळेत पाटकर सर नावाचे कडक शिक्षक होते.. त्यांनी ती कविता वाचली आणि मला बोलवून खडसावत विचारलं, ही कविता कुणाची आहे?' मी म्हटलं, माझी. त्यांनी पुन्हा जरबेनं विचारलं, तू लिहिलीस ही कविता? मी म्हटलं, हो. मीच लिहीली. तर म्हणाले, हे बघ.. खरं सांगितलंस तर शिक्षा होणार नाही. पण खोटं सांगितलंस तर मात्र गय करणार नाही. खरं सांग ही कविता तुझी आहे का? मी म्हटलं, हो. ही माझीच कविता आहे. मीच लिहिली आहे. तसं ते गोड हसले. आणि शाबासकी देत म्हणाले, 'छान लिहिली आहेस. या वर्षीच्या वार्षिकात मी ती घेतोय.'

**आज खरंच असे शिक्षक फार कमी आहेत जे मुलांना पाठ्यपुस्तकाबाहेरचंही शिकवण्याचा प्रयत्न आत्मीयतेने करताना दिसतात. त्या वेळच्या काळात आमच्या प्रत्येकाजवळ किमान एका शिक्षकाचे नाव आहे; जे असं काहीतरी वेगळं करण्याचा प्रयत्न करत. पूर्वी अध्यापन हे ज्ञानदानाचं कार्य मानलं जाई. आता अध्यापन हे अर्थाजनाचा स्रोत मानला गेलाय...**




**मी आणि चंद्रकांत खोत दोघे मिळून असंच एका चहाच्या टपरीवर कटिंग पिता पिता ठरवलं की एक सिनेमा बनवायचा. बस्स. आणि काम सुरू झालं. आम्ही कथा निवडल्या आणि मौजच्या ऑफिसमध्ये ग. रा. कामत येत. ते सिनेमाशी संबंधित होते. त्यामुळे चंद्रकांत खोत आणि मी त्यांच्याकडे गेलो. म्हणालो, 'आम्हाला सिनेमा करायचाय.'**

मला वाटतं. ती माझी पहिली कविता. तिथून कविता सुरू झाली. बघ आठवणींना उजाळा देताच कवितेचा स्रोत सापडला.

**मी : ही आठवीतली आठवण? पुढे?**

**सामंत :** पुढे मग असंच लिहीत राहिलो, जे मनात येईल ते. मला आठवतंय एकदा साहित्य संघात नवोदित कवींचे कवितावाचन होते. तेव्हा मी अर्ध्या चड्डीत तिथे कविता वाचायला गेलो. कवींची रांग लागलेली कविता वाचण्यासाठी. मीही त्या रांगेत उभा राहिलो आणि वाटत राहिलं. हे काही खरं नाही. अशा कविता-वाचनाला अर्थ नाही. त्यानंतर मी कधीच अशा कार्यक्रमांना गेलो नाही. मासिकांना पाठवू लागल्यावर 'सत्यकथे'तून मला चांगला प्रतिसाद मिळाला.

मी 'मौज'मध्ये लागल्यानंतरची एक आठवण सांगतो तुला. त्या घटनेतून आपण आपल्या कवितेकडे कसं तटस्थपणे पहायला हवं, हे मी शिकलो. त्या वेळी मी 'मौज'मध्ये लागलो होतो. आणि 'सत्यकथे'तून माझ्या कविता येऊ लागल्या होत्या. त्या कवितांना प्रतिसादही चांगला मिळत होता. खूप पत्रे येत होती. श्रीपु एकदा म्हणाले, 'गुरुनाथ तुमच्या कविता मला विशेष भावत नाहीत, पण लोकांना तुमच्या कविता आवडतात.' त्यानंतर एकदा ग्रेसांचं पत्र आलं की 'तुमच्या कविता मला आवडतात.' ग्रेसांनी पाठवलेलं ते पोस्टकार्ड घेऊन मी राम पटवर्धनांकडे गेलो आणि पटवर्धनांना अभिमानाने ते पत्र दाखवलं. तसं पटवर्धनांनी दोन क्षण ते पत्र डोळ्यांसमोर धरलं आणि त्यावर लाल अक्षरात 'श्रीपु' असं लिहून माझ्याकडे दिलं. श्रीपु त्यावेळी दुसऱ्या माळ्यावर बसत. मी ते पत्र घेऊन श्रीपुंकडे गेलो. श्रीपुंनी ते पत्र शांतपणे वाचलं आणि एकच वाक्य म्हणाले, 'हे डोक्यात जाऊ द्यायचं नाही.' आणि ते पत्र बाजूला ठेवून दिलं. त्या क्षणी मी जमिनीवर आलो, तो कायमचाच. पण आसपास कवितासंग्रहाचं थाटात चाललेलं प्रकाशन पाहिलं, कुणीतरी स्वतःला प्रमोट करताना पाहिलं की उदासही वाटायचं. अशा वेळी श्रीपु म्हणायचे, 'गुरुनाथ, हे सगळं बरबरचं आहे. यामुळे उदास होऊ नका. तुमची कविता मोठीच आहे. तिला अशा कुबड्यांची गरज नाही.'

श्रीपुंची एक छान आठवण सांगतो. श्रीपु नेहमी माझ्याकडे संग्रह प्रकाशनासाठी कविता मागवायचे आणि मी दिवाळी अंक किंवा इतर व्यस्ततेमुळे नेहमी त्यांना म्हणायचो, 'दिवाळीनंतर देतो.' एक दिवस त्यांनी पुन्हा विचारलं, 'गुरुनाथ तुमचं हस्तलिखित कधी देता?' आणि मी सवयीप्रमाणे म्हणून गेलो, 'दिवाळीनंतर देतो.' तर ते हसत म्हणाले, 'गुरुनाथ तुम्ही नेहमी म्हणता दिवाळीनंतर देतो. अहो, कधीतरी दिवाळीआधी देतो म्हणा की.' (दोघेही हसतो.)

त्यानंतर 'कविता दशकाची'साठी माझ्या कवितांची विचारणा होऊ लागली पण मी माझ्या कविता देत नव्हतो. कारण मला वाटायचं की मी श्रीपुंना कविता दिल्या नाहीत तर यांना कशा द्याव्यात. शेवटी पाडगांवकरांनी मला विचारलं, 'तुम्ही कविता का देत नाही?' मी कारण सांगितल्यावर त्यांनी थेट श्रीपुंना फोन लावला आणि सांगितलं की, 'गुरुनाथ तुम्हाला कविता दिल्या नाहीत म्हणून 'कविता दशकाची'ला कविता देण्यास टाळाटाळ करतो आहे. तुम्ही त्याला समजवा.'

तेव्हा श्रीपुंनी मला बोलावलं आणि म्हणाले, 'कवितासंग्रह प्रकाशन हा वेगळा भाग आहे आणि हा 'कविता दशकाची' हा प्रकल्प वेगळा आहे. तुम्ही या प्रकल्पास कविता द्या. आणि नंतर मग मी 'कविता दशकाची'साठी कविता दिल्या आणि त्यानंतर मौजने 'गुरुचरित्र' काढल्यावर गुरुनाथ सामंत हे नाव परिचित झालं.

'गुरुचरित्र'च्या वेळेची एक आठवण सांगतो. श्रीपुंनी 'गुरुचरित्रा'चं हस्तलिखित मागवलं आणि ते नेल्यावर मी काही नावे काढली होती संग्रहासाठी जी मी पहिल्या पानावर लिहिली होती. उदाहरणार्थ, एक्सरे, तुकडे अशी ती पर्यायी नावे होती. श्रीपुंनी ती वाचली आणि विचारलं, 'हे काय आहे?' मी म्हटलं, 'ती पर्यायी नांवे आहेत संग्रहासाठी.' श्रीपु म्हणाले, 'ही पर्यायी नावे का काढली?' मी म्हटलं, 'कारण 'गुरुचरित्र' हे नाव मला आत्मस्तुतीसारखं वाटतंय. तर श्रीपु म्हणाले, 'ती आत्मस्तुती नाही. प्रत्येक कवितासंग्रह हा त्या कवीचा 'उद्गार'

असतो आणि हा तुमच्या आयुष्याचा 'उद्गार' आहे. म्हणून तेच नाव योग्य आहे.'

**मी : त्या सुरुवातीच्या काळात कविताच लिहिल्यात की आणखी काही?**

**सामंत :** नाही, इतर साहित्यप्रकार लिहिले नाहीत. मात्र नाटक-चित्रपटाकडे ओढा होता. मी आणि चंद्रकांत खोत एक चित्रपटही करत होतो ती गमतीदार आठवण पुढे सांगतो. पण सुरुवातीच्या काळात नाटक करत होतो, तो काळ फार मजेदार होता. आमचा एक ग्रूप होता. त्यात विजय पवार आणि आणखी काही जण होते. विजय नाटकातलाच होता. त्यामुळे तो नाटक करतच असायचा. मग मीही त्याला जॉइन झालो... त्याने वग आणि गवळण लिहिली होती. ती गंभीर स्वरूपाची होती पण मी त्याला विनोदी रूप दिलं आणि ती गवळण फार मजेदार झाली.

तू जसं राज्य नाट्यस्पर्धेत नाटक करतोस तसं मीही राज्य नाट्यस्पर्धेत आणि इतर ठिकाणी नाटक केलंय. एक वर्ष तर 'मौज'मधल्या कामगारांचं नाट्यमंडळ स्थापन केलं आणि त्यांच्या रिहर्सल्सही सुरू केल्या. मग एक-दोन प्रयोगही केले. पण नंतर वेळा जुळणं कठीण होत गेलं. कामगारांच्या रिहर्सल्समुळे प्रेसच्या कामावर परिणाम होऊ नये, म्हणून मग ते थांबवलं. पण आम्ही राष्ट्र सेवा दलातले काही होतो त्यात विजय पवार, भाऊ पाध्ये, त्यांची पत्नी असे सहकारी होतो; ते नाटक करत असू.

एकदा या विजयने आणीबाणीवर नाटक लिहिलं.

**मी : मग काय झालं?**

**सामंत :** काही नाही. त्याला जेलमध्ये टाकलं. (दोघे हसतो) आणखी काय होणार? त्यावेळी त्याचं लग्न नुकतंच झालं होतं. मी भाऊंना म्हटलं, 'आपण काय करायचं आता? त्याचं लग्न नुकतंच झालंय, त्याचा संसार कसा चालणार?' तर भाऊ (पाध्ये) म्हणाला, 'हा विचार त्याने चळवळीत उतरण्याआधी करायला हवा होता. अरे या लोकांना कळायला नको? चळवळीत काम करायचं असेल तर कशाला करता लग्नबिग्न!'


आता खरंतर भाऊ पाध्येही कामगार चळवळीतला. त्याचंही लग्न झालेलं. आणि त्याची बायकोही त्याच आणीबाणीत तुरुंगात गेलेली. पण तो म्हणाला, 'हे लोक चळवळी करणार, तुरुंगात जाणार आणि यांची बायकापोरं आम्ही पोसणार काय?' पण ते तेवढंच. नंतर भाऊ पाध्ये, मी आणि इतर मित्रांनी मिळून तो जेलमध्ये असताना त्याचं घर सांभाळलं.

**मी : तुम्ही चित्रपटाविषयी काही सांगत होतात.**

**सामंत :** (हसतात) मी आणि चंद्रकांत खोत दोघे मिळून असंच एका चहाच्या टपरीवर कटिंग पिता पिता ठरवलं की एक सिनेमा बनवायचा. बस्स. आणि काम सुरू झालं. आम्ही कथा निवडल्या आणि मौजच्या ऑफिसमध्ये ग. रा. कामत येत. ते सिनेमाशी संबंधित होते. त्यामुळे चंद्रकांत खोत आणि मी त्यांच्याकडे गेलो. म्हणालो, आम्हाला सिनेमा करायचाय.' त्यांनी विचारलं, 'तुमच्याकडे किती पैसे आहेत?' आम्ही म्हणालो, 'काहीच नाही. पण आम्ही जमा करू. तर म्हणाले, 'कोणत्या कथेवर करायचाय सिनेमा?' आम्ही म्हणालो, 'बनगरवाडी. तर म्हणाले, 'त्याचा नाद सोडा. जब्बार पटेलने त्याचे हक्क घेऊन ठेवले आहेत. दुसरं काय ते सांगा.' तर आम्ही दोन-तीन कथा सांगितल्या. म्हणालो, जीएंची 'गुंतवळ', खानोलकरांची 'सनई' वगैरे वगैरे. सनई तर विदाऊट डायलॉग करायची आहे. त्यांनी विचारलं, 'या फिल्म बघणार कोण?' तर आम्ही म्हणालो, 'आम्हीच.' (मी हसतो)

तर म्हणाले, 'या कथा काही तुम्हाला पैसे कमवून देणार नाहीत.' आम्ही म्हणालो, 'माहीत आहे. तरी आम्हाला या कथांवरच सिनेमा करायचा आहे.' तसं त्यांनी एका सेटवर बोलवलं. मग आम्ही सेटवर गेलो तर तिथे दत्ता डावजेकर होते. ग. रा. कामतांनी दत्ता डावजेकरांशी ओळख करून दिली आणि त्यांना म्हणाले, 'या मुलांना सिनेमा करायचा आहे. दत्ता डावजेकर त्या वेळी कोणता तरी सिनेमा करत होते आणि त्या सिनेमाचे डायरेक्टर होते पद्मनाभ बांदोडकर. दत्ता डावजेकरांनी पद्मनाभ बांदोडकरांना बोलावलं आणि सांगितलं की 'ही पोरं कवी आहेत आणि यांना चित्रपट करायचा आहे.' तेव्हा पद्मनाभ बांदोडकर म्हणाले, 'मी २५ वर्षे

**वसंत दत्तात्रय गुर्जरांनी वर येऊन श्रीपुंना निवेदन दिलं, की आम्ही 'सत्यकथे'ची 'होळी' करण्याचे ठरविले आहे. त्याआधी त्यांनी केलेलं विधान गाजलेलं होतंच. ते म्हणाले होते की 'सत्यकथे'चा भागवत संप्रदाय झाला आहे.' वसंत दत्तात्रय गुर्जरांनी दिलेलं पत्र वाचून श्रीपुंनी राम पटवर्धनांना वर बोलावलं आणि पटवर्धनांना सांगितलं की, 'यांनी 'सत्यकथे'चे अंक प्रतीकात्मकरीत्या जाळून सत्यकथेचा निषेध करण्याचं ठरवलं आहे. तेव्हा यांना लागतील तेवढे अंक द्या.' राम पटवर्धन 'ठीक आहे. या, देतो अंक', असं म्हणून खाली गेले आणि वसंत दत्तात्रय गुर्जर व इतर सहकारी वळणार तोच श्रीपु म्हणाले, 'अंक जाळताय तर जाळा. पण तेवढं ठिणग्या इतर कुठे उडू नये याची काळजी घ्या.'**




**मी वृत्तात फार लिहिलं नाही. किंवा येतं ते असंच मुक्तछंदात. याचं कारण मला छंद सुरांचा असला तरी माझ्या आतील लय मात्र मुक्त असावी असं वाटतं.**

घालवल्यावर खोसलांनी मला एक सिनेमा करायला दिला. यांची अजून वयाची २५ संपली नाहीत.'

पण आम्ही ध्यास सोडला नाही. त्या वेळी मराठा मंदिरमध्ये बंगाली भाषेचे वर्ग चालत. आम्ही फिल्म मृणाल सेन, सत्यजित राय यांच्यासारख्या असाव्यात आणि त्यांचे सिनेमा भाषेतील बारकाव्यांसह पुन्हा पाहू आणि शिकू म्हणून मग बंगाली शिकण्याचे ठरवले आणि बंगाली भाषेच्या वर्गात प्रवेश घेतला. पण मागच्या बाकावर बसून चंद्रकांत आणि आमच्या गमज्याच चालायच्या. नंतर लक्षात आलं की आपल्यामुळे सगळा वर्ग डिस्टर्ब होतोय. त्यांना गंभीरपणे करिअर म्हणून भाषा शिकायची होती आणि आम्हाला चित्रपट शिकण्यासाठी. म्हणून मग आम्ही त्या वर्गाला जाणंच बंद केलं, तर महिन्याभराने त्या वर्गाचे शिक्षक पत्ता शोधत शोधत आमच्या घरी आले आणि विचारलं, तुम्ही दोघे क्लासला का येत नाही? मी कारण सांगितलं तसं म्हणाले, 'असं नका करू. तुम्ही क्लासला येत चला. तुम्ही होता तोवर वर्गात जिवंतपणा होता. तुम्ही येणं बंद केलंत आणि वर्गातला जिवंतपणा संपला. आता मलाही शिकवायला मजा येत नाही.'

नंतर गरांनी आम्हाला कॅप्टन लिमये नावाच्या माणसांकडे पाठवलं. त्यानेही तेच विचारलं, 'तुम्ही सुसाइड करायच्या मागे का लागला आहात?' पण आम्हाला ते माध्यम हाताळायचं होतं. नव्या गोष्टी, नवे रस्ते शोधण्याचा तो काळ होता. आणि मला वाटतं आम्ही तेच करत होतो.

**मी : सर तुम्ही लिटिल मॅगझिन चळवळ जवळून पाहिली आहे. लिटिल मॅगझिन चळवळीत तुम्ही सामील होतात. पण त्याच वेळी तुम्ही 'मौज'मध्ये काम करत होतात? तुमच्या कविता 'सत्यकथे'त प्रकाशित होत होत्या.**

**सामंत :** लिटिल मॅगझिन चळवळ प्रस्थापितांच्या विरोधातली चळवळ होती. त्यात वसंत दत्तात्रय गुर्जर, सतीश काळसेकर, नामदेव ढसाळ, राजा ढाले ही सगळी मंडळी मित्र होती. त्यामुळे मग मीही त्यांच्यासोबत असायचो.

एक फार छान आठवण सांगतो तुला. 'सत्यकथे'ची 'होळी' करण्याचा निर्णय या लोकांनी घेतला तेव्हा 'मौज'मध्ये कामाला लागून मला महिनासहा महिने झाले असावेत. तरी मी त्यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला. मग ज्या दिवशी होळी करायची त्या दिवशी पाच वाजेच्या आसपास वसंत दत्तात्रय गुर्जर, तुळशी परब, मनोहर ओक, काळसेकर, ढाले अशी सगळी मंडळी 'मौज'च्या गल्लीत जमली. मी वर मौजच्या ऑफिसमध्ये काम करत होतो. वसंत दत्तात्रय गुर्जरांनी वर येऊन श्रीपुंना निवेदन दिलं, की आम्ही 'सत्यकथे'ची 'होळी' करण्याचे ठरविले आहे. त्याआधी त्यांनी केलेलं विधान गाजलेलं होतंच. ते म्हणाले होते की, 'सत्यकथे'चा भागवत संप्रदाय झाला आहे.' वसंत दत्तात्रय गुर्जरांनी दिलेलं पत्र वाचून श्रीपुंनी राम पटवर्धनांना वर बोलावलं आणि पटवर्धनांना सांगितलं की, 'यांनी 'सत्यकथे'चे अंक प्रतीकात्मकरीत्या जाळून सत्यकथेचा निषेध करण्याचं ठरवलं आहे. तेव्हा यांना लागतील तेवढे अंक द्या. राम पटवर्धन 'ठीक आहे. या, देतो अंक' असं म्हणून खाली गेले आणि वसंत दत्तात्रय गुर्जर व इतर सहकारी वळणार तोच श्रीपु म्हणाले, 'अंक जाळताय तर जाळा. पण तेवढं ठिणग्या इतर कुठे उडू नये याची काळजी घ्या. कागद आहेत सगळीकडे. नुकसान होईल.' एवढा मोठ्या मनाचे होते श्रीपु.

**मी : मग पुढे काय झालं?**

**सामंत :** साडे पाच वाजले होते. सहाची वेळ ठरली होती. माझी ड्युटी साडेपाच वाजता संपताच मी भीत भीत श्रीपुंकडे गेलो आणि म्हणालो, 'मला परवानगी हवी आहे.' ते म्हणाले, 'कसली?' मी म्हटलं, 'ते 'सत्यकथे'ची होळी करणार आहेत. त्यात मीही सामील होणार आहे. तेव्हा तुमची काही हरकत आहे का? तर श्रीपु शांतपणे म्हणाले, 'नाही. माझी काहीच हरकत नाही.'

आणि मग मी खाली गेलो आणि ज्या ऑफिसमध्ये मी काम करत होतो त्याच ऑफिसच्या खाली, माझं कार्यालय जे अंक काढत होतं, त्याच अंकांची होळी करणाऱ्यांत सामील झालो. पण श्रीपु आणि राम पटवर्धनांचा

मोठेपणा एवढा की दुसऱ्या दिवशी मी कामावर गेलो आणि कुणीच मला कालच्या घटनेबाबत बोललं नाही. त्या दिवशी तर नाहीच, पण त्यानंतरही कधीच कुणी त्या विषयावर मला टोमणा मारला किंवा उल्लेख केला असंही घडलं नाही कधीच.

**मी : पण मग ही लिटिल मॅगझिन चळवळ बंद पडली. याचं कारण काय असावं?**

**सामंत :** कारण एकच... नंतर तेही प्रस्थापित झाले. लिटिल मॅगझिन चळवळ हा नवोदितांचा प्रस्थापितांविरोधातला लढा होता. त्यामुळे या नवोदितांना आवाज मिळाला, त्यांची ओळख मिळाली आणि मग 'सत्यकथे'तून नाही तर इतर ठिकाणांहून त्यांचा प्रवास प्रस्थापित असण्याकडे जसजसा सुरू झाला, तसतसा लिटिल मॅगझिन चळवळीतला जोर संपू लागला. काही चळवळीत स्थिरावले, त्यात व्यस्त झाले, काही संशोधन, काही इतर गोष्टींत आपापलं नाव मिळवू लागले आणि मग चळवळीत कुणी फार राहिलं नाही.

**मी : तुम्ही मघाशी म्हणालात की लहानपणी तुम्ही वाद्यं वाजवायचात. याचा अर्थ लहानपणापासूनच तुम्हाला लय, सूर आणि ताल यांची ओळख होती. पण असं असताना तुमच्या कविता वृत्तछंदात नसतात. याचे कारण काय असावे?**

**सामंत :** लहानपणी खरंच मी वाद्यं चांगली वाजवायचो. आजही वेळ आणि मन असेल तर काढून वाजवत बसतो. मला आठवतंय आठवी ते दहावी मी बुलबुलतरंग वाजवायचो लग्नात. आमचे एक भोईर नावाचे बँडमास्तर होते. त्यांनी मला तयार केला होता. आणि मी छान वाजवायचो. त्यामुळे कुठेही काही कार्यक्रम वा ऑर्केस्ट्रा असेल तर ते मलाच बोलवायचे. एकदा माझी सहामाही परीक्षा चालू होती आणि त्यांचा मला फोन आला, 'अरे गुरू, अशा अशा ठिकाणी एक सोहळा आहे आणि त्यात त्यांना कुणीतरी परफॉर्मर हवा आहे तेव्हा तू जरा जाशील का?' आता त्यांना नाही कसं म्हणणार? म्हणून मी गेलो आणि 'कुहू कुहू बोले कोयलीया' हे गाणं वाजवलं. त्यानंतर एका माणसाने मला एका बाईकडे नेलं. ती बाई उच्च खानदानातली, तिच्या बोलण्या, वागण्यात आब. ती मला एक कार्ड देत म्हणाली, 'कधीही काही गरज लागली तर यांच्याकडे जायचं.' मी कार्ड वाचलं तर त्यावर 'अविनाश व्यास' हे नाव. ती म्हणाली, हे माझ्या मिस्टरांचं कार्ड. त्यांचा स्वत:चा ऑर्केस्ट्रा आहे. देशविदेशात ते शो करत असतात. तू त्यांना जॉईन होऊ शकतोस. चांगले पैसेही मिळतील.' पण परीक्षेच्या नादात मी विसरलो आणि नंतर गेलो नाही. मग मामांना कळलं तेव्हा ते कार्ड पाहून उडालेच ते. म्हणाले, 'अरे तू गेला का नाहीस? खूप मोठा माणूस आहे हा. दरवर्षी मुलांचा ऑर्केस्ट्रा देशविदेशात नेत असतो. पैसेही चांगले देतो आणि परीक्षेच्या वेळेस सुटी असते. मॅड आहेस!' त्या वेळी मी जर गेलो असतो तर मला वाटतं आज मी इथे नसतो. कवितेत नसतो. माहीत नाही.

आता लयीतल्या कवितांविषयी म्हणायचं तर तू म्हणतोयस ते खरं आहे. मी वृत्तात फार लिहिलं नाही. किंवा येतं ते असंच मुक्तछंदात. याचं कारण मला छंद सुरांचा असला तरी माझ्या आतील लय मात्र मुक्त असावी असं वाटतं. त्यात मर्ढेकर आणि पु.शि. रेगेंचा प्रभाव माझ्यावर त्या वेळी खूपच होता. तेही कारण असू शकेल.

या प्रभावाची एक मजेशीर आठवण तुला सांगतो. त्या वेळी कुठेतरी एक कविता स्पर्धा होती. कुठे होती? हं... केसी कॉलेज... केसी कॉलेजमध्ये एक कविता स्पर्धा होती. आणि परीक्षक होते रमेश तेंडुलकर. मी माझी कविता म्हटली आणि खूप चांगल्या टाळ्या झाल्या. जोरदार प्रतिसाद मिळाला माझ्या कवितेला. सगळ्या मुलांचं म्हणणं पडलं की गुरुनाथ सामंतलाच पारितोषिक मिळणार. पण निकाल जाहीर होताच सगळ्यांना आश्चर्य वाटलं. तेंडुलकरांनी मला अगदी उत्तेजनार्थही दिलं नव्हतं. काहीच नाही. पण त्यांनी त्यांच्या भाषणात माझा आवर्जून उल्लेख केला. ते म्हणाले, 'गुरुनाथ सामंत या मुलाची कविता अप्रतिम होती पण त्यावर मर्ढेकर आणि पु. शि. रेगे या दोघांचा प्रभाव दिसतो. त्यामुळे त्याला पारितोषिक दिले तर तो या प्रभावातच लिहीत राहील. म्हणून मी त्याला पारितोषिक देत नाही. तसं केलं तरच त्याला त्याची स्वत:ची

**रमेश तेंडुलकरांनी खूप योग्य केलं होतं. त्यांनी तसं केलं म्हणूनच नंतर मला माझी कविता सापडली.**

**कविता पूर्वी सोपी होती. आता कविता कठीण झाली आणि बोल्डही झाली.  त्यामुळे सामुहिक वाचन वा घरात वाचन कमी झालं असावं. त्यात भरमसाठ कविता संग्रह येऊ लागले हे सुध्दा एक कारण असू शकतं.  जे लिहिलं जतं ते साहित्य असा एक समज तयार झाला.**

कविता सापडेल.'

रमेश तेंडुलकरांनी खूप योग्य केलं होतं. त्यांनी तसं केलं म्हणूनच नंतर मला माझी कविता सापडली. त्या निकालानंतर मी खूप दिवस निराश झालो होतो. काही लिहिलं की वाटायचं हे आपण मर्ढेकरांसारखं लिहितोय का? हे आपण पु. शि. रेग्यांसारखं लिहितोय का? मग खूप दिवस काहीच लिहिलं नाही. खूप कठीण होते ते दिवस. पण त्यामुळेच मला माझी लय सापडली. माझा छंद सापडला. त्यानंतर रमेश तेंडुलकरांशी चांगले सूर जुळले.

**मी : कवितेसाठी तुम्ही संपूर्ण आयुष्य दान केलंत. आज या क्षणी काय वाटतं? कवितेने तुम्हाला काय दिलं?**

**सामंत :** कवितेने मला जगण्याचं भान दिलं. आत्मविश्वास दिला. त्या वेळी दम्याच्या विकारामुळे मी बाहेर जायचो नाही. आजही मी फार लोकांत जात नाही. पण कवितेने मला आत्मविश्वास दिला. माझी संवादाची भूक कवितेने भागवली. कवितेशिवाय कोंडलेपण जाणवत होतं. त्याचा निचरा झाला. माझ्या आतले असे विस्कळीतपण कवितेत उतरताना वाटायचं की या भिकार कविता कोण छापणार? पण राम पटवर्धनांनी कविता वाचल्या आणि म्हणाले, 'छान आहे.'

माझ्या कविता विजय तेंडुलकरांना खूप आवडायच्या. त्र्यं. वि. सरदेशमुख, विजय तेंडुलकर, सुनील कर्णिक, वसंत पाटणकर अशी खूप माणसे मला कवितेने दिली. राम पटवर्धन, श्रीपुंसारखे गुरुतुल्य मार्गदर्शक दिले. वाचक दिले, प्रेम दिलं.

विजय तेंडुलकर तर नेहमी म्हणायचे की, कविता घेऊन त्या गुरूला पाठवा माझ्याकडे. माझं 'गुरुचरित्र' आल्यावर त्यांनी मला फोन केला आणि म्हणाले, 'सगळं कुटुंब एकत्र करून मी तुझ्या कवितांचं वाचन केलंय.' एवढं प्रेम करणारी माणसं मला कवितेने दिली. त्यांनी 'जाहीरनामा' नावाचं मासिक सुरू केलं तेव्हा हट्ट धरला की या मासिकासाठी संपादक म्हणून गुरूच हवा. मला व्यस्ततेमुळे ते शक्य नव्हतं तेव्हा कसंतरी करून मी ती जबाबदारी सुनील कर्णिककडे दिली. जाण्याआधी एकदा तेंडुलकर म्हणाले, 'तू काही येत नाहीस बोलावून. आता शेवटी मलाच तुझ्याकडे यावं लागेल.' ती भेट राहून गेली.

**मी : तुमच्या कवितेचा चाहता वर्ग मोठा आहे. पण तरीही तुमचा कवितासंग्रह प्रकाशित होण्याचा वेग कमी आहे. असं का?**

**सामंत :** मी मघाशीच सांगितलं तसं पहिलं कारण माझाच विस्कळीतपणा. मी माझ्या कविता लिहून एका ठिकाणी ठेवणं, हे माझ्या सवयीत नाही. त्यामुळे मलाच खूप वेळा माझ्या कविता सापडत नाहीत. सापडत नाहीत म्हणजे गहाळच होतात त्या. त्यामुळे संग्रह काढायचं तर या सगळ्या कविता शोधण्याचं अवघड काम माझ्यावर पडतं आणि त्या कामाला मी नाखूश असतो. अर्थात त्या शोधण्यासाठी वेळ लागतो, जो माझ्याकडे नसतो. अगदी माझ्या पहिल्या कवितासंग्रहाचं श्रेय मी सुनील कर्णिकांना आणि वसंत पाटणकरांना देतो. कारण त्यांनीच कुठे कुठे प्रकाशित झालेल्या कवितांची कात्रणं ठेवून, इतरांकडून गोळा करून तो कवितासंग्रह काढला.

यानंतर दुसरं कारण म्हणजे कामातली व्यस्तता. 'मौज'मधलं पुस्तकांचं काम एवढं प्रचंड आहे की त्यामुळे स्वत:च्या संग्रहाचं नेहमीच मागे पडत राहिलं. खूप महत्त्वाची पुस्तकं रांगेत उभी आहेत. त्यामुळे ते काम आधी करावं असंच वाटत आलं मला नेहमी. आणि त्यामुळेच माझ्या स्वत:च्या कवितासंग्रहाचं काम राहून गेलं असावं.

तुला एक आठवण सांगतो. तेव्हा गुरुनाथ धुरी नव्यानंच पुढे येत होता. त्याच्या कविताही छान होत्या. 'सत्यकथे'तून यायच्या. लोकांना आवडायच्या. मी त्याच्या संग्रहाचं मनावर घेतलं आणि श्रीपुंच्या मागे लागलो की गुरुनाथ धुरीचा संग्रह आपण काढूया. शेवटी खूपदा सांगितल्यावर श्रीपु एकदा म्हणाले, 'अहो गुरुनाथ, धुरींचा संग्रह आपण काढूच, पण तुमचा संग्रह कुठेय? तोही काढायला हवा. हस्तलिखित द्या.

**मी : आज कविता लोकांपासून दूर गेली आहे का? पूर्वी लोकांच्या बोलण्यात कवितेच्या ओळी यायच्या. त्याच्या नेहमीच्या जगण्यात कवितेच्या ओळी असायच्या.  पण आजकाल कविता फक्त**

**निवेदनात वापरली जाते. सामान्य माणूस पूर्वी झोपाळ्यावर बसून निवांत क्षणी कविता म्हणायचा. आज अंताक्षरी खेळतो, हौजी खेळतो. कवितेविषयी हे औदासीन्य कशामुळे आलं?**

**सामंत :** लोकांना गाणं आवडतं. पूर्वीही लोक गाणी ऐकायचे. आजही ऐकतात. कारण गाणं सोप असतं. कवितेचं तसं राहिलं नाही. पूर्वी लोक कविता ऐकायचे. आज कमी ऐकतात. पूर्वी कवितेचे कार्यक्रम व्हायचे. आजही होतात पण त्यात सोप्या कविता म्हणाव्या लागतात. अवघड कविता लगेच पोहचत नाहीत. कविता पूर्वी सोपी होती. आता कविता कठीण झाली आणि बोल्डही झाली. त्यामुळे सामूहिक वाचन वा घरात वाचन कमी झालं असावं.

त्यात भरमसाठ कवितासंग्रह येऊ लागले हे सुद्धा एक कारण असू शकतं. जे लिहिलं जातं ते साहित्य असा एक समज तयार झाला. त्यामुळे लिहिलं खूप जाऊ लागलं आणि वाचक तेच राहिले. त्यात त्यांच्यापुढे सरसकट सगळंच येऊ लागलं, संपादनाशिवाय. साहित्यावर संपादन होणं आवश्यक असतं या मताचा मी आहे.

तिसरं मला वाटतं तसंही कविता पूर्वीपासूनच मागेच राहिली होती. कविता म्हणजे विचार करण्याची गोष्ट. आणि त्याला फारसं कुणी उत्सुक नसतंच. त्यात लोकांना सध्या टाईमपास मिळाला आहे. सिनेमा आहे, टीव्ही आहे, मोबाइल आहे, खूपच आहे. आणि सगळं डोक्याला ताप न देणारं आणि वेळ मजेत घालवणाऱ्या गोष्टी आहेत त्यात अशा डोकेफोड करणाऱ्या गोष्टी कोण कशाला विकत घेईल?

**मी : 'मौनराग' या महेश एलकुंचवारांच्या पुस्तकात एलकुंचवार एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करतात. ते लिहितात की नर्तकांना नियमितपणे नृत्याचा सराव करावा लागतो, गायकाला नियमितपणे रियाज करावा लागतो. तसा काही रियाज वा सराव लेखक-कवींना आवश्यक असतो का? काय वाटतं तुम्हाला?**

**सामंत :** पटवर्धनही हा प्रश्न विचारायचे. रियाज जरुरीचं आहे. तपश्चर्या जरुरी आहे. पण कवितेचा रियाज वेगळा असतो. पूर्वसुरींच्या कवितांचे वाचन, मनन, चिंतन पुन्हा पुन्हा करणे आणि सगळ्या कलांशी जवळीक साधणे हा एक रियाजाचा प्रकार असू शकतो. इतर कलांमधून प्रवाहित होणाऱ्या जाणिवांमुळेही तुम्ही समृद्ध होऊ लागता. तुमच्या आतल्या कवितेच्या रसायनाला त्यामुळे खतपाणी मिळू लागतं. कलात्मकतेने विचार करण्याची वृत्ती वाढीस लागते आणि इतर कलांतून दिसलेले, जाणवलेले विषय, अर्थ तुम्हाला नवी दृष्टी देतात. दुसरा रियाजाचा महत्त्वाचा प्रकार म्हणजे वेळोवेळी आपल्यातल्या कवीचा अहंकार ठेचणे. खूप कवी म्हणतात, 'ही कविता मला अचानक सुचली, स्फुरली.' झूट आहे हे. त्या सुचण्याआधी त्या बाबतच्या विचारप्रक्रियेला कुठेतरी खूप आधी सुरुवात झालेली असते. कविता ही घुसळण असते विचारांची! ती चालूच असते तुमच्या आत सतत. आणि त्यातून एखाद्या क्षणी वर येते ती कविता. या विचारप्रक्रियेत आधीच्या कवितांचे फॉर्म असतात. त्यातले शब्द असतात. खूप कवी म्हणतात, 'हा नवा शब्द मी बनवला आहे.' पण त्या शब्दाला कुठेतरी पाया असतोच की नाही. पण काही कवींना आपल्याला कविता सुचते याचा एवढा अहंकार असतो की तो अहंकारच त्यांच्या कवितेला मारक ठरू लागतो. म्हणूनच रियाजाचा भाग दुसरा असा की आपल्यातला अहंकार ठेचण्याचा सराव हवा.

कवितेच्या रियाजाचा तिसरा आणि महत्त्वाचा भाग असा की स्वत:ला चॅलेंज करत राहणं. कवीनं स्वत;ला चॅलेंज करत रहायला हवं. मला हे का सुचलं? कसं सुचलं? याविषयी विचार करत राहायला हवं. 'न कळे कुठून होते कविता' हा फालतूपणा आहे. आपल्या एका चांगल्या कवितेवर समाधानी न राहता त्या कवितेच्या पुढे जाणारी कविता कशी बाहेर येईल याचा विचार करायला हवा आणि म्हणून पुन्हा पुन्हा स्वत:ला हरवण्यासाठी स्वत:च्या आणि इतरांच्या कवितांचा अभ्यास करायला हवा. कविता लिहून झाल्यावर त्यावर संस्करण करायला हवं.

**मी : तुमच्या कवितांत आयुष्याचा आणि जीवनाचा अन्वयार्थ शोधण्याचा प्रयत्न कवी करताना दिसतो. हा शोध आध्यात्मिक आहे. पण**

**दुसरा रियाजाचा महत्त्वाचा प्रकार म्हणजे वेळोवेळी आपल्यातल्या कवीचा अहंकार ठेचणे. खूप कवी म्हणतात, 'ही कविता मला अचानक सुचली, स्फुरली.' झूट आहे हे....**

**कवितेच्या रियाजाचा तिसरा आणि महत्त्वाचा भाग असा की स्वत:ला चॅलेंज करत राहणं. कवीनं स्वत;ला चॅलेंज करत राहायला हवं. मला हे का सुचलं? कसं सुचलं? याविषयी विचार करत राहायला हवं. 'न कळे कुठून होते कविता' हा फालतूपणा आहे.**

**तुमच्या कवितांतला कवी देवत्व न मानणारा दिसतो. हा कवी विज्ञानशरण नाही आणि देवशरणही नाही. तो फक्त माणूस आहे. त्याला सत्य जाणवतं ते विसावं शतक ओलांडताना आपली चड्डी घरंगळतेय याचं भान सुटून ते चौखूर रांगत येतंय...**

**आता विश्वात्मके देवे, येणे वागयज्ञे कोपावे, कोपोनी (तरी) त्यास द्यावे, तुमानदान हे!!**

**'कंबरेचं सोडलेल्या माणसाला तुमानदान द्यावे' ही कवीची अपेक्षा आहे. तुमच्या पहिल्या संग्रहातील बहुतांशी कविता पर्सनल पोएट्री होती. दुसऱ्या 'प्लीज' संग्रहातील काही कविता अशा समाजभान देणाऱ्या दिसतात. याचं कारण काय असावं?**


**सामंत :** तुझं निरीक्षण बरोबर आहे. नंतर नंतर माझ्या कवितांचे विषय बदलले आहेत. पण अजूनही काही वेळा पर्सनल पोएट्री येते. 'प्लीज'मध्ये मात्र काही कविता आहेत त्या पूर्वीच्या आहेत ज्या 'गुरुचरित्र'मध्ये नाही आल्या किंवा मिळाल्या नाहीत त्या 'प्लीज'मध्ये समाविष्ट झाल्या आहेत.

**मी : मराठी काव्यसमीक्षा वाचकाभिमुख आणि परिपूर्ण आहे का? तुम्हाला काय वाटतं?**

**सामंत :** नक्कीच नाही. मराठी काव्यसमीक्षा वाचकाभिमुख नाही. बोजड आहे. ती तशी करून ठेवली आहे की काय असं वाटावं इतपत ती बोजड आहे. मला मान्य आहे की काही विषयांची ती गरज असते. जसं विज्ञान हा विषय तुम्ही सोपा करून लोकांच्या भाषेत नाही सांगू शकत. तसं काही कवितांबाबत होऊ शकतं. पण वाचकांनी कवितेकडे वळावं, कविता समजून घ्यावी यासाठी काव्यसमीक्षा आहे हा मूळ विचारच काव्यसमीक्षेत हरवत असेल तर कुठेतरी गफलत होतेय किंवा चूक होत आहे असं मला वाटतं. माधव आचवलांचं, 'जास्वंद', त्र्यं. वि. सरदेशमुख यांचं 'अंधारी यात्रा' आणि 'शारदीय चंद्रकळा', म. वि. राजाध्यक्ष यांचं 'पाच कवी', म. वा. धोंड, रसाळ, विजया राजाध्यक्ष, यांची पुस्तके. ना. ग. जोशी यांचं 'गीत मंजुषा' ही मराठी काव्यसमीक्षेतली खूप चांगली पुस्तके आहेत. समीक्षा वाचकांना कविता समजावून सांगणारी असायला हवी; पण उलट समीक्षा आयव्हरी टॉवरमध्ये नेऊन बसवली गेली आहे. आणि लोक समीक्षा वाचत नाहीत असं नाही. लोकांना कविता समजावून घ्यायची आहे. त्यासाठी त्यांना समीक्षाही वाचायची आहे. उदाहरणच द्यायचं झालं तर पुस्तक परीक्षण लोक वाचतात आणि त्याचा परिणाम लगेच बुक डेपोतल्या पुस्ततक विक्रीवर दिसतो. तेव्हा समीक्षा वाचकांना हवी आहे पण त्यांना आकलन होणारी हवी आहे. कविता समजावून देणारी हवी आहे. अगदी अरुण कोलटकरची समीक्षाही खूप नंतर 'जेजुरी' वगैरे आल्यावर झाली. खूप जणांच्या कवितांवर समीक्षा झालीच नाही. हा बॅकलॉग खूप मोठा आहे. आणि तो लवकरात लवकर पूर्ण व्हायला हवा. तरच कवितेकडे लोक नव्याने वळतील.

**– गुरुनाथ सामंत**

भ्रमणध्वनी : ९९६७२०९८८२



कवितेच्या रियाजाचा महत्त्वाचा प्रकार म्हणजे वेळोवेळी आपल्यातल्या कवीचा अहंकार ठेचणे.

**(गुरुनाथ सामंत)**

पहिले चार संच अतिशय लोकप्रिय झाल्यानंतर प्रकाशित होत आहे –

ह्या संचात अगाथा ख्रिस्तीच्या हर्क्युल पायरो ह्या मानसपुत्राची
शेवटची रोमहर्षक शोधकथा

**'क्वीन ऑफ क्राइम' तुमच्या घरी**

संच ५
६ पुस्तके
१७८० पृष्ठे



# अगाथा ख्रिस्ती

जिच्या पुस्तकांच्या खपाची तुलना फक्त बायबल आणि शेक्सपिअर यांच्याबरोबरच होऊ शकते
अशी रहस्यकथेची सम्राज्ञी मराठीत प्रथमच

HERCULE POIROT

**नवीन पाचवा संच**

**अनुवाद : रेखा देशपांडे**

थ्री ॲक्ट ट्रॅजेडी ◆ डम्ब विटनेस
द मर्डर ऑफ रॉजर ॲक्रॉयड ◆ मर्डर इन मेसोपोटेमिया
मिसेस मॅकगिंटी इज डेड ◆ कर्टन : पायरोज लास्ट केस

पद्मगंधाच्या सर्व पुस्तकांवर २०% सवलत
ऑनलाईन पेमेंट सुविधा उपलब्ध

**या संचाची एकत्रित किंमत : रुपये १८०० / सवलत मूल्य : रुपये १२५० फक्त**
**सवलतीची नोंदणी : ३० सप्टेंबर २०१६ पर्यंत / एका संचास टपाल खर्च रु. ५०**

**संच ४ - ६ पुस्तके । मूळ किंमत १५७० रु. । सवलत मूल्य १०५० रु.**
**संच ३ - ७ पुस्तके । मूळ किंमत १४३० रु. । सवलत मूल्य १०७० रु.**
**संच २ - १० पुस्तके । मूळ किंमत १८०० रु. । सवलत मूल्य १३५० रु.**
**संच १ - १० पुस्तके । मूळ किंमत १५३० रु. । सवलत मूल्य ११५० रु.**


४ संच सवलतीत ४६०० रु.

**या एकत्रित पाचही संचातील ३९ पुस्तकांची किंमत : ₹ ८१३०**

**सवलत मूल्य : ₹४९०० ( + ट. ख. २५०)**

Online at www.padmagandha.com Book Delivery In Within Five Working Days.
Online Payment Facility Available. 20% Discount On All Titles

**पद्मगंधा प्रकाशन** १९६६, तारा-भुवन, माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे-४११०३० www.padmagandha.com
फोन : (०२०) २४४५०२६० मो. : ७३५०८३९१७६ E-mail : p.padmagandha@gmail.com



# त्यामुळे मी पुन्हा कथात्म साहित्याकडे वळलो नसेन...

**प्रा. वसंत आबाजी डहाके**

**मी पुढे कथा वा कादंबऱ्या लिहिल्या नाहीत, नाटकं लिहिली नाहीत; यामुळे आपण काही गमावलं असं मला वाटत नाही. प्रत्येक साहित्यप्रकार हे लेखकासाठी एक आवाहन असतं आणि आव्हानही असतं.**

**'निष्ठा** फक्त कवितेशी' हे शीर्षक थोडं आग्रही वळणाचं आहे. मागे वळून पाहतो तेव्हा केवळ कवितालेखन आणि कवितेशिवाय इतर कोणत्याही प्रकारातलं लिखाण नाही अशी फार थोडी उदाहरणं सापडतील. अगदी मर्ढेकरांपासून पाहिलं तरी ते आणि त्यांचे समकालीन कवितेखेरीज अन्य लेखन करीत होते असं दिसतं. पुरुषोत्तम शिवराम रेगे, बा. भ. बोरकर, विंदा करंदीकर, मंगेश पाडगांवकर, बसंत बापट, सदानंद रेगे, इंदिरा संत, इत्यादी; पुढच्या पिढीतले मधुकर केचे, आरती प्रभू (चिं. त्र्यं. खानोलकर), दिलीप पुरुषोत्तम चित्रे, मनोहर ओक, भालचंद्र नेमाडे, विलास सारंग, ग्रेस, ना. धों. महानोर, नामदेव ढसाळ, चंद्रकांत पाटील, प्रभा गणोरकर, अरुणा ढेरे, चंद्रकांत खोत, विवेक मोहन राजापुरे, नीरजा, कविता महाजन, प्रज्ञा दया पवार, श्रीधर तिळवे, सचिन केतकर, प्रवीण दशरथ बांदेकर, रमेश इंगळे उत्रादकर इत्यादी. आणखीही बरेच लोक आहेत, उदाहरणादाखल ही नावं लिहिली आहेत.

माझ्या बाबतीत सांगायचं तर मी कवितेखेरीज थोड्या कथा लिहिल्या, तीन छोट्या कादंबऱ्या लिहिल्या, थोड्या एकांकिका-नाटकं लिहिली. ललित लेख लिहिले. भरपूर समीक्षा लिहिली. अनुवाद केले. अर्थात हे खरंच आहे की कविता हा साहित्यप्रकार माझ्या अभिव्यक्तीसाठी मला महत्त्वाचा वाटला. कथा, कादंबरी, नाटक यांच्याकडे १९८० नंतर मी वळलो नाही. ललित लेख आणि साहित्यकला-समीक्षा यांत काम करीत राहिलो. वाङ्मय-कोशांच्या प्रस्तावना लिहिल्या. कथा लिहावी, कादंबरी लिहावी, नाटक लिहावं असं मला वाटत राहिलं. तसे आराखडे मनात व कागदांवर केलेही, परंतु अन्य लेखनाच्या मग्नतेत ते बाजूला पडले. कविता लिहिण्याच्या बाबतीत मात्र कसलाही अडथळा आला नाही.

मी पुढे कथा वा कादंबऱ्या लिहिल्या नाहीत, नाटकं लिहिली नाहीत; यामुळे आपण काही गमावलं असं मला वाटत नाही. प्रत्येक साहित्यप्रकार हे लेखकासाठी एक आवाहन असतं आणि आव्हानही असतं. चित्रकलेच्या क्षेत्रात ज्याप्रमाणे पेन्सिल, चारकोल, जलरंग, ॲक्रिलिक, तैलरंग यांचा वापर करून कागद, कॅनव्हास, ताम्रपत्र, लाकडी फळ्या यांवर चित्रं काढली जातात. आम्लांकन, काष्ठचित्र इत्यादी प्रकार असतात. निसर्गचित्र, स्थिरचित्र, व्यक्तिचित्र असे विविध प्रकार असतात. विविध शैली असतात, विविध दृष्टिकोन असतात. हे सगळे चित्राभिव्यक्तीचे विविध प्रकार असतात. तसंच लेखनाबाबतही म्हणता येतं. लेखकाला, कवीला विविध साहित्यप्रकारांत काम करणं आवडतं. त्या प्रकारांत आपल्या अभिव्यक्तीला काही वेगळ्या दिशा सापडतात का हे पाहायचं असतं. प्रत्येक साहित्यप्रकारात काही शक्यता असतात. मीदेखील अशाच काही विचारातून अन्य प्रकारांत लेखन केलेलं आहे. त्यामुळे निष्ठा फक्त कवितेशी असं मी म्हणू शकत नाही. एवढं लक्षात ठेवून कविता आणि मी यांच्यातल्या संबंधांविषयी लिहिता येईल.

शाळेत, नववी-दहावीत, असल्यापासून आपण कविता लिहाव्या असं वाटू लागलेलं होतं. वाचनालयात येणाऱ्या मासिकांतल्या कविता मी वाचीत असे. 'सत्यकथा' मासिकात छापल्या जाणाऱ्या कविता आवडत असत. त्या मासिकाकडे कविता पाठवल्या, त्यांतली एक 'सत्यकथे'त छापून आली त्या वेळी मी अठरा वर्षांचा होतो. कविता लिहिणं सुरू होतं; वेगवेगळ्या मासिकांकडे कविता पाठवणं, त्यांत त्या छापून येणं, महाविद्यालयाच्या ग्रंथालयातले कवितासंग्रह वाचणं सुरूच होतं. या पलीकडे त्या वेळचं आपलं अनुभवविश्व, कल्पनाविश्व काय होतं, याचा विचार करतो तेव्हा लक्षात येतं की ते बरंचसं पुस्तकी होतं. मी आमचं कुटुंब, त्या कुटुंबाबाहेरची कुटुंबं बघत होतो; भग्न तट असलेलं चांदा नावाचं शहर आणि त्या शहरातल्या लोकांचं जगणं बघत होतो. ते मनात साठवतही होतो. बाहेरच्या जगातल्या राजकारणाच्या बातम्या वाचत होतो. निसर्गातले ऋतुमानाप्रमाणे होणारे बदल अनुभवत होतो. पुस्तकांतले आणि घरातले, रस्त्यांवरचे शब्द ऐकत होतो आणि टिपत होतो. कथा-कादंबऱ्या आणि समीक्षात्मक लेखनही वाचत होतो. मराठी साहित्य हा विषय घेतलेला असल्यानं वर्ज्य काहीच नव्हतं. गंगाधर गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकर, विशेषत: जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांनी चकित करून टाकलं होतं. श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर इत्यादिकांच्या कादंबऱ्यांतला परिसर समजून घेत होतो. बी.ए.


होईपर्यंत असंच चाललेलं होतं. कविता लिहिल्या जात, त्या छापल्या जात. तरीही मनात समाधान नव्हतं. आपण जे लिहितो आहोत त्यात विशेष काही अर्थ नाही असं जाणवत होतं. मी घडत होतो, पण माझं घडत जाणं कवितेतून व्यक्त होत नव्हतं. असं काहीतरी आपल्या आत आहे, पण ते योग्य त्या शब्दांत बाहेर येत नाही आहे असं वाटत होतं. त्यात भर म्हणून की काय एक न करमणं नावाचा प्रकार सुरू झाला होता. कुठंही, कशातही मन न रमणं. तो पौगंडावस्थेतला रोमँटिक हुरहुरपणा नसावा. अर्थात त्या वेळी त्याचं स्वरूप समजणं अवघडच होतं.

कवितेशी नातं घट्ट झालं ते तोपर्यंतच्या कविता नष्ट करण्याच्या कृतीत. हे नागपूर येथे एम.ए. करायला आलो तेव्हा घडलं. अशा प्रकारे आपलीच बरीवाईट निर्मिती नष्ट करावीशी वाटणं, ही एक चांगली गोष्ट आहे असं माझं मत झालेलं आहे. आपलं जगाचं वाचन अधिक खोल व्हायला लागलेलं असल्याचं ते चिन्ह आहे. आपण अनुभवतो ते आणि आपण लिहितो ते यांतली तफावत जाणवण्याची ती खूण आहे. एकीकडे पुस्तकं, मासिकं, साप्ताहिकं, दैनिक वर्तमानपत्रं यांचं वाचन आणि दुसरीकडे आपण ज्या घटना-प्रसंग-स्थिती यांतून जात असतो त्यांचं वाचन असं दुहेरी वाचन सुरू झालं. त्याच वेळी नागपुरात त्या वेळी असलेल्या कवी, कथा-कादंबरीकार, चित्रकार, नाटककार, रंगकर्मी यांच्याशी झडत असलेल्या चर्चा, व्यक्तिगत जगण्यातल्या विविध स्थिती आणि भोवतीच्या समाजातल्या विविध स्थिती यांचा विचित्र मेळ मनात जमायला लागला. त्यांतून ज्या कविता लिहिल्या गेल्या त्या ठेवल्या, पुस्तकांत टाकल्या. 'योगभ्रष्ट' या दीर्घकवितेच्या प्रकाशनानंतर (मे १९६६) मुंबईकडच्या समकालीन समवयस्क कवी-लेखकांच्या ओळखी होत गेल्या. पुढे ही बिरादरी वाढत, विस्तारत गेली.

आपण एक व्यक्ती म्हणून जगत असतो; कुटुंबात विविध नात्यांचे संदर्भ असतात; समाजात एक नागरिक म्हणून जगत असतो; समाजात वेगवेगळ्या भूमिका आपण करत असतो; समाजात ज्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक गतिविधी चालत असतात, त्यांचेही आपण घटक असतो. थोडक्यात, आपलं व्यक्तिगत अस्तित्व असतं, तसंच सामाजिक अस्तित्व असतं. आपण एका विशिष्ट काळात जगत असतो. आपल्या काळात आपल्या व्यक्तिगत आणि सामाजिक अस्तित्वाच्या संदर्भात उपस्थित होणाऱ्या भिन्न भिन्न स्थितींच्या संदर्भात आपण विचार करत असतो. हे सर्वच लोकांच्या बाबतीत घडत असतं. आपण लिहितो, इतकंच. जगाच्या एकंदर व्यापात आपलं लिहिणं नगण्यच असतं. असंख्य लोकांच्या असंख्य गोष्टी एकाच वेळी सुरू असतात. आपल्या स्वत:च्या संदर्भात मात्र आपलं लिहिणं नि:संशय महत्त्वाचं असतं. समोरच्या पांढऱ्या कागदावर एक काळी रेघ ओढणं हेदेखील महत्त्वाचं असतं. आपण आहोत आणि आपण आहोत याची जाणीव आपल्याला आहे याचं ते चिन्ह असतं. आपल्या असण्याची, अस्तित्वाची खूण. आपण आहोत म्हणून कविता लिहितो, असं म्हणण्याऐवजी आपण कविता लिहितो म्हणून आपण आहोत असं उलटं म्हणायचं याचा हाच अर्थ आहे.

कवी-लेखक आपापल्या काळाबद्दल, आपापल्या परिसराबद्दल लिहीत असतात. थोडक्यात, ते आपल्या काळात आणि आपल्या भोवतीच्या अवकाशात हस्तक्षेप करतात. साठ-सत्तरची दशकं हा हिंसाचाराचा, हिंस्रतेचा कालावकाश होता. तो घडणीचा काळ होता. पुढचाही काळ अस्वस्थतेचा, अशांततेचाच होता. अशा काळात मी लिहीत राहिलो. माझे समकालीन लिहीत होते. ते काय लिहीत आहेत याची मला चांगली जाणीव होती. माझ्या लिहिण्याच्या काळात माझ्या वयाच्या पुढे-मागे असलेल्या कवींचंच नव्हे तर कथात्म साहित्य लिहिणाऱ्यांचंही लेखन मी वाचत असे, आणि आजही वाचत असतो. साठ-सत्तरच्या दशकांतली पिढी काय लिहिते आहे याचं जसं मला कुतूहल होतं, तसंच आज ऐंशी-नव्वदच्या दशकांतली पिढी काय लिहिते आहे याचंही मला कुतूहल आहे. माझ्या लक्षात आलं आहे की आम्ही आपला काळ खणत असतो.

कवितेचं, आपण कविता लिहिण्याचं आपल्या कालावकाशाशी काय नातं असतं? आपण जे पाहतो, अनुभवतो, आपल्या भोवतीच्या आणि त्या पलीकडच्या जगाविषयी समजून घेत असतो, ते कविता लिहायला प्रवृत्त करतं. आपली शारीरिक, मानसिक, आत्मिक स्फुरणं कवितेतून




**समोरच्या पांढऱ्या कागदावर एक काळी रेघ ओढणं हेदेखील महत्त्वाचं असतं. आपण आहोत आणि आपण आहोत याची जाणीव आपल्याला आहे याचं ते चिन्ह असतं. आपल्या असण्याची, अस्तित्वाची खूण. आपण आहोत म्हणून कविता लिहितो, असं म्हणण्याऐवजी आपण कविता लिहितो म्हणून आपण आहोत असं उलटं म्हणायचं याचा हाच अर्थ आहे.**






व्यक्त होत जातात. आपली भावनिक आणि वैचारिक आंदोलनं कवितेतून प्रकट होऊ लागतात. आपल्या अत्यंत वैयक्तिक अवस्था आणि समाजातील व्यक्तींच्या, व्यक्तिसमूहांच्या अवस्था यांचा पीळ तयार होतो आणि तो कवितेतून येऊ लागतो. अलीकडच्या काळात मी लिहिलेल्या या काही ओळी पाहा :

अपेक्षित आणि योग्य वेळेच्या आधीच हे फळ
पिकून गेलं विसाव्या शतकाचं;
मुठीत मावतील एवढ्याही बिया हाताला
लागल्या नाहीत,
आपल्याच डाव्या-उजव्या डोळ्यांना
फसवण्याच्या चळवळी मात्र चालल्या.
आठवणींच्याही पलीकडे गेलेल्या धूसर,
धुक्यासारख्या भूतकाळातून
काळ्या घट्ट शाईसारख्या गडद वर्तमानात
फेकले गेलो अवचित...

हे मी आपल्या काळाचं केलेलं एक वाचन आहे. कवितेच्या बाबतीत हे बरोबर की चूक असा काही प्रश्न नसतो. तो एक प्रत्यय असतो. मी एका कवितेत रचनेची एक प्रक्रिया सांगितलेली आहे:

गोष्ट रचणं सोपं नसतं.
जे घडलं ते जसंच्या तसं लिहून काढायचं,
असं नसतं.
घडताना झालेली आतड्याची कुरतड
कुठं लपवायची?
जे घडलेलं असतं
त्या पलीकडे न घडलेलंही असतं.
घडलेलं दिसतं, कळतं, त्या पलीकडे
न दिसणारं, न कळणारंही असेल...

गोष्ट लिहिणं असो की कविता लिहिणं असो, समग्र वास्तव शब्दांत सामावतंच असं नसतं. आपल्या मनात जे वास्तव प्रतिबिंबित होतं, ते आपण आपल्या भावना-विचार-कल्पना यांच्या माध्यमातून कागदावर साकार करतो. जे लिहिलेलं असतं, त्यातून आपल्या मनातल्या वास्तवाला आकार मिळतो. ते आपण अनुभवलेल्या वास्तवाचं अर्थ लावणं असतं. वर म्हटलेलं आहे :

घडताना झालेली आतड्याची कुरतड
कुठं लपवायची?

...खरं तर लिहिताना झालेली आतड्याची कुरतड कुठं लपवायची हाही प्रश्न असतो. जे घडलं ते जसंच्या तसं लिहून काढायचं, असं नसतंच. त्यात ही कुरतड मिसळत असते. अनुभवलेल्या वास्तवाचा लिहिताना पुन्हा अनुभव घेणं, असं ते स्वरूप असतं. ही कुरतडही लपवता येत नाही. अर्थातच कोणत्याही कवितेला (कथेला, कादंबरीला) जे रूप मिळत असतं ते या कुरतडीमुळे. तिचं स्वरूप व्यक्तिगत वा सामाजिक असं नसतं. दोन्ही गोष्टी मिसळलेल्या असतात.

कदाचित मी कवितेतून, ललित-वैचारिक लेखनातून ही कुरतड व्यक्त करू शकत असेन, त्यामुळे मी पुन्हा कथात्म साहित्याकडे वळलो नसेन. कदाचित कविता हा रूपबंध माझ्या सर्व स्फुरणांना, प्रस्फुरणांना सामावून घेणारा असेल, म्हणून मी कविता लिहीत राहिलो असेन. मी कविता लिहायला लागलो तेव्हापासून पांढऱ्या कागदावर काळ्या रेषा ओढायला लागलो, तेही अजूनपर्यंत सुरूच आहे. त्या नि:शब्द कविता आहेत असंही म्हणता येईल.

**– प्रा. वसंत आबाजी डहाके**
भ्रमणध्वनी : ९८९०३६२७०३
vasantdahake@gmail.com

**खरंतर लिहिताना झालेली आतड्याची कुरतड कुठं लपवायची हाही प्रश्न असतो. जे घडलं ते जसंच्या तसं लिहून काढायचं, असं नसतंच. त्यात ही कुरतड मिसळत असते. अनुभवलेल्या वास्तवाचा लिहिताना पुन्हा अनुभव घेणं, असं ते स्वरूप असतं. ही कुरतडही लपवता येत नाही.**




आपण कविता लिहितो, म्हणून आपण असतो.

**(वसंत आबाजी डहाके)**

भारतीय परंपरा आणि भाषा यांची
जोपासना करणारी २ विश्वासार्ह पुस्तकं...


रोहन प्रकाशन




जगभरातील ४० भाषांमध्ये अनुवादित झालेलं
**योगाचार्य अय्यंगार** यांचं आंतरराष्ट्रीय कीर्तीचं पुस्तक
**LIGHT ON YOGA** चा मराठी अनुवाद

# योगदीपिका
## बी.के.एस. अय्यंगार

किं. रु.३९० • विशेष ऑफर रु.३४०




संस्कृत शिकायचंय...पण अवघड वाटतंय?
हसत खेळत संस्कृत शिकायची...
आणि भाषा 'एन्जॉय' करायची इच्छा असणाऱ्या प्रत्येकासाठी...

# मैत्री संस्कृतशी
## तन्मय केळकर


किं. रु.२५० • विशेष ऑफर रु.२००

१५ ऑक्टोबरपर्यंत विशेष ऑफर

रोहन प्रकाशन

५ व ६ धवलगिरी, शनिवार पेठ, पुणे ४११०३०
☎ पुणे २४४८०६८६ मो. ८१४९१२०२१०
☎ मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२

अधिक माहितीसाठी
आमच्या वेबसाईटला भेट द्या
www.rohanprakashan.com



# मराठी काव्यसमीक्षा वाचकाभिमुख आणि परिपूर्ण आहे का?

**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**

**मुळात** कविता ही 'वाचकाभिमुख' नसते आणि 'परिपूर्ण' अशी तर नसतेच नसते. ती असलीच तर कवी आणि कविताभिमुखच असते. ती मुळात पूर्ण का, कुठे आणि कशी होते हे खुद्द कवीही सांगू शकत नाही. याचे कारण वाचकाभिमुखतेसाठी वा परिपूर्णता गाठण्यासाठी कविता जन्मालाच येत नाही. तथाकथित परिपूर्णतेच्या शोधात कवी असू शकतो. परिपूर्णता ही संकल्पना मुळात दर्शनशास्त्राशी संबंधित संज्ञा आहे. हे विश्व पूर्णापासून ढळलेले असून ते पूर्णाकडे नेणे हे जीवन प्रयोजन व त्यासाठीचा प्रवास हा परिपूर्णतेसाठीचा प्रवास समजला गेला आहे. 'पूर्ण' हे तत्त्व असून ते तत्त्व 'अलौकिक' निर्गुण, निराकार समजले गेले. त्याच्याशी तादात्म्य ही परिपूर्णता. आपले सौंदर्य व साहित्यशास्त्र हे अशा संज्ञांनी भाव, विभाव, अनुभाव, संचारीभाव यांनी– भरलेले व भारलेले अणि त्यातही त्या 'स्थायी'च्या, त्यातल्या केंद्रिभूत स्थानाभोवती फिरणाऱ्या, फिरवणाऱ्या व त्यातून 'रस' काढणाऱ्या संकल्पनांनी भरलेले आहे. आधुनिक जीवनाच्या 'परिपूर्णता'निरपेक्ष, अपूर्ण अशा मानवी जगातील कुरूपताबोधाची सोय ते तथाकथित परिपूर्णतेचे सौंदर्यशास्त्र लावू शकत नव्हते. मर्ढेकरांनी त्यामुळे प्रयोग केवळ कवितेतच केले नाही तर साहित्यशास्त्रात, समीक्षेतही केले. त्यातूनच 'आर्ट अँड मॅन', लयतत्त्व व त्यांची वाङ्मयीन महात्मतेची साहित्यशास्त्रीय मांडणी व आधुनिक सौंदर्यबोधाची निर्मिती त्यांनी केली. ती चूक की बरोबर हे महत्त्वाचे नसून ती त्यांनी केली हे महत्त्वाचे. रचनासूत्राच्या त्या मांडणीने मर्ढेकरपूर्व आणि मर्ढेकरोत्तर अशी मराठी कवितेतील अगोदरच्या युगाचा युगान्त आणि नव्या युगाचा उदय, नवोदय याची जाणीव झाली.

रसनिष्पत्तीच्या रचनासूत्राचे शास्त्र हे मुळात साहित्यशास्त्र नव्हते. परिपूर्णतेच्या. म्हणजे 'अलौकिक' मूलतत्त्वाच्या स्थायीकरणाचा, त्या एका संकल्पनाव्यूहाच्या व्यवस्थेचा साहित्य-व्यवहारातील तो प्रभावी हस्तक्षेप होता. मर्ढेकरांनी तो 'लौकिक' तत्त्वाधारे कवितेतून आणि समीक्षेतून हद्दपार केला. तो केवळ मर्ढेकरांनीच केला असे नाही. पण मराठी कविता प्रांतात तो इतक्या ठसठशीतपणे व प्रभावी आणि परिणामकारकरीत्या केवळ त्यांनीच प्रथम केला. म्हणून त्यांचे महत्त्व. हा उठावच मुळात अ-पौरुषेय अशा धारणेच्या, परिपूर्णतेच्या अलौकिक संकल्पनाव्यूहाने निर्मिलेल्या व ती अमान्य करण्याचे मान्य करण्याचे कारणच नसल्याच्या जाणिवेने बाधित, पर्यायाने विकलांग, निरर्थक झालेल्या शब्दाला, अभिव्यक्तीला, कुरूप व अपूर्ण जीवनाशयाला मानवी यथार्थाच्या पायावर उभा करण्याचा तो लौकिक उठाव होता. अशा पूर्णपणे लौकिक उठावाचे प्रेरणास्रोत ठरलेल्या मर्ढेकरांची पुनर्स्थापना मात्र मराठी समीक्षेतच अलौकिकतावादी म्हणून करण्याचा एक महान प्रयोग केला गेला आहे. तो ज्या ताकदीने केला गेला त्या ताकदीने तो अद्यापही पुरेसा खोडून मात्र काढला गेलेला नाही.


सिनेमा कसा बघावा, नाटक कसे पाहावे, कविता कशी वाचावी, शिल्प कसे समजून घ्यावे, चित्र कसे जाणावे, नृत्य कसे बघावे, कोणतेही 'माध्यम' कसे समजून घ्यावे याबाबतची माध्यम-साक्षरता निर्मिणे व वाढवणे या बद्दलची कोणतीही जाण आणि भान विकसित करण्याचे, पर्यायाने सौंदर्यबोध हा शिक्षण, प्रशिक्षण, प्रबोधनाचे उद्दिष्टच न बाळगता अशी जाण आणि भान नसणाऱ्यांना, केवळ प्रत्येकाला सारखेच आणि एकच मत असते या राजकीय लोकशाही मूल्यामुळे 'रसिक' म्हणून संबोधण्याची संस्कृती ही अशा 'न-रसिक' वाचकांच्या अभिमुखतेची, वाचकाभिमुखतेची संस्कृती आहे. तशा संस्कृतीच्या निर्मितीची कवी-कलावंतांकडून अपेक्षा करणारी सक्ती ही वाचकांना, लोकांना, कविताभिमुख, कला व सौंदर्याभिमुख होण्यापासून रोखून धरणारी घटना ठरली आहे.

साहित्याचे 'वाचन' वा सौंदर्यग्रहण ही जर सहनिर्मिती असेल तर निर्मितीक्षणांचा जो स्पर्श साहित्यनिर्मात्याला होतो व ज्याला त्याचा निर्मितीचा रियाज हा मुळातच कारण असतो तसा रियाज या असंख्य 'सहनिर्मात्यांचा', वाचक-प्रेक्षक-श्रोत्यांचा व्हावा असा कोणताच व्यापक कार्यक्रम कोणत्याच शिक्षण-प्रशिक्षण व्यवस्थेचा भागच झालेला नाही. जो काही असेल-नसेल तोदेखील संपुष्टातच आणला गेल्याने 'समीक्षा' हा वाचक-प्रेक्षक-श्रोते यांचा कधी व्यवहारच केला गेलेला नाही. त्या व्यवहाराचा त्यांना कधी भागच त्यामुळे करून घेतले गेले


नाही. समीक्षा-कुपोषित, विश्लेषण-कुपोषित, सौंदर्यबोध-कुपोषित, आकलन-कुपोषित असा आणि वृत्तपत्रीय अथवा जाहिरातीय मजकुराचीच तेवढी वरवरचीच समज बाळगणारा समाज व अशाच समाजनिर्मितीच्या उद्दिष्टाला बांधलेल्या सर्व प्रकारच्या व्यवस्थांमुळे काव्यसमीक्षा म्हणजे काय याचा विचार हा साहित्य विषयाच्या पदव्युत्तर परीक्षेतल्या एखाद्या प्रश्नपत्रिकेतील एखाद्या प्रश्नापुरता मर्यादित प्रांत उरला आहे. काव्यसमीक्षा तर दूरच पण साध्या ज्या दूरचित्रवाणी माध्यमाचा आपला चोवीस तास संपर्क असतो व जे आपल्या जीवनाचा सर्वंकष ताबा घेऊन आपल्या जीवनाचे अग्रक्रम ठरवतात, त्या माध्यमाची समीक्षा, 'माध्यम-समीक्षा' करण्याची गरज भागवणारी 'माध्यम-साक्षरता'देखील आपल्याजवळ नाही.

मराठी काव्यसमीक्षेला आधुनिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान यांनी आकाराला आणलेले जीवनभान, जीवनाशय व वेगवेगळे संकल्पनाव्यूह पूर्णपणे अपरिचितच आहेत. अशा समीक्षाव्यूहाचे अद्याप कोणतेच भान मराठी काव्यसमीक्षेला एखाद दुसरा सन्मान्य अपवाद वगळता आलेले नाही. मर्ढेकर हे माध्यमामध्ये नोकरी करत होते, मर्ढेकरांचे 'माध्यम-भान'ही अतितीव्र होते व ज्या आधुनिक संवाद-माध्यमांच्याच अंगाने ते निर्मितिप्रक्रियेची शास्त्रीय अशी नवी मांडणी करत होते त्या मर्ढेकरांच्या पारंपरिक समीक्षकांना मर्ढेकरांच्याच काळात जागतिक ख्यातीचा संवाद-माध्यम शास्त्रज्ञ मॅक लूहन यांच्या 'अँडर स्टँडिंग मीडिया : द एक्सटेंनशनस ऑफ मॅन' या ग्रंथाची माहिती तरी असते काय? सस्यूरच्या भाषाविज्ञानानंतर भाषा, आशय, घाट, रूप, संस्कृती या साऱ्यांचीच नव्याने वैज्ञानिक आणि सामाजिक व संस्कृतिवैज्ञानिक मांडणी ज्या काळात होत होती तो मर्ढेकरांचा समकाळ होता. तो काळ, त्यांच्या त्या नव-जाणिवा, मर्ढेकरांचे संवेदनाविश्व असे कशाकशाने प्रभावित होते याची प्राथमिक चिकित्सादेखील मराठी काव्यसमीक्षेत अद्यापही अवतरलेली नाही. अशी चिकित्साभिमुखताच मराठी काव्यसमीक्षेत नाही. अशी काव्यसमीक्षा त्यामुळे 'वाचकाभिमुख' नाही ही एका अर्थाने चांगलीच गोष्ट आहे. काव्यसमीक्षेने वाचकाभिमुख असण्याची अपेक्षा व त्याचा प्रत्यक्षात अर्थ वाचकदेखील काव्य-समीक्षाभिमुख करणे असा होतो, नसेल तर तसा तो असायला हवा. मराठी काव्यसमीक्षा या संदर्भात अतिशय मागासलेली आणि आळशी आहे. ती स्वतःच पुरेशी उद्बोधित नाही.

मराठी कवितेने जे उत्तर आधुनिक (खरेतर आधुनिकोत्तर) वळण घेतले असे आपण म्हणतो त्या वेळी उत्तर आधुनिकता म्हणजे नेमके आपण काय समजतो हे नीट तपासले पाहिजे. पर्यावरणवाद, स्त्रीवाद, स्त्रीलेखन, स्त्रीविमर्श, दलित विमर्शाचे साहित्य, जन-बहुजन-आदिवासी साहित्य, सीमांत साहित्य, युद्धविरोध, अण्वस्त्रबंदी, राष्ट्र, राष्ट्रीयत्व व राष्ट्रवादाची सर्वांगीण चिकित्सा, समतेचा सर्वांगीण विस्तार, ट्रांसजेंडर, गे, लेस्बियन, बायसेक्युअल यांची व्यक्ती व माणूस म्हणून प्रतिष्ठा, वंशवादविरोध, वर्णद्वेष विरोध, साम्राज्यवाद विरोध, सर्वहारावर्गाच्या स्वतःच्या संस्कृतीतल्या निहित बाबींना मान्यता, बहुसांस्कृतिकता, बहुविधता, आंतरराष्ट्रीयता, बहुभाषिकता, मनाचे निर्वसाहतीकरण, देशीयता, भाषेचा वैज्ञानिक दृष्टिकोन, संस्कृतिविज्ञान, साहित्यापलीकडले साहित्य, साहित्याचा अंत, समीक्षेचा अंत, नवऐतिहासिकतावाद, अभिव्यक्तीचा खुलेपणा, मानवाधिकार असे सारे उत्तर आधुनिक आविष्कार आहेत. मात्र तो एक समग्र संकल्पनाव्यूह आहे. त्यातला एखादा तुकडा घेऊन त्याचा वेगवेगळा झेंडा किंवा काठी करणे अथवा त्याचा अन्य संदर्भात झेंडा वा काठीसारखा वापर करणे म्हणजे उत्तर आधुनिकता नव्हे. केवळ साठोत्तरी म्हणजेही उत्तर आधुनिकतेचा संप्रदाय वा सांप्रदायिक वापर म्हणजेही उत्तर आधुनिकता नव्हे. धार्मिक वा कोणताही मूलतत्त्ववाद, अधिनायकवाद, दहशतवाद, आवेशपूर्ण वा राष्ट्रभक्तीयुक्त पुनरुज्जीवनवाद म्हणजेही उत्तर आधुनिकता नव्हे. ह्या प्रकारच्या व्यापक, प्रेरक उत्तर आधुनिकतेचे नाते हे वैचारिक स्तरावर पारंपरिक शास्त्रीय समाजवाद वा साम्यवादाशी नसून ते नवमार्क्सवादी सांस्कृतिक मार्क्सवादाशी आहे. पौर्वात्य समग्रतेशी आहे. उत्तर आधुनिकता मांडताना साठोत्तरी म्हणायचे पण या साऱ्या सांस्कृतिक मार्क्सवादी प्रेरणा मात्र अनुच्चारित राखायच्या अशी राजकीयता म्हणजे काय व राजकारण हे साहित्य आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग कसा असते याचे प्राथमिकही




**मराठी काव्यसमीक्षेला आधुनिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान यांनी आकाराला आणलेले जीवनभान, जीवनाशय व वेगवेगळे संकल्पनाव्यूह पूर्णपणे अपरिचितच आहेत.**



ज्ञान न बाळगणारी, बाळबोध पातळीवर रांगणारी मराठीतली उत्तर आधुनिक समीक्षा-जाणीव ही मर्ढेकरांच्याच भाषेत सांगायचे तर मुळात पुरेशी परपुष्टच नाही. त्यामुळे ती उत्तर आधुनिकही नाही, आधुनिक तर नाहीच नाही. उलट ती या संकल्पनाव्यूहातील वेळोवेळी सोयीच्या व निवडक तेवढ्या बाबी वेगवेगळ्या वेचून मूलतत्त्ववादी, अधिनायकवादी, नवसामंतवादी युग साकारणाऱ्या मांडणीच्या जवळ जाते. मूलतत्त्ववाद, अधिनायकवाद वा नवसामंतवाद म्हणजे उत्तर आधुनिकता नव्हे.

लिटिल मॅगझिन चळवळीतली प्रयोगशीलता ही मुळातच महानुभाव गद्याची पर्यायाने समग्र कर्मठ सांस्कृतिक शोषणव्यवस्थेच्या विरोधातल्या बहुजन-बंडाची जाणीव होती. ती एकसंध वर्गीय अशी जाणीव होती. त्या जाणिवेची ती वाङ्मयीन चळवळ होती.

मराठी काव्यसमीक्षेला जे करता आले नाही ते या अनियतकालिकांच्या चळवळीने करून दाखवले होते. ते म्हणजे नव्या बदलत्या जीवनाशयाच्या आकलनासाठी, नव्या निर्मितीशी, वाङ्मयाशी सुसंवादी असा सहृदय वाचकांचा नवा वर्ग तिने निर्माण केला. ती मुळात नव्या वाङ्मयीन संवादाचीच चळवळ होती; जिने कुजलेली, शिणलेली, थकलेली भाषा वगळून मर्ढेकरांसारखी पण त्याहूनही वेगळी अशी नवी काव्यभाषा निर्माण केली, सोबतच त्या काव्यभाषेच्या जाणकार वर्गाचा परीघ निर्माण करण्याचा प्रत्यक्ष असा कार्यक्रमच हाती घेतला.

त्या पुढची पायरी ही दलित कवितेच्या झंझावाताची होती. ती अधिकच सक्रिय अशी प्रत्यक्ष कृतिशील वाङ्मयीन-सामाजिक चळवळ होती. तिने पारंपरिक काव्यसमीक्षाच नव्हे तर पारंपरिक साहित्य व सौंदर्यशास्त्राला मर्ढेकरी सौंदर्यशास्त्राच्या कितीतरी पुढचे, प्रत्यक्ष जीवनच सुंदर करण्याचे, त्यासाठी समग्र व्यवस्था परिवर्तनाचेच आव्हान दिले. वाङ्मयीन संवादाद्वारे पूर्णपणे नवा सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक संवाद व या संवादासाठीचे सारे संदर्भ प्रथमच त्यातून निर्मिले गेले. त्याचे मोल व प्रभाव एवढा व्यापक होता की तो नाहीसा करण्यासाठी आजची अभिव्यक्तीची राजरोस मुस्कटदाबी करणारी सांस्कृतिक दहशतवादी प्रतिक्रांती जन्माला घातली गेली. त्या आव्हानाने आणि आवाहनाने कवितेला, कवींना, काव्यसमीक्षेला नवा परीघ तर उपलब्ध करून दिलाच पण निष्प्राण होत चाललेल्या वाङ्मयीन कलेवरात नवे प्राण त्याने फुंकले गेले. प्रतीतीविश्रांतीवादी तथाकथित मुख्य प्रवाही मराठी काव्यसमीक्षेने ती प्रयोगशीलता तरीही बराच मोठा काळ साहित्यबाह्य, अनुल्लेखित व उपेक्षितच ठेवलेली होती.

मराठी समीक्षेने काहीही पचवण्यासाठी तिचे अ‍ॅपिटाइटच आधी व्यवस्थित असायला हवे. ते फारच कमकुवत आहे. केवळ तथाकथित देशीवादाच्या एकाच एका आवृत्तीचे टॉनिक रिचवण्यात तिने गेली काही दशके जी वाया घालवली त्यातून तिला अधिकची सूज आली आहे. बौद्धिक, वैचारिक, विश्लेषक व्यायाम-प्रकारांचा आळस तिने अंगी भिनवून घेतला आहे. तिची पचनसंस्थाच बिघडलेली आहे आणि ती दुरुस्त करण्याची तिची इच्छाच नाही. कितीतरी गोष्टी त्यामुळे तिच्या रक्तातच शिरत नाहीत. तिला निकोप व सुदृढ करू शकण्यास समर्थ अशा अभ्यासक-विवेचकांची प्रचंड मोठी उणीव तिच्याजवळ आहे. कोल्टकर, दिपु, वसंत दत्तात्रय गुर्जर, तुळशी परब, मनोहर ओक अशा कवींची कविताच मुळात तुमच्या-आमच्या-सारख्या 'मायक्रोस्कोपिक मायनॉरिटी' असलेल्या, अत्यल्प अशा लोकांच्या वर्तुळापर्यंत मर्यादित असलेली बाब आहे. 'वाचकाभिमुख' समजल्या जाणाऱ्या पाडगांवकरी कवितेच्या वा सुरेश भटांच्या वाचकविश्वात तिला स्थान नाही. ते तसे असावे असे प्रामाणिकपणे वाटणारे समीक्षकच मराठीला पुरेसे लाभलेले नाहीत.

मुळात आज तीही समीक्षा हयात नाही. तिचा कधीच अंत झाला आहे. जी काय तगली, जगली ती द. भि. कुळकर्णीसारख्यांनी तिला जे ललित साहित्यरूपी आस्वादकतेचे वळण दिले त्या आश्रयाने. पुढे तीही संपली. उरली ती एखाद दुसरा सन्मान्य अपवाद वगळता केवळ परिचयात्मकता अथवा पुरस्कारानुवर्ती टोळ्यांमधून परस्परांना चलाखीने उचलून धरणारी, परस्परांची पाठ खाजवणारी स्तुतिपरता. अशा समीक्षेकडून कविता उलगडून सांगण्याची अपेक्षा करणे म्हणजे आपणच 'ना समझ' ठरणे होय.

**मराठी काव्यसमीक्षेला जे करता आले नाही ते या अनियतकालिकांच्या चळवळीने करून दाखवले होते. ते म्हणजे नव्या बदलत्या जीवनाशयाच्या आकलनासाठी नव्या निर्मितीशी, वाङ्मयाशी सुसंवादी असा सहृदय वाचकांचा नवा वर्ग तिने निर्माण केला.**

कवितेचा वाचक मात्र या साऱ्याच्या परिणामी अधिक स्वावलंबी होण्यास खरोखच मदत झाली आहे. तो स्वतःच काव्यास्वादासाठी स्वतःच्या पायावर उभा राहू बघतो आहे आणि त्यात तो बराच यशस्वी होतो आहे असे आपल्या कविता वाचल्यावर येणाऱ्या त्याच्या दूरध्वनींवरून, तो जे काही बोलतो त्यावरूनच तेवढे कळते. कारण त्यालाही ते व्यक्त करण्यासाठी अन्य कोणतेच माध्यम उपलब्ध नाही.

ग्रंथालयात, वाचनालयात, शाळा, महाविद्यालयात काव्यसमीक्षाविषयक पुस्तके तुलनेने कमी दिसतात हे खरेच आहे. याचे प्रमुख कारण लेखन म्हणजे जसे अंकलिपी येते म्हणून काहीही लिहिणे असे होत चालले आहे तसेच 'वाचन' म्हणजेही साहित्यसमीक्षा सोडूनच अन्य छापलेले वाचणे असेही होत चालले आहे. दुसरे, तिथे ती दिसावीत, पोहचावीत यासाठी प्रथम ती तुलनेने तेवढी लिहिली जायला हवीत. मुळात अध्ययन, अध्यापन, प्राध्यापकी, शिक्षकी पेशाच्या व्यावसायिक गरजांची व नियम-अटींची पूर्तता करणाऱ्या चौकटीतली ती गरज उरली आहे. शिक्षकी, प्राध्यापकी, त्याच त्या चावून चावून चोथा झालेल्या संज्ञांची फोलपटे वापरणारे समीक्षाप्रबंध व प्रबंधिका म्हणजे काव्यसमीक्षा नव्हे.

गंभीर समीक्षा ग्रंथ प्रकाशित करून ते सर्वदूर पोहचवण्यात रुची असणारा ग्रंथव्यवहार मराठीत नाही. कारण जिथे कवितेलाच वाचक नाही असे प्रकाशन व्यावसायिक आनंदाने सांगतो तिथे तो काव्यसमीक्षेला कसा असेल? ग्रंथ निर्मिणे, त्याची आवड निर्माण करणे, ते पोहचवणे ही व्यवसायबद्ध कृती आहे. काव्यसमीक्षा प्रकाशन व वितरण हा व्यवसायाचा भाग होऊ शकत नाही. कारण ती विकली जाणारी वस्तू नाही. ग्रंथालये, वाचनालये संबद्ध सरकारी योजनांमधली 'कमिशन' आधारित ग्रंथविक्री व खरेदी, त्यासाठीची सरकारी अनुदाने, त्यांची उपलब्धता व हा ग्रंथव्यवहार सांभाळणारे त्यातले व्यावसायिक 'तज्ज्ञ' ह्या साऱ्यांच्या दृष्टीने ग्रंथांच्या बाजारात आज जिथे कवितासंग्रह, कथासंग्रह, ललित लेखन यांनाच स्थान उरलेले नाही तिथे ते काव्यसमीक्षेला कसे असणार? ग्रंथनिवड करणाऱ्या विविध समित्यांच्या ग्रंथनिवडीच्या 'व्यावहारिक' निकषात कवितासंग्रह, काव्यसमीक्षा हे ग्रंथ बसावेत अशा अभिरुचीची व गरजा असणारी माणसे तिथे पोहचवणारी आपली शिक्षणव्यवस्था व संस्थात्मक व्यवहार उरलेला नाही.

कशाचा खप वाढवायचा आणि कशाचा खप होत नाही हे पूर्वनिश्चित पद्धतीने ठरवून त्याचे रडगाणे गायचे ह्यात तज्ज्ञ असणारे प्रकाशक व ग्रंथविक्रेते त्यांच्या व्यावसायिक हिताच्या बाजारात पाडगांवकर-सुरेश भटांसारखे अपवाद वगळता ग्रेससारखा एखाद दुसरा कवीच, त्यांचे कवितासंग्रह व त्यांच्या तथाकथित समीक्षेची पुस्तके याव्यतिरिक्त इतर कवी व त्यांच्या समीक्षा यांना उठाव देत नाहीत.

मुख्य म्हणजे कविता ही त्यामुळे इतिहासापेक्षा अधिक महत्त्वाची व गांभीर्याने बघण्याची बाब असली तरी ती तशी वाटायला लावणारी 'कविता-साक्षरता' अद्यापही पुरेशा प्रमाणात तशा प्रकारच्या सातत्यपूर्ण चळवळींच्या अभावी या मराठी समाजात रुजलेली नाही. तुलनेने ती मल्याळम, हिंदी व बंगाली समाजात अधिक आहे.

कविता, तिचे मोल, तिचे इतिहासापेक्षाही अधिक असणारे महत्त्व हे सारे ठसायचे असेल तर साठीच्या दशकात अनियतकालिकांच्या चळवळीने केले तसे, सत्तरीच्या दशकात आम्ही इकडे रस्त्यावरच्या कवितांपासून, गच्चीवरच्या, स्मशानातल्या कवितेपर्यंत उभारलेले काव्याभिरुचीचे खरोखरच परिणामकारक ठरलेले आंदोलन किंवा बापट-पाडगांवकर-करंदीकरांनी कवितेला महाराष्ट्रभर लोकप्रियता मिळवून देण्यासाठी घेतलेले परिश्रम व त्यायोगे त्या त्या काळात जागवलेली, रुजवलेली 'कविता-साक्षरता' पुनःपुनः रुजवणारी बंडखोरी, प्रयोग, चळवळी, यांचे सातत्य टिकवण्याची गरज ही कवितेच्या समीक्षा ग्रंथांपेक्षा कितीतरी अधिक आहे. कारण हा समाज 'कविता-साक्षर' राहिला तरच कविता राहील, तरच काव्यसमीक्षा राहील. त्यासाठी अशा प्रकारची 'वाङ्मयीन-सक्रियता', लिटररी ॲक्टिव्हिझम हवा.

समग्र संस्कृती हाच एक संवाद मानणारा दृष्टिकोन मराठी समीक्षेला, काव्यसमीक्षेला अजूनही अपरिचित असणे, संस्कृतिविज्ञान हे समीक्षकांच्या कार्यकक्षेतच नसणे आणि साहित्य

**मराठी समीक्षेने काहीही पचवण्यासाठी तिचे ॲपेटाइटच आधी व्यवस्थित असायला हवे. ते फारच कमकुवत आहे. केवळ तथाकथित देशीवादाच्या एकाच एका आवृत्तीचे टॉनिक रिचवण्यात तिने गेली काही दशके जी वाया घालवली त्यातून तिला अधिकची सूज आली आहे. बौद्धिक, वैचारिक, विश्लेषक व्यायामप्रकारांचा आळस तिने अंगी भिनवून घेतला आहे. तिची पचनसंस्थाच बिघडलेली आहे आणि ती दुरुस्त करण्याची तिची इच्छाच नाही.**

**मुख्य म्हणजे कविता ही त्यामुळे इतिहासापेक्षा अधिक महत्त्वाची व गांभीर्याने बघण्याची बाब असली तरी ती तशी वाटायला लावणारी 'कविता-साक्षरता' अद्यापही पुरेशा प्रमाणात तशा प्रकारच्या सातत्यपूर्ण चळवळींच्या अभावी या मराठी समाजात रुजलेली नाही. तुलनेने ती मल्याळम, हिंदी व बंगाली समाजात अधिक आहे.**

समीक्षेला आंतरज्ञानशाखीय अशा आकलनाचे संवेदनच नसणे हे मराठी काव्यसमीक्षेचे वास्तवही अगोदर नीट समजून घेतले म्हणजे मर्ढेकर, अनियतकालिकांची भाषा, शैली, अभिव्यक्ती, प्रयोगशीलता या साऱ्यांकडे बघण्याचा या समीक्षेच्या दृष्टिकोनाचा बौद्धिक, वैचारिक स्तर काय लायकीचा आहे याची कल्पना करता येऊ शकते. अशा काव्यसमीक्षेच्या आवाक्यात उत्तर आधुनिकतेचा समग्र संकल्पनाव्यूह कसा काय येणार? ही समीक्षाच जिथे स्वतः अशी ज्ञानाभिमुख झालेली नाही तिथे तिच्याकडून कोणत्या परिपूर्णतेच्या अपेक्षा करायच्या? आणि 'वाचकाभिमुख' होऊन तिने नेमके काय करायचे? अशी समीक्षा वाचकाभिमुख नाही हीच त्यामुळे चांगली गोष्ट आहे.


खरेतर कवी, कविता, काव्यसमीक्षा वाचकाभिमुख असणे महत्त्वाचे नसून वाचकाला कवी, कविता आणि समीक्षाभिमुख करणे हे काव्यसमीक्षेचे प्रयोजन असणे आवश्यक आहे. ते साध्य करायचे तर कविता, साहित्य आणि संवाद यांच्या परस्पर नात्याची समीक्षेने अगोदर नीट मांडणी केली पाहिजे.

साहित्य हा वृत्तपत्रीय बातमी वा जाहिरातीसारखा वा कोणत्याही माहितीपर मजकुरासारखा एकच मजकूर प्रत्येकाला कळावा यासाठी बेतलेला 'साधनीभूत' स्वरूपाचा संवाद नसतो. तो 'भोग्य' स्वरूपाचा, आस्वादक अशा स्वरूपाचा संवाद असतो. अर्थ वा आशयापेक्षाही व्यक्तिनिष्ठ अभिव्यक्ती ही त्यातली सर्वाधिक महत्त्वाची बाब असते. केवळ शब्द व त्यांची रचना काय सांगते एवढ्यापुरते हे प्रकरण मर्यादित नसून त्या सांगण्याचे शब्दातून, वाच्यार्थाने अव्यक्त असणारे जे अनेक स्तर व थर, अंतःस्वर आशयाचा प्रतिमेतून विस्तार करत असतात, जी प्रसरणशीलता हा या अभिव्यक्त होण्याच्या संवादाचा जो तरल असा भाग आहे त्याला स्पर्श करता येणे आवश्यक असते. भाषा तीच, तरी त्या भाषिक संवादापेक्षा कवितेतला, साहित्यातला हा वाङ्मयीन संवाद वेगळा असतो तो याच कारणाने. केवळ ती भाषा समजते म्हणून त्या भाषेतली कविता 'समजत' नसते. वाङ्मयीन शैली ही म्हणूनच त्याच भाषेची पण सोपेपणा वा सुलभता यांची मागणी न पुरवणरी वेगळी शैली ठरते.

शब्दांचे, अगदी विरामचिन्हांचेही, रुपांतर प्रतिमा आणि प्रतीकांमध्ये करणारी ही संवाद-शैली म्हणजे साहित्यातील संवाद.

वाचक या संवादविश्वाचा भाग होण्यास सक्षम नसेल, म्हणजे ते 'संदर्भ जाणणारा नसेल, त्या 'संदर्भ-चौकटी'त नसेल तर त्याच्याशी वाङ्मयीन संवाद घडू शकत नाही, केवळ वरवरचा भाषिक संवाद तेवढा घडू शकतो. तो केवळ वाचक आहे म्हणून कविता ही त्याच्याकडे तोंड करून त्याच्या आवाक्यात स्वतःहून गेलीच पाहिजे, म्हणजे 'वाचकाभिमुख' असली पाहिजे असा बातमी वा वार्तापत्रातील संवादाकडून अपेक्षित आग्रह साहित्यातील संवादाकडून धरला जाऊ शकत नाही.

कवितेचा, साहित्याचा हेतू वाङ्मयीन, आस्वादक संवाद स्थापण्याचा आहे. वृत्तपत्रीय,


**कविता मनातल्या**
**कविता कोर्टातल्या**

**मृदुला भाटकर**

माणूस अन् न्यायाधीशाच्या अनुभवाचा उद्गार,
वेदनेचा हुंकार व्यक्त करणारी

कविता मनातली, कोर्टातली...

**मूल्य ६० रु. सवलतीत ३५ रु.**

माहितीपर स्वरूपाच्या आश्वासक संवादाची स्थापना हे त्याचे प्रयोजन नाही. कवितेची वा समीक्षेची वाचकाभिमुखता म्हणजे केवळ वरवरच्या दर्शनी भाषिक स्तरावरील आनंद, दुःख, यातना, सुख यांचे दर्शन देत, गुदगुदल्या करत, मनोरंजन करत, शाब्दिक चाळे करत भावना चाळवणे नव्हे. त्या योगे कवीचे माहात्म्य स्थापित केले जाऊ शकते. वाङ्मयीन वा काव्यात्म महात्मता नव्हे.


लेखकाने, कवीने निर्मिलेल्या प्रतिमा-सृष्टीची भाषा ही म्हणूनच वेगळी भाषा असते. तिची उकल करण्याची क्षमता असणाऱ्या वाचकाशीच ती संवादी असू शकते; भाषक समाजातील कोणत्याही व प्रत्येक भाषकाशी, वाचकाशी नव्हे.

कवितेची ज्ञानात्मक, बोधात्मक आणि भावात्मक अशा पातळ्यांवर संरचना उलगडून बघण्याची तयारी असणे म्हणजे कवितेचा वाचक असणे. असे वाचक निर्माण करणे हा आपल्या साहित्य संस्थात्मक व्यवहाराचा, शिक्षण-व्यवस्थेचा व तथाकथित वाचन संस्कृतीचाही अग्रक्रमच नसल्याने व आस्वादक संवादाऐवजी केवळ आश्वासक संवाद हीच तेवढी गरजेची बाब असल्याने आपल्या समीक्षेचे पतनदेखील विश्लेषणाकडून केवळ परिचयात्मकतेकडे वेगाने होत गेले आहे.

जे काम काव्यसमीक्षा करू शकत नाही ते बऱ्याच अंशी 'लिटररी ॲक्टिव्हिझम', वाङ्मयीन चळवळी करू शकतात. त्यांनी ते वेळोवेळी केले आहे. कारण अशा चळवळींचा भर हा वाङ्मयातले नेमके काय ऐकू यायला हवे याबद्दलच्या कळकळीवर असतो. संवादाशयाचे पोहचणे हे अशा कळकळीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असते. या चळवळी उत्सुकता जागवतात, जाणून घ्यायला उद्युक्त करतात, ज्ञानेंद्रियांना खाद्य पुरवतात, हृदयाला हात घालतात, आवाहन करतात, त्यांच्या त्या तीव्रतर आवाहनाने वाङ्मयीन संवादासाठी आवश्यक ते संदर्भ त्या पुरवतात व वाङ्मयीन संवादाच्या संदर्भ चौकटीत वाचकाला आणण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करतात. वाङ्मयीन वातावरण निर्माण करतात. जे, जसे आणि जेवढे ऐकायला व त्यालाच चिकटून राहायला शिकवले गेले असते ते खरवडून काढण्याचा प्रयत्न करतात. त्या जागी नवे आवाज, वेगळे आवाज, अनेक आवाज, अनोळखी, अपरिचित विश्वाचे म्हणणे, कण्हणे, सांगणे-ऐकण्याची, म्हणजेच वेगळ्या प्रतिमांची, वेगळया चिन्हांची, वेगळया प्रतीकांची, वेगळ्या आशयांची उकल करू बघणारी त्याची मानसिकता त्या तयार करतात. त्याची सवय लावू बघतात. सामुदायिक विवेक, शहाणपण आणि मानवी अंतरंगाचे सौंदर्य जागवू बघतात. त्याची सांगड वाङ्मयाशी, अभिव्यक्तीशी घालू बघतात, हे करता करताच वाङ्मयीन संस्कृती साकारत जाते. शेवटी शेलेच्याच शब्दात सांगायचे तर कवी हे जगाचे अनधिकृत विधायक असतात. त्यामुळे त्यांच्या कृती असणाऱ्या कविता ह्या कोणाच्याही मध्यस्थीशिवाय सरळ भिडणाऱ्या असायला हव्यात. केवळ जिथे त्या भिडायला हव्यात त्यांचे 'सहृदय' असणे एवढेच आवश्यक आहे. उणीव त्याचीच आहे.

– श्रीपाद भालचंद्र जोशी
भ्रमणध्वनी : ९९६०४९३६२२
shripadbhalchandra@gmail.com

**खरेतर कवी, कविता, काव्यसमीक्षा वाचकाभिमुख असणे महत्त्वाचे नसून वाचकाला कवी, कविता आणि समीक्षाभिमुख करणे हे काव्यसमीक्षेचे प्रयोजन असणे आवश्यक आहे. ते साध्य करायचे तर कविता, साहित्य आणि संवाद यांच्या परस्पर नात्याची समीक्षेने अगोदर नीट मांडणी केली पाहिजे.**



Poetry is finer and more philosophical than history; for poetry expresses the universal, and history only the particular.

(Aristotle)



# मराठी ग़ज़ल समीक्षा : काही प्रश्न

डॉ. राम पंडित

**मराठी ग़ज़लचे मोजकेच शेर अनुभवाधिष्ठित असतात. काहींच्या शेरांत उर्दूतील काव्याचे चौर्य जाणवते. ग़ज़लचा निवेदक 'मी'चे स्वानुभव संक्रमण करीत राहतो. काफियांसाठी अर्थशून्य विधानही शेरात कोंबलं जातं.**

**मराठी** काव्यसृजन गेल्या दोन-तीन दशकांत बाजारगर्दीच्या सीमेपर्यंत वाढलंय. त्यामुळे नीरक्षीरविवेक करणे अभ्यासकांना अवघड झाले आहे. त्यात साहित्यप्रेमींची काव्यवाचनाची रुची आटली. कथा, कादंबऱ्यांचे वाचक त्यामानाने अधिक पण कवींची संख्या बेसुमार अशी स्थिती उद्भवली आहे. जास्त करून अमूर्त गद्यप्राय पद्यरचनेकडे या कविवर्गाचा कल असल्याने आकलनकक्षेत न मोडणाऱ्या या रचनांची समीक्षा कोण अन् कसा करेल?

इथे मी ग़ज़ल या काव्यविधेच्या अनुषंगाने काही निरीक्षण नोंदवीत आहे. 'ग़ज़ल' या विधेत कवितेची आशयघनता व गीताची संगीतात्मकता अभिप्रेत आहे. मराठी ग़ज़ल या निकषाची कितपत पूर्तता करते? तर याचं उत्तर तिचा उर्दू ग़ज़लच्या सातशे वर्षांच्या प्रवासाच्या तुलनेने आशयघनतेच्या संदर्भात तीस ते चाळीस टक्के व संगीतात्मकतेच्या निकषाच्या संदर्भात ऐंशी टक्के.

सुरेश भटांनी 'ग़ज़ल-मिशन' चालविताना जे मूलत: उत्तम कवी आहेत अशांकडून ग़ज़लसृजनाची अपेक्षा केली होती. पण कार्यशालेयवृत्ती हे संतुलन बंधन पाळू शकली नाही. अन् हा मोहात पाडणारा आकृतिबंध व त्याची सार्वकालीन लोकप्रियता पाहून कवीच नव्हे तर काव्यरसिकांनाही भुरळ पडणे स्वाभाविक होते. यामुळे ग़ज़लकारांच्या संख्येत अचानक लक्षणीय वाढ झाली. परंतु यातील बहुतांश जणांचा भर तंत्रावर अजूनही आहे. तंत्र हे साधन असून साध्य उत्तम 'काव्य' आहे या साधन-साध्यविवेकाचा अनेकांना अद्याप विसर पडलाय.

समीक्षक मग तो कोणत्याही साहित्य-प्रकारावर लिहीत असो, त्याला त्या आकृतिबंधाची सखोल जाण व निकष यांची माहिती असणे अध्याहृत असते. मुळात ग़ज़ल ही तंत्राच्या स्तोमामुळे ती तंत्रानुगामी रचनाकला आहे असा अपसमज काव्य-अभ्यासकांत रूढ झालाय. याला ग़ज़ल न जमलेले कवी, तंत्राचे आकलन न झालेले समीक्षक, छंदोबद्ध रचनांबद्दल अढी असलेला साहित्यिकवर्ग जबाबदार आहे. आजही बोरकर, कुसुमाग्रज यांसारख्या छंदात रचना केलेल्या कवींच्या काव्याचा समीक्षात्मक मागोवा घेतला जातोच ना? रदीफ काफियामुळे कृतक काव्यरचना जन्म घेते असं समजणं समंजसपणाचं द्योतक मानता येईल का?

ग़ज़लरचनेत 'आमद' (उत्स्फूर्तपणे साकारणारे) व 'आबुर्द' (क्रॉफ्टमनशिपने तयार केलेले) शेर असे दोन प्रकार मानले जातात. खरंतर 'आमद'चे चरण दोन-चारच असतात. (संपूर्ण शेर 'आमद'चे सहसा असूच शकत नाही असेही नाही. पण शक्यता कमीच.) पण ग़ज़लकाराचे नैपुण्य यातच असते की त्याच्या ग़ज़लेतील आबुर्दचे शेरदेखील आमदचेच वाटावे. पण हे पूर्वीच्या समग्र छंदोबद्ध काव्यरचनेस लागू पडेलच ना? 'मोरोपंत' किंवा 'यमक्या वामन' यांच्या रचना तंत्रानुगामी असल्या तरी काव्य म्हणून त्या नाकारता येतील का?

काव्यसमीक्षक ग़ज़लेच्या समीक्षेस नाकारतात कारण एकतर ते तंत्रबाहुल्यामुळे त्यास 'काव्य' सदरात मान्यताच नाकारीत असावेत, किंवा पूर्वग्रहामुळे.

ग़ज़लेतील प्रत्येक शेर विविध विषयांवर असतो. विषयाचे अवचित होणारे मार्गांतरण (क्रमबद्ध ग़ज़लेत सारे शेर एकाच विषयावर असतात.) त्यांना रुचत नसावे. परंतु चांगल्या ग़ज़लेचे शेर विभिन्न विषयांवर असले तरी त्यांच्यात एक आंतरिक सूक्ष्म एकरूपता विद्यमान असते. म्हणून ग़ज़ल ही शृंखला-पद्य या संज्ञेत मोडते.

उर्दू-फारसीतील या पारंपरिक आकृतिबंधात पूर्वी प्रणयरम्य गंधस्मृती, अहंकेंद्रादी आत्मनिवेदन, दार्शनिक सूत्रे, कृतक, शोकतत्त्वे आढळत असत. पण ही विद्या एक संस्कृती गणली गेल्याने तिच्यात ग्राम्यतेचा अंतर्भाव नव्हता. मात्र लखनऊ स्कूलने शृंगार व कामोद्दीपक भाव तिच्यात आणले. भटांच्या 'मलमली तारुण्य माझे', 'तरुण आहे रात्र अजुनी', 'केव्हातरी पहाटे' इत्यादी रचनांवर अशाच संदर्भातील आरोप झाले. पण तेही जीवनाचे अविभाज्य अंग आहे हे कसे नाकारता येईल?

मराठी ग़ज़लचे मोजकेच शेर अनुभवाधिष्ठित असतात. काहींच्या शेरांत उर्दूतील काव्याचे चौर्य जाणवते. ग़ज़लचा निवेदक 'मी'चे स्वानुभव संक्रमण करीत राहतो. काफियांसाठी अर्थशून्य विधानही शेरात कोंबलं जातं. उदा. एका कवयित्रीचे दोन शेर पाहा-

**१) जाई जीव उंद्राचा / मार्जारा मजा वाटे**
**२) दोघे भांडती तेव्हा / लोणी तिसरा लाटे**

छंदनिर्वाहासाठी व शेरांची संख्या वाढविण्यासाठी केलेली ही नीरस क्लृप्ती होय.

उर्दू ग़ज़लच्या शब्दांतली अनेकार्थता मराठी शब्दांत नाही. मराठी शब्द सामान्यत: अचूक अर्थ देतात. त्यामुळे इथे भाषाजाल पसरविता येत नाही. मात्र मराठी रूपकं, प्रतीकं समृद्ध आहेत. भटांनंतर त्यांचा वापर विपुल प्रमाणात झाला नाही.

काही मुशायऱ्यांत मराठी ग़ज़लकार ग़ज़लचा आशय संप्रेषित करण्यापेक्षा अनेकदा प्रदर्शनकौशल्यावर भर देतात. काहींना मात्रिक छंदात ग़ज़ल लिहिताना यती व मात्रिक गण सांभाळण्याचे अवधान राहत नाही. अन् त्यांची ग़ज़ल गद्यप्राय लयीत साकारते. उर्दू छंद ध्वन्यानुकारी आहेत. मराठी वृत्त वा जातींचे स्वरूप लघु-गुरू वर्ण व मात्रिकप्रणालीनुसार आहे. त्यामुळे उर्दू बहरात मराठी ग़ज़ल रचताना बहरचं मात्रिक परिवर्तन करून वापरण्यास हरकत नाही. यामुळे आपले वृत्त-छंद भांडार समृद्ध होईल.

ग़ज़ल ही विशुद्ध कविता असते. पण काव्यसमीक्षकांना तिच्यातील सुबोधतेमुळे व तंत्रानुगामी वृत्तीमुळे ती नगण्य वाटत असावी. पण तिचा शैलीदृष्टचा विचार करावा. अर्थगर्भितेच्या अनुषंगाने अध्ययन करावे. असंप्रेषनीय रसहीन अमूर्त रचनांच्या काळात या सुबोध लयनिष्ठ रचनाविधेची प्रासादिकता पडताळून पाहावीशी का वाटत नाही? हवे तर त्यांनी ज्यूडिशियल क्रिटिसिजम पद्धतीचा अवलंब करून या काव्यविधेचे तर्कशुद्ध मूल्यमापन करावे. (तंत्राचा भाग वगळून)

वास्तविकता अशी आहे की ग़ज़ल समीक्षा करण्यास काव्यसमीक्षकांत पूर्वापार चालत आलेली ग़ज़लबद्दलची पूर्वसूरींची श्रद्धानिष्ठ मते खोडण्याचं धाडस व व्यासंग नाही. रदीफ, काफिया, छंद यांच्यामुळे सूत्रबद्ध आशय-कल्पनेला लाभणारी कर्णमधुरता, शेरातील चिंतनाचा सौंदर्यानुभव, प्रतीकं/रूपकातील गूढार्थ विवरण या साऱ्या गोष्टी अनुभवण्यास कलामर्मदृष्टी हवी. तीच नेमकी हरवली आहे की काय असा प्रश्न पडतो.

जे ग़ज़लच्या संदर्भात लिहितात, त्यांची मदार सुरेश भटांच्या बाराखडी नामक प्राथमिक मार्गदर्शिकेवर. ही मंडळी एखाद्याने गुरुवर्णाऐवजी दोन लघुवर्ण वापरले, किंवा पाचऐवजी चारच शेर लिहिले तर ग़ज़ल बाद ठरवणार. याचं कारण मूळ उर्दूचे ज्ञान नाही, तंत्रापलीकडे धाव नाही.

मराठीत ग़ज़ल ही काव्यविधा माधव ज्यूलियन यांनी आणली. अन् भटांनी ती सर्वार्थाने रुजविली असं म्हटलं जातं. खरंतर या आकृतिबंधाचा ठोकळ परिचय माधव ज्यूलियन यांनी करून दिला, त्यांचा भर उर्दूतील (मूळ अरबी-फारसीतील) छंदावर अधिक होता. छंदोरचनेद्वारे जवळपास शंभर गेय व प्रचलित उर्दू छंद त्यांनी मराठीत आणले. यातील विबुधप्रिया, पंचचामर, स्त्रग्विणी, भुजंगप्रयात असे अनेक वार्णिक छंद संस्कृतमधील वृत्तरचनाकारम, कालिदासकृत श्रुतबोध इत्यादी छंदोग्रंथात पूर्वीपासूनच विद्यमान आहेत.

'ग़ज़्ज़लांजली' या आपल्या प्रयोगरूप काव्यसंग्रहात माधवरावांनी उपरोक्त शंभरेक छंदांची उदाहरणे देण्यासाठी ज्या रचना दिल्या आहेत त्या ग़ज़लच्या निकषांवर उतरत नाहीत हे खरे, पण त्यांच्या 'छंदोरचनेने' सुरेश भट व समकालीन कवींसाठी ग़ज़ल-काव्यसृजनाकरिता गेय छंदाद्वारे एक मार्ग प्रशस्त केला होता हे सत्य नाकारता येणार नाही. 'ग़ज़्ज़लांजली'तील रचनांच्या एकयमकीपणावर (रदीफ?) आक्षेप झाले. ज्यांनी आक्षेप घेतले ते-

(१) कवी नसलेले समीक्षक असावेत किंवा

(२) कवी असल्यास ग़ज़लतंत्र त्यांना ज्ञात नसावे.


(३) किंवा छंदोबद्ध काव्यसृजन जमत नसावे.

ग़ज़लेतील विविध विषयांवरील शेर हे विविध कविताच असतात. नारदीय अथवा शांडिल्य सूत्रांप्रमाणे त्या अर्करूप व दोन ओळींत परिपूर्ण असतात. या विविधरंगी कविता क्रमबद्धपणे एकाच छंदात ओवलेल्या असतात व काफिया (म्हणजे स्वरांतिका-ध्वनीची स्वरसाम्यता) त्या शेरात छंदामुळे निर्माण झालेल्या गेयतेचे गेयमूल्य वाढवितो व रदीफ़च्या (अंत्य स्थिर समांतिका) पुनरुक्तीनं वाचक व श्रोत्याच्या रसस्वादनात, संगीतात्मक आनंदवृद्धी करते. हेच श्रेष्ठ उर्दू शायर, समीक्षक शम्सुर्रहमान फारुकींचे मत आहे.


उर्दूचे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते शायर शहरयार यांच्या मते ''जो छंदोबद्ध काव्य रचू शकतो त्यांसच गद्य कविता लिहिण्याचा अधिकार आहे.'' मूलत: साहित्य हे गद्य व पद्य या दोन प्रकारांत विभागलंय. पद्याचे अधिष्ठान छंदोबद्धता, लयनिष्ठता हे आहे व याच निकषावर ते गद्यापासून पृथक होते. जे पद्य नाही ते गद्य होय. म्हणून गद्य कविता हे वाक्य चूक आहे. जर त्या गद्यरचनेत काव्यगुण




**वास्तविकता अशी आहे की ग़ज़ल समीक्षा करण्यास काव्यसमीक्षकांत पूर्वापार चालत आलेली ग़ज़लबद्दलची पूर्वसूरींची श्रद्धानिष्ठ मते खोडण्याचं धाडस व व्यासंग नाही.**




**मुशायरा हे एक ग़ज़लगायनाप्रमाणेच ग़ज़लच्या पेशकशीचं म्हणण्यापेक्षा परफॉर्मिंगचं माध्यम बनलं आहे. इथे तरल, प्रतीकात्मक शेर क्वचित दाद घेतात. इथे बहुधा ग़ज़लपेक्षा हजलच दाद घेते.**




विद्यमान असतील तर त्या रचनेस 'काव्यात्मक गद्य' संबोधणे सयुक्तिक ठरेल.

जी मंडळी अमूर्त (संप्रेषित न होणारी) अशी काव्यात्मक गद्यरचना करीत असतील ती कवी या संज्ञेस पात्र आहेत का? त्यांना संप्रेषित होणारी छंदोबद्ध काव्यरचना भावणे वा जमणे शक्यच नाही. मग छंदोबद्ध काव्यावर म्हणजे ग़ज़ल-गीत इत्यादी विधांवर कृत्रिमतेचा, कृतकतेचा आरोप करणे एवढंच या मंडळींच्या हाती उरतं.

रदीफ काफियांमुळे 'नीमहशी सिन्फे सुखन' (अर्धनारीनटेश्वर किंवा अर्धहिंस्र साहित्यप्रकार) असं उर्दू समीक्षक डॉ. कलीमुद्दीन अहमद यांनी ग़ज़ल विधेबद्दल विधान केलं. पण अजूनही उर्दूत ग़ज़लसृजन सर्वाधिक आहे व दर्जेदार आहे. (मराठीत हे चित्र तितकंस दर्जेदार नसलं तरी आशादायक आहे.) खुसरोपासूनची सातशे वर्षांची प्रदीर्घ परंपरा असल्याने उर्दू ग़ज़ल उत्तरोत्तर प्रगल्भ व विश्वव्यापक बनली. याउलट मराठी ग़ज़ल दीर्घकाळ काफिया नव्हे तर यमकाच्या चक्रव्यूहात सापडली होती. याला कारण ग़ज़लेतील आंतरिक सौंदर्यापेक्षा बाह्य नट्ट्यापट्ट्याचे वाढलेले अवास्तव स्तोम.

मराठी ग़ज़लकार दुसऱ्या ग़ज़लकाराच्या ग़ज़लेचे काव्यमूल्यमापन करण्यापेक्षा त्यातील काफियातली चूक, अलामतची चूक, काफिया खुला केला नाही (?) इत्यादी गोष्टींबाबत बोलत राहतो. काफिया खुला करणे ही फक्त मराठीतील एक हास्यास्पद संकल्पना आहे. तसेच काफिया म्हणजे यमक ही व्याख्यादेखील अपूर्ण आहे. काफियात यमकाचा अंतर्भाव अवश्य होतो. पण स्वरसाम्य असलेल्या (ज्यास सौती काफिया म्हटलं जातं.) शब्दांचाही अंतर्भाव होतो. या दोन गोष्टींची अपूर्ण जाण असल्याने तीस-पस्तीस वर्षे मराठी ग़ज़ल अंत्ययमकाच्या चक्रात अडकून मर्यादित झाली. तिच्याबर कृत्रिमतेचा यामुळे आरोप होणे स्वाभाविक झाले. कारण यमकं मिळून मिळून किती मिळणार? तेच तेच शब्द रदीफ बदलून ग़ज़लकार वापरू लागले. स्वरांचा काफियाचा अलीकडे वाढला आहे. याने ग़ज़लच्या अभिव्यक्तीचे क्षेत्र विस्तृत होईल हे निश्चित. हे झाले तंत्र क्षेत्र, पण ग़ज़लेतील काव्यात्म गुणांचे काय? मराठी ग़ज़लमध्ये ग़ज़लियत ऊर्फ तगज्जुल बाबत फारशी चर्चा होत नाही. ग़ज़लियत म्हणजे खरेतर संस्कृत काव्यज्ञांनी जे काव्यगुण विश्लेषित केले तेच होय. फारसा फरक नाही. प्रासादिकताच इथेही प्रधान आहे. नवी पिढी हुशार आहे. तंत्र त्वरित अवगत करण्याची त्यांची हातोटी आहे. त्यामुळे अकवीदेखील ग़ज़ल कार्यशाळेतून तंत्र शिकून झटपट काव्यविहीन शेर म्हणजे छंदोबद्ध सपाट स्टेटमेंट पेश करू शकतो. अशात नीरक्षीरविवेक कोण कसा करणार?

ग़ज़ल समीक्षा होत नाही पण ग़ज़लसंग्रहावर परीक्षणे मात्र आस्वादक स्वरूपात प्रकाशित होतात. मी संपादित केलेल्या एका संग्रहावर लिहिताना एकाने माझ्या संपादकीयातील विविध वाक्ये तोडून जोडून आपला लेख परिपूर्ण केला. तर दुसऱ्याने मात्र संपादक वा संपादकीय लेखाची दखल न घेता, उल्लेखही न करता ग़ज़लेचं कविता म्हणून आस्वादक मूल्यमापन करणारा लेख लिहिला. तंत्राबद्दल त्याने अवाक्षरही काढले नाही. हीच अपेक्षा काव्यसमीक्षकांकडून ग़ज़लेच्या संदर्भात आहे. मग हवा तर निषेधात्मक स्वर लावून लिहा.

**सुरेश भटांच्या निधनाअगोदरची ग़ज़ल**

क्षेत्रातील बहुतांश मंडळींची सूत्रे ग़ज़ल गवैय्यांच्या हाती जाऊ लागल्याचे जाणवत होते. आहारी गेलेले गजलकार गायनानुकूल सृजनापेक्षा गायकानुकूल ग़ज़ल सृजन करू लागला. हा बाज लयनिष्ठ दादलेवा गजलचा होता. ग़ज़ल गायकांची संख्या हळूहळू वाढू लागल्याने विशिष्टांचे वर्चस्व ओहटीला लागले. अशातही मोजके ग़ज़लकार श्रवणीयपेक्षा वाचनीय ग़ज़ला लिहीतच होते हेदेखील सत्य आहे. ग़ज़ल गायनाच्या महफिलींच्या यशस्वितेचे खरे श्रेय जाते ते त्यासोबत जॉइंट व्हेंचर स्वरूपात घेतल्या जाणाऱ्या मुशाऱ्यांना व कार्यशालेय फॅक्टरीला.

ग़ज़ल- काव्य प्रकाशित करणाऱ्या नियतकालिकांच्या अभावामुळे नवोदित ग़ज़लकारांना फेसबुक व क्षेत्रीय मुशायरे यांचा आधार घेणे भाग पडले. मग आपण विस्मृतीत जाऊ नये यासाठी दररोज शेर टाकण्याचे काहींना व्यसन जडले. नाटकाप्रमाणे इथे त्वरित दाद मिळते हे पाहून अनेकांनी मासिकांची उपेक्षा करणेच उचित ठरविले.


या अशा पार्श्वभूमीवर गजल समीक्षा कशी संभवेल? जिथे कवींनाच इतरांच्या रचना

वाचावयास वेळ व इच्छा नाही तिथे रसोत्पत्ती न करणारी समीक्षा शुष्क व नीरस ठरणारच. बहुप्रसवतेमुळे बहुतांश ग़ज़ल- काव्यच वाचनीयता गमावू लागलंय, अशात तिची समीक्षा वाचकाभिमुख होण्याची शक्यता वर्तविणे अशक्य आहे.

आज चारशेच्या जवळपास ग़ज़लकार मराठीत ग़ज़ल लिहीत आहेत. प्रत्येकाची भाववृत्ती, चिंतनशीलता, कैफियत वेगळी आहे. पन्नास वर्षांत हा आकृतिबंध मराठी साहित्याचा अविभाज्य अंग बनला आहे. त्याची काव्यसमीक्षकांनी उपेक्षा करणे म्हणजे पळ काढणे ठरेल. त्यातील त्रुटी अधोरेखित करीत, त्यातील त्याज्य वा अनुचित बाबींचे हवे तर खंडन करा, परंतु ग. दि. माडगूळकरांच्या काव्याबाबत त्यांच्या काळातील काव्यसमीक्षकांनी जे धोरण राबविले तेच आजचे काव्यसमीक्षक ग़ज़ल-विधेबाबत राबवतील तर ते त्यांच्या प्रतिष्ठेला शोभणार नाही. अशोक बागवे, अरुण म्हात्रेंसारखे प्रतिष्ठित कवीदेखील अधेमधे ग़ज़ल रचना करतात. कवींना जसा गीत रचनांचा मोह होतो तसा ग़ज़ल रचनांचाही होतोच. पाडगांवकर, करंदीकर, शांता शेळके, ना. घ. देशपांडे, फ. मु. शिंदे अशी अनेक नावे नमूद करता येतील. यांच्या रचना तंत्रदृष्ट्या कशा सदोष आहेत याचीच चर्चा ग़ज़लकार (कार्यशाळेतून डायरेक्ट ग़ज़लकार म्हणून घडलेले) करतात. पण या साऱ्यांच्या कवितेच्या योगदानामुळे आपली ग़ज़ल कितपत स्टॅण्ड होते याचा विचार ही ग़ज़लकार मंडळी करीत नाहीत. 'ग़ज़ल'ने आपले स्वतंत्र बिऱ्हाड थाटल्याने ती कविता, कविवर्ग व काव्य-समीक्षकांपासून दुरावली असं तर नव्हे! सुरेश भटांना हे अपेक्षित नव्हते. कविसंमेलनातच ग़ज़लकारांनी सहभागी व्हावं असं त्यांचं मत होतं, किंबहुना निव्वळ ग़ज़लसंग्रह काढणेही त्यांना मान्य नव्हते. सुरेश भटांच्या काव्यसंग्रहातील त्यांची प्रास्ताविकं, ग़ज़लची बाराखडी, लेखसंग्रहातील लेख व डॉ. अक्षयकुमार काळेंनी घेतलेली मुलाखत इत्यादींचा सखोल अभ्यास केला तर काव्यसमीक्षकांना ग़ज़ल समीक्षा करण्यास मदत मिळू शकेल. अन्यथा ग़ज़लकारांनी स्वत: आपल्या संग्रहात आपली काव्यविषयक भूमिका मांडीत आपल्या रचनांची समीक्षा (एकतर्फी झाली तरी हरकत नाही.) करणे भाग पडेल. उर्दूचे ज्येष्ठ कवी अख़्तर उल-ईमान (यांनी ग़ज़ला कधीच लिहिल्या नाहीत.) यांनी आपल्या प्रत्येक संग्रहाला स्वत:ची विस्तृत प्रस्तावना जोडली आहे. त्याच्या आधारे त्यांच्या काव्यावर चार पीएच.डी. झाल्या आहेत. त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात उर्दू समीक्षकांनी त्यांच्या काव्याची दखल घेतली.

काव्यसमीक्षा वाचनीय असते का? बहुतांश कविता अमूर्त स्वरूपाच्या असल्याने आकलन-कक्षेत मोडत नाहीत. मग समीक्षा वाचकाभिमुख कशी असणार? ग़ज़ला बहुधा सुबोध असतात. मग त्यावर विद्वज्जड समीक्षा कशी संभवेल? असा प्रश्न माझ्या रसिक मित्राने विचारला. त्यावर ग़ज़ल संदर्भात एवढंच सांगू शकलो. भाषा, शैली, विषय, स्थायी विचार, लक्षणीय कल्पना इत्यादींचा मागोवा ग़ज़ल समीक्षेद्वारे सहज शक्य आहे. तंत्राचा कीस पाडायला अन्य ग़ज़लकार सज्ज असतात. त्यामुळे अलामत, हर्फ़ेरवी, जमीन इत्यादींच्या चर्चा करण्यास त्यांना मोकळं रान द्यावं.

– डॉ. राम पंडित
भ्रमणध्वनी : ९८१९७२३७५६
dr.rampandit@gmail.com




जिथे कवींनाच इतरांच्या रचना वाचावयास वेळ व इच्छा नाही तिथे रसोत्पत्ती न करणारी समीक्षा शुष्क व नीरस ठरणारच. बहुप्रसवतेमुळे बहुतांश गजल- काव्यच वाचनीयता गमावू लागलय, अशात तिची समीक्षा वाचकाभिमुख होण्याची शक्यता वर्तविणे अशक्य आहे.



The blood jet is poetry,
There is no stopping it.

(Sylvia Plath)



# नुसता गळा काढुया

प्रा. संजय बोरुडे

**मराठी कवितेची समीक्षा डोळसपणे वाचली तर किती समकालीन किंवा हयात असलेल्या कवींच्या कवितेवर समीक्षा लिहिली गेलेय? बरेचसे समीक्षक हयात नसलेल्या कवींवरच समीक्षालेखन करण्यात धन्यता मानतात.**

**मराठी** कवितेची समीक्षा 'वाचकाभिमुख' आहे किंवा नाही, या मुद्याची चर्चा करताना यात नेमका कोणता वाचक अभिप्रेत आहे, हे पहावे लागेल. या निमित्ताने पुन्हा हाही प्रश्न निर्माण होतो की, खरोखर मराठी कवितेला वाचक आहे काय? असल्यास तो कोणत्या प्रकारचा आहे? या अनुषंगाने विचार करू जाता आणखी एक मुद्दा समोर येतो; तो कविता लिहिणाऱ्यांचा. कविता लिहिणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे; हे कुठल्याही व्हाट्सप ग्रुपवरून चक्कर मारली तरी किंवा 'चेहरे पुस्तक' अथवा फेसबुकवर नजर टाकली तरी लक्षात येते. १९९७च्या अखिल भारतीय संमेलनाच्या निमित्ताने आमच्या नगर जिल्ह्यातील कविंची संख्या ४७६ पेक्षा जास्त नोंदवली गेली, हे उदाहरण पुरेसे बोलके आहे.

इतके लोक फार कविता लिहितात तर कुणीतरी वाचक असल्याशिवाय लिहितील का? आताच सावित्री नदीतल्या दुर्घटनेवर सोशल मिडियावर सावित्रीपेक्षाही जास्त कवितांचा महापूर आलेला पाहतो की! यावरून सांप्रतसमयी महाराष्ट्रप्रांती अनेकविध कवी स्वयंतेजाने तळपत आहेत असे म्हणावे लागेल. यातील बहुसंख्य कविता 'हुकुमी' असल्याचेही जाणवते. ही सर्व चर्चा करण्याचे प्रयोजन म्हणजे कविता लिहिणे हा 'सोपा' प्रकार आहे, असा एक सार्वत्रिक, अगंभीर असा समज आहे आणि तो निखालस चुकीचा आहे. याबद्दल प्रस्थापित कवीही मूग गिळून गप्प बसतात. शासकीय नोकऱ्यांत वरच्या पदावर असणारे कवी, पत्रकार कवी, कार्यकर्ते कवी यांच्या कवितेच्या समीक्षेच्या कोणी फंदात पडत नाहीत.

या व अशा 'काव्यजत्रे'त जुन्या पारंपरिक कवींची किंवा प्रस्थापित कवींची पुस्तकेही खपलेली दिसतात. म्हणजे त्या पुस्तकांच्या अनेक आवृत्त्या निघालेल्या दिसतात. याचा अर्थ ती पुस्तके वाचली जात असावीत. दुसरीकडे ख्यातनाम प्रकाशकांनी काढलेल्या विख्यात कवींच्या संग्रहांची पहिली आवृत्ती आजही प्रदर्शनातून सापडते. पन्नास-साठ वर्षानंतरही पाठ्यपुस्तकातील कवींवर, अभिजात म्हणवल्या जाणाऱ्या कवींवर तितक्याच उत्साहाने चर्चा होताना दिसते. कविता तिन्ही वळणांच्या बरीच पुढे आली, त्यालाही बरीच वर्षे झाली पण कवितेची समीक्षा मात्र त्या वळणांपलिकडेच घुटमळते आहे. दहावीतील गुणवत्ता यादीचे महत्त्व आता व्यवस्थेने कमी केले आहे. त्यामुळे ९०च्या पुढे पडणाऱ्या गुणांचे अप्रूप राहिले नाही. तसेच काहीसे मराठी कवितेच्या बाबतीत झाले आहे काय? इथल्या व्यवस्थेने 'चौथे' वळणच निश्चित केले नाही, त्यामुळे मराठी समीक्षा नारायण सुर्वेपाशीच थांबलेली दिसते. गेली पाच-पन्नास वर्षे मराठी समीक्षा कवितेचे चौथे वळण निश्चित होण्याची वाट पहात ती अजून तिथेच तिष्ठत असावी!

मराठी कवितेची समीक्षा डोळसपणे वाचली तर किती समकालीन किंवा हयात असलेल्या कवींच्या कवितेवर समीक्षा लिहिली गेली? बरेचसे समीक्षक हयात नसलेल्या कवींवरच समीक्षालेखन करण्यात धन्यता मानतात. असूनही संतकवी, पंतकवी, तंतकवी यांच्यावर नेटाने संशोधन करणारे किंवा समीक्षा लिहिणारी तज्ज्ञ मंडळी पाहिली की कसे भरून येते! आपण अजूनही अश्मयुगीन कालखंडातच जगत असल्याचे जाणवते. बहुतेक प्रस्थापित समीक्षकांच्या समीक्षेची 'आवर्तने' किंवा 'प्रस्फुरणे' पहा. एकाही जिवंत कवनांवर समीक्षा लिहिलेली दिसत नाही. भा. ल. भोळे व निशिकांत मिरजकर सरांनी तसा नैमित्तिक प्रयत्न केल्याचे आढळते. पण या कविंवर लिहिलेय त्या कवींच्या एकूण काव्यप्रवासाचे समग्र आकलन होत नाही.

फार वर्षांपूर्वी 'ग्रंथाली'च्या 'कविता दशकाची'च्या धर्तीवर लोकवाङ्मयच्या वतीने दहा कवींचे संग्रह प्रकाशित केले गेले. त्यावर एका तरुण समीक्षकाने समीक्षा केलेली होती. 'अभिधानंतर', 'शब्दवेध'च्या निमित्ताने भाषिक व्यवहार या मुद्याची चर्चा झाली होती. त्यातून पुढे आलेले कवी आणि या सर्व कवींच्या कवितांवर झालेल्या समीक्षेने वाचकाभिमुखतेचा मुद्दा विचारात घेतला काय? हे मुद्दे अभ्यासकांनी लक्षात घेऊन या व अशा प्रयत्नांना, या नव्या भूमिकेला, समीक्षेला पडताळले पाहिजे.

प्रचलित समीक्षेने हयात असलेल्या कवींची समीक्षा केलीच असेल तर ती 'सत्यकथा'सारख्या नियतकालिकांतून सातत्याने लिहिणाऱ्या कवींवर केलेली असावी. यातही मौज अशी की मर्ढेकरकालीन दळण दळणाऱ्या समीक्षकांचीही इथे चलती आहे. प्रस्तुत समीक्षक मर्ढेकरांच्याच

कवितांचा अन्वय लावत बसणार आहेत का? तसे असेल तर तुमच्या आमच्या कविता यांना समजायला किती काळ द्यावा लागेल? की सध्याच्या समीक्षकांमध्ये समकालीन कवितेला भिडण्याचे सामर्थ्यच नाही???

१९८० पर्यंतचा कवितेचा इतिहास बऱ्यापैकी नोंदला गेला आहे. त्यानंतरच्या कवितेची कोणतीही बरीवाईट 'वासलात' आजतागायत लावली गेलेली नाही किंवा तशी जबाबदारीही कोणी घेतलेली दिसत नाही. १९८० नंतरच्या कवितेचा सांगोपांग इतिहास न लिहिला जाण्याची काही कारणे संभवतात. पहिले कारण की आज 'सत्यकथे'सारखे नियतकालिक नाही. दुसरे कारण पूर्वी विद्यापीठांच्या खुर्च्या बनवत जी अपेक्षित गणिते जुळवता येत होती, ती आता जुळवता येत नसावीत. अभ्यासक्रमाला पुस्तके लावणे यातही ती गंमत राहिली नाही. विद्यार्थीच आता वर्गात बसत नाहीत. कला शाखेचा नोकरीसाठी उपयोग नसल्याने त्यांच्यात एक अनुत्साह आला आहे. तिसरे महत्त्वाचे कारण म्हणजे इथल्या व्यवस्थेला ही समीक्षा करायचीच नाहीये आणि याला बहुजन-अभिजन वादाची किनारही असू शकते.

अशा परिस्थितीत कवितेची प्रचलित समीक्षा ही वाचकाभिमुख सोडा 'सत्याभिमुख' तरी आहे काय? हाही प्रश्न पडतो. आता सध्या कवितांची ही वर्गवारी झाली आहे. ही अभ्यासकांच्या सोयीसाठी ठीक असली तरी कवितेसाठी मारक आहे. त्यामुळे ग्रामीण कविता, दलित कविता, महानगरी जाणीवेची कविता, चौथ्या नवतेची कविता, स्त्रीवादी कविता अशी बेटं तयार झाली आहेत आणि या बेटांचे 'फॅमिली डॉक्टर'सारखे फॅमिली समीक्षकही ठरलेले आहेत. मग पुन्हा या बेटातल्या समीक्षकांनी त्या बेटातल्या कवींच्या कवितेची समीक्षा करायची नाही असा बांध घतलेला दिसतो. बांध आला म्हणजे बांधावरची भांडणे आलीच. त्यातून समीक्षकांचे 'आखाडे' तयार झाले. त्या-त्या आखड्यांचे उस्ताद तयार झाले. त्या त्या उस्तादाचे पठ्ठे तयार झाले. त्यातून मठ, कंपू तयार झाले. या सगळ्या काव्यकुंभमेळयात अशी वर्गवारी करून मग कवितेचे नेमके काय भले झाले; हाही प्रशच आहे. कविता 'कविता' असते. ती दलित, ग्रामीण अशी नसते, असे माझे वैयक्तिक मत आहे.

एका प्रसिद्ध अंकात सप्टेंबर २०१३ मध्ये 'बाई ठेवण्याचे मानसशास्त्र' या शीर्षकाच्या कविता छापल्या तर एका अज्ञातवासातल्या समीक्षक कवीने संपादकाशी चर्चा केली की हे टोपणनावाने लिखाण केलेले आहे, हे का छापले? आधी या कवितांचा संग्रह काढायला तयार असणारा संपादक त्या हल्ल्यामुळे बॅकफूटवर गेला. हे उदाहरण यासाठी की कविता टोपणनावाची असो नाहीतर नसो, त्या कवितेतील उणीवा, बलस्थाने दाखवण्याऐवजी, तिच्यावर साधकबाधक चर्चा करण्याऐवजी हे काय भलतेच? प्रस्तुत समीक्षकांचे स्त्रियांच्या कवितेवरील कोणतेही समीक्षालेख उघडून पाहिले तर त्यात मुंबई-पुण्यातल्या चारदोन कवयित्रींची नावे सोडून इतर कोणाच्याही कवितेचा विचार केलेला आढळत नाही. समीक्षकांची अशी 'द्रोणाचार्यी' भूमिका आणि संपादकांची कचखाऊ भूमिका चांगल्या कवितेला कितपत न्याय देईल?

सांप्रतसमयी कवितेची समीक्षा कोठे वाचायला मिळते, या प्रश्नाचा शोध घेतला तर 'प्रतिष्ठान', 'युगवाणी', 'कविता-रती', 'अनुष्टुभ्', 'खेळ', 'सर्वधारा' यांसारखी नियतकालिके हा एक स्रोत मानला जाऊ शकतो. दुसरा स्रोत म्हणजे प्रकाशकांच्या गृहपत्रिका होत. या गृहपत्रिकेतून स्वत:च्याच प्रकाशकांकडून आलेल्या कवितासंग्रहाची समीक्षा लिहिली जाते. बऱ्याचदा ती लिहवून घेतली जाते. त्यात सदर पुस्तक खपावे असा मार्केटिंगधार्जिणा उद्देश असल्याने सदर समीक्षा, समीक्षकी न ठरता प्रचारकी ठरते किंवा प्रोत्साहनपर तरी. त्यातही 'लिहवली' जाणारी असल्याने यजमानांना दुखावणे किंवा त्यांच्या ध्येयधोरणांशी विसंगत समीक्षा येणे दुरापास्तच. तिसरा स्रोत म्हणजे वर्तमानपत्रातील परिक्षणे. यातही प्रचंड काटछाटीत जागा मिळणे अवघड झाले आहे. खालून येणाऱ्या छापील, पेड जाहिरातींच्या शिखरांच्या बेचक्यांतून वाट काढत ही परिक्षणे छापली जातात. अर्थात ही परीक्षणेच असतात यांमुळे त्यांना समीक्षा म्हणणे अवघड आहे. पत्रकारितेत असून साहित्यात लिखाण करणाऱ्या मंडळींकडेच बऱ्याचदा ही कामे असतात. त्यामुळे त्यातही हितसंबध जोपासण्याकडे कल

**१९८० पर्यंतचा कवितेचा इतिहास बऱ्यापैकी नोंदला गेला आहे. त्यानंतरच्या कवितेची कोणतीही बरी-वाईट 'वासलात' आजतागायत लावली गेलेली नाही किंवा तशी जबाबदारीही कोणी घेतलेली दिसत नाही.**

**भाडोत्री समीक्षकांची जात हाही चांगल्या कवितेच्या वाचकाभिमुख समीक्षेतील प्रमुख अडथळा आहे. असे समीक्षक लेखक, कवी प्रकाशक यांच्या वतीने लिहिणारा असतो त्यामुळे तो वैगुण्य दाखवेल किंवा साक्षेपी लिहील याची शाश्वती नसते. नीरक्षीर विवेकबुद्धीने, सम्यक आकला करून लिहिणारे कोणते समीक्षक आज आहेत? त्यातही फक्त समीक्षकांचा आढळ हा शहरातच का आहे हेही एक कोडेच आहे.**




**सूत्रसंचालन करणाऱ्या एका कवीने ३० पेक्षा जास्त कवितासंग्रह लिहिले आहेत. त्यांच्याबद्दल 'त्यांनी कवितेपेक्षा कवितासंग्रहच जास्त लिहीले' असा आक्षेप एका सुजाण वाचकाने घेतला होता. मात्र मंचीय अथवा लोकप्रिय कवितांचीही बरी-वाईट समीक्षा व्हावी.**

असू शकतो. एवढे चॅनल्स झालेली असताना एकाही चॅनल्सवर नवीन आलेली पुस्तके, त्यावर चर्चा, वाद अथवा समीक्षा असे काही दिसत नाही. यावरून प्रसारमाध्यमे व साहित्य यांचा परस्पर संबंध (?) लक्षात येतो. पत्रकार, साहित्य, सामान्य वाचक, प्राध्यापक, समीक्षक, अभ्यासक यांच्यामध्ये परस्पर आंतरसंबंध आहेत काय? असतील तर त्याचे स्वरूप वाङ्मयीन आहे काय यांची उत्तरे नकारार्थीच आहेत. हे पत्रकार तरी कविता किती वाचतात हाही प्रश्न आहे. नुकत्याच एका साहित्यिक क्षेत्रात जाण्याचा योग आला होता. संयोजकांची कवितेसाठीची भूमिका फार व्यापक होती. पण तिथे चॅनल्सवरच्या निवेदिका काही सूत्रसंचालनासाठी होत्या. पण त्यांना मराठी कवितचे प्रवाहही नीट माहीत नव्हते, निमंत्रित कवांचे कवितेतील योगदान काय हेही माहीत नव्हते. त्यांची धाव पाडगावकर, बोरकर किंवा फार फार तर संदीप खरेपर्यंत दिसली. म्हणजे कवितेचे समकालीन कवितेचे वाचनच नाही या लोकांचे. तरीही त्यांना सूत्रसंचालनाची संधी मिळते? म्हणजे कवितेचा वाचक फक्त कवीच आहे हे कटुसत्य आपण स्वीकारले पाहिजे. दुसऱ्या कुणालाही कवितचे काही पडलेले नाही; अगदी प्रकाशकांनाही.

वरील स्रोतांपैकी नियतकालिके वर्गणी भरल्याशिवाय वाचकांना मिळत नाहीत. काही मोठमोठ्या साहित्यिकांनी आपल्या मानधनातून मोठी रक्कम देणगी म्हणून दिल्याचेही बोलले ाते. मग ही नियतकालिके त्यांच्या बऱ्यावाईट कच्च्या-पक्क्या सर्वच साहित्याचा उदोउदो करताना दिसतात. प्रस्थापित साहित्यिकांच्या, कवींच्या, साऱ्याच रचना चांगल्याच असतात ही एक 'वाङ्मयीन अंधश्रद्धा' आहे. त्यामुळे त्यांची चिकित्साच होत नाही. हेही मराठी कवितेच्या समीक्षेचे अपयश आहे.

वरील स्रोतांमधून सध्याच्या वाचकाला समीक्षा शोधावी लागते. त्यातून तो त्याचे बरेवाईट मत बनवतो. तिथून पुढे संबंधित संग्रह कोणत्या वाचनालयात उपलब्ध होईल ते पाहतो. संग्रह विकत घेऊन वाचण्याची जशी अपल्याकडे मानसिकता नाही तशीच ती ऐपतही. प्रकाशकांनीही पुस्तकांच्या किंमती तशाच ठेवलेल्या असतात हा एक भाग. या बहुजन कवींनी कविता लिहिल्यात ते वाचण्याचे, त्याचा बरा-वाईट अन्वय लावण्याचे कष्ट बहुजनच वाचक घेत नाहीत. कारण मराठीत, महाराष्ट्रात वाचन हे एक जीवनाचा अविभाज्य अंग आहे असे मानले जात नाही. वाचक शहरात जास्त असतात. खेडोपाडी पसरलेला वाचक स्वत: मोडकेतोडके का होईना, पण लेखन करणाऱ्यातलाच असतो; हे नाईलाजाने मान्य करावे लागते.

दुसरीकडे शासनदरबारी साहित्याबद्दल दाखवली जाणारी अनास्था हाही एक मुद्दा आहे. गावोगाव अनुदानासाठी चालवली जाणारी 'कागदी' वाचनालये हाही एक चिंतेचा विषय आहे. इथला साहित्य व्यवहार असा गुंतागुंतीचा आहे. ध्येयवादी प्रकाशकांची पिढी संपली आहे आणि त्यांच्या जागी वारसाहक्काने आलेली पुढची पिढी प्रकाशनाकडे 'व्यवसाय' म्हणून बघत असल्याने मार्केटिंग महत्त्वाचे झाले आहे. या नव्या प्रकाशकांचे मराठी कवितेचे किती वाचन आहे? यांना किती कविता कळते?

असो, अशा या धबडग्यात कवितेला 'वाचक' तरी आहे का, हाच मूळ प्रश्न आहे; तो तसा अनुत्तरीत आहे किंवा कळत असूनही मान्य न केला जाणारा आहे, परंतु जो काही थोडाफार वाचक उपलब्ध आहे त्याला उपरोल्लिखित स्रोतांतूनच समीक्षा पदरी पडते. ती अर्थातच वाचकाभिमुख नसते तर त्याच्यावर 'लादलेली'च असते. मध्यांतरी एका वृत्तपत्राने 'माझी आवडती टॉप-टेन पुस्तके' असे विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून निवड केलेल्या पुस्तकांची यादी छापणे सुरू केले होते. आता या 'सो कॉल्ड', एलिट वर्गाच्या आवडीची पुस्तके चक्क पारंपरिक किंवा इंग्रजी होती... त्यातही कवितासंग्रहाची नावे पाडगावकर, कुसुमाग्रांच्या पलीकडे जातच नव्हती. हा काय प्रकार आहे? इंग्रजी वाचणारा हा वर्ग मराठी, तोही अलिकडची कवितेची पुस्तके का वाचत नसावा, याचाही विचार तमाम कवी, समीक्षक व प्रकाशकांनी करावा. मग कविसंमेलनाला जाताना चारदोन हक्काचे श्रोते बरोबर तयार करून घेऊन जावेत, तसे वाचकही तयार करावे लागतील का? ते सोडा, अशा भाराभार कविता लिहिणाऱ्यांचे तरी किती वाचन आहे?

निदान कवितेचा वाचक तरी घडवावाच लागणार आहे. फार मोठा वर्ग 'ययाती',

'मृत्युंजय' वा तत्सम लेखन पुन्हा वाचणारा आहे, दुसरा वर्ग सुहास शिरवळकर, गुरुनाथ नाईक वगैरे लेखक वाचणारा आहे. तिसरा वाचक आहे तो धार्मिक पुस्तकांचा; चौथा वाचक आहे तोमाहितीपर पुस्तके वाचणारा. साहित्य संमेलनातल्या उत्सवी मंडपात पुस्तके खरेदी करणारा वर्ग हा दिवाणखाण्याची सजावट केंद्रीभूत ठेवणारा असतो. त्यातही कवितेचा वाचक असतोच असे नाही. कवितेचा सुजाण वाचक हा उंबराच्या फुलांसारखाच दुर्मिळ प्रकारातला आहे. बराचसा वाचक हा सोशल मिडीयावरचा आभासी वाचकवर्ग आहे, हे वास्तवही नाकारून चालणार नाही. अशा वाचकाला किती महत्त्व द्यायचे, हे ज्याने त्याने ठरवावे.

भाडोत्री समीक्षकांची जात हाही चांगल्या कवितेच्या वाचकाभिमुख समीक्षेतील प्रमुख अडथळा आहे. असे समीक्षक लेखक, कवी प्रकाशक यांच्या वतीने लिहिणारा असतो त्यामुळे तो वैगुण्य दाखवेल किंवा साक्षेपी लिहील याची शाश्वती नसते. नीरक्षीर विवेकबुद्धीने, सम्यक आकलन करून लिहिणारे कोणते समीक्षक आज आहेत? त्यातही फक्त समीक्षकांचा आढळ हा शहरातच का आहे, हेही एक कोडेच आहे.


समीक्षेच्या उद्दिष्टांनुसार सत्यशोधनासाठी किती समीक्षक लेखणी झिजवतात? वाचकांची अभिरुची घडवणारे लिखाण आज पहायला मिळते काय? पूर्वी व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर नाटकांवरील परीक्षणे समरसून लिहायचे. त्यांचा एक स्वतंत्र वाचकवर्ग निर्माण झाला होता. रेडिओवरील 'बिनाका गीतमाला'मध्ये फक्त अमीन सयानीचा आवाज ऐकण्यासाठी वेळ काढून रेडिओला कान लावणारा श्रोता होता. तसा आवर्जून वेळ काढून एखाद्या समीक्षकाचा स्तंभ आवडीने वाचणारा वाचकवर्ग आहे काय? दक्षिण भारतामध्ये काही भागात घरोघर पारंपरिक नृत्यकला शिकवली जाते. कारण ते त्यांच्या दैनंदिन जीवनाचे अविभाज्य अंग असते. त्यामुळे ती कला मोठी होते व कलाकारही. आपल्याकडे उलट आहे. कवी मोठे होतात, पण त्यांची कविता नाही.

त्यात कवितेतील राजकारण, कंपूबाजी, प्रसिद्धीचे फंडे, मठशाही, रात्रीतून यशाचे शॉर्टकटस, कमी श्रमात नाव मिळवणे, गंडाबंद शागीर्दी, हितसंबंध जोपासणे, चांगल्या कवींना डॉमिनेट करणे, पुरस्कार हंटिंग, कितीही चांगली कविता असली तरी मनमोकळी दाद न देणे ; ही मराठी कवितेच्या क्षेत्राला लागलेली ग्रहणे आहेतच. नवे कवीही हेच शिकतात. कवितेआधी साहित्यातल्या राजकारणाचे धडे ते गिरवतात. कोणत्या तरी कळपात आपली कविता घुसवतात. पुरस्काराची फिल्डींग लावतात, त्याच त्या कविता म्हणत एकाच कवितेवर पेशा मिळवायला पाहतात. यातून मराठी कवितेचा काय ढेकळे विकास होतो? आमच्याकडचा एक मूळचा बाहेरचा परंतु स्वत:ला नगरी म्हणवून घेणारा एक प्रथितयश कवी महाराष्ट्रातील कोणत्याच कवीला चांगले म्हणत नाही. त्याच्या कवितेची कोणी यथार्थ समीक्षा करायला गेले की तो त्यावर चर्चा न करता उलट अंगावर येतो. स्वत:ला सेन्सॉर समजतो. चांगल्या कवींच्या खाजगी जीवनाची माहिती काढून त्यांची बदनामी करत राहतो. (त्याचे पहिले पुस्तक चक्क चारोळीसंग्रह होता. चंद्रशेखर गोखलेंच्याही आधी त्याचा संग्रह आलेला होता. हे त्याचे योगदान दुर्लक्षितच राहिले.) ही प्रवृत्ती सर्वत्र आढळते. हे उदाहरण यासाठी की जर सांप्रतच्या काळात कोणी खरी समीक्षा करायचा प्रयत्न केला तर असे हे वाङ्मयीन दहशतवादी कितपत






**वाचकांच्या अभिव्यक्तीला किती वाव हल्लीच्या मासिकात, नियतकालिकांत, दैनिकांत मिळतो? हिंदीमधल्या 'हंस'सारख्या नियतकालिकांत वाचकांच्या पत्रव्यवहाराला फार मोठी पोच दिली जातात.**




स्वीकारतील? नव्या कवींपुढे समीक्षेतील आयडॉल्स तरी आहेत का? अशा या अर्ध्या कच्च्या, निम्म्या हळकुंडाने पिवळ्या झालेल्या कवींना कोण आवरणार? यांच्यात कवितेची खरी समीक्षा सोसण्याची किमान आच तरी आहे काय? हे उद्या हाताबाहेर गेले तर या प्रजातीला आवरण्याची ताकद प्रचलित समीक्षेत आहे काय?


मंचीय कवितेचा एक प्रेक्षकवर्ग आहे. परंतु मिनटामिनटाला हशा आणि टाळ्या वसूल करणारे दिग्गज कवी मराठी वाङ्मयाच्या इतिहासाच्या क्षितीजावरही दिसत नाहीत. त्यात सूत्रसंचालन करणाऱ्या एका कवीने ३० पेक्षा जास्त कवितासंग्रह लिहिले आहेत. त्यांच्याबद्दल 'त्यांनी कवितेपेक्षा कवितासंग्रहच जास्त लिहीले' असा आक्षेप एका सुजाण वाचकाने घेतला होता. मात्र मंचीय अथवा लोकप्रिय कवितांचीही बरीवाईट समीक्षा व्हावी.

कोणत्या कवितेची समीक्षा वाचकाला हवीय ते वाचकाला ठरवू द्या ना! वाचक सोडून बाकीचेच हे ठरवू पाहताहेत. मग वाचकाभिमुखता येणार कशी? दुसरीकडे कवितेचा वाचक (असलाच तर) तो किती प्रगल्भ आहे, हाही एक प्रश्न आहे . भावकविता, चारोळी किंवा प्रसिद्ध गीतकारांची पुस्तके वाचणाराही एक वाचकवर्ग आहे. खऱ्या कवितेचा वाचकवर्ग किती, याचा शोध कोण व कसा घेणार? वाचकांच्या अभिव्यक्तीला किती वाव हल्लीच्या मासिकांत, नियतकालिकांत, दैनिकांत मिळतो? हिंदीमधल्या 'हंस'सारख्या नियतकालिकांत वाचकांच्या पत्रव्यवहाराला फार मोठी पाने दिली जातात. 'नया ज्ञानोदय'सारख्या ज्ञानपीठाकडून काढल्या जाणाऱ्या कविता विशेषांकाच्या पाच-पाच आवृत्त्या निघाल्यात. मराठीत एखाद्या मासिकाच्या एका अंकाच्या अशा आवृत्त्या निघाल्याचे ऐकिवात तर नाहीच नाही, पण तशी स्वप्नेही पडत नाहीत संपादकांना. 'वाचकाभिमुख' साहित्य निर्माण झाल्याखेरीज वाचकाभिमुख समीक्षा तरी कशी उपजणार? हो चि मिन्ह, चे गवेरा सारखी मोटिव्हेट करणारी कविता आकाराला येईल काय?

वाचकांचा आतला आवाज, स्वर दाबून केली जाणारी समीक्षा कोणत्याही वर्तमानाचा खरा वेध घेऊ शकत नाही, याची सम्यक जाण ठेवणे गरजेचे आहे. या व अशा सगळ्या परिस्थितीत वर्तमान कविता, समकालीन कविता यांचा प्रवाह आधी निश्चित करावा लागेल. तुकारामांसारख्या अभंगाच्या ओळी लोकांच्या ओठांवर जाण्याइतकी ताकद इथल्या कवी मंडळीकडे यावी लागेल. नाहीतर १००-१५० कविता झाल्या की प्रथेप्रमाणे प्रकाशकांचे उंबरठे झिजवणे, प्रकाशकांनी त्यांचेच पैसे घेऊन त्यालाच गंडविणे हा 'मराठी बाणा' असाच चालत राहणार; हौसेपोटी संग्रह येत राहणार; इथली कुपोषित समीक्षा तिला अनुल्लेखाने मारणार आणि वाचकाभिमुख समीक्षेअभावी कवितांचा बळी जात राहणार, हे त्रिवार सत्य आपण स्वीकारुया नाहीतर 'मराठी कवितेचं काय होणार 'म्हणून नुसता गळा काढूया.....!

**- संजय बोरुडे**
भ्रमणध्वनी : ९४०५०००२८०
९३७२५६०५१८
sanjayborude2010@gmail.com

**'नया ज्ञानोदय'सारख्या ज्ञानपीठाकडून काढल्या जाणाऱ्या कविता विशेषांकाच्या पाच-पाच आवृत्त्या निघाल्यात. मराठीत एखाद्या मासिकाच्या एका अंकाच्या अशा आवृत्त्या निघाल्याचे ऐकीवात तर नाहीच नाही पण तशी स्वपेही पडत नाहीत संपादकांना. 'वाचकाभिमुख' साहित्य निर्माण झाल्याखेरीज वाचकाभिमुख समीक्षा तरी कशी उपजणार?**



Everywhere I go,
I find a poet has been there before me.

**(Sigmound Freud)**





पाने ८० । किंमत रु. १००

## हे मित्रवर्या!

प्रा. रा. ग. जाधव

डॉ.नरेंद्र दाभोलकर हे सामाजिक कार्यकर्ते तर प्रा.रा.ग.जाधव हे साहित्य-समीक्षक. मागील तीन दशकांपासून म्हणजे जाधव सर सातान्यात राहात होते तेव्हापासूनचे हे दोन मित्र. गेल्या दहा वर्षांत तर डॉ.दाभोलकर, साधनाच्या कामासाठी प्रत्येक सोमवारी-मंगळवारी पुण्यात येत तेव्हा जाधव सरांच्याकडे रहायला असत...
२० ऑगस्ट २०१३ रोजी डॉ.दाभोलकरांची हत्या झाली. त्यानंतरच्या दीड महिन्यात जाधव सरांनी लिहिलेल्या या ६७ स्मृतिरचना...

सवलतीत : ६० रुपये (टपालखर्च वेगळा)




पाने १०८ । किंमत रु. १००

## बापू एकभाषित चिंतनकाव्य

प्रा. रा. ग. जाधव

दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली

३० जानेवारी १९४८ रोजी गांधीजींची हत्या झाली. त्यावेळी मी शालेय विद्यार्थी होतो. गांधीजींना मी एकदाच फक्त आगाखान पॅलेसमधील प्रार्थनासभेत खूप लांबून पाहिले होते. खरे म्हणजे ते मला तेव्हा फक्त दिसले होते. ३० जानेवारीला व नंतर पुण्यात जी जाळपोळ झाली, समाज पेटून उठला, त्यांतील काही दृश्ये मात्र मी पाहिली व तेव्हापासूनच 'गांधीजी' माझ्या मनात रुतून बसले. मी काहीतरी देणे लागतो आहे, ही भावना उत्तरोत्तर दृढमूल होत गेली. या रचना खरे तर, या शालेय वयात झालेल्या मानसिक कराराच्या द्योतक आहेत.

सवलतीत : ६० रुपये (टपालखर्च वेगळा)

संपर्क : साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ, पुणे ३० फोन ०२० २४४५९६३५
mediasadhana@gmail.com



# आजच्या मराठी काव्यसमीक्षेची गत

**प्रा. राजश्री पाटील–कुलकर्णी**

**हल्लीची मराठी समीक्षा ही 'आम्ही कोण म्हणुनि काय पुससी' या थाटात स्वत:चा अभिनिवेश निर्माण करणारी व अकारण हास्यास्पद झालेली मल्लिनाथीच होऊ लागली आहे.**

**समीक्षेने** रसशोधन किंवा सौंदर्यशोधन करणे अपेक्षित असते. सत्यशोधन हा संशोधनाचा प्रांत आहे. एखाद्या welldefined कलाकृतीमधील सौंदर्य उकलून दाखविणारे रस्ते समीक्षेने दाखविणे आवश्यक असते. तथापि, विद्यमान समीक्षा ही अत्यंत गंभीर मुद्रेने किंबहुना लांब चेहऱ्याने विद्वत्ताप्रदर्शन करू इच्छिणारी आणि म्हणूनच गमतीशीर झालेली आहे. कलावंताच्या व्यक्तित्वाचा शोध, इत्यादी बाबी, या संशोधनाकडे नेणाऱ्या पाऊलवाटा असतात. टीकाकार जेव्हा या पाऊलवाटांचा बडेजाव मिरवू लागतो तेव्हा ते लेखन संशोधनसुद्धा सिद्ध होत नाही. नवीन समीक्षकांना किंवा स्वधन्य टीकाकारांना सदर गोष्टीचे भान असेल, असे त्यांची समीक्षा वाचून वाटत नाही. विद्वत्ताप्रदर्शन करीत असताना ना धड समीक्षा, ना धड संशोधन, ना धड परीक्षण असा बेंगरूळ कारभार मराठी समीक्षेत आढळून येत आहे.

कवितेचा एकच एक अर्थ असावा, असे म्हणणे तितके योग्य नसले तरी समीक्षकाने उकललेला अर्थ मूळ कवितेशी संवादी असावा, त्या कवितेशी सुसंगत असावा अशी रास्त अपेक्षा असते.

शिल्प, नृत्य, चित्र इत्यादी कलांचे ज्ञान आणि आता त्या प्रांतांमध्ये काय घडते आहे याचे भान कलावंताप्रमाणे समीक्षकालाही असणे आवश्यक आहे. कारण सर्व अभिजात कलांचे कवितेशी जवळचे नाते आहे. सिनेमा आणि जाहिरातकलेचेही! कवितेतील सौंदर्यस्थळे टिपण्याची आणि ती वाचकांपर्यंत पोहचवण्याच्या जबाबदारीची जाणीव समीक्षकाला असावी. ही जाणीव पूर्वीच्या समीक्षकांमध्ये होती, याची काही प्रातिनिधिक उदाहरणे पाहू.

बालकवींच्या कवितेतील चित्रमयतेबाबत रा. शं. वाळिंबे यांनी म्हटले आहे, ''लँडस्केपमध्ये एकाच वेळी दिसणारे अनेक रंग ज्या कौशल्याने प्रतिभाशाली कवी शब्दांच्या साहाय्याने व्यक्त करू शकतो व ते समग्र दृश्य जसेच्या तसे आपल्या डोळ्यांसमोर उभे व्हावे अशी योजना करू शकतो...''

मर्ढेकर व पु. शि. रेगे यांना नवकवितेची केंद्रीय संस्था मानणारे डॉ. सुधीर रसाळ यांनी म्हटले आहे की, प्रतिमेकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोण नवकवींच्या पिढीने मराठीमध्ये रुजवला. तसेच... ''युरोपातील संगीत व चित्रांचा पाश्चिमात्य साहित्यावर परिणाम झाला व तो मराठीमध्येही आला... सलग वस्तूचे, घटनांचे तुकडे तोडून त्यांची एक अपूर्व रचना साधण्याचा प्रयत्न या कवींनी केला...'' नवकवितेमधील प्रतिमा समजून घेण्यासाठी अर्थाचे स्तर उलगडत जावे लागतात हे व डॉ. रसाळ यांचे मत निर्मिती व आस्वाद या दोन्ही प्रक्रियांमधील सेतू असणाऱ्या समीक्षकाचे मत आहे.

मं. वि. राजाध्यक्ष यांनी ना. घ. देशपांडे यांच्या 'शीळ' या कवितासंग्रहाला लिहिलेली प्रस्तावना हे आदर्श समीक्षेचे उदाहरण म्हणता येईल. ना. घं.च्या कवितेतील विविध रंगच्छटा सूक्ष्मदर्शकातून वस्त्रांच्या जाणकाराने दाखवाव्यात तशा राजाध्यक्ष यांनी दाखविल्या आहेत. एवढ्या तलमपणे विणकाम वाचकांपर्यंत पोहचवण्यासाठी त्या निर्मितीच्या हृदयापर्यंत जाणारा रस्ता पोटातून जात नाही तर थेट हृदयापर्यंत जातो. याचा अर्थ असा नव्हे की, 'व्वा व्वा' असेल तर समीक्षा छान छान. असे असते तर मर्ढेकरांची 'भंगू दे काठिन्य माझे' आधुनिक काळातील 'पसायदान' आहे हे म्हणावयाला इतकाऽऽ अवधी गेला नसता. कलाकृतीमध्ये बाजारूपण नाही हे सांगायला समीक्षकाची दृष्टीही तेवढीच निकोप असायला हवी.

आस्वादक समीक्षेचे देखणे रूप म्हणजे डॉ. विजया राजाध्यक्ष यांची काव्यसमीक्षा. वाचकांना सहानुभव देण्याची समीक्षकाची वृत्ती आणि त्यासाठी संवादी भूमिका हे या प्रकारच्या समीक्षेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य. ''अनिलांच्या कवितेला कसं सामोरं जावं हे मी माझ्या अनुभवातून शिकले आहे. तुम्हालाही तसं सामोरं करण्याचा, सन्मुख करण्याचा प्रयत्न मी करणार आहे,'' असं म्हणत त्या अनिलांच्या कवितेची रूपे उलगडत जातात तेव्हा त्यांची ही भूमिका अधोरेखित होते.

पूर्वीच्या समीक्षेची वैशिष्ट्ये नोंदवताना हे लक्षात येते की, लेखक हे अंक टाकून संशोधन व समीक्षा यांचे क्रमाने भाग पाडत असत. क्रमांक एकमध्ये प्रास्ताविक, कवी परिचय, काव्य परिचय येत असे व तिसऱ्या भागात उपलब्ध संशोधनानुसार दिसलेल्या तरल सौंदर्याचे किंवा तलम रसाचे दिग्दर्शन होऊन समीक्षा सिद्ध होत असे. डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे लिखित

'ना. घ. देशपांडे : कवी व कविता' हा लेख म्हणजे शिस्तबद्ध पद्धतीने केलेले रसशोधन आहे. ना.घं.च्या विशुद्ध प्रेमकवितेची विविध वळणे, आशाय व अभिव्यक्ती या दोहोंमधील एकमेव आणि तिच्यातील गीतकाव्याची निर्देशित सामर्थ्ये या सर्व वैशिष्ट्यांसह क्रमाने केलेले सौंदर्यशोधन म्हणजे हा लेख होय.

विद्यमान समीक्षा ही समीक्षा न राहता कधी संशोधन तर कधी परिचय तर कधी परीक्षण वाटते. उदाहरणार्थ, ''संतसाहित्य हे दुर्बोध कधीच नव्हते. मुळातच ते जनसामान्यांच्या उत्कर्षाचे असल्याने त्याची भाषा सुबोध, प्रासादिक असणेच स्वाभाविक होते,'' अशी वाक्ये केवळ ओळख करून देणारी असून समीक्षेच्या नावाखाली खपून जातात. शिवाय, अशा लेखनामध्ये निबंधाच्या शेवटी संदर्भ दिले जातात. त्यामुळे त्या समीक्षकांची आपल्या मजकुराला संशोधनपत्रिका समजावे अशीच अपेक्षा असते.

''...१९८५ ते १९९८ या काळात लिहिलेल्या कविता (टिंब टिंब टिंब)... यांच्या (टिंब टिंब टिंब)... या कवितासंग्रहात मराठी वाचकांपुढे आल्या आणि त्यानंतर वीस वर्षे त्यांनी कविता लिहिली नाही...'' निदान या वाक्यावरून तरी हा निबंध म्हणजे संशोधन आहे की समीक्षा आहे की परिचय आहे हे समजण्याची शक्यता नाही.

''...यांना पंढरपूरचे जाणवलेले ओंगळवाणे स्वरूप लक्षणीय आहे. पंढरपूरची पवित्रता अनेक गोष्टींनी मंगळी आहे. त्याचे मूळ स्वरूप नष्ट झाले आहे... विठ्ठलाच्या संदर्भात त्यांच्या धारणा पक्क्या ठरल्या आहेत. आपल्या विचारांवर ते ठाम आहेत...'' अशा वाक्यांमधील शब्द बिनचेहऱ्याचे होऊन जातात. 'पवित्रता' ह्या शब्दाऐवजी 'पावित्र्य' ह्या शब्दाचे उपयोजन अधिक योग्य ठरले असते.

वरील उदाहरणांमध्ये 'कवितारती' ह्या नियतकालिकाचे संदर्भ देण्यामागचे कारण असे की, केवळ काव्य या प्रकाराला गंभीरपणे वाहिलेले हे एक नियतकालिक आहे.

हल्लीची मराठी समीक्षा ही 'आम्ही कोण म्हणुनि काय पुससी' या थाटात स्वत:चा अभिनिवेश निर्माण करणारी व अकारण हास्यास्पद झालेली मल्लिनाथीच होऊ लागली आहे.

समाजमाध्यमांमधील लेखनाचे वेगळेच प्रकरण! नेटक्रांतीमुळे समाजमाध्यमांमध्ये लिहिणारे कमी आणि 'पाडणारे' अधिक असे चित्र निर्माण झाले आहे. त्यामुळे 'झेलणारा' वाचकच समीक्षक असल्याच्या आविर्भावात वावरत आहे. ब्लॉगवरील समीक्षात्मक लेखनामध्ये सकसतेचा आढळ ही आजच्या काव्यसमीक्षेची जमेची बाजू म्हणता येईल.

विद्यमान कवितेची स्थिती पाहता तिच्यात काव्यात्म स्पंदन (पोएटिक इम्पल्स) व काव्यात्म विचारांचं (पोएटिक थॉट) दुर्भिक्ष्य आहे, हे ध्यानात येतं. या कवितेमध्ये जागतिकीकरण, तंत्रज्ञान, तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे संपलेला संवाद, शेतकऱ्यांची स्थिती, उदारीकरण-बाजारीकरण, स्त्रीमुक्ती ते स्त्रीस्वातंत्र्य या प्रवासामधील अवकाश, बाईला चिकटून राहिलेलं आईपण हे सऽऽगळं येत आहे परंतु गद्यरूपात. सगळं बदलत चाललं आहे, हे मान्य. ते बदललेलं कवितेत आहे हेही मान्य. परंतु या गद्यलेखनाला 'कविता' म्हणावं, हा दुराग्रह सोडावा लागणार आहे.

आजूबाजूला अस्वस्थता आहे ती दिसते आहे; पण निर्मितीमध्ये ठाशीवपणे येत नाही. सामाजिकतेचं भान ह्या कवितेला आहे. पण सामाजिकतेचं भान राखण्याच्या अट्टहासापायी कवितेमधला गीतगुण हरवला आहे. निसर्गप्रेमाची, स्त्री-पुरुषप्रेमाची कविता तर जणू हद्दपार झाली आहे.

निर्मितीची आणि आकलनाची पद्धती सर्वकाळ तशीच राहते असे नाही. ती तशीच राहावी अशी अपेक्षा करता येत नाही. बोटांवर मोजण्याइतके सन्माननीय अपवाद वगळता विद्यमान मराठी कवितेची स्थिती वरीलप्रमाणे आहे. आजच्या मराठी काव्यसमीक्षकांनी जुन्या कवितेचे आणखी नवे धागे उकलण्याची निकड निर्माण झाली आहे.

**– राजश्री कुलकर्णी**

भ्रमणध्वनी : ९००४२००४८७
raj.aseem22@gmail.com




**विद्यमान समीक्षा ही अत्यंत गंभीर मुद्रेने किंबहुना लांब चेहऱ्याने विद्वत्ताप्रदर्शन करू इच्छिणारी आणि म्हणूनच गमतीशीर झालेली आहे. कलावंताच्या व्यक्तित्वाचा शोध इत्यादी बाबी या संशोधनाकडे नेणाऱ्या पाऊलवाटा असतात. टीकाकार जेव्हा या पाऊलवाटांचा बडेजाव मिरवू लागतो तेव्हा ते लेखन संशोधनसुद्धा सिद्ध होत नाही. नवीन समीक्षकांना किंवा स्वधन्य टीकाकारांना सदर गोष्टीचे भान असेल, असे त्यांची समीक्षा वाचून वाटत नाही.**



# आपल्या हातात याशिवाय फार काही उरलेलेच नाही!

**डॉ. प्रल्हाद देशपांडे**

**'कलाकार,** त्याची कलानिर्मिती या गोष्टींचा, तो राहतो त्याच्या भवतालाशी, समाजाशी बराचसा संबंध असला तरी निर्मितीच्या उन्मेशाचा आणि त्या कलेच्या नावाखाली स्थापन होणाऱ्या समूहाचा परस्परांशी तसा काहीच संबंध नसतो. '

असे सडेतोड विधान करून आणि त्यावर खूपसा खल करूनही कलाकाराला, इथे, 'कवीला' आपल्या कवितेच्या विकासासाठी, कवीच्या आत वसणाऱ्या 'माणसा'साठी समछंदी समूहाची, अर्थात एखाद्या काव्यमंडळाची आवश्यकता असू शकते. अनेकदा ती संस्था त्या कवीला 'थोर' करण्यात हातभार लावू शकते. आता 'कवितेसाठीची मंडळे का तयार होतात?' यावर पुलंची खोचक टिप्पणी आहे. त्यांच्या मते, 'ज्यांना स्वत:चे असे थोर काही निर्माण करता येत नाही ते लोक, स्वयंभू कलाकार आणि सामान्य रसिक यांच्यामधला दुवा म्हणून काम करतात. आमचे 'काव्यरसिक मंडळ, डोंबिवली' हेही याला (नावाप्रमाणे) अपवाद नाही.

या एकाच संस्थेसंबंधीच्या अनुभवातून मांडायचे झाले तर चारचौघा आस्वादकांचे कुटुंब बनवून साहचर्याचा आनंद घ्यावा, एवढ्या साध्या भावनेतून पन्नास वर्षांपूर्वी हे 'काव्यरसिक मंडळ' तयार झाले. आनंदाच्या देवघेवीचं चलन, अर्थात, कविता हेच होतं. कवितेसारखी कला, ही केवळ मनात उमलून, कागदावर उमटून मिटून जाण्यासाठी नसावी. कविता परस्परांना ऐकवून, प्रसंगी गाऊन, स्वरसाजासकट पेश करण्यात बहुआयामी रसास्वाद घेता येतो आणि हेच कवींनी, रसिक श्रोत्यांनी एकत्र येण्याचं प्रयोजन असावं.

'पण संस्थांमुळे अभिजात आणि गुणवंत कवी घडतो का?' या प्रश्नाचं उत्तर 'हो' आणि 'नाही' असं दोन्ही मिळू शकतं. उपजतच प्रतिभावंत असणाऱ्या एखाद्या अनघड हिऱ्याला पैलू पाडण्याची प्रक्रिया कदाचित अशा मंडळाद्वारे घडत असावी. कवीच्या उमेदवारीच्या काळात त्याचा 'अहम' पोसण्याचं किंवा त्याला प्रोत्साहन देण्याचं काम अशी संस्था करत असावी. उपजतच निर्मितिक्षमता असलेला आणि वेळेवर संधी लाभलेला कवी पुढे आपली प्रगतीची वाट धरतो आणि मंडळासारख्या सामाजिक शिडीपासून यथावकाश आपली नाळ हलकेच विभक्त करतो. वैयक्तिक आणि व्यावहारिक प्रगतीसाठी ते गरजेचंही असतं. असे होतकरू कवी पंख विस्तारत प्रसिद्धी आणि लौकिकतेच्या आकाशात भरारी घेतांना आम्ही पाहिलेत. कौतुकाची बाब ही की त्यांनी मंडळाच्या सुवर्णवर्षालाही हृदयाच्या एका कोनाड्यात मंडळाविषयीचे उतराईपण अगत्याने जपलेले दिसले.

कवितेचं सामाजिकीकरण होण्यामुळे कवीचा फायदा होतो की तोटा, हे शोधून काढणे सोपं नाही. अल्पतुष्टीच्या विहिरीत किंवा स्थानिक चटकदार प्रसिद्धीच्या जाळ्यात अडकून कवी पंगू होण्याची धास्ती अशा सामाजिक संस्थांच्या परिघात नेहमीच असते. त्यातले नेमके दाणे टिपून वेळीच पिसं सोडवून घेण्याची किमया साधणारे इथल्या जमिनीचा गंध आणि उड्डाणातली झिंग या दोन्हींचा आनंद घेऊ शकतात.

कवितेसारख्या धूसर कलेवर आधारित संस्था जर निष्ठावान कार्यकर्त्यांच्या हातात नसेल तर मात्र व्यक्तिगत हेवेदावे लवकरच त्या संस्थेचं विसर्जन करू शकतात. सुयोगाने काव्यरसिक मंडळ, डोंबिवली या संस्थेला पहिल्यापासूनच जीव ओतून काम करणारे आणि कवितेला जीव लावणारे अनेकजण लाभले. काही विशिष्ट उद्देशाने जवळ येणारे इथल्या निरलसतेचा अंदाज आला की एक तर मुकाट राहायचे किंवा हळूहळू स्वत:ची कागदी होडी मंडळापासून दूर सारत दिसेनासे व्हायचे. काहींना केवळ व्यासपीठीय लोणीच चाखायचा मोह असतो. असे काहीजण कार्यकर्ता म्हणून करायची असतात ती कर्तव्ये करायची टाळून फक्त गरूडनजरेने स्वत:च्या प्रसिद्धीचे लक्ष्य हेरत राहतात. संधी जवळ आली की त्यांचे मधाळपण पणाला लावतात. अर्थात हे राजकारण कोणत्याही सामाजिक संस्थेत असावे तसेच असल्याने मानवी स्खलनता म्हणून ते समजून घेणेच श्रेयस्कर असते.

मूठभर डोकी सोडल्यास सर्वसामान्य कवी-सदस्यांना मासिक बैठक कुठे घ्यावी, कुणी संपर्क करावा, चहापाण्याची व्यवस्था कुणी पाहायची, वार्षिक संमेलनासाठी योग्य मान्यवर कोण असावा इत्यादी जबाबदाऱ्यांची फिकीर नसते. केवळ मी, माझी कविता आणि व्यासपीठ, या कोशातच ते अडकलेले असतात. आणि अशा गठ्ठा कवी-सदस्यांच्या संख्याबळामुळे त्यांचे विकार सोसत, स्वत:ला आयोजक मानणारे, आपली नेतेपदाची हौस भागवून 'मंडळ' नावाचे गाडे पुढे रेटत

राहतात. असो.

संयोजन, आर्थिक उलाढाली, रुसवेफुगवे इत्यादी क्षुल्लक तरीही महत्त्वाच्या बार्बीकडे तात्पुरते दुर्लक्ष केलं तर मात्र गेल्या पन्नास वर्षांची (माझ्यापुरती बेचाळीस वर्षांची) ही यात्रा अवर्णनीय आनंदयात्राच वाटते. एका बाजूला गुणी कवींना रसिकप्रेमाचा आनंद मिळतो तर दुसऱ्या बाजूस हा आनंद आपण सगळ्यांना मिळवून देऊ शकतो, या भावनेची तुष्टता आयोजक मंडळींना मिळते. काही प्रसंगी कार्यक्रमांच्या नेटक्या आखणीसाठी कठोर निर्णय घ्यावे लागतात. कोणी दुखावते, कोणी सुखावते. पण शेवटी गणित सुटते तेव्हा समाधानाची थोडीशी शिल्लक मनाच्या खिशात उरतेच.

अशी मंडळे असावीत की नाही, असं जर कुणी विचारलं तर माझं उत्तर 'असावीत' असंच असणार! पण सद्य:काळाचा रोख पाहता अशा संस्था टिकवणे उत्तरोत्तर कठीण होत जाणार आहे. काव्यरसिक मंडळ पन्नास वर्षे का व कसे टिकले, हा एक स्वतंत्र लेख होईल. आज सोशल मीडियाच्या झंझावातात अशा कलेच्या टोळ्या अमिबासारख्या विभाजत आहेत. इतरांच्या आनंदापेक्षा ' यात मला काय मिळेल?' ही वृत्ती इतक्या जोमाने फोफावतेय की एकूण चित्र निराशेचेच आहे. या बदलाचा एक फायदा असा की कविता हा प्रकार मात्र मोबाइलच्या माध्यमातून पसरतोय. अभिजातता अथवा दर्जा वगैरे क्षणकाल विसरलो तर थोरांच्या मुबलक कविता स्क्रीनच्या एका स्पर्शाने आपण वाचू शकतोय. 'उडदामाजी काळे गोरे' म्हणून या चांगल्या कवितांबरोबर वाहत येणाऱ्या सुमार गाळाकडे दुर्लक्ष करण्यात बरीच ऊर्जा खर्च होते, हेही तितकेच खरे.

विसाव्या शतकाच्या अखेरीस कवितेसंबंधित चालणारी मंडळे आणि गेल्या दहा-पंधरा वर्षांतल्या सुरू असलेल्या तत्सम संस्था, त्यांची कार्यपद्धती यांच्यात काही बदल जाणवतो का? असा प्रश्न जर उपस्थित केला तर त्याचं उत्तर 'खूपच बदल जाणवतो आहे' असेच द्यावे लागेल. १९६६ सालाच्या काळात कवितेचे रसिक प्रामुख्याने बोरकर, कुसुमाग्रज, मर्ढेकर, आरती प्रभू, इंदिरा संत किंवा पु. शि. रेगे आदींच्या कवितांच्या रसास्वादावर पोसलेले असे रसिक होते. याच काळात पाडगांवकर-बापट-करंदीकर त्रिकुटाने (व्यासपीठीय) कवितेचे गठ्ठा-श्रोते निर्माण केले. हा पायंडा पुढे 'कवितेच्या गावा जावे', 'आयुष्यावर बोलू काही' अशा अनेक रूपांनी कविता-रसिक यामधील नात्याचे स्वरूप आमूलाग्र बदलून टाकणार होता. इथून पुढे दलित कविता, ग्रेस, ढहाके, चित्रे, कोलटकर यांची सद्दी सुरू झाली. सत्तरीनंतर दशकाच्या कवींमुळे मुक्तछंद कवितेची नवी फळी आघाडी सांभाळू लागली. मुक्तछंद नावाच्या मोकाटपणामुळे 'कोणीही यावे आणि कविता हाणावी' या वृत्तीला उधाण येत गेले. एके काळी कविता, कवितासंग्रहापुरती आणि वाचकापुरती उपलब्ध होती, ती आता सभाधीट होत चालल्यामुळे तिच्या दर्जाचे आणि सच्चेपणाचे आडाखेच बदलत गेले. या अनुरोधाने रसिकवर्गही कवितेसंबंधित असलेल्या चिंतन, मनन, अभ्यास, विचार या आस्वादप्रक्रियेपासून हळूहळू दूर जात उथळ आणि तात्कालिक करमणुकीकडे झुकू लागला. विंदा, बापट, पाडगांवकर यांना कवितीक दर्जा आणि रंजन यांच्या सीमारेषेवरच जो तोल सांभाळता आला तो पुढे कुणाला तितक्या ताकदीने तोलून धरण्याचे जमले नाही.

या सगळ्या काव्य-रसिक जगताच्या रूपांतराचे पडसाद कवितेच्या सामाजिकतेवर पडणे अपरिहार्य असते. स्थलांतरित झाल्याने काव्यरसिक मंडळापासून दूर गेलेल्या काही सदस्यांनी परगावी जी नवी मंडळे प्रस्थापित केली त्यांना स्वत:ची आत्मप्रसिद्धीची, (आपलीच) कविता अधिकाधिक व्यासपीठीय करण्याची स्वप्ने पुरी करायची आणि त्यायोगे माणसे जोडण्याची मोठीच संधी प्राप्त झाली. पदाधिकारी जर कविता या कलेशी प्रामाणिक नसतील तर कविता हा केंद्रबिंदू मानून सुरुवात झालेल्या या संस्थांना गाणी, गप्पागोष्टी, सहली, मेळावे अशा उपक्रमांच्या आयोजनाने गंभीर कवितेच्या अभ्यासापेक्षा गम्मतमंडळाचे स्वरूप कधी येते, ते कोणाच्याच ध्यानात येत नाही. हास्यविनोद, प्रसिद्धी आणि व्यासपीठ यांचा मोह हा नशीला असल्याने रसिक समूहाला पुन्हा कवितेकडे वळविणे नंतर अवघड होऊन जाते. याचे प्रत्यंतर म्हणून मासिक बैठकांचे तसेच वार्षिक संमेलनांचे रूप गेल्या दोन दशकांत बदलत गेले आणि ही प्रक्रिया पाहण्यासारखी

**कुठल्याही कलेला, क्षणिक प्रसिद्धी आणि त्यावाटे मिळणाऱ्या पैशाच्या मोलाने मोजण्याच्या या काळात आपल्या हातात याशिवाय फार काही उरलेलेच नाही!**

**अभिजात आणि गुणवंत कवी या संस्थांमुळे घडतो का? या प्रश्नाचं उत्तर 'हो' आणि 'नाही' असं दोन्ही मिळू शकतं. उपजतच प्रतिभावंत असणाऱ्या एखाद्या अनघड हिऱ्याला पैलू पाडण्याची प्रक्रिया कदाचित अशा मंडळाद्वारे घडत असावी.**




आहे. सत्तरी ते नव्वदीच्या दशकांपर्यंत कविता छंद आणि अभ्यास याच्या दरम्यान झुलत होती. शालेय आणि विद्यापीठीय स्तरावर या अशा संस्थांना फार काही प्रतिष्ठा होती असे मात्र कधी जाणवले नाही. शिक्षक-प्राध्यापकवर्गाची या क्षेत्रातली टक्केवारी नगण्यच होती.

वीस वर्षांपूर्वी मासिक बैठकांमधून वेगवेगळ्या नामांकित कवीच्या कवितेवर चर्चा, परिसंवाद, कवितेसंबंधी विशिष्ट विषयावर व्याख्यान असे उपक्रम आखले जायचे. वार्षिक स्नेहसंमेलनात एका मान्यवर कवीच्या कवितेवर आधारित कार्यक्रम, परिसंवाद, अध्यक्षीय भाषण अशी रूपरेषा असायची. शहरातल्या जाणकार नागरिकांना, अध्यापक मंडळींना आणि पत्रकारितेशी संबंधित व्यक्तींना अध्यक्षीय भाषणाचा विषय आणि ते भाषण याबाबत बातमीमूल्य म्हणून उत्सुकता असायची. ते भाषण एक नोंद घेण्याजोगा निबंध आणि संग्राह्य विधान मानलं जायचं.

या रूपरेषेची जागा सवंग लोकानुनयाच्या लाटेत गीतरचना, मुलाखती अशा व्यक्तीसापेक्ष आयोजनाने घेतली आणि व्यासपीठावर येणारे आणि त्याचं कौतुक पाह्यला जमणारे ते श्रोते-प्रेक्षक असे वेगळेच हिशेब मांडले जाऊ लागले. प्रेक्षकांमधे मंडळाचे (स्वत:ची कविता सादर करणारे)काही सदस्य, व्यासपीठावर सहभाग असणाऱ्यांचे हितचिंतक याव्यतिरिक्त कोणीही श्रोते येईनासे झालेले कोणाच्या ध्यानातही येईना. 'इतकी वर्षे होऊनही संस्थेला परिपक्वता कशी येत नाही!' असे कुजबुजत. कवितेचे अभ्यासू आणि चोखंदळ श्रोते यथावकाश नाहीसे झाले याची कोणाला फिकीरही उरली नाही.


मग अशा या निराश परिस्थितीत नकारात्मक नजरेतून केवळ कुढत राहायचे की याही परिस्थितीत मराठी कवितेला 'अच्छे दिन' येण्यासाठी झटत राहायचे?

सद्य:स्थितीचे निरीक्षण करता मला वाटते. पन्नास वर्षे सलग कार्य करत राहिल्याची नशा विसरून ज्येष्ठ मंडळांनी बदलत्या काळानुसार रसिकांच्या कलाकलाने घेत जागोजागी उमलत जाणाऱ्या मिनी संस्थांशी संलग्न राहून आपलं कार्य करत राहावं. सभागृह भरेल इतपत श्रोत्यांची उपस्थिती हाच एक निकष ठेवायचा तर गझल, गीत अशा प्रकारांच्या काठ्या आधाराला घेतच कवितेचा दर्जा राखण्याचा होता होईतो प्रयत्न करत राहायला हवा. कुठल्याही कलेला क्षणिक प्रसिद्धी आणि त्यावाटे मिळणाऱ्या पैशाच्या मोलाने मोजण्याच्या या काळात आपल्या हातात याशिवाय फार काही उरलेलेच नाही!

कविताप्रेमी असलेल्या या मावळत्या पिढीच्या उरात जोवर काव्यरसिकतेची धडधड शाबूत आहे तोवर तरी अशी मंडळे हा 'शब्दवेडा' पिंगा घालत राहतील आणि बदलत्या काळाशी जुळवून घेता आले तर भावी काळातही कवितेभोवती बेभानपणे फेर धरत राहतील.

**– डॉ. प्रल्हाद देशपांडे**
भ्रमणध्वनी : ९८१९३९४०११
drpralhadd@gmail. com

# 'मॅजेस्टिक'ची संग्राह्य पुस्तके




सावित्री आपल्या पतीच्या प्राणाची याचना करीत नाही. ती याचक नाही. यमधर्माबरोबर केलेल्या वाटचालीत प्रत्येक पावलागणीक ती आपल्या वैचारिक सामर्थ्याने यमधर्माचा युक्तिवाद निष्प्रभ करून आपल्याला अनुकूल निर्णय प्राप्त करते. सावित्रीचे हे वैचारिक योगदान, तिची निष्ठा, बुद्धिमत्ता, चौसष्ट कलांचे चतुरस्र ज्ञान, वाकपटुत्व, चातुर्य, शस्त्र आणि शस्त्रनिपुणता तसेच अपार कष्ट घेऊन स्वतःला संक्रमित केलेले सामर्थ्य सगळ्याच स्त्रीवर्गाला कायम प्रेरणा देणारे ठरले आहे.

**– आबासाहेब पटवारी**

## सावित्री

**लीला जोशी**

पृष्ठे : ४३२ । मूल्य : ४०० रुपये

पेशवाईच्या अस्तापासून स्वातंत्र्य मिळेपर्यंतचा काळ या 'वृत्तान्त'त आहे. लढाया, बंडे, चळवळ आणि रोगराई हे सर्व इथे आहे. शंभर वर्षांचा काळ हाच इथे नायक आहे. निरनिराळ्या हकीगतींच्या द्वारे त्या काळाची विविध आंगोपांगे दाखविण्याचा प्रयत्न येथे लेखकाने केला आहे. जोशी घराण्याचा सव्वाशे वर्षांचा हा 'वृत्तान्त'.

## वृत्तान्त

**श्री. ज. जोशी**

दुसरी आवृत्ती

मूल्य : २०० रुपये




मॅजेस्टिक

प्रमुख विक्रेते : मॅजेस्टिक बुक स्टॉल। गिरगाव। पुणे । मो. ९९२२३४४०८१ मॅजेस्टिक बुक डेपो। ठाणे (प.), दूरध्वनी : २५३७६८६५ मॅजेस्टिक ग्रंथदालन। शिवाजी मंदिर, भ्रमणध्वनी : ९८९२२२०२३९ मॅजेस्टिक बुक गॅलरी । म्हात्रे पुलाजवळ, १०० फूट डीपी रोड, पुणे । दूरध्वनी : (०२०) ६८८८८९०८

Website : www.majesticprakashan.com । E-mail : majesticph@gmail.com

आपली आवडती पुस्तके मागविण्यासाठी Click करा- www.majesticonthenet.com या साईटवर

Customer Care : 022-65666755



# शब्दगंध कविमंडळ : या दिंडीला अंत नाही

**पुष्कर ओगले**

**एखादे मंडळ, संस्था स्थापन करणे सोपे असते पण ते वाढवणे, चालविणे ही साधी गोष्ट नव्हे.**

**अगदी** वेद-उपनिषद कालापासून अखंड वाटचाल करत चाललेली काव्यदिंडी अर्थात ज्यांचे कवितेवर मनापासून प्रेम आहे; श्रद्धा, भक्ती आहे तेच या दिंडीत सामील होणार ना? बेळगाव म्हणजे आधीच सीमाभाग. सतत मराठी भाषेची गळचेपी, मुस्कटदाबी. पण कवितेवरचे प्रेम स्वस्थ कसे बसू देणार? म्हणून कविता लिहिणारे, कविता वाचणारे, कविता जगणारे आणि कवितेवरील प्रेमाने बेडी झालेली काही मोजकी मंडळी एकत्र आली आणि १३ सप्टेंबर १९९० रोजी शब्दगंध कविमंडळाची स्थापना झाली.

एखादे मंडळ, संस्था स्थापन करणे सोपे असते पण ते वाढवणे, चालविणे ही साधी गोष्ट नव्हे. पण शब्दगंध कविमंडळ याला अपवाद ठरले. कारण शब्दगंध कविमंडळ फक्त कवितेपुरते नव्हते तर ते एक संयुक्त कुटुंब असे त्याचे स्वरूप आहे. एकमेकांना समजून घेऊन, सुखदुःखात सामील होऊन सर्वांना सोबत घेऊन जाणारे हे मंडळ आहे. यातील कोणालाही पद, प्रतिष्ठा, प्रसिद्धी याचा मोह नाही. येथे मोठे आर्थिक व्यवहारही नाहीत. शब्दगंध मंडळाने नुकताच रौप्य महोत्सवही मोठ्या दिमाखात साजरा केला. याचे कारण म्हणजे 'आदर्श ध्येय धोरण' व कवितेवरील प्रेम. शब्दगंधचे कविमंडळाचे सर्व कार्यक्रम सदस्यांच्या वर्गणीतूनच होतात.

शब्दगंध कविमंडळाचे सुरवातीपासूनचे एक उमदे चतुरस्र व्यक्तिमत्त्व म्हणजे, कवी अविनाश ओगले. ग़ज़ल, विडंबन, वात्रटिका, भावकविता, बालकविता, हजल अशा अनेकविध काव्यप्रकारांत त्यांनी मोठी झेप घेतली होती. 'चषक माझा' हा चारोळीसंग्रह, 'थेंब टपोरे' कवितासंग्रह, याचा कन्नड अनुवाद 'हनीध्वनी' या नावाने प्रकाशित आहे. तसेच 'काजवा' हा कविता आणि ग़ज़लसंग्रह प्रकाशित आहे. विविध साहित्य संमेलनातून त्यांचा सहभाग होता. ग़ज़ल काव्यप्रकारात त्यांचा हातखंडा होता. अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे मार्गदर्शन शब्दगंध कविमंडळाला लाभले. अनेक मानाची पारितोषिके प्राप्त झालेल्या अविनाश ओगलेंनी नवोदितांना लिहिते केले. त्यांच्या कविता विविध पुरवण्या, मासिके, दिवाळी अंकांतून प्रसिद्ध होऊ लागल्या. कवितासंग्रह प्रकाशित होऊ लागले. सौ. उर्मिला शहा यांचा 'प्राजक्तधारा', सौ. वंदना कुलकर्णी यांचा 'माध्यान्ह', श्री. व्ही. एस. वाळवेकर यांचा 'बोरीबाभळी', 'आमच्या पण दोन ओळी', सौ. मंदाकिनी देसाई यांचा 'विकल्पवाट', शब्दगंधचे विद्यमान अध्यक्ष श्री बसवंत शहापूरकर यांचा 'कवितेचं गाव' हे ग्रंथ प्रकाशित झाले आणि त्यांना पुरस्कारही लाभले.

शब्दगंध कविमंडळाने नवोदितांना व्यासपीठ देण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन १९९५ साली अर्थपूर्ण शीर्षक असलेला 'अंकुर' तसेच २००० साली 'बहर' हा प्रातिनिधिक संग्रह प्रकाशित केला.

मंडळातर्फे दर महिन्याला काव्य मैफल भरवली जाते. पहिल्या सत्रात काव्यचर्चा, कवितेच्या प्रकारावर चर्चा, एखाद्या आमंत्रित कवीचे मार्गदर्शन, एखाद्या संग्रहावर चर्चा, दिवाळी अंकांतल्या आवडलेल्या कविता यांवर सविस्तर चर्चा केली जाते. दुसऱ्या सत्रात सदस्यांचे कवितावाचन असे एकंदरीत स्वरूप असते. शिवाय महाकवी कालिदासदिन, मराठी भाषादिन, श्रावणी कविसंमेलन असे विविध कार्यक्रम केले जातात. नामवंत प्रथितयश कवींचा सहभाग असलेला शब्दगंधचा वर्धापनदिन म्हणजे काव्यरसिकांना एक पर्वणीच असते. वैशिष्ट्यपूर्ण अशा वर्धापनदिनाला आजवर काव्यरसिक मनापासून दाद देत आले आहेत. अविनाश ओगलेंच्या अथक प्रयत्नाने अनेक दिग्गज कवी या कार्यक्रमासाठी उपलब्ध झाले. यात कै. इंदिरा संत, कै. माधवी देसाई, अंध कवी राम गोसावी, प्रा. सोमनाथ कोमरपंत, प्रा. सुभाष सुंठणकर, प्रा. अनुराधा गुरव, श्री. श्रीराम पचिंद्रे, सौ. आसावरी काकडे, कै. श्री. नारायण सुर्वे, कै. श्री. मंगेश पाडगावकर, कवी सुधांशु, श्री. शंकर रामाणी, श्री. महेश केळुस्कर, डॉ. दिलीप पां. कुलकर्णी, श्री. विसुभाऊ बापट, श्रीमती अरुणा ढेरे, श्री. इलाही जमादार, नारायण सुमंत, अशोक नायगावकर, अरुण म्हात्रे आणि इतर नामांकित कवी होते.

खरेच शब्दगंध कविमंडळ भाग्यशालीच म्हणायला हवे. पण... या भाग्याला तडा गेला. शब्दगंधचा आधारवड अचानक कोसळला. अविनाश ओगले हे अलौकिक प्रतिभासंपन्न, हसरे उमदे व्यक्तिमत्त्व अर्ध्या मैफलीतून निघून गेले. अविनाश ओगलेंची पत्नी अश्विनी व पुत्र पुष्कर यांनी त्यांचे कार्य नेटाने ध्येयाने पुढे चालविले. अविनाश ओगलेंचा स्मृतिदिन व



शब्दगंध कवीमंडळ परिवार

शब्दगंधचा वर्धापनदिन ऑक्टोबर महिन्यात एकत्रितपणे केला जातो. ओगले कुटुंबीयांतर्फे उत्कृष्ट कवितासंग्रहास रोख पुरस्कार, स्मृतिचिन्ह अविनाश ओगलेंच्या नावाने प्रदान करण्यात येते. शिवाय अविनाश ओगलेंच्या अप्रकाशित कविता व विविध लेखन 'रंग मनाचे' व 'प्रतिबिंब' या नावाने ओगले कुटुंबियांनी नुकतेच प्रकाशित केले आहे.

शब्दगंध कविमंडळाने ही काव्यशारदेची पालखी खांद्यावर घेऊन सत्तावीस वर्षांची यशस्वी वाटचाल केली आहे. प्रसंगी भोई बदलले तरी दिंडी चालतच ठेवली आहे. आता नव्या दमाची तरुणाई या दिंडीत सामील होत आहे. नवीन नवीन उपक्रम हाती घेत आहे. जोपर्यंत कविता जगणारे, कविता लिहिणारे, कविता वाचणारे आहेत, तोपर्यंत ही पालखी पुढे पुढे जातच राहणार, हे निश्चित.

परंतु एक मोठी खंत आहे, ती या प्रसंगी व्यक्त केल्याशिवाय राहवत नाही. काही अपवाद वगळले तर इथल्या साहित्यिकांची दखल महाराष्ट्रातल्या समीक्षकांनीही घेतली नाही. इथल्या प्रतिभावंतांना महाराष्ट्रात आमंत्रित करत नाहीत. महाराष्ट्रातील प्रकाशन संस्थाही असाच दुजाभाव करतात. येथील पुस्तकांची दखलही घेतली जात नाही. महाराष्ट्रातून येथे नेहमीच साहित्यिकांना कार्यक्रमासाठी आमंत्रित केले जाते पण येथील साहित्यिकांना बोलावले जात नाही, याचा खेद वाटतो, हे नमूद करून पुढे सरकतो.


असो. तर शब्दगंध कविमंडळामध्ये अनेक कटू, गोड प्रसंग घडले. अनेक निराशेचे क्षणही आले गेले. पण शेवटी अंधार हा तात्पुरताच असतो ना? कवितेवरील श्रद्धा, प्रेम, तळमळ असली की पुरे. स्वतः पदरमोड करून श्रम, पायपीट, अनेक अडचणींवर मात करत शब्दगंध कविमंडळ तावूनसुलाखून प्रगतीच्या दिशेने घोडदौड करू लागले आहे. हेच खरे.

'शब्दगंध कविमंडळ', नफा-तोटा याचा विचार न करता सदस्यांचे कवितासंग्रह प्रकाशित करणार आहे. त्यापासून होणारा आनंद हा फार मोठा आहे. तसेच लवकरच तिसरा प्रातिनिधिक संग्रह काढण्याची पण तयारी करीत आहे. ग्रामीण भागातील शाळांतूनही आता कविता-वाचनासाठी मंडळाला आमंत्रण येत आहेत. काव्यरूपी हा दिवा आम्ही, तुम्ही रसिक या साऱ्यांनीच अखंड नंदादीपासारखा तेवत ठेवायचा आहे.

तात्पर्य, ही काव्यशारदेची दिंडी अशीच वाटचाल करीत राहणार. या दिंडीला अंत नाही हेच खरे.

– पुष्कर ओगले
भ्रमणध्वनी : ०९४४८३२४६२८
capushkarogale@gmail.com

**ही काव्यशारदेची दिंडी अशीच वाटचाल करीत राहणार. या दिंडीला अंत नाही हेच खरे.**



# ‘नाशिक कवी’

**शरद पुराणिक**

**प्रत्येक महिन्याच्या चौथ्या रविवारी बरोब्बर साडेचार वाजता काव्यवाचन मेळावा होतो. सर्वोत्कृष्ट तीन कवितांना प्रत्येकी एक कवितासंग्रहाचे पारितोषिक दिले जाते.**

२००३ पूर्वी काही कवीमित्र एकमेकांच्या घरी कवितेच्या मैफली जमवायचो. एकदा मित्रवर्य उत्तम कोळगावकर म्हणाले,

‘असा अनियमितपणे कुठेतरी कार्यक्रम करण्याऐवजी ठरावीक वेळेला, ठरावीक दिवशी आणि विशिष्ट ठिकाणी कार्यक्रम घ्या.’

कोळगावकरांच्या या वाक्याने ‘नाशिक कवी’ या संस्थेच्या स्थापनेचं बीज मनात रुजलं. मित्रवर्य आघाडीचा ग़ज़लकार प्रदीप निफाडकर ३० नोव्हेंबर २००३ रोजी मुद्दाम पुण्याहून नाशिकला आला. त्याच्या आणि नरेश महाजन या वात्रटिकाकाराच्या उपस्थितीत दुपारी ४.३० वाजता ‘ज्योति कलश’ या ठिकाणी फक्त १८ जणांच्या उपस्थितीत ‘नाशिक कवी’ या काव्याला वाहिलेल्या संस्थेची स्थापना झाली.

प्रत्येक महिन्याच्या चौथ्या रविवारी बरोब्बर साडेचार वाजता काव्यवाचन मेळावा होतो. सर्वोत्कृष्ट तीन कवितांना पारितोषिक दिले जाते.

‘नाशिक कवी’ या संस्थेचे विविध उपक्रम आहेत. प्रत्येक महिन्याला नाशिकमधील तसेच बाहेरगावचे मान्यवर कवी निमंत्रित करून विविध काव्यप्रकारांचा कवींना परिचय करून दिला जातो. ग़ज़ल, कता, चारोळी, सुनीत, हायकू, ओवी, अभंग, पोवाडा, लावणी इत्यादी. अशा प्रकारांच्या कार्यशाळाही घेतल्या आहेत.

२००४ पासून शालेय विद्यार्थ्यांसाठी स्वरचित काव्यवाचन स्पर्धा दोन गटांत घेऊन प्रत्येक गटांत प्रथम तीन क्रमांकांना, तसेच उत्तेजनार्थ तिघांना रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक दिले जाते.

संस्थेने २००७ सालापासून राज्यस्तरीय काव्यसंग्रह पुरस्कार द्यायला सुरुवात केली. प्रथम तीन क्रमांकांच्या काव्यसंग्रहांना, तसेच उत्तेजनार्थ तीन संग्रहांना रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक दिले जाते. मुक्तछंद आणि छंदोबद्ध अशा दोन गटांत राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धा घेतली जाते. येथेही प्रत्येक गटातील प्रथम तीन क्रमांकांना, तसेच उत्तेजनार्थ तिघांना रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक दिले जाते.

गेल्या दहा-बारा वर्षांत या स्पर्धांमुळे ‘नाशिक कवी’चे नाव साहित्यक्षेत्रात महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यात पोहोचले आहे.

कालिदास दिनच नाही, तर कालिदास सप्ताह ‘नाशिक कवी’ संस्था साजरा करते. नाशिक जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील कवींच्या बरोबर ‘नाशिक कवी’चा संबंध प्रस्थापित होतो.

‘काव्य कोजागरी’ आम्ही साजरी करतो. नोव्हेंबरमध्ये वर्धापन दिन साजरा करताना निमंत्रितांचे काव्यवाचन आयोजित केले जाते.

जानेवारीमध्ये नाशिकमधील एखादी प्राथमिक शाळा निवडून पहिली ते चौथीच्या प्रत्येक तुकडीतील पाच विद्यार्थी निवडून त्यांना कोणत्याही कवीची कोणतीही कविता पाठ म्हटल्यावर प्रत्येकाला कंपास बॉक्स वा तत्सम पारितोषिक प्रदान केले जाते. महिलादिन साजरा करताना महिलांसंबंधी कविता सादर केल्यावर प्रत्येकाला गीताई वा एखाद्या कवीचा काव्यसंग्रह प्रदान केला जातो.

‘नाशिक कवी पत्रिका’ हे अनियतकालिक काढले जाते. यात विविध काव्यप्रकार आणि अनेक नवोदित कवींच्या दर्जेदार कविता स्थान मिळवतात.

‘नाशिक कवी’ चार हा प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित केला.

या जवळपास तेरा वर्षांच्या वाटचालीत अनेक संस्था आणि व्यक्तींचे साह्य झाले. ‘नाशिक कवी’ ही संस्था त्या सगळ्यांचे ऋण जाणून कृतज्ञ आहे. लोकहितवादी मंडळाने ‘ज्योति कलश’ ही वास्तू विनामूल्य वापरायला दिली होती. तसेच काही महिने रचना विद्यालयाने आपले वर्ग वापरण्यास दिले होते. गेली आठ वर्षे कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या वास्तूत आम्ही काव्याचा जागर करत आहोत. कुसुमाग्रज प्रतिष्ठानने तसेच अन्य संस्थांनी विनामूल्य आपली वास्तू काव्यजागराला दिली म्हणून ‘नाशिक कवी’ त्यांच्याप्रती नेहमीच कृतज्ञता व्यक्त करीत असते.

आमचे पूर्व अध्यक्ष कै. डॉ. सुरेश मेणे यांच्या नेतृत्वाखाली ‘नाशिक कवी’ संस्था फुलली, त्यांच्या दातृत्वामुळे बहरली.

आमचे नवीन अध्यक्ष आर्किटेक्ट बाळासाहेब मगर यांच्या नेतृत्वाखाली ‘नाशिक कवी’ची वाटचाल २४ एप्रिल २०१६ पासून सुरू झाली आहे.

**– शरद पुराणिक**
भ्रमणध्वनी : ९८९०३८६६६२
sharadpuranik4@gmail.com



## कौतुकी – टी. एन्. परदेशी

आपल्या या काव्यात जुन्या आठवणी व जुनी जीवनचित्रे जिवंत होऊन बोलतात. वाचकांनाही स्वतःच्या जुन्या आठवणी त्यात खास दिसतील. विषयवार मांडणी ही एक आकर्षक फॉर्म घेते. कौतुकीच्या भोवती सर्व धागे गुंतलेले आहेत. सुंदर आहेत. राधेचा भाव व चित्र जास्त प्रभावी आहे. भाषा साधी पण हृदयस्पर्शी आहे.

**मूल्य १०० रु.   सवलतीत ६० रु.**

## राधेचा पाऊस – अरुण शेवते



मराठीत मालिका-कवितांना थोडीफार परंपरा आहेच, पण तुम्ही या रूपबंधाला दशकपूर्तीपर्यंत अधिक सश्रद्ध करत गेला आहात. राधेचे निखळ प्रतिबिंब या कवितांत पडले आहे. ही राधा केवळ विशेषनामापुरती नाही. तो तुमचा समग्र अनुभव झाला आहे. ही राधा अलगदपणे तुमच्या आंतरिक जाणीवेपर्यंत पोचली आहे.

**मूल्य ८० रु.   सवलतीत ५० रु.**



## मळवट – फ. मु. शिंदे

माणूस आणि मानवाच्या शोध-पर्वात त्याची कविता ही 'माणसाची' कविता बनली. त्याच्या कवितेला आत्मनिष्ठेचा पायाभूत आधार तसा सुरुवातीपासूनच होता. त्या आधारावर ती आत्मशोधाच्या मार्गाने आपला भावाविष्कार विस्तारीत वाटचाल करू लागली ती आजपर्यंत न थांबता त थबकता! हे त्याचे साहित्य-प्रांतातील निर्विवाद असे यश आहे!

**मूल्य १०० रु.   सवलतीत ६० रु.**

## बाबासाहेब...! – यशवंत मनोहर



'बाबासाहेब...!' ही यशवंत मनोहर यांची विश्वतत्त्वज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील महाकविता! बाबासाहेबांच्या प्रत्येकच शब्दावर जगातल्या सर्वच माणसांची नावे सन्मानाने छापली आहेत आणि बाबासाहेबांच्या सर्वच शब्दांचे भाषांतर मनोहरांनी 'बाबासाहेब...!' या एकाच सूर्यशब्दात केलेले आहे आणि हे भाषांतर वाचकांना माणुसकीच्या परमशिखरावर घेऊन जाईल.

**मूल्य १२५ रु.   सवलतीत ७५ रु.**



## पाणीबाणी – संपादन प्रभाकर साळेगावकर

भीषण वास्तवातून आकाराला आल्या ह्या कविता. ह्यातला सूर आनंद देणार नाही, पण भरपूर अस्वस्थ करणारा आहे. ह्या कवींच्या मनात जखमा झालेल्या आहेत. त्यातले रक्त वाहून गेले आहे. पण खपली भरेल असा वेडा आशावादही आहे. सुन्न करणारा हा संग्रह म्हणजे निसर्गानेच तयार केलेले शिल्प आहे.

**मूल्य १६० रु.   सवलतीत १०० रु.**

## हसत खेळत – अरुण शेवते



सुभाष किन्होळकर हे नव्या पिढीतील बालकांचे भावकवी आहेत. बालकवितेची लय, ताल आणि भाषेची सहजता त्यांना समर्पकपणे साधली आहे. बालकांसमवेतच मोठ्यांनाही त्यांची कविता मनापासून भावते, याचा प्रत्यय 'हसत खेळत' या संग्रहात दिसून येतो.

**मूल्य ४० रु.   सवलतीत २५ रु.**



# ‘आम्ही रचनाकार’, इंदौर : चार मैत्रिणींचा प्रवास

**अलकनंदा साने**




**माणसाचा** स्वभाव असा असतो की जी गोष्ट त्याच्यापासून लांब असते त्या गोष्टीचे त्याला जास्त अप्रूप असते. आम्हा महाराष्ट्राच्या बाहेर असणाऱ्या मराठी भाषकांचे नेमके असेच होते. मराठीबद्दल अनामिक अशी ओढ असते म्हणून ही भाषा आणि तिच्याबद्दल असलेला नितांत आदर मनात जपत काही ना काही करत राहण्याकडे आमचा कल असतो. हे सर्व आज नाही तर वर्षानुवर्ष चालू आहे. मग मराठीत अजरामर काव्य लिहिणारे भा. रा. तांबे असो किंवा शंभर वर्षांपूर्वी उत्तर भारतात मराठी पत्रकारितेचा पहिला झेंडा फडकाविणारे र. वि. शिरढोणकर असोत.

अशी प्रात:स्मरणीय मंडळी आमच्यासाठी प्रेरणास्थान तर आहेच, शिवाय इंदौर, उज्जैन, देवास, ग्वाल्हेर वगैरे संस्थान मराठा शासकांच्या अधीन असल्यामुळे मराठी जाणणारे आणि बोलणारे इकडे विपुल प्रमाणात आहेत. त्यामुळे लिहिणारेसुद्धा भरपूर आहेत,

एकदा एका कविसंमेलनानंतर माझ्या लक्षात आले की आम्ही कवी/कवयित्री मंडळी अनेक वर्षांपासून लिहीत असूनही वर्षातून एकदा किंवा फारतर दोनदा भेटतो आणि इतकी वर्षं भेटत असूनही अपरिचयाची भावना आमच्यात आहे. तेव्हा घरोघरी फोन नव्हते. म्हणून मग तेथे भेटलेल्या काही कवयित्रींशी बोलून ठरविले की महिन्यातून एकदा तरी आपण भेटायचेच.

ही जवळ जवळ पंधरा वर्षांपूर्वीची गोष्ट. मी, अरुणा खरगोणकर, अर्चना शेवडे आणि सुषमा अवधूत ह्या आम्ही चार कवयित्री मैत्रिणींनी दरमहा भेटायचे ठरवले. प्रत्येक भेटीत आपली नवी कविता एकमेकींना ऐकवायची आणि मग त्यावर बाकी तिघींनी आपली प्रतिक्रिया नोंदवायची, काही सुधारणा असल्या तर त्या सुचवायच्या शिवाय सादरीकरणाकडेसुद्धा लक्ष पुरवायचे असं हे सुरवातीचं स्वरूप होतं. नंतर आणखी काही कवी/कवयित्री भेटल्या, मग या समूहाला एक वेगळे स्वरूप दिले गेले –‘काव्य भिशी’ एकदम नवी कल्पना. प्रत्येक बैठकीत चिठ्ठ्या काढायच्या आणि ज्या कोणाचे नाव येईल फक्त त्याने किंवा तिने पुढील बैठकीत पूर्ण वेळ कविता ऐकवायच्या. मग त्यावर एकेकाने आपली प्रतिक्रिया नोंदवायची. हा उपक्रम जवळपास बारा वर्षं चालू होता.

साधारण तीन वर्षांपूर्वी एक कार्यक्रमा–निमित्त हिंदीतून लिहिणारे काही तरुण मराठी भाषक कवी ह्या समूहात आले आणि मग एक वेगळीच दिशा आमच्या समूहाला मिळाली. सळसळणारं रक्त आणि काहीतरी वेगळं करायची जिद्द व धडपड. इतकी वर्षं आम्ही बारा–तेरा जण होतो पण समूहाला काही नाव असं नव्हतं. सर्वात पहिले मराठी हिंदीला शोभेल असं नाव ठरलं– ‘आम्ही रचनाकार’ आणि मग ‘माय मावशी’ ही एक आगळीवेगळी संकल्पना समोर आली. नव्याने समूहात सामील झालेले आणि प्रामुख्याने हिंदीत लिहिणारे उत्साही तरुण वैभव पुरोहित, संदीप भालेराव आणि निलेश शेवगावकर यांनी सुचविले की ‘आम्ही रचनाकार’ तर्फे दर दोन महिन्यांनी मराठी आणि हिंदीत कवितांचा कार्यक्रम ‘माय मावशी’ ह्या नावाने सादर करायचा. त्याच्या मागे भूमिका अशी की येथे राहत असलेल्या मराठी भाषकांना हिंदी येतेच आणि अनेक वर्षं मराठा शासकांचे राज्य इथे असल्याने हिंदी भाषक लोकांना मराठी समजते. इकडील मराठी भाषकांच्या मराठीवर हिंदीचा अपरिहार्य प्रभाव असल्याने ती त्यांना समजणे फारसे कठीणदेखील नाही. शिवाय अनेक लोक स्वच्छ मराठी बोलतात. येथील अनेक हिंदी साहित्यिकांना मराठी साहित्याची आवड आणि जाण आहे. १३ सप्टेंबर २०१४ या दिवशी इंदौर येथील मध्य भारत हिंदी साहित्य समितीच्या हॉलमध्ये कार्यक्रम करायचे ठरले. पहिला कार्यक्रम दमदार व्हायला हवा म्हणून युवा ग़ज़लकार निलेश शेवगावकरच्या हिंदी ग़ज़ल आणि विचारसंपन्न ज्येष्ठ कवयित्री अलकनंदा साने यांच्या मराठी कविता, वैभव पुरोहित आणि संदीप भालेराव यांच्या सकस संचालनात गुंफून सादर झाल्या. पहिल्याच कार्यक्रमात हॉल तुडुंब भरला होता. मराठी/हिंदीचे साहित्यिक, तसेच समूह सदस्यांच्या ओळखीची मंडळी तर होतीच, काही लोक ह्या अनोख्या कार्यक्रमाबद्दल कुठून तरी कळलं म्हणून उत्सुकतेने, कौतुकाने आले होते. आम्ही भरून पावलो. स्थानिक वृत्तपत्रांनी छान कवरेज दिलं. कविता आणि त्या मागचा




'आम्ही रचनाकार' तर्फे सादर झालेला कार्यक्रम

**माझ्या लक्षात आले की आम्ही कवी/कवयित्री मंडळी अनेक वर्षांपासून लिहीत असूनही वर्षातून एकदा किंवा फारतर दोनदा भेटतो आणि इतकी वर्षं भेटत असूनही एक अपरिचयाची भावना आमच्यात आहे.**

विचार सर्वांनाच मनापासून आवडला. आम्ही लगेच दुसऱ्या कार्यक्रमाच्या तयारीला लागलो. दुसरा कार्यक्रमही यशस्वी झाला. ह्या कार्यक्रमानंतर हिंदी साहित्य समितीच्या संचालक मंडळाने आपणहून कमी दरात हॉल द्यायचा निरोप आमच्यापर्यंत पोहचविला. प्रत्येक कार्यक्रमानंतर सदस्यांच्या संख्येत भरच पडतेय आणि ही फक्त समूहाच्या दृष्टीनेच नाही तर कवितेच्या दृष्टीनेसुद्धा अत्यंत आनंदाची आणि समाधानाची बाब आहे.

जवळ जवळ दीड वर्ष सातत्याने समूहाच्या सदस्यांनी कवितांचे कार्यक्रम सादर केले. ह्या इतक्या कमी अवधीत सहा नवीन कवी इंदौरच्या लोकांसमोर आले. ही संख्या कदाचित खूप कमी वाटेल, पण हिंदी प्रांतात राहून मराठी लिहिणे ही आमच्यासाठी खूप कौतुकाची बाब आहे. आता ह्या वर्षी नवीन उपक्रम हातात घेतला आहे आणि तो म्हणजे पोस्टर कविता प्रदर्शन. समूहाच्या प्रत्येक सदस्याच्या एका अत्युत्तम कवितेचे पोस्टर करायचे आणि अशा सर्व पोस्टरांचे प्रदर्शन शहरात निरनिराळ्या भागात भरवायचे आणि कवी/कवयित्रींनी आपल्या कविताही तेथेच सादर करायच्या. लोकांना कविता ऐकण्यासाठी बोलविण्याऐवजी आपणच लोकांकडे कविता घेऊन जायची. अगदी आगळावेगळा उपक्रम. सर्व सदस्य उत्सुक आहेत आणि पोस्टर तयार होण्याची आतुरतेने वाट बघत आहे. दरम्यान परत एकदा 'काव्य भिशी' सुरू झाली आहे.

इंदौरसारख्या अमराठी प्रदेशात कविता मंडळाची गरज आम्हाला भासली ती संवेदनशीलतेमुळे. आम्हा सगळ्यांचे प्रादेशिक मूळ एकच होते. जाणिवा एकच होत्या, संवेदना एकच होत्या. त्या एकमेकांपर्यंत पोहचवण्याची गरज आम्हाला भासत होती आणि आजही भासते. नव्याने सभासद झालेल्या मराठी आणि अमराठी कवींचीही ती गरज असल्याचे जाणवते. कविता हा सगळ्यांनाच जगण्याचा एक भाग वाटतो आणि हा जगण्याचा भाग एकमेकांशी वाटून घ्यावा. या विचाराने सुरू झालेले हे मंडळ आजपर्यंत अव्याहत चालू आहे.

आम्ही चार मैत्रिणींनी पंधरा वर्षांपूर्वी सुरू केलेला असा हा आमचा प्रवास. नवीन सदस्य येत आहेत तसे तसे कल्पनांना नवे धुमारे फुटत आहेत. मनाची तरलता जपत क्षितिजापर्यंत चालत जायची जिद्द आहे. बस् सध्या इतकेच.

– अलकनंदा साने
भ्रमणध्वनी : ९८२६०५९९३४
alknanda31@gmail.com








# वाचले जाणारे साहित्य ठेवण्याकडे कल

**सुनीति लिमये**

**कवितेचा नवा वाचक निर्माण करण्याची जबाबदारी घेताना आणि उपाययोजना करताना कोणीही दिसत नाही. या कविता विशेषांकातून या विषयाला ऐरणीवर आणून कवितेचा वाचक निर्माण करण्यासाठी आणि असलेला वाचक टिकवून ठेवण्यासाठी होणारी ही चर्चा स्वागतार्ह आहे.**

**'ग्रंथाली'च्या** शब्द रुचीच्या कविता विशेषांकात 'ग्रंथालयातून कवितासंग्रह वाचले जातात का?' विषयावर मते मागविली जात आहेत. ही चर्चा स्वागतार्ह आहे. कवितासंग्रह जास्तीतजास्त वाचले जावेत यासाठी ग्रंथालयांची भूमिका काय असावी या संदर्भात विचार करत असताना जे जाणवले ते मांडण्याचा हा प्रयत्न :

१) वाचक कवितासंग्रह खरेदी करून वाचतात असं चित्र दुर्दैवाने दिसत नाही. अगदी थोर साहित्यिकांचे संग्रहही विकत घेतले जात नाहीत (काही अपवाद वगळता) मग न नावाजलेल्या कवींची तर बातच दूर!

२) आर्टस्चे विद्यार्थी सिलॅबसचा भाग म्हणून कविता अभ्यासतात परंतु आवर्जून कवितासंग्रह खरेदी करणे, हे त्यांच्यातही घडताना दिसत नाही.

३) 'आपल्याला ते कविता वगैरे काही कळत नाही बुवा!' असे म्हणणारा वर्गही मोठा आहे. त्यापेक्षा गद्य वाचू, असे म्हणणारे बरेच. कविता समजणे किंवा समजावून घेणे, त्याची मूलत: आवड असणे हा एक वेगळाच प्रांत आहे. त्या बाबतीत काहीही प्रयत्न होताना दिसत नाहीत. चांगले कवी हवेत तसे चांगले रसिकही हवेत. परंतु ते कष्ट घेण्याची तयारी वाचकांत दिसत नाही.

४) ग्रंथालयात वाचले जाणारे कवितासंग्रह, पाडगांवकर, कुसुमाग्रज, शांता शेळके, विं. दा. करंदिकर यांच्यापुढे जात नाही. केशवसुत, बोरकर, मर्ढेकर यांचे लेखन कदाचित दुर्बोध वाटत असावे म्हणून वाचले जात नाही. (मी सर्वसामान्य रसिकांविषयी बोलत आहे.) नवीन कवींमध्ये, संदीप खरे, सौमित्र हे वाचले जातात परंतु नवीन कवींची किंवा त्यांच्या नव्याने प्रकाशित कवितासंग्रहांची माहिती रसिकांपर्यंत पोहचत नाही आणि ते वाचलेही जात नाहीत.

५) ग्रंथालयेही आवर्जून कवितासंग्रह विकत घेत नाहीत असे दिसते. त्यांच्या दृष्टीने स्पष्ट बोलायचं तर ती डेड इनव्हेसमेंट आहे. ग्रंथालयातील कवितासंग्रह बहुतांशी त्या कवीनेच भेट म्हणून दिलेला असतो असे आढळते. याबद्दल आणखी बोलायचे तर ग्रंथालयाचे अर्थिक गणित, ही हल्ली तारेवरची कसरत झाली आहे. वाचणारे कमी, दिवसेंदिवस घटणारी सभासद संख्या, आधुनिक टेक्नॉलॉजीमुळे ई-साहित्याची वाढलेली लोकप्रियता, यात टिकून राहणे ग्रंथालयांना खरेच जड जाते आहे. त्यामुळे नेहमी वाचले जाणारे साहित्य ठेवण्याकडे कल असणे स्वाभाविक आहे. त्यात कवितासंग्रह विकत घेणे, हा विषयच मागे पडून जातो. या सर्व बाजूंनी निराशा करणाऱ्या परिस्थितीवर नक्कीच काही उपाय व्हायला हवेत.

कविसंमेलने ही जशी त्याला मोठ्ठा हातभार लावू शकतात तशीच कवितासंग्रह वाचण्याची आवड, विविध ग्रंथालये लावू शकतात.

१) आपल्याकडे या महिन्यात जे नवीन कवितासंग्रह दाखल झाले आहेत त्याच्या मुखपृष्ठाचे डिजिटल प्रिंटआउट्स दर्शनी भागावर लावल्यास सभासदांच्या नजरेस पडतील व उत्सुकता जागृत होईल असे वाटते.

२) मघाशी म्हटले त्याप्रमाणे वाचले जाणारे साहित्य ग्रंथालयात किंवा वाचनालयात ठेवण्याचा कल असतो. याचे कारण नवे कवी वाचकांना माहीत नसतात. म्हणूनच अशा कवींची ओळख करून देण्यासाठी त्यांच्या कविता वाचनालयातील फलकावर लावल्या किंवा लिहिल्या तर वाचकांच्या मनात त्या कवीच्या कवितांविषयीसुद्धा उत्सुकता वाढून कवितासंग्रहाची मागणी होऊ शकेल.

३) सभासद वाचकांना कवितांची निवड करण्यास सांगून त्यांच्याकडूनच काव्यवाचनाचा कार्यक्रम वाचनालयात सादर केल्यास या कार्यक्रमाला वाचनालयाचे सभासद श्रोते म्हणून लाभतील आणि नंतर त्यांचाही सहभाग अशा कार्यक्रमातून वाढेल आणि अशा सहभागामुळे कवितासंग्रहांचे वाचनही आपसूकच वाढेल.

अशा रीतीने कविता जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी इतकेच नव्हे तर त्याची आवड लागण्यासाठी ग्रंथालये पुढाकार घेऊ शकतात.

**- सुनीति लिमये**
भ्रमणध्वनी : ९९७५९००४६७
suniti.limaye@gmail.com

ग्रंथाली



## आरसपानी जगताना – डॉ. वीणा सानेकर

आजच्या आपल्या जगण्यात अनेक पातळीवरचे 'संवाद' हरवलेले आहेत. अनेक शब्दांचे स्पर्शार्थ हरवलेले आहेत, अशा स्पर्श-संवादांची गरज अधोरेखित करणारे डॉ. वीणा सानेकर यांचे हे लेखन आजच्या कौटुंबिक-सामाजिक संबंधाच्या बदलत्या पोतावर अचूक भाष्य करते...

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

## निर्भया लढते आहे. – नीलम माणगावे



खरं तर, या कथा लिहिताना आनंद नव्हता झाला. झाल्या त्या वेदनाच! एक मूक-बधिरता व्यापून राहिली होती. अशा कथा कुणाला कधीच लिहाव्या लागू नयेत, अशी समाजव्यवस्था निर्माण व्हायला हवी.


**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**



## फुटपाथ ते नोटरी – सुजाता लोखंडे

या कादंबरीचा नायक सागर आहे. तो ज्या समाजात जन्मला तो आंबेडकरी समाज येथील समाजव्यवस्थेने तळागाळातच आरंभापासून ठेचलेला असून, त्याच्या जगण्याचे सगळे मार्गच अवरुद्ध करून टाकलेले आहेत. साध्या दैनंदिन आवश्यक गरजा- अन्नपाणी, वस्त्र, निवारा पूर्ण करण्यासाठी त्याला अटीतटीने परिस्थितीशी लढावे लागते. वाचकाला विचार करायला लावणारी ही परिस्थिती मनुष्यनिर्मित व्यवस्थेतून अस्तित्वात आली हे तर निर्विवाद आहेच. **मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.**

## पारुल एक प्रेमकहाणी – डॉ. हर्ष देहेजिया / अनुवाद : सविता दामले



एका प्रणयरम्य कथानकात गुंफलेले भारताचे समृद्ध तत्त्वज्ञान.

मानवाच्या इंद्रियसंबंधित आणि भावविश्वसंबंधित इच्छाआकांक्षा व्यक्त करणारी एक असामान्य का म्हणजेच पारूल.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**




## प्रॉमिसलँड (एका परदेशस्थाची कथा) – अविनाश बागल / अनुवाद : जी.बी. देशमुख

काही कथा ज्या माझ्या पन्नास वर्षांपेक्षा अधिकच्या अमेरिकेतील कार्य आणि जीवनावर आधारित आहेत आणि त्याशिवाय काही आनंदी, काही गमतीदार कथांसोबतच तुमच्या डोळ्यांत अश्रूचा एखादा टिपूस आणणाऱ्या दोन-एक कथासुद्धा आहेत.

**मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.**

## लुपसचे महाभारत – डॉ. अंजली रानडे



ही कथा आहे लुपससारख्या एका असाध्य आजाराशी जवळजवळ २० वर्षं दिलेल्या लढ्याची. या लढ्याचे साधर्म्य महाभारतातील युद्धाशी आहे. महाभारत युद्ध जसे आप्तस्वकीयांविरुद्ध होते, तसेच माझेही युद्ध आपल्याच रोगप्रतिकारक शक्तीविरुद्ध आहे. आपल्याच शरीराने आपल्यावर केलेले हल्ले परतविण्याचे सतत चालणारे युद्ध! **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**



# ...तर कवितासंग्रहांचा खप वाढेल!

**प्रा. दीपा ठाणेकर**

**एकूण १००० ग्रंथांपैकी १०० ग्रंथ कवितेशी संबंधित आहेत. त्यात ६६ टक्के कवितासंग्रह तर ३४ टक्के काव्यसमीक्षेशी संबंधित ग्रंथ आहेत.**

**अकरावीचा** पहिला दिवस आणि मराठीचा पहिलाच तास! ओपनिंग बॅट्समन म्हणून पहिल्याच तासाला जाण्याची ही माझी पहिली वेळ नव्हती. पहिल्या दिवशी पहिल्या तासाला अगदी नवनवीन भांबावलेले, अनोळखी पण टवटवीत चेहरे पाहताना एक वेगळेच चैतन्य जाणवत राहतं. ही सगळी मुलं वेगवेगळ्या वातावरणातून आलेली, कॉलेजमधील पहिलं पाऊल हे त्यांच्या वेगवेगळ्या ऊर्मी जागृत करणारं असतं. भिन्न स्वभाव, भिन्न शाळा, भिन्न वृत्ती, भिन्न परिस्थिती यांमधून आलेली ही मुलं! त्यांना आम्हीही असंच आनंददायी, सकारात्मक ऊर्जा देणं गरजेचं असतं.

त्यामुळे मी दरवर्षी मंगेश पाडगांवकर यांचा 'बोलगाणी' हा कवितासंग्रह वर्गात नेते आणि 'बोलगाणी'तील कवितांचा नजराणा मुलांसमोर पेश करते. 'प्रेम म्हणजे प्रेम असतं तुमचं आणि आमचं अगदी सेम असतं' अशा प्रेम कवितांनी सुरुवात करून 'सांगा कसं जगायचं' या जीवनविषयक सकारात्मक दृष्टी देणाऱ्या कविता ऐकताना मुलं अगदी हरखून जातात. त्यांना आठवत असलेल्या कवितांबद्दलही बोलतात. 'बोलगाणी' वाचून झाल्यानंतर काही विद्यार्थी कवितांच्या ओढीने लगेचच येऊन विचारतातही की, 'आपल्याकडे अजून कोणत्या कवींचे काव्यसंग्रह आहेत? ते वाचायला मुलांना मिळतात का?' किंवा 'मॅडम, आम्हाला पण द्या ना हे बुक' असा हट्टही करतात.

या अशा मुलांसाठी मी एक यादी करून ठेवली आहे. ती त्यांना देऊन ठेवते आणि काहीजण त्यातील कवितासंग्रह वाचून आपला अभिप्रायही सांगतात. या तासाचा परिणाम पुढल्या सगळ्याच तासांवर होतो. मुलं तासाला अगदी आनंदाने बसतात, चर्चा करतात, कविता, कथा, लेख लिहिण्यासाठी धडपड करतात. मात्र गेल्या काही वर्षांत तरुणांतील या साहित्यप्रेमाला ओहोटी लागली होती. इंग्रजी माध्यमाचा परिणाम इथे दिसत होता. पण आपण आपले काम चालू ठेवायचं, बाकीचा भाग अलाहिदा, असा विचार करून मी हा उपक्रम चालू ठेवला होता. त्यातून तीन-चार जणांना साहित्याची गोडी लागली तरी चालेल असा विश्वास वाटत होता.

पण या वर्षी घडलं ते जरा वेगळचं. अबोली आणि सुलेखा या दोन मुली जवळ आल्या आणि म्हणाल्या, 'मॅम, आम्हाला आपल्या ग्रंथालयातील पुस्तकं पाहायची आहेत आणि थोडी माहितीही मिळवायचीय. एक प्रोजेक्ट आहे त्यासाठी 'आमच्या ग्रंथालयातील काव्यग्रंथांची संख्या' हा विषय आम्ही घेतला आहे. दोघींना घेऊन ग्रंथपाल शुभांगी वेदक यांच्याकडे गेलो. शुभांगीने सांगितलं की, १९६३ साली महाविद्यालयाची स्थापना झाल्यापासून महाविद्यालयाचे ग्रंथालय सुरू झालं, ग्रंथालयात कथा, कादंबऱ्या, कविता, ललित, चरित्र, आत्मचरित्र, समीक्षात्मक, संदर्भ ग्रंथ, कोश असे सगळ्या साहित्यप्रकारांचे ग्रंथ आहेत आणि त्याची संख्या १००० एवढी आहे. २६ दिवाळी अंक तर दर महिन्याला २९ नियतकालिके (मासिके-त्रैमासिके-साप्ताहिक) ग्रंथालयासाठी घेतली जातात.

'पण, आपल्या ग्रंथालयात कविता आणि कवितेशी संबंधित किती ग्रंथ आहेत, ते सांगाल का?' अबोली म्हणाली.

ग्रंथालयाचे लेखनिक उदय धुरींनी सांगितले, 'एकूण १००० ग्रंथांपैकी १०० ग्रंथ कवितेशी संबंधित आहेत. त्यात ६६ टक्के कवितासंग्रह तर ३४ टक्के काव्यसमीक्षेशी संबंधित ग्रंथ आहेत. अबोली, तू म्हणतेस ते खरंय पण कवितेची कमीच आहेत पुस्तकं आपल्याकडे. पण काव्यग्रंथ वाचणारे वाचकही कमी आहेत हां. ९० टक्के प्राध्यापकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी मराठी जरी असला तरी त्यातील ५ टक्के वाचक कवितासंग्रह वाचतात. विद्यार्थी तर कवितासंग्रहाला हातही लावत नाहीत. तुमच्यासारखीच एक-दोन टक्के हौशी मंडळी क्वचितच काव्यसंग्रह वाचायला येतात. दिवाळी अंकांतून येणाऱ्या कविता वाचत असतील तेवढंच काव्यवाचन होत असावं या वाचकांचं.'

'पण असं कसं रे? आपण मराठी भाषादिनानिमित्त जेव्हा कवितांचा कार्यक्रम करतो तेव्हा त्यात आपले वीस टक्के प्राध्यापक तरी सहभागी होत असतात. म्हणजे कविता त्यांना आवडतात.'' मी लगेच माझे मत व्यक्त केले. उदय म्हणाला, 'मॅम, खरंय तुमचं. पण काव्यसंग्रह वाचायला नाही हो घेत कुणी.' मुली आमचं संभाषण शांतपणे ऐकतच होत्या.

आपल्याकडे असलेल्या शिक्षकांशी याबाबत मी बोलायचं ठरवलं. स्टाफरूममध्ये डबा खाताना न राहवून हा विषय मी माझ्या ज्येष्ठ

> **९० टक्के प्राध्यापकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी मराठी जरी असला तरी त्यातील ५ टक्के वाचक कवितासंग्रह वाचतात. विद्यार्थी तर कवितासंग्रहाला हातही लावत नाहीत.**

मित्र-मैत्रिणींकडे काढलाच. खरंतर सगळे माझ्यापेक्षा वयानं मोठे पण आमची दोस्ती साहित्याची होती. प्रा. रेखा घोरपडे, प्रा. शुभांगी वर्तक, प्रा. दिवाण मॅम, प्रा. सुभगा कार्लेकर, प्रा. सीमा रत्नपारखी, डॉ. काळे, प्रा. कमलाकर इंदुलकर, डॉ. एस. टी. इंगळे, प्रा. ज्योत्सना निज्सुरे हे सगळे विज्ञानशाखेचे प्राध्यापक. पण मराठी साहित्य आणि मराठी कवितेशी त्यांची विशेष जवळीक. अनेक कविता त्यांना मुखोद्‌गत होत्या. कवितांचा कार्यक्रम करायचा झाला तर ही फौज नेहमी तयार. मी हळूच विषय काढला आणि विचारलं, 'आपल्याकडे मराठी भाषा बोलणारा एवढा स्टाफ आहे, पण ग्रंथालयातून कवितासंग्रह किंवा काव्यसमीक्षेशी संबंधित ग्रंथ घेऊन वाचणाऱ्यांची संख्या खूपच कमी आहे.'

'अरे? असं कसं शक्य आहे?' ज्योत्स्ना जरा साशंकतेनेच म्हणाली. 'अगं, आताच लायब्ररीमध्ये मी गेले होते. काही मुलींना कवितेच्या संदर्भात प्रोजेक्ट करायचे आहे. त्यांना माहिती देता देता समजल मला हे! पण तुम्ही कधी कवितासंग्रह घेऊन वाचले आहेत का? आणि कविता समजाव्यात यासाठी कधी समीक्षात्मक पुस्तके वाचलीत का?'

फिजिक्सच्या रेखामॅम म्हणाल्या, 'अगं, पूर्वी पुस्तके घेऊन वाचायचो. पण हल्ली कॉलेजच्या कामांमुळे वेळच मिळत नाही. त्यामुळे पूर्वीसारखं वाचन नाही होत आता.' सगळ्यांनीच त्यांच्या मताला दुजोरा दिला आणि हळूहळू सगळेच काव्यमैफल असल्यासारखे कवी आणि काव्यसंग्रह याबाबत बोलू लागले.


डॉ. काळेसर खूपच छान कविता लिहितात, कवितांचं विडंबनही सुंदर करतात. ते म्हणाले, 'कविता समजून घेण्यासाठी मी कधीच समीक्षा नाही वाचली. काव्यवाचन हा कवी-कविता-वाचक यांच्यातील मूक संवाद असतो. आजचे नवकवी आशयाच्या बाबतीत फार काही नवीन मांडतायत असं वाटत नाही.'

प्रा. इंदुलकरांनीसुद्धा काळेसरांच्या मताला दुजोरा देत म्हटलं, 'बरोबर आहे सर तुमचं, आजचं जीवन रेल्वेच्या गती प्रमाणे धावतंय त्याप्रमाणं कविताही धावताना दिसतेय. म्हणजे काव्यसंमेलनं ढीगभर होतायत पण दर्जात्मक काव्य काहीच ठिकाणी दिसतंय. त्यात ती लेबलं असतात ना! विद्रोही कविता, स्त्रीवादी कविता अशी गटबाजी कशासाठी करतात ते कळतच नाही. कोणत्याही कवितेला असं गटात नको बसवायला.'

पुढल्या रविवारी कॉलेजकट्टा होता. कॉलेजकट्टा म्हणजे महिन्यातील एखाद्या रविवारी विविध महाविद्यालयातील, माझ्या कॉलेजमधील अकरावी ते एम.ए.चे शिक्षण घेणारी मुले आणि आम्ही काही मित्र मंडळी एकत्र भेटतो. साहित्याची आवड मुलांमध्ये रुजावी यासाठी हा कट्टा महाविद्यालयात सुरू केला. कविता, कथा, नाटक यांबाबत आम्ही दर महिन्याला काही ना काही सेशन्स घेत असतो. या कट्ट्यात कविता, पथनाट्य लिहिणारी मुले आहेत. कवितांची, साहित्याची चांगली समज त्यांच्यामध्ये आहे. अनेकदा ही मुले माझ्याकडून वाचण्यासाठी पुस्तके नेतात पण कवितासंग्रह वाचायला फार कमी वेळाच मागितले जातात. मग काव्यविषयक इतर ग्रंथांचे नावच नको.

व्हॅलेंटाईन दिनानिमित्त 'व्हॅलेंटाइन डे विथ बुक' असा उपक्रम घेतला होता. मुलांनी त्यांना आवडलेल्या पुस्तकांवर बोलावं, या हेतूने हा उपक्रम घेतला होता. ३३ पैकी फक्त एकाच सदस्याने काव्यसंग्रहाबाबत आपली मते व्यक्त केली होती. मुलांशी चर्चा केली तेव्हा कळलं की पदवीसाठी, एम.ए.साठी मराठी विषय घेतलेले विद्यार्थीसुद्धा अभ्यासक्रमाखेरीज वेगळे कवितासंग्रह वाचत नाहीत. कवितेचा अर्थ समजून घेण्यासाठी प्राध्यापकांची मदत घेणं आणि त्या विषयाच्या नोट्स वाचल्या की त्यावर पेपर लिहिणं यापलीकडे मराठी साहित्याविषयी फार कळकळ त्यांच्यापाशी नाही. बाकीचे विषय इंग्रजीमधून असतात. इंग्रजीची भीती मनात असल्यामुळे मराठी विषय शेवटच्या वर्षाला निवडणार अनेक विद्यार्थी आहेत. मराठी साहित्यात काही करायचयं असं वाटून फार तर दोन-तीन टक्केच विद्यार्थी मराठी विषय घेतात. समीक्षेच्या भानगडीत ते पडतच नाहीत. कारण मुळातच समीक्षेची भाषा त्यांना बोजड, क्लिष्ट वाटते. जिथे कवितेचेच नीट आकलन होत नाही तिथे समीक्षा काय समजणार, अशी भीती त्यांना वाटत असते. मनापासून मराठी साहित्याचा अभ्यास करणारी मंडळी अगदी नावाजलेल्या कॉलेजमध्येही पाच-सहाच असतात.

साधी सरळ असलेली कविता या मुलांना भावते, आवडते, पण काही कविता समजतच नाहीत. त्यांना विविध अर्थाचे पदर असल्यामुळे त्याबद्दल अर्थनिर्णयन वा भाष्य करणं त्यांना कठीण वाटतं. कवितासंग्रह एका दमात संपवता आल्यामुळे




पदवीसाठी, एम.ए.साठी मराठी विषय घेतलेले विद्यार्थीसुद्धा अभ्यासक्रमाखेरीज वेगळे कवितासंग्रह वाचत नाहीत. कवितेचा अर्थ समजून घेण्यासाठी प्राध्यापकांची मदत घेणं आणि त्या विषयाच्या नोट्स वाचल्या की त्यावर पेपर लिहिणं यापलीकडे मराठी साहित्याविषयी फार कळकळ त्यांच्यापाशी नाही.

त्यांचा परिणाम मनावर दीर्घकाळ टिकत नाही. एखाद्या कवितासंग्रहातील एखादीच कविता चटका लावणारी असते. तीसुद्धा कालांतराने विसरायला होते. फेसबुक, मराठी वेबसाइट यावर असंख्य कवितांचा खजिनाच असल्यामुळे काव्यसंग्रह वाचायलाच हवेत असं वाटत नाही. त्याउलट कथा, कादंबऱ्यांचा आवाका मोठा असल्यानं त्यातून अनेक गोष्टी शिकायला मिळतात. ते सोशल मीडियावरही उपलब्ध नसते. त्यामुळे ते वाचावंसं वाटते. कथात्म साहित्यातील प्रसंग, संवाद आणि त्यातून केलं जाणारं भाष्य हे मनावर फार परिणाम करतं. आत्मचरित्र, चरित्र वाचनाने मोठमोठ्या व्यक्तींनी आयुष्यात केलेला संघर्ष निश्चितच दिशादर्शक वाटतो.


मुलांच्या ह्या मतांमुळे मी अवाकच झाले. कारण मागे एका काव्यस्पर्धेसाठी मी कविता मागविल्या होत्या तेव्हा शंभरहून अधिक कवी ठाणे, मुंबईमधील कवी कविता लिहितायत असे निदर्शनास आलं. सोशल मीडियावर तर अनेक ग्रूप केवळ कवितांसाठी तयार झाले आहेत. दर महिन्याकाठी एक तरी कवितेचं पुस्तक प्रकाशित होत असतंच. कवितेला असे सुगीचे दिवस असताना ग्रंथालयातून वाचकाकडून मात्र त्याची उपेक्षा होतेय, हे दुःखद वास्तव होतं.

ह्या सगळ्या परिस्थितीला जबाबदार कोण? शिक्षण पद्धती? बदलते शिक्षणप्रवाह? शिक्षक-पालक यांची मानसिकता? प्रकाशनसंस्था? ग्रंथालये? की सोशल मीडिया?

मुळातच आज सगळ्याच घरातील मराठमोळे वातावरण बदललेलं आहे. एकत्र कुटुंबपद्धती नष्ट झाल्यामुळे आजी-आजोबांच्या ओठांवर असलेली कविता नातवांपर्यंत पोहचत नाही. बोलण्यापुरतं मराठी आलं म्हणजे झालं असं सध्या वातावरण आहे. पूर्वी शाळेला सुट्टी लागली की पालक मुलांना गोष्टी, कविता यांची पुस्तके आणून द्यायचे. ते स्वतः वाचून दाखवायचे. पण आज वाचनाची जागा छंदवर्गाने घेतली आहे. या छंदवर्गातून व्यक्तिमत्त्वविकास होतो हे सत्य आहे. पण कलांच्या जोडीने वाचनही गरजेचं आहे. त्याने कल्पनाविकास, भावनिक विकास, वैचारिक विकास होतो हा वाचनाचा होणारा संस्कार विचारात घेतला जात नाहीए. अगदी मोजक्या घरात हे वाचनसंस्कार टिकवून ठेवले जात आहेत. छंदही आनंदासाठी जोपासले जात आहेत असे नाही. त्यामधून करिअरचा विचार केल्यामुळे त्यातही स्पर्धा झाली आहे. ज्या घरांमध्ये पालक नोकरीनिमित्त घराबाहेर जातात तिथे मुले व्हिडिओ गेम, मोबाइल यामध्ये अडकलेले दिसताएत. मुलांना कवितेची खरी ओळख होते ती अडगुलं मडगुलं, अंगाई गीतापासून! पण आज बाळावर संस्कार करणारी आईच रेल्वेच्या चाकाच्या गतीनं धावतेय. हे फास्ट लाइफ नक्कीच कवितेला मारक ठरतंय.

हे चित्र बदलायला हवं असेल तर काही पालकांनी एकत्र येऊन काव्यक्लब सुरू करायला पाहिजेत. मुलांसोबत आपणही कविता केल्या तर त्यांचा हुरूप वाढू शकतो. आपल्या मुलाचे कलागुण, स्वभाव, त्याने केलेली प्रशंसनीय कामगिरी याचे कवितेतून वर्णन केले तर ते मुलांना अधिक भावेल. बाबाने, आईने माझ्यावर कविता केली हे मित्रमैत्रिणीला सांगताना त्याचा ऊर अभिमानाने भरून येईल. वेळ नसल्यास अगदी घरात बोलतानाही काव्यमय भाषेत वा यमकांमध्ये बोलण्याची सवय लावली तर मुलांचा शब्दसंग्रह वाढेल आणि कवितेचा सूरही मनात उमलत जाईल. थोडं बदलायला लागणार आहे पालकांनाही.

घरातील मराठमोळं वातावरण तर



बदललंच आहे पण ज्या शिक्षणप्रक्रियेतून मुलं 'लहान माझी बाहुली मोठी तिची सावली', 'ये रे ये रे पावसा' म्हणत मोठी होत होती तिचे महत्त्व कमी होऊन इंग्रजी माध्यमातील शाळांना अवास्तव महत्त्व प्राप्त झालं. त्यातच आय.सी.एस.ई.- सी.बी.एस.ई या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढली. या शाळांमधून मराठी भाषेला अभ्यासक्रमातून बाजूला केलं जातंय वा गौण दर्जा दिला जातोय त्यामुळे मराठी भाषा शिकणाऱ्यांची, जाणणाऱ्यांची संख्या घटत चालली आहे.

मराठी माध्यम, इंग्रजी माध्यम यांसाठी मराठी भाषेच्या अभ्यासक्रमाची रचना ही सदोष असल्याचं पदोपदी जाणवतं. अभ्यासक्रमात मुलांच्या वयाला साजेल अशा रचनांचा अभाव असेल तर कवितेची ओढ कशी लागणार? आजची पिढी खूप प्रॅक्टिकल विचार करणारी आहे. प्रसारमाध्यमे, विकसित तंत्रज्ञान, सोशल नेटवर्किंग यामुळे त्यांच्या कल्पनांना वास्तवाचे अस्तर मिळतेय. त्यामुळे कवितेची नावड निर्माण होत आहे. त्या आशयाच्या कवितांचा अंर्तभाव अभ्यासक्रमात असायला पाहिजे. त्यांच्या वयाच्या मुलांनी लिहिलेल्या एक-दोन कवितांचा समावेश असला तर त्यांच्यातही स्वत:हून असे लेखन लिहिण्याची ऊर्मी जागृत होईल. पाठ्यपुस्तका-बाहेरील कविताही त्यांना अवांतर वाचनासाठी असाव्यात. अशा कवितांवर आधारित मौखिक स्वाध्याय ठेवून त्याला वेगळे गुण दिले तर विद्यार्थ्यांना निश्चितच आवड लागेल. काही कवितांचे ऑडिओ-व्हिडिओ दाखवता येतील. त्या कवितांवर नृत्याविष्कार वा नाट्याविष्कार करण्यासाठी प्रवृत्त केलं तर अभिनय-भाषा-नाटक-काव्य या सगळ्याचाच सुंदर मेळ घातला तर विद्यार्थ्यांचा रस टिकून राहील. मग ती मुलं कोणत्या माध्यमातून का शिकेनात, आपोआप ती कवितेकडे वळतील. महाविद्यालयीन पातळीवर तर हे प्रयत्न अधिक करावे लागतील. दिनविशेष माहिती करून कवी-कवयित्रीची येणारी जन्मतिथी-स्मृतिदिन यांनुसार त्यांच्या साहित्यातील योगदानाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती करून देता येईल. त्यासाठी पॉवर-पॉईंटचे प्रेझेंटेशन करून त्यात त्या कवी-कवयित्रीने लिहिलेली पुस्तकं, त्यातील कविता दाखवता येतील. त्या कवीच्या कवितांचे सादरीकरणाचे ऑडिओ-व्हिडिओ दाखवता येतील. त्या कवीची मुलाखत वा गप्पांचा कार्यक्रम आयोजित करता येईल. व्हाट्स अप, फेसबुकचे गट तयार करून चांगल्या कवींच्या रचना पोचवण्याचा प्रयत्न करता येईल. त्या कवितांबद्दल मुलांची मते काय हे जाणून घेता येईल. आजूबाजूला होणाऱ्या काव्यसंमेलनात ह्या विद्यार्थ्यांना घेऊन जाता येईल.

हे झालं पालक-शिक्षक यांच्या जबाबदारीबाबत पण ग्रंथालयांनीसुद्धा थोडं पुढचं पाऊल टाकणं गरजेचं आहे. महाविद्यालयातील व इतर ग्रंथालयं या ठिकाणची पुस्तक देवाण-घेवाणीसंबंधी असलेली पारंपरिक पद्धत यामुळे ग्रंथ कपाटात व रजिस्टरमध्ये बंदिस्त आहेत . ती पद्धत बदलली पाहिजे. संगणकावर पुस्तकां-बद्दलची माहिती देणं, त्याची सतत जाहिरात करणं, ग्रंथालयातील सदस्यांना मेलवरून ग्रंथालयातील पुस्तकांची यादी देणं या सहजगत्या करता येणाऱ्या गोष्टी आहेत. महाविद्यालयातील ग्रंथालयांनी आपल्या महाविद्यालयाच्या वेबसाइटवर, फेसबुक पेजवर ग्रंथांची अद्ययावत माहिती दिली तर काही विद्यार्थी त्याचा लाभ घेऊ शकतील.

वाचकांनी कवितासंग्रह आणि त्यासंबंधित ग्रंथ वाचावेत यासाठी काही ग्रंथालयांत स्पर्धा, चर्चासत्र, परिसंवाद, कवी-कवयित्रींची प्रत्यक्ष वा ऑडिओ मुलाखत, काव्यसंमेलनं, कवीच्या काव्यसंग्रहांवर आधारित चर्चा असे कार्यक्रम करता येतील. केवळ मराठीच नव्हे तर मराठीत अनुवादित कवितांचे अनेक काव्यसंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. मूळ कवी आणि अनुवादक यां दोहोंची मुलाखत घेता येईल, मूळ कविता आणि अनुवादित कविता यांचे सादरीकरण ही या वेळेस करता येईल. आज आपण आपली मराठी भाषेची चौकट मोठी करायला हवी आहे.

काव्यसंग्रह प्रकाशित करणाऱ्या प्रकाशन संस्थांनीही काव्यसंग्रह लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रकाशनाच्या वेळी कवीची मुलाखत, काव्यसंग्रहाच्या खरेदीवर आकर्षक सवलत ठेवायला हरकत नाही. एकाच कवीचा एकच संग्रह प्रकाशित करण्यापेक्षा दहा-बारा कवींच्या उत्तम कवितांचे प्रातिनिधिक कवितासंग्रह काढले तर कवितासंग्रहांचा खप वाढेल.


– प्रा. दीपा ठाणेकर

भ्रमणध्वनी : ९८२०१६३१२७

deepathanekar73@gmail.com


**मुलांना कवितेची खरी ओळख होते ती अडगुलं मडगुलं, अंगाई गीतापासून! पण आज बाळावर संस्कार करणारी आईच रेल्वेच्या चाकाच्या गतीनं धावतेय. हे फास्ट लाइफ नक्कीच कवितेला मारक ठरतंय.**

**ग्रंथालयांनी आपल्या महाविद्यालयाच्या वेबसाइटवर, फेसबुक पेजवर ग्रंथांची अद्ययावत माहिती दिली तर काही विद्यार्थी त्याचा लाभ घेऊ शकतील.**



# काव्यानंद : आज आणि पूर्वी

**डॉ. उज्ज्वला मेहेंदळे**

**मर्ढेकरांच्या काव्यनिर्मिती नंतर काव्याकडे पाहण्याची लोकांची दृष्टीच बदलली. यथार्थ अभिव्यक्ती आणि नव्या प्रतिमांची ओळख मर्ढेकरांनी काव्यरसिकांना दिली. नवकाव्याची इथपासून सुरुवात झाली.**

**प्राचीन** काळापासून मराठी साहित्यात काव्याचे स्थान सगळ्यात महत्त्वाचे ठरले आहे. किंबहुना असे म्हणता येईल की काव्यलेखनातूनच मराठी साहित्याची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली आहे.

संत ज्ञानेश्वरांपासून किंवा त्याही आधीपासून पुढे मोरोपंतांसारख्या पंडित कवींपर्यंत, संत-पंत-तंत सर्व कवींच्या काव्याचे स्थान हे मराठी भाषेत आजही अजरामर आहे.

काळानुसार काव्याचा विषय-भाषा-परंपरा यात बदल होत गेले. कवी केशवसुतांच्या वेळेपासून काव्यरचनेची पद्धत, काव्यविषय यात पुष्कळच बदल झाला. काव्याचा आशय आध्यात्मिकतेकडून सामाजिकतेकडे वळू लागला. कविवर्य रेव्हरंड टिळक, गोविंदाग्रज, बी कवी, रेंदाळकर, बालकवी यांनी विविध विषय-विविध प्रकारची रचना असा वेगळेपणा काव्यात आणला. कवितेचे अंतरंग आणि बाह्यांग सर्वच बदलले. समाजदर्शनाला, समाजातील महत्त्वाच्या प्रश्नांना स्पर्श करणारी ही कविता ठरली. अर्थात या कवितेवर इंग्रजी वाङ्मयाचा प्रभाव होता हे निःसंशय! १९२० ते १९३५ या काळात विपुल काव्यनिर्मिती झाली. ती लोकप्रियही झाली आणि त्यावर साक्षेपी टीकाही झाली.

१९४० नंतरच्या मराठी काव्यातली समाजाभिमुखता अधिक तीव्र, व्यापक व्हायला लागली. काही कवी समाजाभिमुखतेबरोबर सौंदर्यवादाकडे वळले. बापट-करंदीकर-पाडगांवकर या त्रयींबरोबरच इतरही अनेक कवी काव्याच्या क्षेत्रात आपला ठसा उमटवू लागले.

या काळात कवितेच्या बाह्यरूपात मुख्यत: बदल व्हायला लागला. यमक-वृत्त यांच्या बंधनातून कविता बाहेर पडायला लागली. केशवसुतांच्या काव्यातून जळता प्रक्षोभ व्यक्त झाला पण यानंतर कविता प्रणयगीते, निसर्गगीते यांकडे वळली. कविवर्य भा. रा. तांब्यांनी आपल्या वेगळ्या प्रकारच्या गेय कवितांनी लोकप्रियता मिळवली. रविकिरण मंडळाने कविता सामान्य रसिकांपर्यंत नेऊन पोहचवली. कवी अनिलांच्या कवितेतून व्यापक सामाजिक जाणिवा निर्माण व्हायला लागल्या आणि हळूहळू कवितेच्या बाह्यांगाची कृत्रिक चौकटही नाहीशी व्हायला लागली. कवी कुसुमाग्रज, बा. रा. कांत, निकुंब, पु श. रेगे यांच्याबरोबर मनोरमाबाई रानडे, संजीवनी मराठे, इंदिरा संत, पुढच्या काळात शांताबाई शेळके, साहित्यलक्ष्मी लक्ष्मीबाई टिळक यांची कविता लोकप्रिय झाली. सोपानदेवांनी बहिणाबाईंची गाणी प्रसिद्ध केली आणि एक वेगळीच कवित्वशक्ती प्रत्ययाला आली.

मर्ढेकरांच्या काव्यनिर्मितीनंतर काव्याकडे पाहण्याची लोकांची दृष्टीच बदलली. यथार्थ अभिव्यक्ती आणि नव्या प्रतिमांची ओळख मर्ढेकरांनी काव्यरसिकांना दिली. नवकाव्याची इथपासून सुरुवात झाली. मर्ढेकरांमुळे आपल्या सर्वसामान्य जीवनातले विषय काव्यामधून यायला लागले. सामान्य माणसाच्या जीवनातले प्रश्न-भावना हे जसे गंगाधर गाडगीळांच्या नवकथेतून व्यक्त व्हायला लागले तसे मर्ढेकरांच्या काव्यातूनही ते लोकांपर्यंत पोहचले.

साठोत्तरी कविता मात्र याहूनही वेगळे वळण घेणारी ठरली. १९६० नंतर मराठीत दलित, आदिवासी, ग्रामीण, भटक्या-विमुक्तांचे साहित्य, जनसाहित्य आणि स्त्रियांचे साहित्य असे अनेक प्रवाह निर्माण झाले आणि सर्वसामान्य जीवनापेक्षा वेगळे जीवन, साहित्याच्या आतापर्यंतच्या भाषेपेक्षा वेगळी भाषा लोकांना या साहित्यातून वाचायला मिळू लागली. प्रस्थापित समाजव्यवस्था, पारंपरिक मूल्य यांना नकार देऊन प्रत्यक्ष अनुभवलेले दाहक सत्य साहित्यातून व्यक्त होऊ लागले. दलित कवितेचा प्रवाह या साठ नंतरच्या मराठी कवितेत फार महत्त्वाचा ठरला.

पण त्याआधी मराठी कवितेत आरती प्रभू आणि ग्रेस यांच्या सामाजिक जीवनाचे, मानवी भावनांचे चिंतन मांडणाऱ्या कविता लोकांच्या मनावर प्रभाव पाडू लागल्या होत्या. वसंत आबाजी डहाके यांनीही आपल्या कवितेतून सामाजिक वास्तवाची जाणीव दिली.

ना. धों. महानोरांनी त्यांच्या ग्रामीण कवितेतून ग्रामीण वातावरण, ग्रामीण जीवनातल्या भावनांचे दर्शन आपल्यापर्यंत पोहचवले. नारायण सुर्वे यांनी महानगरातील कामगार जीवन, त्यांच्या कथा आणि व्यथा आपल्यापुढे ठेवल्या.

जागतिकीकरण, आर्थिक धोरण यांना अनुसरून काव्यनिर्मिती व्हायला लागल्याने कवितेमध्ये संपूर्णतया बदल घडून आला. पारंपरिक काव्यप्रतिमा नाकारल्या गेल्या.

नव्या पिढीच्या कवयित्रींनी पुरुषप्रधान व्यवस्था झिडकारून स्त्रीच्या दु:खाचे अनेक पदर वाचकांसमोर उलगडले, कवितेत आशय आणि अभिव्यक्तीचे नावीन्य आले; त्याचबरोबर आदिवासी कविता, मुस्लीम मराठी कविता यांतून त्यांची समाजव्यवस्था, त्यांची सुखदु:खे आपल्यासमोर आली.

असे विविध प्रवाह मूळ काव्यप्रवाहाला येऊन मिळाल्याने काव्याचा प्रवाह खूपच समृद्ध, संपृक्त झाला. विविध विषय, विविध प्रकारची मांडणी कवितेच्या माध्यमातून वाचकांसमोर येऊ लागली. कवितांचे सादरीकरण किंवा विविध नियतकालिकांतून कविता श्रोत्यांपर्यंत किंवा वाचकांपर्यंत पूर्वीपेक्षा खूप मोठ्या प्रमाणात पोहचू लागल्या. कवींना आपल्या कविता पुस्तकरूपाने किंवा कविसंमेलनातून सादर करण्याची संधीही खूप मोठ्या प्रमाणावर मिळू लागल्या. आज वेगवेगळी वाचनालये किंवा इंटरनेट, व्हॉट्सअप, फेसबुक अशी इलेक्ट्रॉनिक साधनेही स्वत:चे साहित्य वाचकांपर्यंत पोहचवायला उपलब्ध आहेत.

एकेकाळी असे म्हणण्यापेक्षा अगदी पाच-सहा वर्षांपूर्वीपर्यंत मराठी साहित्य संमेलनात कविसंमेलन हा एक श्रोत्यांना अत्यंत आवडणारा भाग होता. दरवर्षी होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात खच्चून भरलेला भलामोठा मंडप आणि कवींच्या कवितांना भरभरून मिळणारा प्रतिसाद असे दृश्य दिसत असे. यामुळेच तीन दिवसांच्या संमेलनात निमंत्रित कवींची दोन कविसंमेलने आयोजित होऊ लागली. कविकट्ट्यावरही अनेक कवी आपली हजेरी लावू लागले. या नवोदित कवींमधूनच अनेक कवी आणि कवयित्री पुढे प्रसिद्ध झाले.

पण गेल्या चार-पाच वर्षांतली कविसंमेलने पूर्वीइतकी रंगत नाहीत. श्रोत्यांचा प्रतिसाद कमी झाल्यासारखा वाटतो. नवीन कविता ऐकण्याची, कवीला वन्स मोअर देण्याची श्रोत्यांची इच्छा कमी व्हायला लागलेली दिसते. त्याचबरोबर कवितांचे वाचन करणे, कवितांची पुस्तके विकत घेऊन किंवा वाचनालयांतून घेऊन वाचण्याचे प्रमाणही अगदी नगण्य आहे.


मुंबई मराठी साहित्य संघाचे ग्रंथालय हे मुळातच इतर वाचनालयांप्रमाणे सर्वांसाठी खुले असणारे, लोकप्रिय पुस्तकांचा साठा असणारे ग्रंथालय नाही, हे संदर्भ ग्रंथालय आहे. त्यामुळे साहित्याचे अभ्यासक येथील पुस्तकांचा उपयोग आपल्या अभ्यासासाठी किंवा लेखनासाठी करतात. या ग्रंथालयामध्ये जुन्या मराठी कवितेपासून मध्यकाळातील आणि आधुनिक कवींच्या कवितांचे अनेक संग्रह आहेत. पण जाणूनबुजून कवितासंग्रह वाचण्यासाठी नेणाऱ्यांची संख्या मात्र खूपच कमी आहे.

अगदी साहित्याचे अभ्यासकही काव्य वाचनाचा आनंद फार घेतात असे वाटत नाही. अर्थात माझ्या दृष्टीने याला काही कारणे असावीत.

एक म्हणजे तरुणवर्गात एकूण मराठी साहित्यवाचनाची प्रवृत्ती कमी झाली आहे. इंग्रजीच्या प्रभावामुळे आणि व्यावहारिक दृष्टीने इंग्रजी भाषा अधिक उपयोगी ठरते. त्यामुळे तरुण पिढीचा कल इंग्रजी भाषेकडे वळला आहे.

शहरातील धावपळीच्या जीवनात निवांतपणे वाचन जरा कठीण झाले आहे. त्यामुळे एखादे पुस्तक हातात घेऊन आणि तेही कवितेचे वाचण्याचे प्रमाण फारच कमी झाले आहे.

**गेल्या चार-पाच वर्षांतली कविसंमेलने पूर्वीइतकी रंगत नाहीत. श्रोत्यांचा प्रतिसाद कमी झाल्यासारखा वाटतो. नवीन कविता ऐकण्याची, कवीला वन्स मोअर देण्याची श्रोत्यांची इच्छा कमी व्हायला लागलेली दिसते. त्याचबरोबर कवितांचे वाचन करणे, कवितांची पुस्तके विकत घेऊन किंवा वाचनालयांतून घेऊन वाचण्याचे प्रमाणही अगदी नगण्य आहे.**



The worst tragedy for a poet is to be admired through being misunderstood.

(Jean Cocteau)

**पूर्वी शाळेमध्ये कविता पाठांतराची पद्धत असे. लहान लहान अगदी पहिली-दुसरीतील मुलांनासुद्धा कविता पाठ करायला लावत. लहानपणी खरंतर त्या कवितांचा अर्थ आणि परिणामही फारसे कळत नसत पण मोठेपणी आपण पाठ केलेल्या या कविता त्यांचा अर्थ कळल्यामुळे मनात पक्क्या झाल्या. लहानपणी नाइलाजाने पाठ केलेल्या कवितांचा फार चांगला उपयोग झाला. तीच पद्धत आता परत शाळांनी अंगीकारली तर मुलांना परत कवितेची गोडी लागेल.**

नव्या पिढीवर इलेक्ट्रॉनिक मीडियाचा पगडा इतक्या मोठ्या प्रमाणावर आहे की कोणतीही गोष्ट तरुण पिढीच्या मनावर ठसवायची असेल तर इलेक्ट्रॉनिक मीडियाचा आधार घेणे आवश्यक आहे. आज एखादी छोटीशी मामुली बातमीसुद्धा व्हॉट्सअप आणि फेसबुक यांच्या माध्यमातून सर्वतोमुखी होते.

एकूण तरुण पिढीचा पुस्तक वाचनाकडचा कल कमी झाला आहे. मग काव्यसंग्रह वाचण्याचे प्रमाण फारच कमी झाले असल्यास नवल नाही. माझ्या मते कविता आपण स्वत: वाचण्यापेक्षा कवीने स्वत: सादर केलेली ऐकण्यात अधिक आनंद मिळतो. हे सादरीकरणाचे कौशल्य सगळ्याच कवींमध्ये असते असे नाही. ते प्राप्त करून घेण्याचा कवींनी प्रयत्न केला तर कविता लोकांना आवडतील. अधिकाधिक श्रोत्यांपर्यंत कविता पोहचली पाहिजे आणि त्यासाठी दूरदर्शनसारखे माध्यम, जे आज लोकांच्या घराघरांत जाऊन पोहचले आहे, त्याचा उपयोग यासाठी करून घेता येईल. काव्यवाचनाचे कार्यक्रम बहारदार असतील तर लोक घरबसल्या त्याचा मनापासून आनंद घेतील.

मराठी कवितेच्या बाबतीत आणखी एक गोष्ट विचार करण्यासारखी वाटते. सध्याच्या काळात एकूणच मराठी साहित्याला आणि त्यातही प्रामुख्याने मराठी कवितेच्या विषयाला एक साचलेपणा आला आहे. तोही कमी होण्याची गरज आहे. मराठी चित्रपटाने जशी कात टाकली आहे तशी मराठी काव्यानेही विषयरचना यात वेगळेपणा आणण्याची गरज आहे. दलित-ग्रामीण-सामाजिक-निसर्गकविता या सर्वांचे रूप सर्वच दृष्टींनी बदलायला हवे आहे. आणि अशा रूप बदललेल्या कविता तरुण पिढीच्या कानावर सातत्याने पडल्या पाहिजेत.

पूर्वी शाळेमध्ये कविता पाठांतराची पद्धत असे. लहान लहान अगदी पहिली-दुसरीतील मुलांनासुद्धा कविता पाठ करायला लावत. लहानपणी खरंतर त्या कवितांचा अर्थ आणि परिणामही फारसे कळत नसत पण मोठेपणी आपण पाठ केलेल्या या कविता त्यांचा अर्थ कळल्यामुळे मनात पक्क्या झाल्या. लहानपणी नाइलाजाने पाठ केलेल्या कवितांचा फार चांगला उपयोग झाला. तीच पद्धत आता परत शाळांनी अंगीकारली तर मुलांना परत कवितेची गोडी लागेल. कवितेच्या बाबतीत ती आधी ऐकून पसंत पडते आणि मग पुन:प्रत्ययाचा अनुभव घेण्यासाठी ती परत वाचली जाते. हे आजकालच्या कवितेबद्दलही व्हायला हवे. आजच्या तरुण पिढीला कवितेची गोडी लागायला हवी असेल तर त्यांच्या कानावर सातत्याने कविता पडायला हवी आणि नजरेखालून जायला हवी.

शालेय अभ्यासक्रमात कविता पाठांतराची परीक्षा असेल तर आजही मुले चांगल्या कविता पाठ करतील. कविता मुखोद्गत झाल्या की त्या पुढेही कायम मनामध्ये रेंगाळतात. मुलांना कविता पाठ झाल्या तर त्यांच्या मनावर कवितेचा पगडा घट्ट बसेल. काव्यानंदाला आणि त्यामुळे काव्यनिर्मितीलाही परत एकदा बहर येईल! आणि तेव्हा मग

अरसिकेषु कवित्व निवेदनम्।
शिरसी मा लिख मा लिख।।

असे म्हणावे लागणार नाही.

**- डॉ. उज्ज्वला मेहेंदळे**
भ्रमणध्वनी : ९८२०८०१७२०
mujwala@hotmail.com


Art Advertising

तुमच्या घरात
पाक्षिक
**पुणे पोस्ट**
असतं तेव्हा...

तुमची मुलं स्वत:हून मराठी वाचू लागतात...
घरामध्ये विचारांची देवाणघेवाण वाढते...
सकारात्मक विचारांची पेरणी मनामनांत होते..
अशी अनेक कारणं...

अवघ्या मराठीजनांचं पाक्षिक 'पुणे पोस्ट' । वार्षिक वर्गणी ५०० । एका वर्गणीवर एक दर्जेदार पुस्तक भेट । संपर्क : ७७२२००५०८१, ०२०-२४४६४६९६

**ग्रंथाली**





## श्रमिकांचा नेता भाई उद्धवराव – संपादन : भारत गजेंद्रगडकर

शेतकरी कामगार पक्षाचे एक संस्थापक उद्धवराव पाटील यांनी या पक्षाला वैचारिक अधिष्ठान दिले, तसेच या पक्षाचा पाया मराठवाड्यात रोवला.

उपलब्ध साहित्य आणि त्यांच्याविषयीचे स्मृतीपर लेख संकलित करून उद्धवराव पाटील यांचे व्यक्तिचित्र उभे करण्याचा हा एक प्रयत्न...

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

---




## न्यायमूर्ती बी.एन. – भारत गजेंद्रगडकर

न्यायमूर्ती म्हणून दिलेले निवाडे, सामाजिक कार्यातला सक्रिय सहभाग, अन्यायग्रस्तांमागे वकील म्हणून खंबीरपणे उभे राहण्याची आस, शेतकरी–विद्यार्थी यांच्या समस्यांना सोडवण्यासाठी दिलेले पाठबळ, अशा घटनांतून त्यांचे व्यक्तिचित्र साकारण्याचा प्रयत्न पुस्तकात केला आहे.

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

---

**ग्रंथाली**



**मूल्य १२५ रु.**
**सवलतीत ७५ रु.**

## काटेसावर – उषा मेहता

'उषा मेहता यांच्या 'काटेसावर'मधील कवितांची भूमी म्हणजे प्रखर वास्तव, या वास्तवात होरपळणारी माणसं, विशेषत: स्त्रिया.

कोणतीही वास्तववादी किंवा स्त्रीवादी भूमिका न घेता कवयित्री ठामपणे या भूमीवर उभी आहे, या वास्तवाचे काटेरी स्वरूप न्याहाळते आहे आणि तेही काहीशा अलिप्तपणे. अंतर्हृदयात करुणा आहे, भय आहे, चिंता आहे आणि चीडही आहे. पण या भावनांना तोलून धरणारा, हे चित्र कधीतरी बदलेल असा दिलासाही आहे. 'जग स्वच्छ, सुंदर होईल' अशा विश्वासाने, 'ही चिमुकली वळतीलही त्या दिशेकडे' हा तो दिलासा.'

**– विजया राजाध्यक्ष**

---

**ग्रंथाली**




**मूल्य ५० रु.**
**सवलतीत ३० रु.**

## मितवा मालिका कविता

**उषा मेहता**

प्रेमभावना काही केवळ तारुण्यसुलभ भावनांचा आविष्कार नाही. तो कालबद्ध कार्यक्रम नाही. प्रेमभाव ही एक वयातीत, कालातीत आणि आयुष्यव्यापी जाणीव आहे. उषा मेहतांची ही कविता आपल्याला विसर पडलेल्या या सत्याचं स्मरण करून देणारी कविता आहेत.

**– अवधूत परळकर**



# कवितेचे वाचक : साठा उत्तराची कहाणी

**राजीव जोशी**

**कथा-कादंबऱ्यांना, तेही खास करून अनुवादित पुस्तकांना आहे. खूप उत्सूकतेने पाहत होतो जी. ए. कुलकर्णी, ग्रेस, भालचंद्र नेमाडे, गौरी देशपांडे, सानिया, मेघना पेठे यांना किती जणांनी वाचलं, कुसुमाग्रज, नारायण सुर्वे आदिंच्या कविता किती जणांनी किमान चाळल्या असाव्यात... हाती निराशाच हाती आली.**

**सार्वजनिक** वाचनालय कल्याण दीडशेहून अधिक वर्षे ग्रंथप्रसार, वाचन संस्कृतीचं कार्य अव्याहतपणे करीत आहे. अशा या नामवंत वाचनालयात जून २०१२ मध्ये मी अध्यक्ष म्हणून निवडून आलो. त्यापूर्वी साधारण पस्तीस वर्षे एक वाचक म्हणून तेथे वावरत होतो. त्या काळात कार्यरत असलेले सरचिटणीस राम जोशी यांचं वाचन अफाट होतं. पदवी व त्यानंतरच्या शिक्षणात मला वाचनालयातून भरपूर पुस्तके त्यांनी उपलब्ध करून दिली आणि म्हणूनच वाचनालयासाठी काहीतरी काम करणं आपलं उत्तरदायित्व आहे, कर्तव्य आहे या भावनेने २००२-०३ मध्ये शतकोत्तर रौप्य महोत्सवापासून पु. भा. भावे यांच्या नावाने सुरू असलेल्या व्याख्यानमालेसाठी साहित्यिक, विचारवंत, वक्ते आयोजित करण्याचं काम मी आनंदाने स्वीकारलं. त्याकाळात अनियतकालिक चळवळीतल्या अनेक कवींचे कवितासंग्रह वाचनालयात नव्हते. विचारलंच तर अशा पुस्तकांना वाचक नाहीत, कधी कधी तर महिन्याभरात कवितासंग्रह वाचलेल्या वाचकांची आकडेवारीच समोर ठेवली जायची. शेवटी, 'बरं, तू सांगतो तर...' असं म्हणून कवितासंग्रह मागवला जायचा, मेहेरबानी म्हणून. एखाददुसऱ्या संग्रहाचा अपवाद सोडला तर संपूर्ण पाडगांवकर नाहीत, बापट नाहीत, नामदेव ढसाळ नाही, गुरूनाथ धुरी नाही, केशव मेश्राम नाहीत, इंदिरा संत नाही, फ. मु. शिंदे नाहीत. वाचनालयात काम करताना कविताच काय, कोणतंही पुस्तक उपलब्ध नाही असं सांगावं लागणं फार वेदनादायी असतं, ते मागवता येत असलं तरी सर्वच पुस्तकं पुर्नमुद्रित होतात असं नाही आणि पुस्तक विक्रेते त्यांचा वेळेवर पुरवठा करतातच असं नाही. कार्यकारिणीवर काम करत असताना विंदा करंदीकरांना 'ज्ञानपीठ पुरस्कार' जाहीर झाला, पण विंदांचे कवितासंग्रहच वाचनालयात उपलब्ध नव्हते, मग याला ज्ञानपीठ मिळालं ते 'अष्टदर्शने' तर दूरच. त्यावेळेस प्रथमच थोडी आक्रमकता आणून विंदांच्या कवितांचे सगळे कवितासंग्रह, अगदी आदिमायासारखं संपादितही प्रथमच वाचनालयात घेतलं गेलं. वाचक नाही म्हणून कवितेला हद्दपार... सुन्न करणारं होतं. कविता आणि कविता-समीक्षा यावरची अनेक पुस्तकं वाचनालयात दुसऱ्या बाजूला घेतली जात होती, मग त्याला तरी वाचक होते का? १९७९ साली प्रकाशित झालेलं त्र्यं. वि. सरदेशमुखांचं 'प्रदेश साकल्याचा' हे पुस्तक जुलै १९९५ पासून मोजक्याच वाचकांनी वाचल्याची नोंद किती वेदनादायी आहे.. एक वाचक म्हणून काय किंवा कार्यकारिणी सभासद म्हणून काय, सार्वत्रिक ग्रंथालयांनी लोकप्रिय, वाचकप्रिय आदी निकष पुस्तक खरेदी करताना लावू नयेत. इतर लोकप्रिय पुस्तकांबरोबरच अक्षरमूल्य असलेली नामवंत लेखक-कवींची पुस्तके, मासिके सार्वजनिक ग्रंथालयांनी तरी आवर्जून घ्यावीत, वाचकांना उपलब्ध करून द्यावीत आणि वेळप्रसंगी विषयाला पर्यायी पुस्तकं शिफारस करून वाचकांच्या वाचनाला दिशाही द्यावी.

सार्वजनिक वाचनालयात कवितांची पुस्तके नाहीत याचा मला वैयक्तिक फायदा झाला तो म्हणजे मी स्वत: कवितासंग्रह विकत घ्यायला लागलो. एम.ए.ला 'तुकाराम गाथा' अभ्यासाला होती. त्या वेळेस शासनाची 'तुकाराम गाथा'ही उपलब्ध नव्हती. आमच्या वाचनालयात देखील शासनाची प्रत नव्हती. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात 'तुकाराम गाथा' होती पण नोकरी करून व कल्याण-दादर शक्य नव्हते. मुंबईतली सर्व दुकानं पालथी घातली. अखेरीस गिरगावात लाखाणी बुक डेपोकडे स्वातंत्र्यपूर्व काळात प्रकाशित झालेली दोन खंडातली कुणा जोगळेकर यांच्या नावे पावती असलेली 'तुकाराम गाथा' मला वीस रुपयात मिळाली (छापील किंमत रुपये पाच होती). हा अनमोल ठेवा आजही माझ्या संग्रही आहे. आज माझ्या संग्रही सहाशेच्यावर कवितासंग्रह आणि कविता-समीक्षेची पुस्तकं आहेत.


वाचनालयात गेल्या आर्थिक वर्षात म्हणजे २०१५-१६ साली तीन हजार वाचकांनी कोणत्या विभागातली पुस्तकं वाचली याचा आढावा घेतला तेव्हा असं लक्षात आलं की वर्षभरात एकूण बहात्तर हजार वेळा पुस्तकांची देवाणघेवाण झाली. सर्वात जास्त वाचक (जवळपास नव्वद टक्के) कथा-कादंबऱ्यांना, तेही खास करून अनुवादित पुस्तकांना आहे. खूप उत्सुकतेने पाहत होतो जी. ए. कुलकर्णी, ग्रेस, नेमाडे, गौरी देशपांडे, सानिया, मेघना पेठे यांना किती जणांनी वाचलं, कुसुमाग्रज, नारायण सुर्वे आदींच्या कविता किती जणांनी किमान चाळल्या असाव्यात. हाती निराशाच हाती आली. कवितांच्या बाबतीत विचार केला तर असं

लक्षात आलं की वाचनालयातल्या २०१२ पूर्व साडेसहाशे-सातशे कवितासंग्रहांच्या संख्येत वाढ होऊन संख्या ९७०च्या आसपास गेली असली तरी कविता वाचणाऱ्यांच्या वर्षभरातल्या संख्येत घटच होत आहे. २०१३-१४ साली ४६८ कवितेचे वाचक होते, २०१४-१५ साली ४८० वाचकांनी कविता संग्रहांना हात लावला तर २०१५-१६ साली त्यात घट होऊन कविता वाचकांची संख्या ३७३ इतकी घटली. वाचनालयात कविता आणि कविता-समीक्षा यावरील पुस्तकं, इतर समीक्षाविषयक पुस्तकांबरोबर, साहित्यटीका या विभागात मोडतात. या विभागात तीन हजारांच्यावर पुस्तकं आहेत आणि गेल्या वर्षात या विभागाचे ८४३ वाचक होते. हे सर्व आकडे कविता आणि कवितेचे वाचक याबाबत पुरेसे बोलके आहेत. मला खात्री आहे की महाराष्ट्रातल्या सर्वच सार्वजनिक वाचनालयात कमी-जास्त प्रमाणात हेच चित्र असावं.

१९८५ साली आम्ही सुरू केलेल्या 'संवाद' ह्या अनियतकालिकाच्या संपादकीयात टी. एस. इलियटची भूमिका (I have always held firmly that a nation which ceases to produce poetry will in the long run ceases to be able to enjoy and even understand the great poetry of its own time) मध्यवर्ती ठेवूनच अनियतकालिकाची वाटचाल सुरू झाली, त्या वेळीही कविता उदंड लिहिली जात होती आणि त्याबाबतची खंत ज्येष्ठ कवी प्रा. वसंत बापट यांनी बोलून दाखवल्यावर भुवया उंचावल्या होत्या. रविकिरण मंडळाच्या अस्तानंतर कविता जनमानसात पोहचवण्यासाठी बापट-पाडगांवकर-करंदीकर असे काही मोजकेच कवी काव्यवाचनाचे जाहीर कार्यक्रम करीत असत. 'सत्यकथे'च्या अस्तानंतर 'कवितेसाठी', कवितारती, 'अनुष्टुभ', 'युगवाणी' आदी मोजकीच मासिकं प्रसिद्ध होत होती. कवितेच्या संवर्धनासाठी कवींच्या प्रयत्नाची आवश्यकता 'संवादने' मांडली. मला वाटतं त्याच काळात अविनाश हरणखेडकर, दा. गो. काळे, मंगेश नारायणराव काळे, मनोज पाठक आदींनी 'शब्दवेध' सुरू केलं, अरुण म्हात्रेंचं 'अक्षर चळवळ', हेमंत दिवटे यांचं 'अभिधा' अशी कवितेसाठी व्यासपीठं तयार झाली. आता प्रवीण बांदेकर, दा. गो. काळे, मंगेश नारायणराव काळे, विष्णू जोशी अशी अनेक मंडळी याबाबत कार्यरत आहेत हा मोठाच दिलासा आहे. अशा नियतकालिकांना वाचकांपर्यंत पोहचवण्याची जबाबदारीही सार्वजनिक ग्रंथालयांची आहे असं मला आवर्जून वाटत आलंय. संस्थात्मक पातळीवर डोंबिवलीच्या काव्यरसिक मंडळाचा उल्लेखही करायला हवा. पूर्वी केवळ कवीच काव्यवाचनाचे कार्यक्रम करायचे आणि अगदी अलिकडील काळापर्यंत अरुण म्हात्रे, अशोक बागवे, अशोक नायगावकर, निरंजन उजगरे आदींनी 'कवितेच्या गावा जावे' या कार्यक्रमातूनही कविता गावोगावी पोहचवली. याच काळात प्रत्यक्ष कविता लिखाणात नसणाऱ्यांनीही कविता लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी कार्यक्रम सुरू केले आणि आजही ते मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. याचाच अर्थ कविता बऱ्यापैकी जनमानसात पोहचवण्याचे काम, वेगवेगळ्या पातळीवर, गेल्या तीन दशकात झालं आणि आजही ते सुरू आहे.


कवितासंग्रहाचे वाचक का वाढत नाहीत याचा शोध घेण्याच्या प्रयत्नातून हे सर्व थोडक्यात घेतलं. अनेक वाचनालयं कवितासंग्रह घेत नाहीत आणि अनेक ग्रंथप्रदर्शनात कविता विभागही नसतो. मला एक किस्सा आठवतो, पुण्यातल्या एका ग्रंथ प्रदर्शनाचं मंगेश पाडगावकरांच्या हस्ते उद्घाटन होते. त्यावेळी त्यांनी आयोजकांना (जे नामवंत प्रकाशकदेखील आहेत) विचारलं, 'इथे कवितांचा विभाग दिसत नाही?' आयोजकांनी सांगितलं, 'तो आम्ही ठेवत नाहीत, कारण कवितासंग्रह कुणी घेत नाही.' पाडगावकरांनी विचारलं, 'माझे सुद्धा?' त्यावर आयोजकांनी आत्मविश्वासने सांगितलं, 'होय. तुमचे सुद्धा.' यात कुणाला वाचकांची मानसिकता दिसेलही, मला तर कविता लोकांपर्यंत पोहचवण्यातली संयोजक आणि प्रकाशकांची मानसिकता यातून दिसते. प्रकाशक आणि ग्रंथ प्रदर्शन आयोजकांनी व्यावसायिक पातळीवर असे हब आयडेंटीफाय करणं गरजेचं आहे. कल्याण-डोंबिवलीत वाचकांचा मोठा हब आहे. त्यांना हवे ते कधी देणार असा मला नेहमी प्रश्न पडतो. प्रकाशक व ग्रंथप्रदर्शन संयोजक याबाबत कमी तर पडत नाही ना?

जेव्हा जेव्हा वाचनालयाच्या डिसप्ले बोर्डवर कवितासंग्रह लावले जातात त्या त्या वेळी कवितांची पुस्तकं वाचक आवर्जून वाचक वाचायला मागतात. अमृता प्रीतम, गुलझार, पाडगांवकर, करंदीकर, ग्रेस, सौमित्र, माडगूळकर,



श्रीशब्द प्रकाशन
फेब्रुवारी १९८३

**पुण्यातल्या एका ग्रंथ प्रदर्शनाचं मंगेश पाडगावकरांच्या हस्ते उद्घाटन होते. त्यावेळी त्यांनी आयोजकांना (जे नामवंत प्रकाशक देखील आहेत) विचारलं इथे कवितांचा विभाग दिसत नाहीत. आयोजकांनी सांगितलं तो आम्ही ठेवत नाहीत, कारण कवितासंग्रह कुणी घेत नाहीत. पाडगावकरांनी विचारलं, माझे सुद्धा? त्यावर आयोजकांनी आत्मविश्वासाने सांगितलं होय तुमचे सुद्धा.**



।। संवेदना प्रकाशन ।।
मे २००२

**शिक्षकच अवांतर वाचत नाहीत तर पाठ्यपुस्तकात धड्याखाली दिलेले संदर्भ मुलांना वाचावेसे तरी कसे वाटतील. शंकर वैद्य सर नेहमी सांगायचे की घरात पुस्तकं आणून टाकायची, आज ना उद्या वाचली जातील.**

संदीप खरे अशा कित्येक कवींची पुस्तकं वाचकांना पाहिजे असतात, विचारलीही जातात, पण वाचनालयात किंवा पुस्तक प्रदर्शनात समोर ठेवलीत तर. दुसरा भाग असा आहे की कथा-कादंबऱ्यांप्रमाणे, कविता हा काही सलग व सातत्याने वाचायचा विषय नाही. आपल्याकडे पुस्तकाची आवृत्ती इनमिन हजार प्रतींची आणि हजार प्रती खरंतर सार्वाजनिक वाचनालयात आणि महानगरातच संपायला हव्यात. महाराष्ट्रातील किमान निम्मा मराठी माणूस कविता वाचायला लागला तर... दुर्दैवाने पाडगांवकरांना तुमचीही कविता वाचली जात नाही असं ऐकायला मिळावं, किती क्लेशदायक.. पाडगांवकरांनाच नाही, तर कवितेचे रसिक म्हणून मिरवणाऱ्या आपणा सर्वांना. परवा व्हाट्स अपवर कुणीतरी विचारलं 'दिवस तुझे हे फुलायचे' ही कविता पाडगांवकरांच्या कोणत्या पुस्तकात आहे.. मी त्याला सांगायचे ते सांगितलं, मनात आलं.. आता संपूर्ण पाडगांवकरांचे संग्रह वाचालयात आहेत, जिज्ञासेपोटी किमान ते चाळल्यास त्यांच्या इतर कविताही डोळ्यांखालून जाणार नाहीत का.. कवितेचे संस्कार खरंतर बालपणा-पासूनच होत असतात. शालेय पाठ्यपुस्तकातल्या कविता घरात आई आणि शाळेत बाई घोकून घ्यायच्या. आम्ही त्या कविता आठवल्या, कुठे वाचल्या, ऐकल्या तर अंगावर रोमांच येतात. आजकालचे पालक आणि शालेय शिक्षणाने हे गमावलंय. शिक्षकच अवांतर वाचत नाहीत तर पाठ्यपुस्तकात धड्याखाली दिलेले संदर्भ मुलांना वाचावेसे तरी कसे वाटतील? शंकर वैद्यसर नेहमी सांगायचे की घरात पुस्तकं आणून टाकायची, आज ना उद्या वाचली जातील.

मला वाटतं, 'चांदोबा'पासून कविता मराठी माणसाच्या रक्तात कविता आहे. काळाच्या ओघात, शिक्षणपद्धतीमुळे पालक-पाल्य त्यापासून दुरावत चालले आहेत. कविता वाचली जावी यासाठी प्रकाशकांनी, पुस्तक विक्रेत्यांनी, एजन्सीजनी पुढे येऊन प्रयत्न करायला हवेत. आम्ही संग्रह प्रकाशित केलाय, घेणाऱ्यांनी आमच्याकडे यावं आणि घ्यावा. मी असे अनेक प्रकाशक सांगू शकतो की वारंवार सांगूनही त्यांनी प्रकाशित केलेले संग्रह, पुस्तकं मिळत नाहीत, पाठवले जात नाहीत. माधवानुज हे केशवसुतांचे समकालीन पण त्यांच्या कविता व अनुवादही उपलब्ध नाहीत. भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांचं विपुल लिखाण आहे, ते स्वत: साहित्य संमेलाचे अध्यक्षही होते. पण त्यांची पुस्तकं वाचनालयात तर नाहीतच, प्रतीही उपलब्ध नाहीत. माझा तर अनुभव असा आहे की मोठे पुस्तक विक्रेते ठराविक प्रकाशकांचीच पुस्तके पुरवित असतात, कवितासंग्रह देत नाहीत, विक्रीसाठी ठेवतच नाहीत, अगदी नामांकित प्रकाशकांचे सुद्धा.. अशा वेळी वाचनालयाने थेट प्रकाशकांकडून पुस्तकं घेण्याची भूमिका घेतली, पण प्रकाशकांचा प्रतिसाद शून्य. अगदी 'ग्रंथाली'ही अपवाद नाहीत, फोन करून पुस्तकं पाठवा असं ओरडून सांगितलं तरी प्रतिसाद शून्य.. हे चित्र वैषम्य आणणारं आहे. ग्रंथप्रदर्शन संयोजक प्रदर्शनात कविता ठेवीत नाही. कवी म्हणतात, 'मी कशाला देऊ? ते प्रकाशकाचं काम.. अखेरीस मी माझ्या कित्येक कविमित्रांना सांगितलं की, अरे बाबांनो, भेट द्यायचं नसेल तर नका देऊ, माझं वाचनालय कवितासंग्रह विकत घेईल, प्रती तर पाठवा..' मला तर आता असं वाटायला लागलंय, कवीलोक्स कवितासंग्रह प्रकाशित करण्यात उत्साह आणि कविता वाचनाच्या कार्यक्रमांतच धन्यता मानत असतात... कविता वाचनाचे कार्यक्रम करावेत, मीही वाचनालयात अशा कार्यक्रमांचं आयोजन करतो. अरे पण आपल्याही कविता सादर करा की! कवितेचा कार्यक्रम तर मोठा फ्रॉड असतो.. इतरांच्या कविता सादर करून रसिकांना आपण किती मोठे आहोत असे भास निर्माण केले जातात. मग कवी नसलेले आपल्या कवितांच्या कार्यक्रमात ते श्रेय किमान त्या त्या कवीला तरी देतात हे केवढं मोठंपण.. साहित्यिक आणि साहित्यकार आजपर्यंत आदराला पात्र आहेत याचं कारण त्यांचा आचार-विचारांशी असलेला प्रामाणिकपणा.. खरं सांगायचं तर, कविता वाचली जात नाही याचा दोष मी वाचकांना अजिबात देणार नाही. कवी, प्रकाशक, विक्रेते मिळून बालेल्या व्यवस्थेची अनास्था याला सर्वस्वी कारणीभूत आहे. त्याचप्रमाणे वाचनालयात ग्रंथपालांनी किमान वर्तमानपत्रातल्या परीक्षणावरून वाचकांपर्यंत कवितासंग्रहच नाही, तर चांगली पुस्तकंही, पोहचवायला हवीत. मी ब्रिटिश कौन्सिलचा सभासद होतो तेव्हा रेकॉर्डवरून मी कविता वाचतो असं लक्षात आल्यावर


व्यवस्थापनाकडून पोएट्री बुक सोसायटीने प्रसिद्ध केलेलं प्रत्येक नवं पुस्तक शिफारस केलं जाई.

कवीसंमेलनांना होणारी गर्दी आणि कवितेचे वाचक यांचं प्रमाण व्यस्त असलं तरी संमेलनात रसिकांची त्याच त्या कवितांची शिफारस, चांगली कविता लोकांपर्यंत पोहचवण्याला मर्यादा घालणारी आहे. मला तर वाटतं स्वत: महेश केळुसकरांना झिनझिनाट कविता ऐकवायची इतक्या वेळा शिफारस होते की त्यांनाही आता कंटाळा आला असावा, अशोक नायगावकरांच्या कवितेतला उपहास न समजल्याने त्यांना तर हास्य कवी बनवून टाकलंय. पाडगांवकरांनाही केवळ बोलगाणी मधल्या कवितांची शिफारस.. या सर्व, संबंधित कवींच्या इतर चांगल्या कविता वाचकांपर्यंत न पोहचल्याचा खुणा वाटतात आणि मग रसिक कवितेकडे करमणूक म्हणून तर पहात नाही ना, अशी शंका मनात आल्याशिवाय राहत नाही.

मला प्रामाणिपणे असं वाटतं की कवी संमेलनांत दर्दी रसिक व कवितेचे जाणकार वाचक तयार होण्यासाठी कवी, प्रकाशक, ग्रंथविक्रेते यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत. जसा एखाद्या नाटकाचा वा चित्रपटाचा प्रोमो होतो, तसा प्रयोग कवींनी करायला हवा.. अर्थात त्यासाठी कवींनी भेदाभेदापलीकडे जायला हवं. परवा एका प्रकाशन समारंभाला एका कवीला पुस्तकावर बोलण्यासाठी बोलावण्यावरून चर्चा झाली. मला कळलं की तो कवी आपल्या गटातला नाही म्हणून वाद झालेत.. हे असे कवी आणि कवितेचे गट पाहिले की वेदना तर होतातच, दूर राहावं असं वाटू लागतं. ग़ज़ल हा काव्यप्रकार मला आवडतो, मी ग़ज़ल लिहिली नसली तरी मराठीबरोबरच पाकिस्तानी ग़ज़लांचे अनेक संग्रह माझ्या संग्रही आहेत. ग़ज़लेला रसिकांची त्वरीत दाद मिळत असते हे खरं असलं तरी कविता वेगळी आणि ग़ज़ल वेगळी असा भेदाभेद स्वत: सुरेश भट यांनाही मान्य नसताना जाणीवपूर्वक वेगळेपण राखणं एकूण कवितेच्या प्रचार व प्रसाराला मारक आहे असं माझं प्रामाणिक मत आहे. मनोहर रणपिसेंसारखा आपल्या गझलेतून एखादा रसरशीतपणे दाद मिळवून जातो तेव्हा सतीश सोळांकूरकर, साहेबराव ठाणगे किंवा नारायण लाळे त्याच व्यासपीठावरून कविता सादर करत असतातच व त्यांनाही तेवढीच दाद मिळत असते हे चित्र किती आशादायी आहे. मग हे साठोत्तरी, नव्वदोत्तरी.. देशी कवी-विदेशी कवी.. न्यूनगंड-अहंगंड.. काय चाललंय तरी काय? कविता हाच केंद्रबिंदू असणार आहे की नाही? कविता खरंतर चांगली असते किंवा वाईट वा फारतर बरी.. मग ही साठा उत्तराची कहाणी कशाला? गरज आहे कविता लोकमानसात पोहचवण्याची.. कवी हा चांगला कार्यकर्ता असतो असा माझा अनुभव आहे आणि म्हणूनच एकूणच कवितेची, कवितेतील प्रवाहांची, प्रयोगांची कवींमधील व रसिकांमधील जाणीव समृद्ध होण्यासाठी भेदाभेद, पंथ विसरून कवींनीच कवितेची पताका आपल्या खांद्यावर घेणं, कवितेचे वारकरी होणं, किमान सार्वजनिक वाचनालयांच्या माध्यमातून कविता वाचकांपर्यंत पोहचवणं वाचक वाढण्यासाठी आवश्यक आहे. या सर्वांचा साकल्याने विचार करता कवी संमेलनांची गर्दी कवितेच्या वाचकांमध्ये परावर्तित करणं हे कवी, प्रकाशन आणि ग्रंथविक्रेते यांच्या समोर मोठं आव्हान आहे यात शंका नाही.

**– राजीव जोशी**

भ्रमणध्वनी : ९५९४०७४४५३
joshrajiv@gmail.com



॥ संवेदना प्रकाशन ॥
ऑगस्ट २०१६

**कवी संमेलनांची गर्दी कवितेच्या वाचकांमध्ये परावर्तित करणं हे कवी, प्रकाशन आणि ग्रंथविक्रेते यांच्या समोर मोठं आव्हान आहे यात शंका नाही.**

**“PERHAPS NO PERSON CAN BE A POET, OR EVEN ENJOY POETRY, WITHOUT A CERTAIN UNSOUNDNESS OF MIND.”**

**THOMAS B. MACAULAY**



# ‘कविता-रती’चे संपादन : दृष्टी आणि दृष्टिकोन

डॉ. आशुतोष पाटील

**‘कविता-रती’चे संपादक पुरुषोत्तम पाटील हे स्वतः कवी आहेत. त्यांच्या समग्र काव्यलेखनातून प्रामुख्याने सौंदर्यलक्ष्यी जाणिवांचा प्रत्यय येतो. त्यांच्या व्यक्तित्वावर १९६० पूर्वीच्या मराठीतील सौंदर्यलक्ष्यी काव्यधारेचा प्रभाव अधिक्याने आहे.**

**वाङ्मयीन नियतकालिकांचे संपादन : गाभा-घटकांची भूमिका**

“राजकीय इतिहासातील व्यक्तींचे स्थान आणि वाङ्मयेतिहासातील नियतकालिकांचे स्थान एकच आहे. ग्रंथ ही स्थिर विकसित घटना म्हटली तर नियतकालिक हे एक छोटे-मोठे विकासक्षम व्यक्तित्व म्हणावे लागेल.” (शंकर गणेश दाते व इतर : १९६९ : ४०) हे विधान मौलिक स्वरूपाचे, वाङ्मयीन नियतकालिकाच्या जीवितकार्याची सुस्पष्ट मांडणी करणारे आहे. समग्र वाङ्मयविश्वाच्या विकसनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्याचे वाङ्मयीन नियतकालिकांचे सामर्थ्य यातून नेमकेपणाने लक्षात येते. मराठी वाङ्मयाचा प्रवाह उन्नतिशील, खळाळता आणि सजग राखण्याचे कार्य वाङ्मयीन नियतकालिकांनी पार पाडले असल्याचे गेल्या दीड शतकातील वाङ्मयीन नियतकालिकांच्या कामगिरीवरून पुरेसे स्पष्ट होते. मराठी कविता, कथा, कादंबरी, नाटक, एकांकिका, निबंध, लघुनिबंध, ललितनिबंध, ललितगद्यात्मक लेखन, चरित्रात्मक व आत्मचरित्रात्मक लेखन अशा विविध वाङ्मयप्रकारांतील आजवरच्या वाटचालीची पहिली पावले बहुतांश प्रमाणात वाङ्मयीन नियतकालिकांच्या माध्यमातूनच पडलेली आहेत आणि आणि या वाङ्मयप्रकारांच्या विकसनास वाङ्मयीन नियतकालिकांनी मौलिक असा हातभार लावलेला आहे. त्यामुळे मराठीतील आजवरच्या वाङ्मयनिर्मितीचा केवळ एक साक्षीदार म्हणून नव्हे तर मौलिक दस्तऐवज म्हणून वाङ्मयीन नियतकालिकांकडे पाहावे लागते. म्हणूनच वाङ्मयेतिहासाचे एक लक्षणीय साधन म्हणून असणारे त्यांचे महत्त्व स्वयंसिद्ध आहे. कोणत्याही वाङ्मयीन नियतकालिकाच्या कार्याला आकार आणि दिशा प्राप्त करून देण्यात त्याची संपादनदृष्टी महत्त्वाची भूमिका बजावत असते. याचे भान बाळगून वाङ्मयीन नियतकालिकांच्या संपादनासंबंधी सारभूतपणे काही मुद्दे येथे नोंदविता येतात.

१. वाङ्मयक्षेत्रातील नव्या ऊर्मींची दखल घेणे, त्यांचे संगोपन करणे, प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे त्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या जडणघडणीस हातभार लावणे.

२. वाङ्मयक्षेत्रातील नव्या वृत्ती-प्रवृत्तींचे स्वागत करतानाच परंपरेतील सत्त्वांशाची बूज राखणे.

३. विशिष्ट काळातील वाङ्मयीन प्रवृत्तींचे समग्र चित्र दाखविण्याचा प्रयत्न करणे.

४. वाचकांच्या वाङ्मयाभिरुचीला वळण लावण्यासाठी प्रयत्नशील असणे.

५. वाङ्मयीन संस्कृती-पर्यावरण निकोप आणि चैतन्यमय राखण्यासाठी कार्यरत राहणे.

अशी वाङ्मयीन नियतकालिकांच्या संपादनविषयक दृष्टीची सर्वसाधारण अंगे नमूद करता येतात. विशिष्ट वाङ्मयीन नियतकालिकांच्या भूमिकेनुसार, संपादकीय धोरणानुसार त्यात काही बदल होत असतात. उदाहरणार्थ, साहित्य, कला, समीक्षा आणि समाजातील सांस्कृतिक जीवन यांतील नवे, वेगळे, अस्सल उन्मेश शोधणे, ओळखणे आणि जोपासणे हे ‘सत्यकथा’चे संपादकीय धोरण होते.

१. नव्या आकार-शैली-आशयाचे लिखाण प्रसिद्ध करून, वाचकांच्या वाचनाला व साहित्यविषयक विचारांना एक वेगळे वळण देण्याचे धोरण ‘अभिरुची’ने सुरुवातीपासून स्वीकारले होते.

२. याच प्रकारचे धोरण ‘साहित्य’ने प्रारंभीच्या काळात अनुसरले होते.

३. एखाद्या विशिष्ट प्रदेशातील वाङ्मयनिर्मितीला प्रोत्साहन देण्याचे धोरण महत्त्वाचे मानून ‘प्रतिष्ठान’सारखे नियतकालिक जन्माला आले.

४. भाषा, साहित्य आणि ललितकला ह्यांच्यासाठी कार्य करणाऱ्या आधीच्या कालखंडातील वाङ्मयीन नियतकालिकांची जाणवणारी कमतरता भरून काढण्याचे धोरण ‘छंद’ने आपल्या कार्याची दिशा मानली होती.


५. मराठीचे प्रगत अध्ययन केंद्र उभारून मराठी भाषा, वाङ्मय व संस्कृती यांचा सर्वांगीण व प्रगत स्वरूपाचा अभ्यास करण्याचे धोरण ‘अनुष्टुभ’ने अंगीकारले होते. अगदी अलीकडच्या ‘शब्दवेध’ आणि ‘अभिधानंतर’ या वाङ्मयीन नियतकालिकांच्या संपादकीय धोरणांचाही येथे विचार करता येईल. “...अधिकाधिक समकालीन राहणे; नव्या, वेगळ्या निर्मितीचा शोध घेणे आणि खऱ्या अर्थाने ‘आजचे’ म्हणता येईल असे साहित्य वाङ्मयीन चर्चेच्या केंद्रस्थानी आणणे हे कार्य या दोन्ही अंकांमधून नेटाने आणि निष्ठेने सुरू आहे...”

६. या साऱ्याच वाङ्मयीन नियतकालिकांची

वाटचाल त्यांनी निश्चित केलेल्या संपादकीय धोरणाच्या चौकटीत होत गेलेली दिसते. प्रत्येक वाङ्मयीन नियतकालिकाच्या संपादकीय धोरणात असणारा भेद हा तपशिलाच्या स्वरूपाचा आहे. कारण वर नमूद केलेले सारभूत मुद्दे गाभा-घटक म्हणून प्रत्येक वाङ्मयीन नियतकालिकाच्या संपादकीय धोरणात कमी-अधिक प्रमाणात अंतर्भूत असतातच. या सगळ्याच गाभा-घटकांचा समन्वय साधणारे वाङ्मयीन नियतकालिक ही एक आदर्श कल्पना आहे. बहुतांश वाङ्मयीन नियतकालिकांचे संपादकीय धोरण वर नमूद केलेल्या सगळ्या नव्हे तर काही मोजक्याच किंवा एखाददुसऱ्या भूमिकेला केंद्रस्थानी ठेवून आकाराला येत असते. उदाहरणार्थ, 'ललित' मासिकाने ग्रंथप्रसार हे प्रधान उद्दिष्ट आपले जीवितकार्य म्हणून अंगीकारलेले आहे. त्याचा संबंध प्राधान्याने वाचकांच्या वाङ्मयाभिरुचीच्या विकसनाशी आहे. किंवा १९५५च्या सुमारास झालेला लघुनियतकालिकांचा उदय हा प्रस्थापित, कलावादी दृष्टीचा प्रतिवाद करण्याच्या भूमिकेतून झाला. तशा प्रकारचे नव्यांचे लेखनच लघुनियतकालिकांनी छापले. त्यामुळे परंपरेतील सत्त्वांशाची बूज राखणे अथवा त्या काळातील वाङ्मयीन प्रवृत्तींचे समग्र चित्र दाखविणे या कार्यांची लघुनियतकालिकांकडून अपेक्षा बाळगणे गैर आहे. यावरून हे स्पष्ट होते की, प्रत्येक वाङ्मयीन नियतकालिकाची संपादनदृष्टी विशिष्ट कार्यासाठी असते. त्यात वर नमूद केलेले सारभूत मुद्दे कमी-अधिक प्रमाणात अनुस्यूत असतातच. तसेच व्यक्ती, व्यक्तिसमूह वा संस्था अशा विविध स्तरांवरून वाङ्मयीन नियतकालिके चालविली जात असतात. त्यानुसारही त्या त्या नियतकालिकाच्या संपादनविषयक दृष्टीमध्ये भेद निर्माण होतो. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे एखादे वाङ्मयीन नियतकालिक ज्या कालखंडात कार्यरत असते त्या कालखंडातील वाङ्मयविषयक स्थितिगतीचे नेटके आणि नेमके भान त्याच्या संपादकीय दृष्टीतून व्यक्त होणे अपेक्षित असते. सदर लेखात वाङ्मयीन नियतकालिकाची संपादनविषयक दृष्टी आणि त्यासंबंधीचा दृष्टिकोन यांबाबत जाणून घेताना गेल्या पावशतकाहून अधिक कालावधीपासून कार्यरत असलेल्या 'कविता-रती' या वाङ्मयीन नियतकालिकाचे संपादकीय धोरण विशद करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. त्यातून एकूणच वाङ्मयीन नियतकालिकांच्या संपादनविषयक दृष्टीवर काही अंशी प्रकाश टाकता येऊ शकेल असे वाटते.

**'कविता-रती'चे संपादन : दृष्टी आणि दृष्टिकोन**

'कविता-रती' हे एका व्यक्तीने चालविलेले वाङ्मयीन नियतकालिक आहे. पुरुषोत्तम पाटील या एका व्यक्तीच्या कल्पनेतून, विचारदृष्टीतून या नियतकालिकाचा जन्म झालेला आहे. 'कविता-रती'चे संपादक पुरुषोत्तम पाटील हे स्वतः कवी आहेत. त्यांच्या समग्र काव्यलेखनातून प्रामुख्याने सौंदर्यलक्ष्यी जाणिवांचा प्रत्यय येतो. त्यांच्या व्यक्तित्वावर १९६० पूर्वीच्या मराठीतील सौंदर्यलक्ष्यी काव्यधारेचा प्रभाव अधिक्याने आहे. संपादकांच्या अशा व्यक्तित्वाचा 'कविता-रती'च्या संपादनविषयक दृष्टीवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभाव पडणे अत्यंत स्वाभाविक बाब आहे. त्यामुळे संपादकांची एक कवी म्हणून असणारी काव्यविषयक दृष्टी 'कविता-रती'च्या संपादकीय धोरणात प्रतिबिंबित झालेली आहे. त्यातूनच संपादक पुरुषोत्तम पाटील यांच्या व्यक्तिगत काव्यजाणिवांच्या कक्षेतील कवितेचे प्रमाण अधिक आणि अगदीच भिन्न असणाऱ्या नव्या काव्यजाणिवांशी समरस होण्यात काही वेळा अपुरी पडलेली काव्यदृष्टी यांचा विचार या नियतकालिकाच्या संपादकीय दृष्टीचा एक भाग म्हणूनच करावा लागतो. परंतु एका व्यक्तीने संपादित केलेल्या कोणत्याही वाङ्मयीन नियतकालिकाला त्या व्यक्तीच्या व्यक्तित्वाची- जीवन व वाङ्मयविषयक दृष्टीची- मर्यादा पडणे अपरिहार्य असते. हे लक्षात घेतले असता 'कविता-रती'च्या संपादकीय दृष्टीकडे तारतम्याने पाहता येणे शक्य आहे. यासंबंधी अधिक सूक्ष्म चिकित्सा केली असता लक्षात येते की संपादक पुरुषोत्तम पाटील हे स्वतः एक उत्तम कवी असूनही, तसेच विशिष्ट सौंदर्यलक्ष्यी जाणिवेची कविता ते लिहीत असूनही एका वाङ्मयीन नियतकालिकाचे संपादन करताना आपली 'कवीची भूमिका' त्यांनी बाजूला ठेवली आहे. संपादक म्हणून त्यांची काव्यविषयक दृष्टी शक्य तितकी उदार, मोकळी, अनाग्रही आणि सर्वसमावेशक आहे. ''...स्वागतशील संमुख




**संपादनदृष्टी वाचकांना काय हवे हे जाणणारी तर असावीच; पण वाचकांना काय द्यावे याचा विवेक करणारीही असली पाहिजे.**




**भालचंद्र नेमाडे, अशोक शहाणे, राजा ढाले, सतीश काळसेकर, नामदेव ढसाळ, चंद्रकांत खोत अशा वेगवेगळ्या किंवा त्याच त्या नियतकालिकांच्या संपादकांनी स्वतःचा वाचकवर्ग शोधला, संघटित केला आणि वाढविला. मात्र मराठी काव्याभिरुचीला गतिमान बनवणे या मोहिमांना शक्य झाले नाही. याची कारणे त्यांच्या स्वतःच्या आग्रही पण पुष्कळ अंशी असंस्कृत काव्यदृष्टीत आढळतात... कवितेकडे स्वच्छ स्थिर दृष्टीने बघू शकणारी वृत्ती त्यांच्यात नव्हती...''**
**(दिलीप पुरुषोत्तम चित्रे : १९८६. ८१-८२)**

वृत्ती हे पाटलांच्या रसिकतेचे मर्म आहे. केवळ स्वतःच्या काव्यानुभूतीशी संवादी असलेल्याच कवितेला खरी कविता मानणे आणि अन्य काव्यप्रवाहांकडे तुच्छतेने तिर्यक दृष्टिक्षेप करणे हे तथाकथित काव्यसमीक्षेचे अवगुंठन त्यांनी कधीच स्वीकारले नाही. त्यांची रसिकता एकारलेली नाही...''

७. या अभिप्रायावरून याची खात्री पटण्यासारखी आहे. कोणत्याही वाङ्मयीन नियतकालिकाच्या संपादनदृष्टीत कल्पकता आणि योजकता या दोन बाबी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. संपादनदृष्टी वाचकांना काय हवे हे जाणणारी तर असावीच; पण वाचकांना काय द्यावे याचा विवेक करणारीही असली पाहिजे. या दिशेने शोध घेतला असता लक्षात येते की 'कविता-रती'ची संपादनदृष्टी ही केवळ एका काव्यरसिकाची नसून कल्पक आणि योजक वाङ्मयाभ्यासकाचीदेखील आहे. योजना आखून, अधिकारी अशा लेखकांची निवड करून त्यांच्याकडून लेख लिहून घेण्याचे कसब या संपादनदृष्टीला पूर्णपणे अवगत आहे. याची प्रचीती 'कविता-रती'च्या साध्या अंकांमधील आणि विशेषतः विशेषांकामधील काव्यसमीक्षात्मक लेखनातून येते. चौफेर फिरणारी चौकस नजर या संपादनदृष्टीला प्राप्त झालेली असल्याने काव्यविश्वातील नवे, अस्सल, प्रतिभावान उन्मेष हेरून त्यांना प्रकाशात आणण्याचे कार्य बजावणे या नियतकालिकाला शक्य झाले आहे.

८. 'कविता-रती' हे कविता आणि कवितेची समीक्षा केवळ यांसाठीच कार्यरत असलेले एक नियतकालिक आहे. त्यामुळे या नियतकालिकाच्या संपादनदृष्टीची अर्थपूर्णता जाणून घेण्यासाठी हे वाङ्मयीन नियतकालिक सुरू होण्याच्या आणि झाल्यानंतरच्या कालखंडातील मराठी कविता आणि एकंदर काव्यव्यवहार याचे समग्र भान प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. 'कविता-रती'पूर्व काळात नवकाव्य आणि लघुनियतकालिकांतील कविता असे दोन महत्त्वपूर्ण काव्यप्रवाह मराठी काव्यप्रांतात प्रभावी ठरले होते. या दोन्ही प्रवाहांतील बरीचशी कविता ही रसिक वाचकांच्या आस्वाद-आकलनाच्या कक्षेबाहेर आपले अस्तित्व टिकवून होती. त्यामुळे चांगल्या-वाईट कवितेबाबत विवेक करणे कठीण होते. ''...प्रत्येक कविता ही वेगळी असते. सर्वच सारख्या तोलाच्या नसतात. काही पहिल्या वाचनातच संपतात; काही तर वाचता वाचताच आपण सोडून देतो. येथे आपण विचार करीत आहोत तो असल्या कवितांचा नव्हे, तर ज्या कवितांकडे आपणास परत परत जावेसे वाटते, ज्या आपल्या होत आहेत असे वाटत असताच पुरेशा आपल्या होत नाहीत हे लक्षात येथे त्यांचा. आजच्या मराठी कवितेत ह्या दोन्ही प्रकारच्या कवितांचा भरणा आहे. त्यातील ज्यांच्याकडे पुनःपुन्हा वळावेसे वाटते अशा कविता कोणत्या हे आपणच आपल्या अनुभवाने सांगू शकतो. परंतु अनेकदा दुर्बोधतेच्या नावाखाली सुक्याबरोबर ओलेही जळते आहे असे काही वेळा वाटते. अशावेळी कवितेच्या आस्थेवाईक वाचकांच्या मनाचा अनेकदा गोंधळ उडताना दिसतो. आज तरी ह्यातून मार्ग काढण्याची एखादी सोपी युक्ती नाही...'' (संपादकीय, 'प्रतिष्ठान' (मराठी कविता आणि आजचे कवी : परिसंवाद विशेषांक) : १९६६ : १२१) १९६०च्या सुमारास लिहिल्या जात असलेल्या मराठी कवितेसंबंधीचे हे एक सर्वसाधारण विधान आहे. तत्कालीन कविता आणि कवितेचा वाचक यांच्यामधील वाढत्या विसंवादाला हे विधान अधोरेखित करते. रसिक वाचकापर्यंत कविता बऱ्याचदा पोहचत नाही, ती एका मर्यादेपलीकडे आकलनाच्या बाबतीत सुकर वाटत नाही आणि अशा एकंदर काव्यसंभारात बऱ्या-वाईट कवितेचा विवेक करणे कठीण होऊन बसते. अशी भूमिका या कालखंडात उदयास आलेल्या लघुनियतकालिकांतील कवितेबाबत प्रामुख्याने मांडली गेल्याचे दिसते.

''...व्यापक दृष्टिकोन ठेवूनही प्रायोगिक, नव्या परंपरा-नवतेचा अर्थपूर्ण संबंध जोडणाऱ्या कवितांवर 'शब्द'ने भर दिला. 'असो', 'वाचा', 'एकंदर', 'आत्ता' व नंतरच्या नियतकालिकांनी 'शब्द'चे अनुकरण न करता ही प्रथा चालू ठेवली असली तरी 'शब्द'चा व्यापक रंगपट त्यात नव्हता. भालचंद्र नेमाडे, अशोक शहाणे, राजा ढाले, सतीश काळसेकर, नामदेव ढसाळ, चंद्रकांत खोत अशा वेगवेगळ्या किंवा त्याच त्या नियतकालिकांच्या संपादकांनी स्वतःचा वाचकवर्ग शोधला, संघटित केला आणि वाढविला. मात्र मराठी काव्याभिरुचीला गतिमान

बनवणे या मोहिमांना शक्य झाले नाही. याची कारणे त्यांच्या स्वतःच्या आग्रही पण पुष्कळ अंशी असंस्कृत काव्यदृष्टीत आढळतात... कवितेकडे स्वच्छ स्थिर दृष्टीने बघू शकणारी वृत्ती त्यांच्यात नव्हती...'' (दिलीप पुरुषोत्तम चित्रे : १९८६. ८१-८२) याच स्वरूपाचा अभिप्राय अन्यत्रही पुढीलप्रमाणे वाचायला मिळतो- ''...लघुपत्रिकेतल्या कवींची कविता लोकांपासून दूर गेलेली आणि आपल्याच कोषात आणि ज्ञानाच्या-तत्त्वज्ञानाच्या दुर्बोधतेच्या रिंगणात फिरताना धन्यता मानणारी आहे. आपण कविता कुणासाठी लिहितो आहोत याचे भान जसे संतांना आणि शाहिरांना होते तसे चळवळीतल्या आणि त्यांचे अनुकरण करणाऱ्या आजच्या कवींनाही दिसत नाही... उलट त्यांची कविता अधिक दुर्बोध आणि अवाचनीय होताना दिसते, ही बाबसुद्धा मराठी कवितेच्या विकासाचे सुचिन्ह मानता येत नाही...

१९७५-८० च्या दरम्यान विद्रोही-दलित कवितेचा एका नवा प्रवाह जोर धरू लागला होता. बांधिलकीच्या भूमिकेतून लिहिली जाणारी ही कविता मराठी कवितेच्या आशय-अभिव्यक्तीत बदल घडवून आणत होती. परंतु ''...विद्रोही कवितेला मिळत असलेली वाचकप्रियता पाहून या काळात अनेक कवींनी उथळ स्वरूपाची विद्रोही कविताही लिहिली आहे. एक प्रकारे ते दलित साहित्याच्या लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ होऊन हुकमी लोकप्रियता मिळवू पाहत होते. कविता हा एक कलाविष्कार आहे याची जाण न ठेवता अनेकदा कविता लिहिली जाऊ लागली. परिणामी त्यास काव्यरूपाऐवजी पद्यरूप येऊ लागले. कवितेत काव्यात्मकतेच्या जागी गद्यात्मकता आली. अनेकदा कविता केवळ दलित कवींची आहे म्हणून तिचे अवाजवी कौतुक होऊ लागले. परिणामी कविता कंठाळी बनली...'' (रवींद्र ठाकूर : १९९९ : ७९) काव्यातील गद्यप्रायतेबाबतची तक्रार या काळात सतत केली जाऊ लागली असे दिसते. ''...कवितेच्या नावाखाली आज नीरस, रुक्ष, व्याख्यानवजा गद्यच शब्द तोडून कविता म्हणून मांडलेलं असतं. ग़ज़ल ही वृत्ती असली तरी ते प्रथम 'वृत्त' आहे- हे पुष्कळसे कवी लक्षातच घेत नाहीत. रेडिओ, दूरदर्शन, वृत्तपत्रे, मासिके या साऱ्या प्रसारमाध्यमांतून आज जी कविता समोर येते, ती अतिशय सदोष आहे. या सर्व माध्यमांनी कवितेबाबत जागरूकता दाखवणं आवश्यक आहे. नाहीतर कवितेच्या नावाखाली हे गद्यच प्रस्थापित होत जाईल. हाही एक धोका या कालखंडातील कविता वाचताना जाणवतो...'' (तु. शं. कुलकर्णी : १९९४ : XXV) दुर्बोध, ज्ञानगंड व तुच्छतावादात अडकलेली, कंठाळी, गद्यप्राय अशा कवितेच्या या वाढत्या प्रभावकाळात चांगल्या कवितेचा प्रांत नेमका कुठून सुरू होतो, याबाबत संभ्रमाचे वातावरण निर्माण झालेले होते. 'वाचकांच्या मनाचा अनेकदा गोंधळ उडतो', 'मराठी कवितेचा गुंता' यांसारखे शब्दप्रयोग म्हणूनच योजले गेले. त्यातच मुक्तछंदाचा वाढता गैरवापर आणि कवितेसंबंधी, कवितासंग्रहांसंबंधी येणारे जुजबी परिचयात्मक लेखन यातून या संभ्रमात भरच पडत गेली. ''...अर्वाचीन मराठी काव्याचे पात्र आता विशाल झाले आहे. दिवसेंदिवस हे पात्र आता रुंदावत आहे. मुक्तशैलीच्या संजीवनामुळे अभिव्यक्तीच्या तंत्रमुक्त वाटा अधिक मोकळ्या झाल्यामुळे कवितालेखनाला बहर आला आहे. कविता तृणासारखी उदंड वाढत आहे. यामुळे मराठी काव्यसंग्रहांचे संख्याबळ वाढलेले असले तरी तिच्यातील गुणधर्मिता किती वाढली आहे, हा वादाचा प्रश्न आहे. तिच्यातील सच्ची कविता कोणती आणि नकली कविता कोणती, हे ओळखणे दुरापास्त झाले आहे. मुक्तशैलीमुळेच नव्हे तर अभिव्यक्तीच्या नवनव्या पद्धतींमुळे आणि विस्तारित झालेल्या काव्यसंकल्पांमुळे कविता अधिकाधिक गुंतागुंतीची झाली आहे. त्यात नित्य नव्याने निघणारे काव्यसंग्रह व त्यांची वर्तमानपत्री परीक्षणे व ती लिहून घेणाऱ्यांचा धंदेवाईक दृष्टिकोन यांमुळे सर्वसामान्य वाचक बुचकळ्यात न पडला, तरच नवल!...'' (अक्षयकुमार काळे : १९९० : १७) कविता लिहिण्याचे प्रमाण अधिक; काव्यसंग्रहांची विपुलता, पण त्यातील 'चांगल्या' कवितेची ओळख करून घेणे बरेचसे कठीण; त्यातच गंभीर काव्यचर्चेचा, काव्यसंग्रहांच्या चिकित्सक मूल्यमापनाचा, कविता म्हणून कवितेचे 'कवितापण' जोखण्याचा बराचसा अभाव अशा एकंदर परिस्थितीत कवितेच्या क्षेत्रात काही सामाजिक अपप्रवृत्तीही शिरू लागल्या आणि मग



''...लघुपत्रिकेतल्या कवींची कविता लोकांपासून दूर गेलेली आणि आपल्याच कोषात आणि ज्ञानाच्या-तत्त्वज्ञानाच्या दुर्बोधतेच्या रिंगणात फिरताना धन्यता मानणारी आहे. आपण कविता कुणासाठी लिहितो आहोत याचे भान जसे संतांना आणि शाहिरांना होते तसे चळवळीतल्या आणि त्यांचे अनुकरण करणाऱ्या आजच्या कवींनाही दिसत नाही... उलट त्यांची कविता अधिक दुर्बोध आणि अवाचनीय होताना दिसते, ही बाबसुद्धा मराठी कवितेच्या विकासाचे सुचिन्ह मानता येत नाही...



**''...कवितेच्या नावाखाली आज नीरस, रुक्ष, व्याख्यानवजा गद्यच शब्द तोडून कविता म्हणून मांडलेलं असतं. गज़ल ही वृत्ती असली तरी ते प्रथम 'वृत्त' आहे- हे पुष्कळसे कवी लक्षातच घेत नाहीत. रेडिओ, दूरदर्शन, वृत्तपत्रे, मासिके या साऱ्या प्रसारमाध्यमांतून आज जी कविता समोर येते, ती अतिशय सदोष आहे. या सर्व माध्यमांनी कवितेबाबत जागरूकता दाखवणं आवश्यक आहे. नाहीतर कवितेच्या नावाखाली हे गद्यच प्रस्थापित होत जाईल. हाही एक धोका या कालखंडातील कविता वाचताना जाणवतो...'' (तु. शं. कुलकर्णी : १९९४ : XXV)**

''...कोणत्याही कालखंडात खरी कविता मागे राहावी आणि छोट्या कवितेचा बोलबाला व्हावा असा धोका निर्माण होण्याची शक्यता असते...'' (विजया राजाध्यक्ष : १९८० : तेरा) ही भीती खरी ठरू लागली. 'अभिरुची'च्या दुसऱ्या पर्वातील 'मर्ढेकरोत्तर मराठी कविता' या विशेषांकाच्या संपादकीयाचे शीर्षकच 'मराठी कविता तिसऱ्या केशवसुतांच्या प्रतीक्षेत' ('अभिरुची' : दिवाळी १९९५ : ६५-६७.) असे आहे. तत्कालीन मराठी कवितेच्या स्थिति-गतीचे, एकूण मराठी कवितेच्या पर्यावरणाचे नेमके चित्र या संपादकीयातून उभे राहते.

अशा मराठी काव्यपर्यावरणात 'कविता-रती' हे द्वैमासिक सुरू झाले. विशिष्ट अशी संपादकीय दृष्टी अंगीकारून हे नियतकालिक कार्यरत आहे. चांगल्या कवितेचा शोध घेण्यासाठी नवोदितांच्या कवितालेखनाकडे स्वागतशील दृष्टीने पाहण्याचे धोरण हे द्वैमासिक स्वीकारते. नवोदितांच्या चांगल्या, अधिक चांगल्या होण्याच्या शक्यता असणाऱ्या कवितांना आवर्जून प्रसिद्धी देते. कविताबाह्य भूमिका स्वीकारून कवितेचा विचार करणे गैर आहे, याची पुरेपूर जाण या दृष्टीत आहे. त्यामुळे कवितेचे 'कवितापण' जोखून चांगली कविता व वाईट कविता असा भेद करण्याची क्षमता या दृष्टीत आहे. वर उल्लेखिल्याप्रमाणे विविध कारणांनी संभ्रमित असलेल्या, मराठी काव्यक्षेत्रात हरवलेल्या चांगल्या कवितेच्या शोधाची निकड जाणणारी ही दृष्टी आहे. वाङ्मयबाह्य कारणांनी शबलित होणारी, उथळ, हौस व प्रसिद्धी यांचा सोस बाळगणारी, काव्यरसिकविन्मुख अशी कविता बाजूला सारण्याचे काम पार पाडण्यासाठी आणि खऱ्या कवितेची पाठराखण करण्यासाठी अशी संपादनदृष्टी उपकारक ठरत असते. काव्यविषयक ताठर भूमिका स्वीकारून केवळ उत्तम कवींच्या उत्कृष्ट कविता छापणे किंवा कोणताही तरतमभाव न बाळगता कवितेच्या नावाखाली काव्यहीन मजकूर छापणे अशा दोन्ही टोकाच्या काव्यविघातक भूमिका टाळून जुन्या-नव्या कवींच्या कवितांचे 'कवितापण' जोखून त्यातील उत्तम, अधिक चांगल्या आणि चांगल्या कविता छापण्याची मध्यममार्गी दृष्टी 'कविता-रती'ने महत्त्वाची मानली आहे. 'कविता-रती' हे एक काव्यविषयक नियतकालिक आहे. त्यामुळे ह्या नियतकालिकाच्या संपादनदृष्टीची अर्थपूर्णता विशद करताना कवी आणि काव्यसमीक्षक यांना दिशादिग्दर्शन करण्याच्या बाबतीत या संपादनदृष्टीची भूमिका आणि वाचकांच्या काव्याभिरुचीला वळण लावण्याचा प्रयत्न करण्यात या संपादनदृष्टीने योगदान अशा दोन अंगांनी मांडणी करता येईल.

### कवी व काव्यसमीक्षा यांना दिशादिग्दर्शन

'कविता-रती'चा प्रारंभ १९८५ साली झाला. साधारणपणे १९८५च्या सुमारास लिहिणाऱ्या व त्यानंतर लिहू लागलेल्या कवींची कविता 'कविता-रती'तून मोठ्या प्रमाणात छापली गेलेली आहे. किंबहुना अशा कवींच्या कवितांची संख्या 'कविता-रती'तून आलेल्या कवितांमध्ये जास्त आहे. याचा अर्थ मराठी काव्यक्षेत्रातील नव्या प्रतिभावंतांकडे 'कविता-रती'ने विशेष लक्ष पुरविले आहे. पण त्यामुळे मराठी कवितेच्या पूर्वपरंपरेकडे मात्र दुर्लक्ष झालेले आहे असे दिसत नाही. आधुनिक मराठी कवितेच्या सौंदर्यलक्ष्यी धारेसोबतच अस्तित्ववादी, महानगरीय, ग्रामीण, दलित, स्त्रीवादी अशा कालानुरूप निर्माण होत गेलेल्या विविध काव्यधारांमधील कविता 'कविता-रती'च्या अंकांमधून आलेली आहे. कुसुमाग्रज, इंदिरा संत, ना. घ. देशपांडे, वा. रा. कान्त, शंकर रामाणी, कृ. ब. निकुंब, वसंत आबाजी डहाके, अनुराधा पोतदार, यशवंत मनोहर, ना. धों. महानोर, केशव मेश्राम, शंकर वैद्य, शांता शेळके या आणि इतर काही 'कविता-रती'पूर्व कालखंडात स्थिरावलेल्या कवी-कवयित्रींच्या कविता 'कविता-रती'तून आलेल्या आहेत. मात्र त्यातही कविता प्रतिष्ठित, सुप्रसिद्ध कवीची आहे म्हणून छापलीच पाहिजे- कविता कशी का असेना ती जशीच्या तशी स्वीकारलीच पाहिजे अशी 'कविता-रती'ची संपादनदृष्टी नाही. ना. घ. देशपांडे यांच्यासारख्या ज्येष्ठ व मान्यवर कवीने स्वतःच्या कवितेबाबत संपादकांना लिहिलेले खाली नमूद केलेले पत्र या संदर्भात लक्षात घेता येईल.

''श्री. पुरुषोत्तम पाटील यांना,

स.न.,

...'दूरची चांदणी' या माझ्या कवितेतील 'घोरते' हा शब्द खटकतो असे आपण म्हणता.

खटकण्यासाठीच हा शब्द आहे हेही आपल्या लक्षात आलेले आहे. तरी तो बरा दिसत नाही असे आपले मत दिसते. कवितेतील शब्द बदलणे फार कठीण असते याचा आपल्यालाही अनुभव असेलच. बदलायचा असेल तर 'घोरते'ऐवजी 'आंधळी' हा शब्द घालावा...

आपला

ना.घ. देशपांडे''


**वाचकांच्या काव्याभिरुचीला वळण लावण्याचा प्रयत्न**

''...काव्याची प्रतिष्ठा आमच्या येथें असावी त्याहून फारच खालची मानलेली आहे. करमणूक व मनोरंजन यांपेक्षा काव्यांत विशेष काही नाहीं. असा तज्ज्ञांखेरीज इतर सर्वत्र ग्रह असल्यामुळे काव्याच्या अभ्यासाला आणि काव्यवाङ्मयाला आमच्या येथें मिळावा तो मान आजपर्यंत मिळालेला नाही...'' (वा.ब. पटवर्धन : १९२१ : ५-६) या सुमारे शंभर वर्षांपूर्वीच्या विधानात मांडलेल्या वस्तुस्थितीत आज कितपत फरक पडलेला आहे? उलट सामान्य वाचक तर सोडाच पण कवी, कवितेचे तथाकथित भाष्यकार व काव्यव्यवहाराशी संबंधित प्रकाशक, साहित्यसंस्था, नियतकालिके, पुरस्कार निवड समित्या आदींना 'करमणूक व मनोरंजन यांपेक्षा काव्यांत विशेष काही नाहीं,' असे वाटू लागले आहे की काय? असा प्रश्न उपस्थित करावा असे समकालीन काव्य-पर्यावरण आहे. कवितेसाठी कार्य करणाऱ्या नियतकालिकाची अर्थपूर्णता या अंगानेही तपासून पाहायला हवी.

या दृष्टीने विचार करता लक्षात येते की लेखक व समीक्षक यांच्याप्रमाणेच 'वाचक' हादेखील कोणत्याही वाङ्मयीन नियतकालिकाच्या प्रभावक्षेत्रातील एक महत्त्वाचा घटक आहे. किंबहुना वाचकांच्या अनुकूल प्रतिसादावर वाङ्मयीन नियतकालिकाचा डोलारा उभा असतो, असे म्हणता येईल. 'कविता-रती'-सारख्या केवळ 'कविता' या वाङ्मय-प्रकारासाठी कार्यरत असणाऱ्या नियतकालिकाच्या वाचक-वर्गाचा विचार करताना लक्षात येते की, तो सर्वसाधारण आणि रसिक अशा दोन प्रकारचा आहे. साहित्याचे अध्यापन करणारे शिक्षक-प्राध्यापक, साहित्याचे विद्यार्थी, कवी-समीक्षक असा कवितेकडे गांभीर्यपूर्ण दृष्टीने पाहणारा वाचकवर्ग त्यात जसा आहे, तसाच कविता वाचण्याची आवड असलेला, कवितेची चिकित्सा वगैरे न करता तिच्यापासून मिळणारा आनंद महत्त्वाचा मानणारा, निरनिराळ्या क्षेत्रांत कार्यरत असलेला असा वाचकवर्गही त्यात आहे. 'कविता-रती'चा वाचकवर्ग नागरी भागातील जसा आहे, तसेच महाराष्ट्राच्या अनेक खेड्या-पाड्यांमधील देखील आहे. मराठी कवितेच्या परंपरेशी, तिच्या विविध रूपांशी परिचित असलेला वाचकवर्ग त्यात जसा आहे, तसाच कविता म्हणजे नेमके काय; यासंबंधी पूर्णतः अनभिज्ञ असलेला वाचकवर्गही त्यात आहे. त्यामुळे 'कविता-रती'च्या वाचकवर्गाची अभिरुची समान पातळीवरची वा एकाच तऱ्हेची असल्याचे गृहीत धरता येत नाही. काव्याबद्दल समाजात असलेला उत्साह, कवितेचा आस्वाद घेण्याची क्षमता, त्यातील सरस-नीरस ठरवण्याची व मूल्यमापन करण्याची शक्ती आणि कवितेच्या सांस्कृतिक मूल्यांची जाणीव या





**मराठी काव्यसंग्रहांचे संख्याबळ वाढलेले असले तरी तिच्यातील गुणधर्मिता किती वाढली आहे, हा वादाचा प्रश्न आहे. तिच्यातील सच्ची कविता कोणती आणि नकली कविता कोणती, हे ओळखणे दुरापास्त झाले आहे.**



We poets in our youth begin in gladness.
But thereof comes in the end
despondency and madness.

(WILLIAM WORDSWORTH )





**'कविता-रती'सारख्या केवळ 'कविता' या वाङ्मय-प्रकारासाठी कार्यरत असणाऱ्या नियतकालिकाच्या वाचकवर्गाचा विचार करताना लक्षात येते की, तो सर्वसाधारण आणि रसिक अशा दोन प्रकारचा आहे.**

घटकांचा वाचकांच्या काव्याभिरुचीत प्रामुख्याने समावेश होतो. 'कविता-रती'च्या वाचकांचे भिन्न भिन्न स्तर लक्षात घेता काव्याभिरुचीच्या बाबतीतील त्यांच्या निरनिराळ्या पातळ्या मान्य कराव्या लागतात. तरीदेखील प्रत्येक कालखंडात प्रभावी ठरणारी लोकप्रिय अभिरुची कार्यरत असते. वाङ्मयीन गुणांपेक्षा वाचनीयता आणि विविधस्पर्शी जिज्ञासा हाच तिचा विशेष असतो. १९९० नंतर दूरचित्रवाणीच्या वाढत्या पसाऱ्यामुळे आणि माहिती-तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या प्रसारामुळे व एकूणच चंगळवादी जीवनशैलीमुळे वाचकांची वाङ्मयाकडे बघण्याची भूमिका बदलत गेलेली दिसते. 'वाचक' हा अधिकाधिक 'दर्शक' बनत गेला. वाङ्मय हे केवळ वेधक, आकर्षक, चटपटीत, कुतूहलपूरक वाचनीयतेच्या अंगाने महत्त्वाचे मानले जाणे, हा गेल्या दोन-अडीच दशकांतील वाचकांच्या अभिरुचीचा जाणवणारा एक महत्त्वाचा विशेष आहे. यावरून हे पुरेसे स्पष्ट होते की वाचकांची अभिरुची ही कोणत्याही एका घटकाकडून नियंत्रित केली जाऊ शकत नाही. "...ज्या वर्तमानकालीन वाङ्मयीन-सांस्कृतिक पर्यावरणाचा वाचक हा एक घटक असतो, त्या पर्यावरणाचा प्रभाव व्यक्तीच्या वाचक या भूमिकेवर अपरिहार्यपणे पडत असतो..." (रा. ग. जाधव : १९९८ : ९५) वाङ्मयीन नियतकालिके ही वर्तमान वाङ्मयीन-सांस्कृतिक पर्यावरणाचा एक घटक असल्यामुळे त्यांच्या कार्याचा वाचकांच्या अभिरूचीवर प्रभाव पडणे शक्य असते. "...मात्र ते श्रेष्ठ प्रतिभेचा कलावंत आणि त्याची समर्थ साहित्यनिर्मिती जितकं घडवून आणू शकते तितकं एखादं नियतकालिक, सामाजिक-राजकीय संस्था, किंवा एखादी संघटित राजकीय, सांस्कृतिक वा वाङ्मयीन क्षेत्रांतील वैचारिक चळवळ घडवू शकत नाही. वाङ्मयीन नियतकालिक अशा श्रेष्ठ साहित्यनिर्मितीचं वाहन झालेलं असलं तर या रूपांतराचं तेही निमित्त होतं आणि ते निमित्त व वाहन महत्त्वाचं असतं..." (श्री. पु. भागवत यांची मंगेश पाडगांवकर यांनी घेतलेली मुलाखत : १९९४ : ३०) यामुळे वाचकांच्या अभिरूचीला वळण लावण्याच्या बाबतीत वाङ्मयीन नियतकालिकांची भूमिका प्रधान स्वरूपाची नसून पूरक आहे.


२०१५ अखेरपावेतो प्रसिद्ध झालेल्या 'कविता-रती'च्या एकूण १०२ अंकांमधून ३०८९ कविता छापून आल्या आहेत. एका दिवाळी अंकातून किंवा विशेषांकातून कमीतकमी ५४ आणि जास्तीतजास्त ९३ कविता आलेल्या आहेत. एका साध्या अंकातूनही जास्तीतजास्त ३३ कविता छापल्या गेलेल्या आहेत. एकेका अंकातून एवढ्या मोठ्या संख्येने कविता वाचकांना वाचायला मिळणे ही विशेष गोष्ट आहे. शिवाय एकाच अंकात आलेल्या कविता या समान आशयाच्या वा अभिव्यक्तीच्या नाहीत. प्रीती, निसर्ग, कौटुंबिक नातेसंबंध, दुःखविषयक जाणीव, अस्तित्वविषयक व जीवनविषयक चिंतन, आत्मशोध, समाजवास्तव, त्याचे महानगरी, ग्रामीण, दलित असे पैलू, स्त्रीजीवनातले वास्तव इत्यादी वैशिष्ट्यपूर्ण आशयाची काव्यात्म अभिव्यक्ती 'कविता-रती'तून वाचायला मिळते. रोजच्या जगण्यातील विविध अनुभव, प्रत्ययास येणाऱ्या विविध संवेदना या कवितांमधून अनुभवायला येतात. त्यामुळे 'कविता-रती'च्या वाचकाला काव्याशयाच्या समृद्धतेचा परिचय होत गेला. वैयक्तिक, हळुवार, तरल संवेदनांच्या अंतर्मुख वृत्तीने केलेल्या काव्यरूप आविषकाराप्रमाणेच भोवतालच्या भेदक, दाहक अनुभवांच्या बर्हिमुख वृत्तीने केलेल्या काव्यरूपाशीही वाचकाची ओळख होत गेली. छंदोबद्ध कवितेप्रमाणेच मुक्तछंदात लिहिलेली कविताही 'कविता-रती'तून आलेली आहे. अभंग, ग़ज़ल, अष्टाक्षरी, हायकू, गद्यप्राय विधानात्मक अशी मुक्तछंदातील कविता, अल्पाक्षरी, मोजक्याच ओळींतून आकारास आलेल्या कवितेपासून अनेक पानांमध्ये विस्तारलेल्या दीर्घ कवितेपर्यंत- अशी मराठी कवितेच्या अभिव्यक्तीची नाना रूपे 'कविता-रती'ने वाचकांसोर मांडली. या कवितांमधून भाषेच्या विविध रूपांचे भिन्न भिन्न प्रकारे केले गेलेले उपयोजन वाचकांच्या प्रत्ययास आणून देण्याचा प्रयत्न 'कविता-रती'ने केला. वाचकांची काव्याभिव्यक्ती, काव्यभाषा यासंबंधीची जाणीव संस्कारित करण्याचा प्रयत्न या माध्यमातून 'कविता-रती'ने केला. सातत्याने अनुवादित कविता छापून अन्य भाषांमधील कवितांचा आशय, त्यांची अभिव्यक्ती यांच्या निरनिराळ्या तऱ्हा वाचकांना परिचित करून दिल्या.

''...एकाच वेळी वेगवेगळ्या प्रकारची कविता; कविता म्हणून स्वीकारण्याइतका स्वागतशील होतो. नाहीतर फक्त अमुक प्रकारची कविता म्हणजेच कविता असे चुकीचे समीकरण रूढ होते. म्हणूनच सर्व थरांतील कवींनी लिहिले पाहिजे आणि सर्व प्रकारचे लिहिले पाहिजे...'' (विजया राजाध्यक्ष : १९७९ : १९५) थोडक्यात, 'कविता-रती'च्या संपादकांनी कवितेचा आशय, तिची अभिव्यक्ती याबाबत कोणत्याही एका विशिष्ट भूमिकेचा आग्रह न धरता काव्याशय व काव्याभिव्यक्ती यांच्या निरनिराळ्या परी अंकांमधून वाचकांसमोर सादर केल्या. आणि त्यातून कवितेकडे बघण्याचा एक व्यापक, खुला आणि कवितेच्या बहुरूपिणत्वाचा यथोचित सन्मान करण्याचा संस्कार कळत-नकळतपणे वाचकांच्या मनावर करण्याचा प्रयत्न 'कविता-रती'ने निश्चितच केलेला आहे. हा संस्कार कवितेच्या रसिक वाचकाला काव्यविषयक मर्मदृष्टी प्राप्त करून घेण्यास उपकारक ठरणारा आहे. तसेच दुर्बोध, शब्दबंबाळ कवितेमुळे सर्वसाधारण वाचकाच्या मनात असलेला काव्यानंदाबाबतचा संभ्रमदेखील दूर करण्यास साहाय्यकारक ठरणारा आहे.

''...चांगला संपादक हा प्रथम संवेदनक्षम रसिक वाचक असतो, चांगला समीक्षक असतो. वाङ्मयातील श्रेष्ठ-कनिष्ठाची पातळी ओळखण्याची जाण त्याच्यात असते. त्यायोगे उत्कृष्ट ते निवडून वाचकाला सादर करणे ही त्याची पहिली कृती असते. पण ते करीत असतानाच ते उत्कृष्ट का आहे, वेगळे कसे आहे याचीही समज तो वाचकांमध्ये निर्माण करीत असतो. यासाठी तो त्या काळातील समीक्षकांचे साहाय्यही घेत असतो...'' (प्रभा गणोरकर : १९९४ : १५०) 'कविता-रती'च्या संपादकांनी समीक्षकांच्या साहाय्याने दिलेले विविध प्रकारचे काव्यसमीक्षात्मक लेखन या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. 'कविता-रती'तून आलेल्या काव्य-समीक्षात्मक लेखनातील कवितांची आकलने आणि काव्यसंग्रहांची परीक्षणे हे भाग विशेष लक्षणीय ठरतात. जुन्या आणि नव्या कवींच्या भिन्न भिन्न आशयाभिव्यक्तीच्या कवितांची आकलने देऊन संपादकांनी चांगल्या कवितेचे मर्म कसे जाणून घ्यावे याचा एक वस्तुपाठच वाचकांपुढे ठेवलेला आहे. त्यात महत्त्वाचे म्हणजे ही कवितांची आकलने एकाच तऱ्हेची नाहीत. काव्यसौंदर्य उलगडवून दाखवताना आशया-भिव्यक्तीची वैशिष्ट्ये आणि एकूणच कवितेची सेंद्रीयता विशद करणारी, कवितेतील मध्यवर्ती प्रतिमेचा शोध घेऊन त्या अनुषंगाने तिचे मर्म जाणून घेणारी, कविचरित्राच्या काही तपशिलांच्या संदर्भात कवितेचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न करणारी, आस्वादकाच्या मनःपटलावर कविताबाचनानंतर उमटलेल्या संस्कारांचे चित्र रेखाटणारी, कविमनाचा शोध घेऊन त्याचा अंतःस्तर उलगडून दाखवणारी, जीवनवास्तवातून कवितेला प्राप्त झालेल्या रूपाची चर्चा करणारी, कवीच्या स्वतःच्या वा अन्य कवींच्या कवितांच्या संदर्भात कवितेचे मूल्यमापन करणारी, कवितेच्या संहितेवर पूर्ण लक्ष केंद्रित करून काव्यभाषेचा, शैलीचा, त्यातील परंपरागत वा प्रयोगशील दृष्टीचा शोध घेणारी अशा काव्याकलनाच्या विविध दृष्टिकोनांचा परिचय 'कविता-रती'तून आलेल्या कवितांच्या आकलनातून वाचकाला होत जातो. कवितेचे आकलन करून घेण्याच्या निरनिराळ्या वाटा, रसिक व सर्वसाधारण वाचक या दोहोंना सुचविणारी ही कवितांची आकलने, वाचकांची काव्याकलनाची दृष्टी समृद्ध करणारी आहेत. काव्यसमीक्षेच्या तत्त्वांचे काही आकलनांमधून केले गेलेले उपयोजन रसिक-विचक्षण वाचकाची कवितेचे मर्म जाणून घेण्याची दृष्टी अधिक सूक्ष्म करण्यासाठी उपयुक्त ठरणारे आहे. मात्र अशी काव्याकलने सर्वसाधारण वाचकाला अनाकलनीय ठरतात. म्हणून त्यांवर अतिरिक्त भर देणे अनावश्यक आहे याची जाणदेखील 'कविता-रती'चे संपादक बाळगतात. एका पत्रामध्ये ते लिहितात, ''...मागच्या रजनी परुळेकरांच्या कवितेवरच्या आस्वादात, त्यातील साहित्य-तत्त्वांच्या चिकित्सक मंथनात बराच भाग खर्ची पडला होता. कविता समजून घ्यायची तर हे मंथनही आवश्यक होते. पण सर्वसामान्य वाचकांना ते काहीसे जड गेले असेल असे वाटते. तुमच्या नेहमीच्या आस्वादापेक्षा ते वेगळे होते...'' (एम. पी. पाटील यांना संपादक, 'कविता-रती' यांनी लिहिलेल्या पत्रातील काही भाग, दि. २८/५/२००५) कवितेचा रसिक-विचक्षण वाचक आणि सर्वसाधारण वाचक यांच्या दृष्टींमधील भेद लक्षात



**''...ज्या वर्तमानकालीन वाङ्मयीन-सांस्कृतिक पर्यावरणाचा वाचक हा एक घटक असतो, त्या पर्यावरणाचा प्रभाव व्यक्तीच्या वाचक या भूमिकेवर अपरिहार्यपणे पडत असतो...'' (रा. ग. जाधव : १९९८ : ९५)**



**वाचकांच्या काव्याभिरुचीचा सर्वेक्षणात्मक अभ्यास अधिक उपयुक्त ठरू शकेल असे वाटते. तरीदेखील वाचकांच्या अभिरुचीला वळण लावण्याच्या बाबतीत वाङ्मयीन नियतकालिकांची भूमिका पूरक स्वरूपाची असते हे ध्यानात ठेवून 'कविता-रती'ने वाचकांच्या काव्याभिरुचीवर संस्कार करून तिला वळण लावण्याच्या बाबतीत प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे केलेले प्रयत्न महत्त्वाचे आहेत**

घेऊन त्यानुसार दोहोंचा समन्वय कसा साधता येईल, याचा विचारही संपादकांनी केलेला दिसतो.

याच पद्धतीने 'कविता-रती'मधून आलेली वैविध्यपूर्ण कवितासंग्रहांची परीक्षणे हीदेखील वाचकांची काव्यविषयक जाणीव प्रगल्भ होण्याच्या दृष्टीने उपकारक ठरणारी आहेत. कवितासंग्रहांच्या प्रस्तावना, कवितासंग्रहांवरील भाषणे, पत्रे व प्रतिक्रिया असे लेखन, कवींच्या काव्यावरील विशेषांक आणि साध्या अंकांमधूनही आलेले कवींच्या समग्र काव्यावरील किंवा काव्याच्या विशिष्ट अंगांवरील लेख, कवींच्या मुलाखती, त्यांची भाषणे व मनोगते हे लेखन रसिक व सर्वसाधारण अशा दोन्ही वाचकांना कवितेचा अनेक दिशांनी विचार करण्यास प्रवृत्त करणारे आहे. 'कविता-रती'तून आलेले काव्यविषयक चर्चा करणारे-बरेचसे तात्त्विक स्वरूपाचे-लेख रसिक वाचकाच्या काव्यदृष्टीला तत्त्वांचे अधिष्ठान प्राप्त करून देण्यास उपयुक्त ठरणारे आहेत. त्यातही 'कवितेचे अध्यापन' या विषयावर झालेली विस्तृत चर्चा अशा वाचकांच्या कवितेचे आकलन करून घेण्याच्या व ते इतरांपर्यंत पोहचविण्याच्या क्षमतेला बळ पुरविणारी आहे. वाचकाला 'काय हवे' हे जाणून त्याला 'काय द्यावे' याचा उत्तम विवेक 'कविता-रती'च्या संपादनामध्ये सांभाळला गेला आहे असे दिसते. ''...साहित्य आणि कला अनुभवांद्वारे आणि आस्वादाद्वारे वाचकाच्या अभिरुचीला वळण लावण्याचे, तिला निश्चित दिशा दाखवण्याचे ध्येय वाङ्मयीन नियतकालिकांच्या संपादकाने मनाशी बाळगलेले असते. यासाठी चांगल्या आणि दव्या दमाच्या लेखकांचा शोध घेऊन त्यांचे साहित्य अधोरेखित करून प्रसिद्ध करणे आणि एक नवे वाङ्मयीन वातावरण निर्माण करणे आवश्यक असते...'' (मृणालिनी कामत : २००३ : ९) या दृष्टीने विचार केला तर लक्षात येते की, १९८५ नंतरच्या गेल्या दोन-अडीच दशकांतील मराठी कवितेमध्ये महत्त्वपूर्ण भर घालणाऱ्या अनुराधा पाटील, निरंजन उजगरे, नारायण कुळकर्णी-कवठेकर, महेश केळुसकर, अरुण म्हात्रे, अशोक बागवे, आनंद जावेकर, हेमंत गोविंद जोगळेकर, सिसिलिया कार्व्हालो, नीरजा, शैला सायनकर, बलवंत धोंगडे, नारायण सुमंत, आसावरी काकडे, किशोर पाठक, प्रियदर्शन पोतदार, पद्मिनी बिनीवाले, इंद्रजित भालेराव, उषा मेहता, अशोक नीळकंठ सोनवणे, गणेश विसपुते, रेणू दांडेकर, रेणू पाचपोर, यशोधरा साठे, अरुणा ढेरे, सुखदेव ढाणके, श्रीपाद भालचंद्र जोशी, श्रीकृष्ण राऊत, सुहास जेवळीकर, अशोक कोतवाल, दासू वैद्य, प्रकाश विठ्ठल किनगावकर, केशव सखाराम देशमुख, श्रीकांत देशमुख, हेमंत दिवटे, सचिन केतकर अशा काही प्रमुख कवींच्या कविता 'कविता-रती'तून अग्रक्रमाने प्रकाशित झालेल्या आहेत. तसेच म. सु. पाटील, रा. ग. जाधव, निशिकांत मिरजकर, सुधीर रसाळ, र. बा. मंचरकर, वसंत पाटणकर, नागनाथ कोत्तापल्ले, प्रभाकर बागले, अशोक रा. केळकर, एकनाथ पगार, प्रकाश देशपांडे-केजकर, एम. पी. पाटील, दिलीप धोंडगे, अक्षयकुमार काळे, द. ता. भोसले, किशोर सानप, प्रतिभा कणेकर, नीलिमा गुंडी अशा काही प्रमुख समीक्षकांचे काव्यसमीक्षात्मक लेख विशेष महत्त्वाचे मानून छापलेले आहेत. अशा प्रकारे चांगल्या आणि नव्या दमाच्या कवी-समीक्षकांचे लेखन केंद्रस्थानी ठेवून एक नवे काव्यविषयक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न 'कविता-रती'ने केलेला आहे. 'कविता-रती'तील काव्यसमीक्षात्मक लेखन हे प्रामुख्याने उपयोजित समीक्षेत मोडणारे आहे. आणि उपयोजित समीक्षेचे मुख्य आणि महत्त्वाचे योगदान संपन्न वाङ्मयअभिरुचीचे संवर्धन हेच असते. या दृष्टीने विचार करता वाचकांची काव्याभिरुची घडविण्याचे कार्य 'कविता-रती'तील काव्य-समीक्षात्मक लेखनाने केलेले आहे. वाचकांची काव्याभिरुची त्यातून कितपत संस्कारित झाली? तिला काही वळण लाभले काय? या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी 'कविता-रती'च्या वाचकांच्या काव्याभिरुचीचा सर्वेक्षणात्मक अभ्यास अधिक उपयुक्त ठरू शकेल असे वाटते. तरीदेखील वाचकांच्या अभिरुचीला वळण लावण्याच्या बाबतीत वाङ्मयीन नियतकालिकांची भूमिका पूरक स्वरूपाची असते हे ध्यानात ठेवून 'कविता-रती'ने वाचकांच्या काव्याभिरुचीवर संस्कार करून तिला वळण लावण्याच्या बाबतीत प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे केलेले प्रयत्न महत्त्वाचे आहेत, असे नमूद करता येते.

**समारोप**

मराठी वाङ्मयीन नियतकालिकांच्या आजरवाच्या वाटचालीवर एक दृष्टिक्षेप टाकला असता सहज लक्षात येते की, मौलिक वाङ्मयीन कामगिरी दीर्घकाळ बजावणारी बहुतांश नियतकालिके मुंबई अथवा पुणे येथूनच प्रकाशित झालेली आहेत. एकोणिसावे शतक तसेच विसाव्या शतकाचा पूर्वार्ध या कालखंडात मुंबई-पुणे हीच मराठी वाङ्मयीन संस्कृतीची प्रमुख केंद्र होती. या कालखंडातील महत्त्वपूर्ण वाङ्मयनिर्मिती, लेखक व समीक्षक मंडळी, प्रकाशन संस्था, वाङ्मयीन नियतकालिके आणि वाचकवर्गदेखील प्राधान्याने या केंद्राशी संबंधित असाच होता. बदलत्या सामाजिक परिस्थितीच्या रेट्याने शिक्षणाच्या संधी व्यापक प्रमाणात उपलब्ध होऊ लागल्यानंतर मुंबई-पुण्याच्या पलीकडच्या महाराष्ट्रातील नवशिक्षित तरुणवर्गामध्ये निर्माण होत गेलेली अभिव्यक्तीची निकड; मराठी वाङ्मयीन संस्कृतीच्या मध्यवर्ती प्रवाहात येण्याची निर्माण झालेली आकांक्षा मराठीतील वाङ्मयनिर्मितीचा चेहरामोहरा बदलणारी ठरली. याचा प्रत्यय साधारणपणे १९५०-५५ नंतर प्रकर्षाने येऊ लागला. मराठीतील सगळ्याच वाङ्मयप्रकारांत महाराष्ट्राच्या विविध भागांतून लेखन करणाऱ्या नव्या लेखकांचा उदय होऊ लागला. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य या प्रवाहांच्या उदयामुळे तर मुंबई-पुण्याच्या पलीकडील महाराष्ट्रातील अनेक लेखकांना, समीक्षकांना पहिल्यांदाच मराठी वाङ्मयीन संस्कृतीच्या प्रवाहात स्थान प्राप्त होण्याची शक्यता निर्माण झाली. वाचकवर्गाचाही विस्तार झाला. वाचकवर्गाच्या अनुभवकक्षेची एकरेषीयता संपून ती विविधांगी अनुभवांनी अधिकाधिक समृद्ध आणि व्यापक होत गेली. लेखक-समीक्षक-वाचकवर्गाच्या विस्तारित क्षेत्रामुळे मराठी वाङ्मयीन संस्कृतीला प्रथमतःच एक खुले अवकाश प्राप्त झाले. या स्थित्यंतरात एकंदर मराठी वाङ्मयव्यवहाराचे स्वरूपच बदलण्यास सुरुवात झाली. १९८५ साली 'कविता-रती'चा झालेला आरंभ हा याच प्रक्रियेचा एक भाग आहे. धुळ्यासारख्या महाराष्ट्राच्या उत्तरेकडील एका कोपऱ्यात असलेल्या निमशहरी भागातून 'कविता-रती' हे वाङ्मयीन नियतकालिक गेल्या पंचवीस वर्षांपासून चालविणे, ही बाब मराठी वाङ्मयीन संस्कृतीच्या विस्तारित पटाचे द्योतक आहे. ऐंशीच्या दशकात नव्या कवींचा उदय, त्यांना सहज उपलब्ध असणारे मुक्तछंदाचे साधन, काव्यलेखनाची विपुलता आणि काव्यविषयक विवेकीदृष्टीचा अभाव अशा एकंदर परिस्थितीत मराठी कवितेसंबंधी गंभीर भूमिकेतून कार्यरत राहण्याचे उद्दिष्ट समोर ठेवणाऱ्या नियतकालिकाची तीव्रतेने जाणवणारी निकड मुंबई-पुण्यातील एखाद्या नियतकालिकाने नव्हे तर धुळे येथील 'कविता-रती' या नियतकालिकाने अचूकपणे जाणली, ही बाब या वाङ्मयीन नियतकालिकाच्या कामगिरीला ऐतिहासिक मूल्य प्राप्त करून देणारी आहे.

'कविता-रती'च्या अंकांमधून आलेल्या कवितेसंबंधी केलेल्या मांडणीवरून हे लक्षात येते की, पूर्वकालीन, समकालीन आणि नवोदित अशा विविध जीवनजाणिवा आणि काव्यजाणिवा यांचा प्रत्यय देणाऱ्या मराठी कवींच्या कविता 'कविता-रती'तून आलेल्या आहेत. काव्य-लेखनाच्या क्षेत्रात उमेदवारी करणाऱ्या नवोदित कवींना 'कविता-रती' हे एक हक्काचे व्यासपीठ वाटते. अनेक नवोदितांच्या 'चांगल्या' कविता छापून त्यांच्या काव्यलेखनाची पत आणि प्रत उंचावण्यासाठी त्यांना उत्तेजन देण्याचे कार्य 'कविता-रती'ने पार पाडले आहे. 'कविता-रती'तून



**Poets are the unacknowledged legislators of the world.**

**(PERCY BYSSHE SHELLEY)**

**मराठी कवितेसंबंधी गंभीर भूमिकेतून कार्यरत राहण्याचे उद्दिष्ट समोर ठेवणाऱ्या नियतकालिकाची तीव्रतेने जाणवणारी निकड मुंबई-पुण्यातील एखाद्या नियतकालिकाने नव्हे तर धुळे येथील 'कविता-रती' या नियतकालिकाने अचूकपणे जाणली, ही बाब या वाङ्मयीन नियतकालिकाच्या कामगिरीला ऐतिहासिक मूल्य प्राप्त करून देणारी आहे.**

**केवळ वास्तवाचे तपशील म्हणजे कविता असा निर्माण झालेला समज, फुटकळ कवितासंग्रहांच्या प्रकाशनांना (आणि तत्परतेने त्यांना दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांनाही) आलेला ऊत आणि कविताबाह्य दृष्टींचा कवितेवर पडलेला प्रभाव अशा एकंदर भोवतालात 'कविता-रती'सारख्या नियतकालिकाची जबाबदारी अधिक वाढली आहे.**

स्वतंत्र कवितांप्रमाणेच अनुवादित कविता काही प्रमाणात आलेल्या आहेत. भारतीय, तसेच परकीय भाषांमधील कवितांची ओळख करून देण्याची ही भूमिका मराठी कवितेला काही नव्या दृष्टी प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने महत्त्वाची वाटते. कवितांच्या सोबतच आकलन, विश्लेषण, आस्वाद, मूल्यमापन, चिकित्सा, अर्थनिर्णयन, मर्मग्रहण अशी भिन्न भिन्न तऱ्हांची कवितेचे 'कवितापण' जाणून घेण्याची दिशा दाखविणारी काव्यसमीक्षादेखील 'कविता-रती'ने सातत्याने छापली आहे. यात उपयोजित काव्यसमीक्षेवर अधिक भर असला तरी काव्यविषयक सैद्धान्तिक लेखनही देण्याचा प्रयत्न सातत्याने 'कविता-रती'ने केलेला आहे. प्रामुख्याने कवी आणि त्याचे काव्य यासंबंधीचे 'कविता-रती'चे विशेषांक अल्प प्रमाणातील मराठीतील कविविमर्शात्मक समीक्षेचा मौलिक ठेवा आहेत. 'कविता-रती'तून आलेली कवितासंग्रहांची परीक्षणे आणि कवितांची आकलने मराठी काव्यसमीक्षेला सूक्ष्म दृष्टी प्राप्त करून देण्यास साहाय्यभूत ठरणारी आहेत. कविता आणि काव्यसमीक्षा या दोहोंसंबंधीच्या व्यापक आणि उदार दृष्टिकोनामुळे वर्तमान काव्यलेखनाच्या चिकित्सेबरोबरच भूतकालीन काव्यधारांचे अर्थनिर्णयन करणे या नियतकालिकाला शक्य झाले आहे. त्यामुळे मराठी कविता आणि काव्यसमीक्षा यांच्या दृष्टीने 'कविता-रती'ने बजावलेली कामगिरी निश्चितच लक्षणीय ठरणारी आहे.

कवी कोणत्याही निर्वात पोकळीत लिहीत नसतो. तो विशिष्ट सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक वातावरणात, विशिष्ट काव्यपरंपरेत लिहीत असतो. या सर्व गोष्टी जशा त्याच्या कवितेला आकार देत असतात, तसेच कवी कविता लिहून या गोष्टींनाही आकार देत असतो. समकालीन कवितेचा विचार करताना ही दृष्टी महत्त्वाची ठरते. पण याचा अर्थ कविता म्हणजे शाब्दिक कसरती, शब्दचमत्कृती किंवा विचारांच्या प्रचार-प्रसाराचे साधन नव्हे. खेदजनक बाब म्हणजे अशा भूमिकांभोवती समकालीन कवितेचे पर्यावरण घुटमळत आहे. प्रत्यक्ष जीवनातील वास्तव आणि काव्यगत वास्तव यांतील भेद अचूकपणे लक्षात न घेतल्याने कवितेबाबत गल्लत केली जात आहे. कधी ग़ज़ल, अभंग, गेय कविता, दीर्घ कविता, हायकू अशा रचनाबंधांच्या अतिरिक्त हव्यासात कविता गुरफटते, तर कधी आपल्या काव्य-जाणिवांचा मूलभूत पिंड ध्यानात न घेता श्रोत्यांना सुखावणाऱ्या (कृतक सौंदर्यलक्ष्यी वा कृतक समाजलक्ष्यी) कोणत्यातरी काव्य-जाणिवेला कविता शरण जाते. कधी टाळ्यांच्या अपेक्षेने (यात फेसबुकच्या लाइक्सची व व्हॉट्स अपच्या वा, बढिया, अभिनंदन, भारी यांची भर) ती कधी मोहरते आणि त्यानुसार रंगरूप धारण करू लागते किंवा कधी वास्तवाला शब्दरूप देता देता, विधानांना एकापुढे एक ठेवता ठेवता अतिरिक्त वक्तृत्वपूर्ण, गद्यप्राय होत जाते. अशा प्रकारे समकालीन मराठी काव्यसंस्कृतीवर एक दृष्टिक्षेप टाकला असता 'कविता-रती'सारख्या नियतकालिकाच्या कार्याची अर्थपूर्णता चटकन जाणवते. कवितेला लाभेली व्यासपीठीय लोकप्रियता, विशिष्ट जीवनजाणिवांचे कवितेत वाढते प्राबल्य, केवळ वास्तवाचे तपशील म्हणजे कविता असा निर्माण झालेला समज, फुटकळ कवितासंग्रहांच्या प्रकाशनांना (आणि तत्परतेने त्यांना दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांनाही) आलेला ऊत आणि कविताबाह्य दृष्टींचा कवितेवर पडलेला प्रभाव अशा एकंदर भोवतालात 'कविता-रती'सारख्या नियतकालिकांची जबाबदारी अधिक वाढली आहे.

**टिपा :**

१. ''...सत्यकथेचं संपादकीय धोरण मुख्यतः कथा-कवितेतील नवनव्या प्रतिभावंतांच्या नवनव्या आणि प्रयोगशील रूपांच्या निर्मितीला प्राधान्य देणारं राहिलं आणि त्याचा आग्रहानं पुरस्कार करणारी समीक्षाही त्याबरोबर प्रसिद्ध केली गेली हे खरं. पण जुन्याला त्यात पूर्णतः व हट्टाग्रही नकार नसे...'' (श्री. पु. भागवत यांची मोनिका गजेंद्रगडकर यांनी घेतलेली मुलाखत, 'श्री. पु. : संवेदनक्षम संपादक', 'ललित', मार्च २००३, पृ.२५).

२. ''...कविता आणि त्याचप्रमाणे अभिरुचीतील लेख, कथा व समीक्षणे ही बुद्धीला आवाहन देणारी होती आणि हेच 'अभिरुची'चे पहिले धोरण होते...'' (शांता गोखले, 'अभिरुची'चे एक विहंगम दर्शन, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जुलै ते सप्टेंबर १९७७, पृ. ४३.)

३. ''...त्याच त्या जुन्या लेखकांच्या तपश्चर्येचे सक्तीने सत्त्वहरण करण्यापेक्षा नवनवीन लेखक

हुडकून त्यांच्यातील नवनिर्माणक्षमतेस चालना देण्याचे 'साहित्य'चे संपादकीय धोरण प्रशंसनीय होते असे म्हणावे लागेल...'' (सुमेधा विलास कुलकर्णी, 'साहित्य'चे वाङ्मयीन वैभव, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जुलै ते सप्टेंबर १९७७, पृ.३१.)

४. ''...मराठवाड्यातील साहित्यनिर्मिती आणि साहित्यसंशोधन यांना उत्तेजन देण्याच्या दृष्टीने जी योजना आखली जाते, तीत तिला स्वतःचे एक मुखपत्र असावे अशी जाणीव तीव्रतेने भासली. ह्या दृष्टीनेच 'प्रतिष्ठान' मासिक काढण्याचे ठरले...'' (संपादकीय, प्रतिष्ठान, वर्ष १, अंक १, सप्टेंबर १९५३, पृ.१).

५. ''...'अभिरुची' व 'साहित्य' ह्या नियतकालिकांची उणीव मनाला अधूनमधून बोचल्याशिवाय राहत नाही. ही उणीव अंशतः भरून काढावी या हेतूने 'छंद' जन्माला येत आहे...'' (संपादकीय, 'छंद', सप्टेंबर-ऑक्टोबर १९५४, पृ.१).

६. संपादकीय, 'शब्दवेध', अंक २६वा, नोव्हेंबर २००३, पृ.१.

७. निशिकांत मिरजकर, एक काव्यमग्न काव्यर्षी, कविवर्य प्रा. पुरुषोत्तम पाटील गौरविका, संपा. पुं. म. चित्ते व इतर, दि. ५ सप्टेंबर १९९०, पृ. १९.

८. ''...संपादक म्हणून ते किती कल्पक आहेत, हेही सर्वांच्या डोळ्यांसमोर आहे. त्यांची नजर चहूबाजूंनी फिरत असते. 'कविता-रती'साठी सामग्री शोधत असते. माझे दोन अनुभव सांगते. मी रमेश तेंडुलकरांच्या 'प्राजक्त' या संग्रहासाठी लिहिलेले प्रास्ताविक पुस्तकाच्या प्रकाशनानंतर लगेचच पाटलांच्या वाचनात आले. आणि ते त्यांनी 'कविता-रती'त उत्साहाने प्रसिद्ध केले. दुसरा अनुभव अधिक महत्त्वाचा आहे. माझ्या मर्ढेकरांवरील पुस्तकाचा समारोप वाचल्यानंतर श्री. पु. भागवत म्हणाले, ''हे प्रकरण आपण 'कविता-रती'कडे पाठवू.'' श्री. पुं.सारख्या बुजुर्ग संपादकाने पाटलांच्या कविता 'कविता-रती'ला दिलेली ही दाद!...'' (विजया राजाध्यक्ष, 'पुरुषोत्तम पाटील : व्यक्ती व कवी', 'ललित', ऑक्टोबर-नोव्हेंबर २००३, पृ. ३३).

– डॉ. आशुतोष पाटील
भ्रमणध्वनी ९८२३३६५१९०
pashutosh30@gmail.com

**माझ्या मर्ढेकरांवरील पुस्तकाचा समारोप वाचल्यानंतर श्री. पु. भागवत म्हणाले, ''हे प्रकरण आपण 'कविता-रती'कडे पाठवू.'' श्री. पुं.सारख्या बुजुर्ग संपादकाने पाटलांच्या कविता 'कविता-रती'ला दिलेली ही दाद!...''**
**– विजया राजाध्यक्ष**

ग्रंथाली

## शहर आत्महत्या करायचं म्हणतंय...!

**सुशीलकुमार शिंदे**



**मूल्य ८० रु.**
**सवलतीत ५० रु.**

सुशीलकुमार शिंदे यांच्या सदर कवितासंग्रहात शहर हे मध्यवर्ती रूपक आहे. त्याच्या माध्यमातून त्यांनी आजच्या मानवी-अमानवी स्थितिगतीचे चित्रण केलेले आहे.त्यांच्याच एका कवितेत म्हटल्याप्रमाणे

'कागदावर उतरले ते
निव्वळ शब्द नव्हतेच कधी,
ती आदिम वर्षांची घुसमट
सांडत गेली अक्षरांतून सहजपणे-'

ही घुसमट त्यांच्या सर्वच कवितांतून व्यक्त झालेली आहे. मात्र नैराश्याने सारे आसमंत वेढलेले असतानाही त्यांच्या कवितेत आशेचा चिवट स्वर आहे, तीव्र जिजीविषा आहे. उजेड पेरणाऱ्या मशाली अद्यापही कुणाच्याच गुलाम नाहीत असे त्यांनी म्हटलेलेच आहे. त्यांच्या कवितेची भाषा खडबडीत, रोखठोक अशी आहे. तथापि त्यांची स्वतःची एक प्रतिमासृष्टी आहे. नामदेव ढसाळ, अरुण काळे यांच्या कवितेशी त्यांच्या कवितेचे आंतरिक नाते आहे हेही जाणवते. मात्र त्यांचेच शब्द वापरून सांगायचे तर 'माणसांचा बोन्साय करण्याचा काळ तेजीत असताना त्यांच्या कवितेने स्वतःची गुणसूत्रे जपलेली आहेत' हेही जाणवते.

**– वसंत आबाजी डहाके**



# कवितेच्या संवर्धनासाठी 'काव्याग्रह'

**विष्णू जोशी**

**जिथे प्रसारमाध्यमं पोहचत नाहीत अशा ग्रामीण भागातील काही कवींकडून चांगल्या कविता लिहिल्या जातात, परंतु ह्या कवी आणि कवितांकडे फारसं कुणाचं लक्ष जात नाही. वृत्तपत्रात किंवा इतरही ठिकाणी प्रस्थापित कवींना मानाचं स्थान मिळतं, पण ग्रामीण भागात नवोदित, चांगल्या आणि दर्जेदार कविता करणाऱ्या कवींना तिथे योग्य व्यासपीठ मिळत नाही.**

**साहित्याच्या** प्रांतात विदर्भाची कर्तबगारी नागपूर, अमरावती, बुलढाणा असे काही जिल्हे वगळता इतरत्र फारशी आढळत नाही. वाशिमसारख्या भागात तर याची अधिक तीव्रतेने जाणीव होते. अशा परिस्थितीत इथल्या साहित्यिकांना त्यांच्या साहित्यजाणिवा प्रकट करणारं एक चांगलं माध्यम मिळावं, या उद्देशाने आम्ही एखादं नियतकालिक सुरू करण्याच्या प्रयत्नात होतो. त्याचाच वास्तव आविष्कार म्हणजे 'काव्याग्रह'. हे अनियतकालिक मुळातच कवितेच्या संवर्धनासाठी सुरू करण्यात आलं आहे. नव्या पिढीतील कवी अत्यंत ताकदीने नव्या विचारांची कसदार कविता घेऊन येत आहेत. त्यांना हक्काचं आणि तितकंच सक्षम व्यासपीठ मिळावं, हा विचारही मनात होताच. त्यामुळे एप्रिल २०१० मध्ये 'काव्याग्रह' हे अनियतकालिक सुरू केलं. तेव्हापासून 'काव्याग्रह'चे आत्तापर्यंत आठ अंक प्रसिद्ध झाले आहेत. सर्व साहित्यप्रकारांना यामध्ये स्थान देण्यात यावं हा विचार काही सहकाऱ्यांनी सुरुवातीला मांडला. मात्र, सर्व साहित्यप्रकारांना स्थान देता देता अस्सल कविता कुठे मागे पडली तर काय, ही भीतीही मनात होती. त्यामुळेच निवडक आणि चांगल्या कवितेवर लक्ष केंद्रित करण्याचं धोरण 'काव्याग्रह'ने सुरुवातीपासूनच अवलंबलं. त्याला काव्यरसिकांचाही पाठिंबा मिळाला. आजवर बहुतेक नव्या-जुन्या कवींच्या कविता, त्यांच्या पुस्तकांवरील समीक्षा 'काव्याग्रह'च्या विविध अंकांमधून प्रसिद्ध झाल्या आहेत.

दूरचित्रवाहिन्यांचं जाळं दुर्गम भागापर्यंत जाऊन पोहचलं तरी मुद्रणकलेच्या अस्तित्वाला तिळमात्र धक्का बसला नाही. वृत्तवाहिन्यांचा रतीब दिवसभर चालू असतानाही त्याचा परिणाम छापील मजकुरावर होत नाही. याचाच अर्थ असा, की समाजातील सर्व स्तरांतील लोकांचा मुद्रित मजकुरावरचा विश्वास अद्यापही ढळलेला नाही. या गोष्टींकडे बारकाईने बघताना त्याचा माझ्यावर झालेला खोलवर परिणाम मला काहीतरी आगळंवेगळं करण्याकडे नेणारा ठरला. लहानपणापासून वाचनाचं वेड. या वेडापायी मुद्रणकलेविषयी आकर्षण निर्माण झालं. मुद्रणक्षेत्रात उतरून काहीतरी वेगळं करावं, असं स्वप्न उराशी बाळगलं. नजरेसमोरच्या सगळ्या वाटा साशंक होत्या, पण निर्णय ठाम होता. वाटचालीत कितीही अडथळे आले तरी त्यांच्यावर मात करत इच्छित लक्ष्य गाठण्याची मनाची पक्की तयारी होती. त्यासाठी काय करता येईल याचे ठोकताळे बांधायला सुरुवात केली. मग जाणवलं, की वाचकांना वाचनासाठी प्रवृत्त करणारं लिखाण हळूहळू कमी होत आहे. आणि कवितेच्या बाबतीत बोलायचं झाल्यास चांगली कविता लिहिली जातही असेल, परंतु ही सगळीच चांगली कविता सुजाण वाचकांपर्यंत पोहचतेच असं नाही, हेही एक सत्य होतं. म्हणून एकदा सकस लिखाणाची उत्पादनक्षमता वाढली की सकस वाचन करणाऱ्यांच्या नजरा वाचनाकडे वळतील आणि ढिसाळलेला कणा भक्कम होईल. ही अस्वस्थता मनात सतत राहायची. त्या दृष्टीने आपल्याला काही प्रयत्न करता येईल का यासाठी आत्मपरीक्षणही करत होतो. आत्मपरीक्षणांच्या या अस्वस्थ क्षणांमुळे एक नवीन विचार उसळी मारून वर आला. तो विचार म्हणजे कवितेसाठी काहीतरी करण्याचा.

जिथे प्रसारमाध्यमं पोहचत नाहीत अशा ग्रामीण भागातील काही कवींकडून चांगल्या कविता लिहिल्या जातात, परंतु ह्या कवी आणि कवितांकडे फारसं कुणाचं लक्ष जात नाही. वृत्तपत्रात किंवा इतरही ठिकाणी प्रस्थापित कवींना मानाचं स्थान मिळतं, पण ग्रामीण भागात नवोदित, चांगल्या आणि दर्जेदार कविता करणाऱ्या कवींना तिथे योग्य व्यासपीठ मिळत नाही. अशांना 'काव्याग्रह'मध्ये जास्तीतजास्त स्थान मिळावं, त्यांच्या कविता जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहचाव्यात म्हणून प्रयत्न करायचे असं ठरवलं. या गरजेतून निर्माण झालेल्या 'काव्याग्रह'ला सर्व स्तरांतून चांगला प्रतिसाद लाभला. कारण आजची ती खरी गरज आहे. मराठीतील महत्त्वाच्या कवींची कविता त्यांच्यासोबतच नव्या पिढीतील चांगल्या कवींची कविता अशा मिश्रणामुळे 'काव्याग्रह'च्या वाचकवर्गात भर पडत गेली. पत्रांचा जणू वर्षावच होत होता. काही निवडक पत्रांना अंकांमधून प्रसिद्धीही देण्यात आली.

'काव्याग्रह'ची स्वतंत्र वितरणव्यवस्था

असल्यामुळे बहुतेक सर्व चांगले कवितासंग्रह आमच्याकडे उपलब्ध असतात. त्यामुळे काही चांगल्या नव्या कवितासंग्रहांवर स्वतंत्र लेख लिहून घेण्यात आले. यातील बाबाराव मुसळे यांचं 'गंध शिवारातला' हे सदर फार लोकप्रिय झालं. त्यांनी नव्या पिढीतील काही कवींच्या कवितासंग्रहांवर फार जाणीवपूर्वक आणि गंभीरपणे समीक्षालेखन केलं. प्रशांत असनारे, ऐश्वर्य पाटेकर, बालाजी मदन इंगळे यांच्या काव्यसंग्रहांवरील लेख विशेष चर्चिले गेले.

'काव्याग्रह' नवीन असला तरी यातील साहित्य नवखेपणाचं असणार नाही याची काळजी घेतली जाते. त्यामुळेच सुरुवातीपासूनच सकस साहित्यावर भर देण्याचं आम्ही ठरवलं होतं. 'काव्याग्रह'चा पहिला अंक काढायचा निश्चित झाल्यावर मान्यवर तसंच नवीन पिढीतल्या सशक्त कवींच्या कविता मिळवण्यासाठी जवळपास सात-आठ महिन्यांचा कालावधी लागला. पहिल्या अंकासाठी ज्या कवींची यादी करण्यात आली त्या सर्वांना 'काव्याग्रह'साठी कविता पाठवण्याचं आवाहन करण्यात आलं. त्या आवाहनावर ठरल्याप्रमाणे सर्व कवींच्या कविता मिळाल्या. सतीश काळसेकर, नारायण कुलकर्णी-कवठेकर, अझीम नवाज राही, दासू वैद्य, लोकनाथ यशवंत, अशोक कोतवाल, प्रकाश होळकर, सदानंद देशमुख, प्रशांत असनारे यांच्यासारख्या जुन्या आणि काही नवीन कवींकडून कविता मिळवल्या. अशा पद्धतीने प्रत्येक अंकाचं नियोजन होत होतं. त्यामुळे वाचकांचा प्रत्येक अंकाला भरपूर प्रतिसाद मिळत गेला. प्रत्येक अंकाची मांडणी अत्यंत सुरेख पद्धतीने करण्याचा आम्ही प्रयत्न केलाय. कवितांना रेखाटनांचा साज चढवला. आमच्या या प्रयत्नांची वर्तमानपत्रांनी योग्य ती दखल घेऊन 'काव्याग्रह'ला वेळोवेळी प्रसिद्धी दिली. अधिकाधिक काव्यरसिकांसमोर जाण्याची संधी आम्हाला त्यामुळे मिळाली.


नवीन कवींना प्राधान्यक्रमाने जास्तीत जास्त संधी देण्याचा प्रयत्न 'काव्याग्रह'ने केला आहे. विनायक येवले, संदीप जगदाळे, गजानन फुसे असे काही नव्या दमाचे कवी आता 'काव्याग्रह'मधून जोमाने पुढे येत आहेत. ग्रामीण जीवनानुभव चित्रित करणारे हे काही कवी आहेत, जे नवी कविता घेऊन येत आहेत.

चांगली कविता ही जास्तीतजास्त वाचक-रसिकांपर्यंत पोहचली पाहिजे हाच 'काव्याग्रह'चा एकमेव उद्देश आहे. काही प्रमाणात तो सफलही झाला आहे. या वाटचालीत अनेक वळणं, खाचखळगे आहेत तरीही ही वाटचाल सुरूच ठेवावी लागणार आहे. आणि ही सगळी शक्ती कवितेची आहे. कवितेवर प्रेम करणाऱ्या रसिकांची आहे. म्हणूनच आपल्या शक्तीनुसार साहित्याची जी काही सेवा करता येईल त्यानुसार आम्ही आमचे प्रयत्न सुरू ठेवले आहेत. अधिकाधिक काव्यरसिकांनी या काव्ययात्रेत सहभागी व्हावं, अशी अपेक्षा आहे.

**– विष्णू जोशी**
संपादक, 'काव्याग्रह'
भ्रमणध्वनी : ९६२३१९३४८०
vishnujoshi80@gmail.com




**चांगली कविता ही जास्तीतजास्त वाचक-रसिकांपर्यंत पोहचली पाहिजे हाच 'काव्याग्रह'चा एकमेव उद्देश आहे.**





# फक्त कवितेला वाहिलेले नियतकालिकच का?

**श्याम पेंढारी**




**मला** जर कुणी विचारलं, 'कविता म्हणजे काय रे भाऊ?' तर मला अचूक उत्तर नाही देता येणार. आतापर्यंत अनेकांनी 'कविते'च्या व्याख्या केलेल्या आहेत. पण परिपूर्ण समाधानकारक उत्तर नाही मिळालं. असो.

मला वाटतं, काव्य हे भूतलावरील सर्व सजीवांच्यात सुप्तावस्थेत दडलेलं असावं. प्रसंगानुरूप ते व्यक्तही होतं. मी राहत असलेल्या वसाहतीसमोर एका कंपनीच्या बागेत बरेच डेरेदार वृक्ष आहेत. वसंतात कोकीळ कुठल्या तरी वृक्षाच्या पानाआड बसून, दररोज आपल्या प्रेयसीला कुहूकुहू अशी आर्त साद घालीत असतो. त्याचं ते विरहगीत मला शुद्ध आनंद देणारं असतं. स्तब्ध उभी असलेली झाडं. क्षणात वाऱ्याच्या झुळुकीने डोलू लागतात. पक्ष्यांचा चिवचिवाट, समुद्राची गाज या साऱ्यांतून मला काव्याची अनुभूती येते.

माझं बालपण कोकणातलं. भात-लावणीच्या वेळी स्त्रिया रांगेत ओणव्याने भाताची रोपं लावताना काही पदं गुणगुणत असत. लग्नसराईत, भात कांडताना, हळद लावताना काही पदं म्हणत असत. पंधराएक वर्षांपूर्वी मी कोसबाडच्या काही आदिवासी पाड्यांत दोन दोन दिवस राहून आलोय. तेथील लग्नसमारंभात गायलेली सुरेल गीतं मनमोहकच.

माझे बाबा हाडाचे शेतकरी आणि तालुका पातळीवरचे जुन्या काळातले पदरमोड करून समाजसेवा करणारे, काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते हा वेगळा विषय होईल, पण माझ्या बाबांना भजनाचं फार म्हणजे फारच वेड होतं. पान-सुपारीचा त्यांचा खास डबा घेऊन तब्येतीत त्या पाटावर बसत असत. पान तयार करता करता मूड लागला की, काही पदं गुणगुणत असत. त्यांचं एक अतिशय आवडीचं पद,

पाण्या निघाली, पाण्या निघाली
सुंदरी, घेउनी दो घागरी...

अशा काहींशा त्या पंक्ती होत्या. तर माझी आई पहाटे दळण दळायला बसायची. जात्याच्या आवाजाने मला जाग यायची. जात्याच्या आवाजाबरोबर गुणगुणण्याचाही आवाज यायचा. बहुधा माझी आईही दळताना काहीतरी ओवीबिवी गुणगुणत असावी. एकंदरीत काव्याला अलिखित लोकगीतांची मोठी परंपरा आहे.

मी बहुधा चार-पाच वर्षांचा असेन. 'शंभर, सोन्याचे पितांबर' आणि 'ये रे ये रे पावसा' ही बडबडगीतं आणि शाळेत जाऊ लागलो तेव्हा पाठ्यपुस्तकांतील त्या बालसुलभ लयबद्ध कविता, हीच माझ्या मनातली कवितेच्या आस्वादाची रुजवात असावी, असं मला आता वाटतं. बालपणात झालेले काव्याचे संस्कार, काव्यरसिकता, उद्‌बोधक उत्कट आनंद देणारी कवितेची आंतरिक आस मी जोपासली. त्यामुळे मला एक नवी दृष्टी लाभली.

पुढे मी मराठी साहित्याचा, विशेषत: कवितेचा, अभ्यास करताना काव्यलक्षण, काव्यप्रयोजन, काव्यानिर्मितीची कारणे या संदर्भात, भामह, रुद्रट, दण्डी, वामन, मम्मट, जगन्नाथ तर पाश्चात्त्य- इमर्सन, हॅजलिट, कोलरिज, कोर्ट हॉप, एडगर अ‍ॅलन पो, अर्नोल्ड, वर्डस्वर्थ अशा मान्यवरांचे विचार, व्याख्या अभ्यासल्या आणि अशा अनुमानापर्यंत आलो की, काव्य आणि इतर साहित्यही जीवनाचे वास्तव चित्रण करणारे, मानवाच्या गतिमानतेला चालना देणारे आणि उत्कट आनंद देणारे रसायन आहे. ज्ञानेश्वर माउली काव्याचे लक्षण सांगताना म्हणतात,

वाचे बरवे कवित्व। बरवें रसिकत्व।
रसिकत्वीं परतत्त्व-। स्पर्शु जैसा।।१८.३४७

विश्वाच्या मुळाशी असलेल्या 'सत्-चित्-आनंद' रूप अशा 'परतत्त्वा'चा प्रत्यय घडवून आणणे हेच श्रेष्ठ काव्याचे प्रयोजन होय. अगदी सुरुवातीला मी नमूद केलेली काही उदाहरणं ही 'परतत्त्वा'चीच लक्षणे नव्हेत का?

आद्यकवी मुकुंदराज (११८८), महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधरस्वामी यांचं कवी म्हाइंभट्टांनी लिहिलेले 'लीळाचरित्र' (बहुधा १२८८), आद्यकवयित्री महदंबाने कृष्णरुक्मिणी विवाहावर रचलेली गीते 'धवळे' (१२२८-१३०३), इ.स. १२७५-१५९९ ज्ञानेश्वरादि संतकाव्य, अर्वाचीन कविता (१८८६ ते १९२०), आधुनिक कवितेचे जनक केशवसुत, १९२० ते १९४७ आधुनिक कवितेचा दुसरा टप्पा... कवी अनिल, बा. भ. बोरकर, कुसुमाग्रज इत्यादी. नवकाव्याचे प्रणेते बा. सी. मर्ढेकर. नंतरची साठोत्तरी कविता. मराठी कविता अशी टप्प्याटप्प्याने विकसित होत गेली आणि अनेक श्रेष्ठांनी समृद्ध केलेली आहे.

आताच्या प्रथितयश आणि नवोदित कवींचा काव्यलेखन प्रवास थक्क करणारा आहे. रोज नवनवे कवितासंग्रह प्रकाशित होत आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात कविसंमेलनं भरविली जात आहेत. एकंदरीत आपल्या मायबोलीच्या संवर्धनाचा विचार करता ही चांगली लक्षणं आहेत. त्यात उत्कृष्ट किती आणि निकृष्ट किती, हे ठरविणं तसं अवघड नसलं तरी सहजशक्य होत नाही. प्रत्येकजण आपल्या अभिरुचीप्रमाणे ते ठरवीत असतो/असावा.


अगदी आताच्या नव्याने कविता लिहिणाऱ्या कवींना अक्षरगणवृत्त, मात्रावृत्त, छंदवृत्त आणि मुक्तछंद असे कवितेच्या वृत्तांचे प्रकार माहीत असतील का, याबद्दलही शंका वाटते. त्यांना मुक्तछंद माहीत असावा. पण 'अक्षरगणवृत्ते व मात्रावृत्ते तसेच अक्षरसंख्या यातून पूर्णपणे मुक्त झालेला प्रकार म्हणजे मुक्तछंद. यात फक्त आंतरिक लय असते व काव्याचा आशय महत्त्वाचा असतो. तो आशय लयीत मांडणे म्हणजे मुक्तछंद.' ही साधी सुटसुटीत मुक्तछंदाची व्याख्या त्यांनी समजून घेतली असेल का, असा संभ्रम पडतो. असो.

फक्त कवितेला वाहिलेले नाही तर कवितेला प्राधान्य देणारे नियतकालिक प्रकाशित करण्याची प्रेरणा मला ग्रंथाली वाचक चळवळीतूनच मिळालेली आहे. १९९२ साली कोरो-ग्रंथाली संचालित 'सावित्री वाचनालय' भांडूप विभागात सुरू करण्याची जबाबदारी दिनकर गांगल यांनी माझ्यावर सोपवली होती. त्यानिमित्ताने 'ग्रंथाली'-विशेषत: दिनकर गांगलसरांशी-माझे स्नेहबंध जुळले होते. मी तीन-चार महिने ग्रंथालीत स्वेच्छेने प्रशासकीय स्वरूपाचं कामही करीत होतो. कन्याशाळा आणि टोपीवाला लेन येथील कार्यालयात मी रोज जात होतो. कन्याशाळेच्या गच्चीवर होणाऱ्या चर्चा-गप्पांना, तर २५ डिसेंबरच्या वाचकदिनाला मी आवर्जून उपस्थित राहत होतो. एकंदरीत ग्रंथालीशी मी एकजीव झालो होतो, असं म्हणणं वावगं ठरू नये.

आता नेमकं ते साल आठवत नाही, १९९३-९४ चं असावं बहुधा. ग्रंथालीने एक 'काव्यसंध्या' आयोजित केलेली होती. स्व. कविवर्य शंकर वैद्यसर, फोडणीकार रामदास फुटाणे, कवी अशोक नायगावकर, नलेश पाटील अन्य दोघे-तिघे त्या काव्यसंध्येचे सहभागी कवी होते. ती काव्यसंध्या उत्तरोत्तर रंगत गेली. ती मला इतकी भावली की, अशा काव्यसंध्या वरच्यावर आयोजित व्हाव्यात अशी तीव्र इच्छा माझ्या मनात ठाण मांडून बसली होती. एका निवांत वेळी मी गांगलसरांना म्हणालो, 'सर, काव्यसंध्या किती बहरली होती. फारच छान. अशा काव्यसंध्या अधूनमधून आयोजित करायला काही हरकत नसावी.' सर त्वरित उत्तरले, 'अरे वा! मग घ्या ना पुढाकार.' दुसऱ्याला पुढे आणणं हा त्यांच्या स्वभावाचा एक स्थायीभावच आहे. ग्रंथालीने प्रकाशित केलेल्या काही पुस्तकांना जागतिक कीर्ती प्राप्त झाली, त्याचे खरे शिल्पकार गांगलसरच आहेत. त्यांनी अनेकांना लिहितं केलं. मलाही काही लिहिण्यासाठी वैचारिक आशयाचे विषय सुचवले होते. पण मला त्या संधीचा लाभ उठवता आला नाही. मी तर त्यांना 'चंदनाचं खोड' असंच समजून आहे. दुसऱ्यांसाठी चंदनाच्या खोडासारखेच झिजले आणि प्रसिद्धीचा सुगंध इतरांना दिला.

'ग्रंथाली'ने 'कवितेचे व्यासपीठ' असा एक अभिवन कार्यक्रम सुरू केला होता. त्याचं स्वरूप होतं. कवींकडून कविता मागवायच्या, त्यातून पाच कवींच्या दोन दोन कवितांची निवड करायची. त्यावर नेमून दिलेल्या जाणकाराने भाष्य करायचं. श्रोत्यांमधून कुणी बोलू इच्छित असेल, तर त्याला बोलू द्यायचं. मला आनंद झाला होता तो कार्यक्रम सुरू होतोय याचा. पण मला अभिप्रेत होती ती 'काव्यसंध्या' — काही जुन्या, निवडक कवींच्या कवितांचं सादरीकरण.

पहिल्याच कार्यक्रमाचं आयोजन कुसुमाग्रजांच्या ८०व्या जन्मदिवशी म्हणजे २७ फेब्रुवारी १९९५ रोजी कन्याशाळेच्या सभागृहात करण्यात आलं होतं. आलेल्या शंभरेक कवितांतून पाच कवींच्या प्रत्येकी दोन कवितांची निवड करण्यात आली होती. कार्यक्रमाला कवी अशोक नायगावकर, नीरजा, बसंत आबाजी डहाके, अन्य मान्यवर, तसेच श्रोत्यांची चांगलीच उपस्थिती. चर्चा, काही अंशी नाराजी अशा प्रकारे पहिला कार्यक्रम पार पडला. पण एखाद्या कवितेच्या कार्यशाळेच्या स्वरूपात. ह्या कार्यक्रमाबद्दलचं 'मिड डे'मध्ये प्रसिद्ध झालेलं वृत्त अधिक चिंताजनक होतं. कविता ही एक अशी प्रभावी कलाकृती आहे की, ती सहजासहजी वश होणारी




**'ग्रंथाली'ने 'कवितेचे व्यासपीठ' असा एक अभिवन कार्यक्रम सुरू केला होता. त्याचं स्वरूप होतं. कवींकडून कविता मागवायच्या, त्यातून पाच कवींच्या दोन दोन कवितांची निवड करायची. त्यावर नेमून दिलेल्या जाणकाराने भाष्य करायचं. श्रोत्यांमधून कुणी बोलू इच्छित असेल, तर त्याला बोलू द्यायचं.**

**एका कार्यक्रमात कुलकर्णी नावाच्या नवोदित कवयित्रीची कविता निवडलेली होती, पण ती कवयित्री कार्यक्रमाला आलेली नव्हती. सूत्रधाराने ती कविता तिथे वाचली की नाही ते आता नीटसं आठवत नाही. पण सूत्रधार म्हणाला, 'ह्या बाईने यापुढे कविता लिहूच नये.'**

नाही. एक कविता दहाजणांनी वाचली वा अभ्यासली तर, दहाजणांना ती वेगवेगळ्या भाववृत्तीतून सामोरी येते. कुणा एखाद्याने त्याच्या कुवतीनुसार चिरफाड करणं, म्हणजे ती कविता आणि कवी यांच्यावर अन्याय करण्यासारखंच होय.

एका कार्यक्रमात कुलकर्णी नावाच्या नवोदित कवयित्रीची कविता निवडलेली होती, पण ती कवयित्री कार्यक्रमाला आलेली नव्हती. सूत्रधाराने ती कविता तिथे वाचली की नाही ते आता नीटसं आठवत नाही. पण सूत्रधार म्हणाला, 'ह्या बाईने यापुढे कविता लिहूच नये.' खरंतर कविता इतकी टाकाऊ होती तर ती निवडलीच का? कुणाचा इतका जाहीर अपमान करणं योग्य नव्हतं. सूत्रधाराच्या त्या भाष्याने मी फारच व्यथित झालो होतो. पण मी काय करू शकत होतो!

पण एक मात्र खरं की, नवोदितांसाठी काहीतरी करायला हवं, ही ऊर्मी स्वस्थ बसू देत नव्हती. 'कवितेचा मंच' कार्यान्वित करायचा निर्णय घेतला. वृत्तपत्रांत दिलेल्या वृत्तानुसार सीमा बिठाणे, सुरेखा गायकवाड, भांडूपचे भालेश साळवी माझ्या घरी येऊन भेटले. वीसएक पत्रंही आली होती. सीमा बिठाणे परळच्या शिरोडकर हायस्कूलमध्ये शिक्षिका होती. तिने शाळेचा वर्ग मिळवून जागेचा प्रश्न सहज सोपा केला. आणि माननीय दिनकर गांगलसरांच्या अध्यक्षतेखाली कविता सादरीकरणाचा पहिला शुभारंभाचा कार्यक्रम आयोजित केला. नेमका दिवस आठवत नाही पण १९९५ साली. कार्यक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्या बहुतांश नवोदित कवींच्या चेहऱ्यावरचा ओसंडणारा आनंद शब्दातीतच.

पुढे मंचाचं 'काव्यगंध' असं नामकरण करून महिन्यातून एकदा कार्यक्रम आयोजित करण्याचं निश्चित केलं. उद्देश असा - कवितेचं सादरीकरण करणं ही एक कला आहे. सभाधीटपणा आणि सादरीकरण अवगत व्हावं. जमल्यास कवितेवर चर्चा व्हावी.

कवींना अधिक लिहितं करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहन मिळायला हवं आणि मला वाटतं 'कविता' ह्या कलाकृतीचं कायमस्वरूपी जतन व्हायला हवं. ती कलाकृती इतरांपर्यंत पोहचायला हवी. तिला इतरांपर्यंत पोहचवायचं माध्यम म्हणजे नियतकालिक. शिवाय हे करताना आपल्या मायबोलीसाठी अगदी अल्पसं का होईना आपण काम करीत आहोत, हे एक मानसिक समाधान माझ्या जीवनाला उभारी देणारं आहे. अशा विचारांनी प्रेरित होऊन 'कुसुमाकर' मासिकाची निर्मिती एप्रिल २००० मध्ये केलेली आहे.

'कुसुमाकर'मध्ये केवळ नवोदितांच्याच कविता असतात असं नव्हे. मान्यवरांच्या कविताही प्रसिद्ध होत असतात. काव्यनिर्मितीविषयीही लेखन प्रसिद्ध होत असतं. नव्यांनी मान्यवरांच्या कविता अभ्यासून, बोध घेऊन आपल्या कवितेत योग्य तो बदल करावा, असाही उद्देश आहे. ह्या सतरा वर्षांच्या वाटचालीत अनेक चढउतार आले. पण डगमगलो नाही. यापुढे आत्मिक, शारीरिक बळ असेपर्यंत ताठ कण्यानं उभं राहण्याचा निर्धार आहे.

केवळ चार पैसे पदरी असून उपयोगाचं नाही. आजपर्यंत अनेक जुन्या-नव्या साहित्यिकांनी नि:स्वार्थीपणे लेखन सहकार्य केलं, अजूनही करीत आहेत. काहींनी नाव जाहीर न करण्याच्या अटीवर देणगीस्वरूपात अर्थसाहाय्य केलं, करीत आहेत. म्हणूनच ही वाटचाल सुरू आहे. लेखनसाहाय्य करणाऱ्या सर्वांचा नामोल्लेख करायचा म्हटलं तर एक भलीमोठी यादी तयार होईल. तरीही आतापर्यंत सातत्याने लेखन सहकार्य करणारे, 'कुसुमाकर'ला वाङ्मयीन दर्जा प्राप्त करून देणारे डॉ. राम पंडित, सदानंद डबीर, अरुण नेरूरकर, वामन देशपांडे, साधना खानवेलकर, माधव गवाणकर, अनुराधा नेरुरकर, मंदाकिनी पाटील व इतर सर्वांचा मी अतिशय ऋणी आहे, ऋणातच राहणार आहे.


विशेष उल्लेखनीय म्हणजे, 'कुसुमाकर'ला काही वर्षांपूर्वी 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालया'च्या संदर्भ विभागात स्थान मिळालेलं आहे. मराठा-विदर्भातील बरीचशी ग्रंथसंग्रहालये 'कुसुमाकर'चे सदस्य आहेत. इंदौर, भोपाळ (म.प्र.), कर्नाटक, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड या विभागातही 'कुसुमाकर' पोहचलं आहे.

या फलश्रुतीचं श्रेय माझं एकट्याचं नाही, आपणा सर्वांचं आहे.

**- श्याम पेंढारी**
भ्रमणध्वनी : ९८६९२७५९९२
shampen@ymail.com

ग्रंथाली


## विश्वसंचारी – डॉ. अनंत पां. लाभसेटवार




मूल्य ७०० रु.
सवलतीत ४५० रु.

भारताचा मध्यमवर्ग जसा वाढत आहे तशी पर्यटकांच्या संख्येतही लक्षणीय वृद्धी होत आहे. परदेशात भारतीय प्रवाशांची भेट होणं ही अपवादात्मक गोष्ट राहिली नाही. पण जे या वारीत भाग घेऊ शकत नाहीत त्यांना घरी बसून देशांतर करण्यास व पर्यायानं नवीन लोक, संस्कृती, चालीरीती आणि राजकारण अभिज्ञ होण्याचे अनुभव पदरात पाडण्यास हे पुस्तक उपयोगी पडेल असं वाटतं. नाहीतर तुम्हाला मोठ्या प्राध्यापकाचं काम सोडून निमसरकारी कंपनीत साध्या बाबूची नोकरी स्वीकारणारा साम्यवादी क्युबातला रिकार्डो, गर्भवती होण्यासाठी धुम्रपान त्यागण्याचा आटोकाट प्रयत्न करणारी व जगातल्या सगळ्या मध्यमवर्गीयांची सुखदु:खे सारखी असतात हे सिद्ध करणारी रियो डिजीनारोतली व्हॅलेंटिना किंवा चहा म्हणून व्होडका ढोसणारा रशियन दुसऱ्या कुठे भेटायला मिळेल? साहित्याप्रमाणे पर्यटनातही मनुष्य सुसंस्कृत, प्रगल्भ व विस्तृत दृष्टिकोनाचा होतो यात शंका नाही. पुस्तकांचा अभ्यास करण्याएवढंच जगातल्या लोकांचे चेहरे वाचल्यानं मनुष्य ज्ञानालंकृत होतो. दुसरे कसे राहतात, कसे विचार करतात, त्यांची सुखदु:खे समजून घेतली तर जगातला कलह कमी होऊन मैत्रीची नाळ जोडण्यास मदत होईल

## ना पूर्व ना पश्चिम! – डॉ. बाळ फोंडके




मूल्य २५० रु.
सवलतीत १५० रु.

केल्याने देशाटन मनुजा चातुर्य येतसे फार', असं सांगितलं जातं. ज्या काळात आपल्या पंचक्रोशीबाहेर पाऊल टाकता येत नसे त्या काळात बाहेरचं जग कसं आहे याचीच कल्पना येत नव्हती. त्यामुळं जो कोणी त्या अपरिचित प्रदेशात संचार करायला धजे त्याच्या गाठी इतरांपेक्षा अधिक ज्ञान साठत असे. पर्यायानं तो अधिक चतुर समजला जाई. आज घरबसल्या आपल्या मोबाईल फोनवरून देशविदेशात मुक्त संचार करण्याजोगी परिस्थिती असताना चातुर्य येण्यासाठी देशाटनच करण्याची गरज आहे का असा प्रश्न कोणालाही पडेल. त्याचंच स्पष्ट आणि सचित्र उत्तर या अनोख्या प्रवासवर्णनातून मिळावं. कारण डॉ. फोंडके यांनी केवळ सामान्य पर्यटकाच्या यादीत नसलेल्या पर्यटनस्थळांचाच फेरफटका घडवलेला नाही तर त्या यादीत असलेल्या स्थळांच्या वैज्ञानिक दृष्टीतून पाहिलेल्या पैलूंचीही ओळख करून दिली आहे. ललितशैली कायम ठेवत हसतखेळत मनोवेधक वैज्ञानिक पार्श्वभूमी सादर करत आगळ्यावेगळ्या प्रवासवर्णनाचा आनंद लुटण्याची संधीच या निमित्तानं तुम्हाआम्हाला दिली आहे.

## सूर्य होता रात्रीला – मेधा आलकरी




मूल्य ५०० रु.
सवलतीत ३०० रु.

'केल्याने देशाटन' ह्या गोष्टीची नवलाई आता फारशी राहिलेली नाही. ह्या पार्श्वभूमीवर, असं काही लेखन करायचं तर त्यामागची वृत्ती खूप स्वतंत्र, स्वधर्मी आणि स्वच्छंदही असायला हवी आणि त्या जोडीला हवी एक स्वत:ची नजर, मनमुक्त... निरागस तरीही बहुश्रुत... अभिव्यक्तीपूर्ण. त्यामुळे अशी लेखनाची जातकुळी मेधाकडे विनासायास आली आहे असं जाणवतं. इथं एक अनाग्रही, अनाक्रमक सहजता जागोजागी जाणवते, जी मला फार मोलाची वाटते. मेधाचं ह्या पुस्तकातलं एकूणच सांगणं मला छान वाटलं. सहप्रवासाची जाणीव आणि तरीही एकटं होण्यातला सुटेपणा ह्यांची इथं होणारी सरमिसळ सहज-सुंदर आहे. त्यामुळे हे पुस्तक निवांत, सावकाश वाचायला हवं. नव्हे, वाचायलाच हवं. – सुधीर मोघे



# कविता, कवितासंग्रह आणि कविसंमेलने

प्रा. उषा तांबे

**छापील कविता मनातल्या मनात वाचणे आणि ती कुणीतरी प्रभावीपणे वाचलेली ऐकणे, यात पुष्कळ फरक होतो. कवितेमधील शब्दांचे नाद, तिची लय, ह्यांची जाणीव कविता ऐकल्यावर होते आणि त्यातून कवितेचा भावार्थही अधिक उलगडत जातो.**

**या** लेखाच्या निमित्ताने घरातील पुस्तके मोजून पाहिली. मराठी, इंग्रजी आणि संस्कृत पुस्तके मिळून ती संख्या साधारण १२०० ते १३०० एवढी भरली. मराठीतली पुस्तके संख्येने सर्वात जास्त आहेत आणि कथासंग्रह, कादंबऱ्या, चरित्रे, आत्मचरित्रे, प्रवासवर्णने, ललित लेख, अनुवाद, समीक्षा अशा विविध प्रकारांचा त्यात समावेश आहे. कवितासंग्रह जवळ जवळ ५० आहेत. ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा, दासबोध हे ग्रंथ वेगळे. काव्यसमीक्षेची पुस्तकेही आहेत.

'आठवणीतल्या कवितां'चे खंड प्रकाशित झाले, तेव्हा इतर असंख्य (त्या वेळी असलेल्या) मध्यमवयीन वाचकांप्रमाणे मीही ते मिळवले. त्यातील कवितांचा आनंद मोठा की त्यातील स्मरणरंजनाचा प्रभाव जास्त प्रत्ययकारी, हे ठरवणे कठीण आहे. परंतु हे खरे की जुन्या छंदबद्ध कविता त्यांच्या गेयतेमुळे अधिक लक्षात राहिल्या आहेत. 'श्रावणमासी' शाळकरी वयात भावली तरी प्रौढपणी –

'झांकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर
पाय टाकुनी जळात बसला असला औदुंबर'

मधील गूढ गंभीरता मनाला स्पर्श करीत राहते. इंदिरा संतांच्या कवितेमधला धिंगाणा घालणारा पाऊस मनभर बरसतो. सुरेश भटांच्या सोप्या शब्दकळेतील गहन गंभीर अर्थ अचंबा करायला लावतो–

'रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा
गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा'

प्रभा गणोरकर, उषा मेहता, नीरजा यांच्या कवितांचे भावार्थ जास्त लक्षात राहतात. ते शब्द आठवण्यासाठी कवितासंग्रह उघडून वाचले जातात. मध्यमवर्गीय सुस्तपणाला, आत्मसंतुष्टतेला धक्का देऊन वास्तवाचं प्रखर भान या कविता देतात. दलित साहित्यातील कविताही असाच वेगळा अनुभव देतात. शाहिरी काव्याचे माझे वाचन फार कमी आहे, हे लक्षात येते. पंत कवींच्या छंदातल्या कविता, त्यातली यमकं, त्यांची वृत्तं हे लहानपणापासूनचे सोबती आहेत.

'तदितर खग भेणें वेगळाले पळाले
उपवन-जल-केली जे कराया मिळाले
स्वजन गवसला जो त्याजपाशी नसे तो
कठिण समय येता कोण कामासि येतो!'

आणि सर्व मराठी लोकांप्रमाणेच माझ्याही भावविश्वात संत कवींचं स्थान फार मोठं आहे. नकळत्या वयापासून त्यांचे अभंग आपण ऐकत आलो आहोत. त्यापासून जगण्याचे आधार शोधत आलो आहोत.

'आवडे हे रूप साजिरे सगुण ।
पाहता लोचन सुखावले ।।
आता दृष्टिपुढे ऐसाची तू राहे ।
जो मी तुज पाहे नारायण ।।'


'करुणाष्टकां'मधील आर्तता पुन्हा पुन्हा जाणवत राहते.


'जळत हृदय माझे जन्म कोट्यानुकोटी
मजवरि करुणेचा राघवा पूर लोट ।।'

आपल्या आरत्यासुद्धा अतिशय समृद्ध आहेत. 'लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा' किंवा 'दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी' या आरत्यांमधील शब्द, भाव, एकरूपता थक्क करणारी आहे.

अशी असंख्य उदाहरणे देता येतील. गद्य पुस्तकांच्या तुलनेत संख्येने कमी असलेल्या कवितासंग्रहांचा प्रभाव मात्र प्रत्यक्षात कितीतरी जास्त आहे, हे लक्षात येते. मला असे वाटते की, रोजच्या जगण्याच्या धावपळीत मनातले जे हळवे, तरल, सच्चे विचार आपण दडपून टाकत असतो, किंवा ज्यांचे स्पष्ट रूप आपल्यालाच कळत नसते, त्यांचा अनुभव आपल्याला कविता वाचताना येतो. तो अनुभव आपल्याला एका वेगळ्या उंचीवर नेतो. जगण्याला सूत्ररूपाने आधारही देतो.

छापील कविता मनातल्या मनात वाचणे आणि ती कुणीतरी प्रभावीपणे वाचलेली ऐकणे, यात पुष्कळ फरक होतो. कवितेमधील शब्दांचे नाद, तिची लय, ह्यांची जाणीव कविता ऐकल्यावर होते आणि त्यातून कवितेचा भावार्थही अधिक उलगडत जातो. शाळा-महाविद्यालयांमध्ये चांगल्या शिक्षकांनी वर्गात वाचून दाखवलेल्या कविता त्यामुळेच मनात ठसतात. कवितेचे सादरीकरण हा एक स्वतंत्र विषय आहे, हे मुंबई मराठी साहित्य संघाने त्या विषयावर आयोजित केलेल्या कार्यशाळेमध्ये समजून आले. ज्येष्ठ कवी पद्मभूषण मंगेश पाडगांवकर यांनी त्या कार्यशाळेचे उद्घाटन केले व कविवर्य शंकर वैद्यांनी समारोप केला. त्या दोघांनी सादरीकरणातील बारकावे समजावून सांगितले आणि कवितावाचनाचे मर्म उलगडून दाखवले. वाचकाने एकट्याने पुस्तकात वाचलेली कविता त्याला उमगण्यासाठी त्याची एकाग्रता










असावी लागते; आणि थोड्या अवकाशात खूपसा भावानुभव समजून घेण्याची तयारीही लागते. तशी तयारी फार थोड्यांची असते. त्यामुळे कदाचित कविसंमेलने लोकप्रिय होत असावीत. अशा वेळी एक निवांत वातावरण तयार झालेले असते. श्रोते शब्द स्वीकारण्याच्या मनःस्थितीत असतात. एरवी व्यावहारिक विचारांनी बधिर झालेली मने भाव-भावनांच्या प्रभावाखाली येतात. कवितांना उत्स्फूर्त दाद मिळते. अशी दाद मिळत गेल्यामुळे कवींनाही उत्साह वाटत असतो. त्यामुळेच नवोदित कवींना अशा संमेलनांमध्ये सहभाग मिळावा अशी तीव्र इच्छा असते. काही कविता मंचीय असतात, काहीशा मेलोड्रॅमॅटिक असल्याने समूह-प्रभावी वाटतात, तर काही करमणूक प्रधान असतात, हे खरे आहे. परंतु साध्या शब्दांमध्ये मांडलेल्या प्रामाणिक, गंभीर कवितांनाही चांगली दाद मिळते, हे मी पाहिले आहे. अनेकदा अगदी अपरिचित, नवख्या कवींच्या कविताही रसिक उचलून धरतात.

छंदोबद्ध कविता गेय असतात आणि गेय कविता अधिक लोकप्रिय होतात हे सर्वसाधारणपणे खरे असले तरी कधी कधी चाल लावून म्हटलेल्या कवितेपेक्षा नुसती वाचून दाखवलेली कविता अधिक प्रभावी वाटते. म्हणजे एखाद्या विषयावरच्या रंगीत चित्रपटापेक्षा कृष्णधवल चित्रपट जास्त विषयानुरूप वाटतो, तसे हे आहे. अलीकडे साहित्य संमेलनांमध्ये अखंड चालू राहणारा कवी कट्टा असतो. त्यातही अनेकदा चांगल्या, आश्वासक कविता ऐकावयास मिळतात.


त्यामुळे कविसंमेलनांमुळे मंचीय कवी, मंचीय कविता तयार होतात, तो एक करमणुकीचा कार्यक्रम ठरतो, हे पूर्णतया खरे नाही. त्या तुलनेत कवितांची पुस्तके कमी खपतात, ह्याची कारणे वेगळी आहेत व त्यातील काही वर नमूद केली आहेत. कविसंमेलनांमध्येही समोरच्या गर्दीला रुचतील अशा कविता वाचण्याऐवजी त्यांना समृद्ध अनुभव मिळेल अशा कविता वाचता येतील. त्यामुळे गर्दीच्या अपेक्षा बदलतील, अभिरुची उंचावेल आणि कविसंमेलन म्हणजे निव्वळ मनोरंजनाचा कार्यक्रम राहणार नाही.

– प्रा. उषा तांबे
भ्रमणध्वनी : ९८२०३२५४७३
ushatambe8@gmail.com

अशा वेळी एक निवांत वातावरण तयार झालेले असते. श्रोते शब्द स्वीकारण्याच्या मनःस्थितीत असतात. एरवी व्यावहारिक विचारांनी बधिर झालेली मने भाव-भावनांच्या प्रभावाखाली येतात. कवितांना उत्स्फूर्त दाद मिळते.






The greatest poets are those with memories so great that they extend beyond their strongest experiences to their minutest observations of people and things far outside their own self-centeredness.

(Stephen Spender)



# कवितासंग्रह आणि कविसंमेलने

**डॉ. महेश केळुसकर**



'कवडसे' हा माझा कवितासंग्रह एप्रिल २०११ मध्ये 'ग्रंथाली'ने प्रकाशित केला. मला त्याच वेळी रॉयल्टी आणि काही प्रती पोच झाल्या. पण या संग्रहाची पहिली आवृत्ती संपली की अजून संपायची आहे, याबाबत मला काहीच अंदाज नाही. माझे मित्र आणि 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांना २०१५ मध्ये कधीतरी मी भेटलो आणि दुसरा कवितासंग्रह काढणार का? अशी विचारणा केली. तेव्हा ते म्हणाले की, ''खरं सांगायचं तर कवितासंग्रहांना मार्केटमध्ये फारसा उठाव नाही आणि...'' मी काय समजायचं ते समजलो आणि निघालो.

हिंगलासपूरकर सत्य तेच बोलले आणि आपला दुसरा कवितासंग्रह ते काढत नाहीत, याचं थोडं वाईट वाटलं तरी कवी म्हणून मार्केटचं वास्तवही कोणीही स्वीकारलंच पाहिजे. काय आहे ते वास्तव? माझा पहिला कवितासंग्रह 'मोर' १९८६ साली निघाला. त्याला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचं अनुदान मिळालं होतं. मी तिकडे दूर सावंतवाडीत आणि प्रकाशक-'इंद्रायणी'-पुण्यात. मला अनुभव शून्य. अत्यंत बेकार कागद आणि महाबेकार लेआऊट वापरून प्रकाशकांनी ५०० प्रती काढल्या. मला रॉयल्टीबियल्टीचा एक दमडा मिळाला नाही. उलट जिल्हा परिषदेचे तत्कालीन शिक्षणाधिकारी माझ्या कवितेचे चाहते आहेत, याचा संबंध लावून प्रकाशकांनी माझ्यातर्फे त्यांच्या गळयात ३०० प्रती मारल्या. 'म.टा.'मध्ये रवीन्द्र पिंगे यांनी 'मोर'वर सहा ओळींचा अभिप्राय लिहिला. पु. ल. देशपांडे, जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक, शंकर रामाणी अशा मोठ्या साहित्यिकांनी खाजगी पत्रांमधून 'मोर'ची भलामण केली. पण त्याचं मार्केटिंग करणं मला जमलं नाही.

१९९६ साली 'अक्षर प्रकाशन'ने 'पहारा' काढला. ३० वर्षे झाली. पहिली आवृत्ती अद्याप संपलेली नाही. डिसेंबर १९९७ मध्ये 'मॅजेस्टिक'ने 'झिनझिनाट' काढला. ह्या मालवणी कवितांच्या संग्रहाची दुसरी आवृत्ती फेब्रुवारी २००९ मध्ये 'ग्रंथायन' प्रकाशनाने काढली. त्यांचं तर सगळं विक्रीचं गणितच बिघडलं आणि २०१५च्या सुरुवातीला त्यांच्या गोदामामधून मला 'झिनझिनाट'च्या बहुतेक सगळ्या प्रती आणाव्या लागल्या. त्यांचं वितरण करणं मला अद्याप जमलेलं नाही. राजकीय भाष्यकवितांच्या 'मस्करिका' या २००९ मध्येच 'झिनझिनाट'-बरोबर काढलेल्या माझ्या कवितासंग्रहाच्या सगळ्या प्रतीही त्यांनी घेऊन जायला सांगितल्या. माझं भाग्य थोर की माझे कवितासंग्रह ज्यांनी काढले त्यांपैकी एकाही प्रकाशकाने उलट माझ्याकडून पैसे घेतले नाहीत.

पण माझ्या माहितीत असे माझे अनेक कविमित्र आणि कवयित्री आहेत, की ज्यांना आपापले कवितासंग्रह निघावेत म्हणून प्रकाशकांना पैसे द्यावे लागलेत. ह्यात केवळ नवोदितच नव्हे तर काही नामवंत कवी-कवयित्रींनी पैसे देऊन आपले संग्रह काढलेले आहेत. मार्केटमध्ये सगळ्यात जास्त मागणी आहे पाडगावकरांच्या कवितासंग्रहांना. विंदा, सुरेश भट, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, ग्रेस अशा काही मोजक्या कवींच्या कवितासंग्रहांनाही बऱ्यापैकी मागणी आहे. पण बाकी सगळा आनंद आहे. जे कवी आणि त्यांचे प्रकाशक विद्यापीठीय अभ्यासक्रमात आपापले कवितासंग्रह लावण्यात यशस्वी होतात, त्यांच्या आवृत्त्या अर्थातच लवकर संपतात. रामदास फुटाणे, फ. मुं. शिंदे, नायगावकर, अशोक बागवे, अरुण म्हात्रे, इंद्रजित भालेराव, दासू वैद्य, सौमित्र या कवितेच्या रसिकांमध्ये प्रिय असलेल्या कवींनी आणि प्रज्ञा दया पवार, नीरजा, कल्पना दुधाळ, राधा भावे अशा काव्यवाचनाला चांगली दाद घेणाऱ्या कवयित्रींनीही आपल्या कवितासंग्रहांच्या विक्री व वितरण व्यवहाराबद्दल सत्य परिस्थिती मराठी ग्रंथजगताला सांगावयास हवी.

कथा, कादंबऱ्या, आत्मचरित्रे, धार्मिक, आरोग्य, पाककलाविषयक वगैरे पुस्तकांच्या तुलनेत कवितासंग्रहांना, तसंच काव्यसमीक्षकांना कमी उठाव असल्याचे ग्रंथविक्रेते सांगतात आणि ते खरंही असणार. पण मग असा सगळा आतबट्ट्याचा व्यवहार असताना नित्य नवे कवितासंग्रह कसे निघत असतात? त्यांचे वितरण कोण करतं? ते संग्रह लोकांपर्यंत पोहचतात तरी का? बऱ्याच कवितासंग्रहांना वेगवेगळे पुरस्कारही जाहीर होत असतात, मग फेसबुक-व्हॉट्सॲपच्या माध्यमातून त्यानिमित्ताने जाहिरातही केली जाते. पण तरीही आवृत्ती संपायला किती वेळ लागणार? ह्या प्रश्नाचं उत्तर

कोणालाही आत्मविश्वासाने देता येत नाही. काही उत्साही कवी आपल्या नातेवाइकांच्या, कार्यालयातील सहकाऱ्यांच्या, कॉलनीतल्या शेजाऱ्यांच्या गळ्यात आपल्या कवितासंग्रहाच्या प्रती मारून अल्पावधीत आवृत्ती संपल्याच्या फुशारक्या मारत असतात. पण पुस्तक विक्रेत्यांकडून काही वाढीव मागणी आली का, असा प्रश्न त्यांना विचारला तर गप्प होतात.

१९७६-१९७९ या कालावधीत माझे गुरू कवी (दिवंगत) वसंत सावंत यांच्याबरोबर मी कुठे कुठे दूरपर्यंत कविसंमेलनांना जायचो. सावंतवाडीच्या दक्षिण रत्नागिरी साहित्य संघाच्या कोजागिरी कविसंमेलनात बोरकर, विंदा, बापट, पाडगांवकर, सुर्वे, दया पवार, विठ्ठल वाघ, आनंद यादव अशा मोठमोठ्या कवींना ऐकायचो. या कविसंमेलनांना बऱ्यापैकी गर्दी असायची. कविसंमेलनं झाल्यानंतर त्या त्या गावात किमान सहा महिन्यांपर्यंत कवितांची आणि कवींची चर्चा असायची. पण त्या वेळीही कवितासंग्रहांना मागणी वाढल्याचं आम्हाला कधी दिसलं नाही.

ज्यांना स्वतःचीच कविता चांगल्या रीतीनं सादर करता येत नाही अशा काही कवींनी आणि जड दृष्टीच्या काही समीक्षकांनी अशी आवई उठवली आहे की लोकांमध्ये प्रिय असलेल्या कवींनी रसिकांना बध्ये बनवले. अशा प्रकारच्या बालिश हेत्वारोपांना यापूर्वी उत्तरही देण्यात आलेलं आहे. या आक्षेपामध्ये आणखी एक गर्भित आरोप असा की लोकप्रिय कवींनी रसिकांना बध्ये बनवल्यामुळे रसिकांची कवितासंग्रह विकत घेऊन वाचण्याची इच्छा नाही. पण खरी गोष्ट अशी आहे की ज्यांना कवितासंग्रह विकत घेऊन वाचायचे असतात ते विकत घेतात, ज्यांना फक्त कविसंमेलने ऐकायची असतात ते लोक फक्त कविसंमेलने ऐकतात आणि काहीजणांना कवितासंग्रह विकत घेऊन वाचण्याचीही सवय असते आणि कविसंमेलनं ऐकण्याचीही आवड असते.


प्रभावी सादरीकरण करणारे कवी-कवयित्री (ज्यांना 'मंचीय कवी' असे तुच्छतादर्शक विशेषण लावले जाते.) लोकांचे मनोरंजन करण्यासाठी काव्यवाचन करतात, असं म्हणणाऱ्यांनी या कविसंमेलनांना हजेरी लावली पाहिजे. तसं केल्यास त्यांना कळेल की गंभीर आणि अंतर्मुख करणाऱ्या कवितांनाही किती प्रचंड प्रतिसाद मिळतो ते. अगदी अलीकडची एक घटना सांगायची म्हणजे, १२ मार्च २०१६ रोजी पुण्यात दरवर्षीप्रमाणे यशवंतराव चव्हाण जयंतीनिमित्त एक कविसंमेलन झालं. त्यात तुकाराम धांडे आणि भरत दौंडकर यांनी दुष्काळावरच्या कविता वाचल्या. दीड-दोन हजारांच्या ऑडियन्सने पुनःपुन्हा त्यांना वन्स मोअर दिला. अभिनेते नाना पाटेकर यांनी या दोघांना जवळ घेऊन खुली दाद दिली. तेव्हा सांगायचा मुद्दा म्हणजे कविसंमेलनांमध्ये नेहमी मनोरंजनच असते असे नव्हे. रात्री साडेनऊला सुरू झालेले ते कविसंमेलन फक्त दहा मिनिटांचा मध्यांतर घेऊन रात्री दीड वाजेपर्यंत चालले. एकही रसिक मधेच बाहेर गेला नाही.

आता लगेच प्रश्न येणार की मग ह्या कविसंमेलनानंतर तुकाराम धांडे आणि भरत दौंडकर यांच्या कवितासंग्रहांवर उड्या पडल्या का? तर नाही. पण त्यांचे कवितासंग्रह कुठे मिळतील अशी चौकशी मात्र अनेकांनी केली. त्यातल्या काहींनी ते कवितासंग्रह विकत घेतलेही असतील. काहीजण विसरून गेले असतील. माझं असं मत आहे की जेथे जेथे कविसंमेलने होतात,

**मार्केटमध्ये सगळ्यात जास्त मागणी आहे पाडगावकरांच्या कवितासंग्रहांना. विंदा, सुरेश भट, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, ग्रेस अशा काही मोजक्या कवींच्या कवितासंग्रहांनाही बऱ्यापैकी मागणी आहे. पण बाकी सगळा आनंद आहे.**




**रामदास फुटाणे, फ. मुं. शिंदे, नायगावकर, अशोक बागवे, अरुण म्हात्रे, इंद्रजित भालेराव, दासू वैद्य, सौमित्र या कवितेच्या रसिकांमध्ये प्रिय असलेल्या कवींनी आणि प्रज्ञा दया पवार, नीरजा, कल्पना दुधाळ, राधा भावे अशा काव्यवाचनाला चांगली दाद घेणाऱ्या कवयित्रींनीही आपल्या कवितासंग्रहांच्या विक्री व वितरण व्यवहाराबद्दल सत्य परिस्थिती मराठी ग्रंथजगताला सांगावयास हवी.**



Imagination is more important than knowledge. Knowledge is limited. Imagination encircles the world.

**(ALBERT EINSTINES)**

**म्हणून मग हे सगळेजण आपापला प्रदेश, आपापले कवी, आपापले समीक्षक, आपापल्या लॉब्या घेऊन मराठी कवितेच्या नावावर गुप्तपणे एकमेकांविरुद्ध कारवाया करत असतात. साठोत्तरी, नव्वदोत्तरी, चौथी नवता, मंचीय कविता, विद्यापीठीय कविता, फेसबुकीय आणि इंटरनेटीस कविता... अशी एक मोठीच धामधूम मराठी साहित्य व्यवहारात नित्यशः चालू असलेली दिसते.**

त्या त्या ठिकाणी सहभागी कवींच्या कवितासंग्रहांच्या प्रत्येकी पाच प्रती संमेलनाआधीच गोळा करून आयोजकांनी विक्रीस्टॉल लावण्याची व्यवस्था केली पाहिजे. ज्या ज्या वेळी असे स्टॉल लावलेत त्या त्या वेळी कविसंमेलनानंतर ४० ते ५० प्रती लोकांनी विकत घेतलेल्या मी पाहिलेल्या आहेत.

(मी स्वतः ह्याबाबतीत आळशी असलो तरी) कवींनी आपल्या झोळीत स्वतःच्या काव्यसंग्रहाच्या ५-१० प्रती प्रत्येक वेळी ठेवायला हव्यात. त्यात लाज बाळगण्याचं कारण नाही. सर्वांना माहितीच आहे की पुस्तकांच्या दुकानात जाऊन कवितासंग्रह विकत घ्यायचा महाराष्ट्रात काय उत्साह आहे तो! धांडे आणि दौंडकर यांच्या कविता वाचण्याची समजा तुम्हाला इच्छा झाली तर त्यांचे संग्रह तुम्हाला कुठे मिळणार? मुंबईत? पुण्यात? सावंतवाडीत? अमरावतीत? नाही मिळणार. यांपैकी एकाही ठिकाणी ते संग्रह मिळण्याची शक्यता कमी आहे. म्हणून म्हणतो की किमान जे रसिक कविसंमेलनांना हजर असतात, त्यांना संग्रह घेण्याची इच्छा झाली तर ते तिथल्या तिथे उपलब्ध पाहिजेत.

महाराष्ट्रात मुंबई-पुणे-नागपूर-औरंगाबाद या शहरांशिवाय आता गावागावांतून कविसंमेलने होऊ लागली आहेत. आणि नवे नवे प्रकाशकही पुढे येत आहेत. पुरस्कारांची आणि त्यांच्या जाहिरातबाजीची वाढही झपाट्याने होऊ लागलीय. पण ज्याला आपण quality work म्हणतो, ते किती प्रमाणात आहे? 'तुम्ही भले... आम्ही भले... मोठे कुले तिकडे जग भुले...' असा परस्पर प्रशंसेचा आणि झटपट प्रसिद्धीचा मामला मराठी कवितेच्या गुणवत्तेत खरोखरच काही भर घालतो आहे काय? या प्रश्नाचं उत्तर नकारार्थी आहे. एखाद्या भाषेतील कुठलाही वाङ्मयप्रकार पुढे जाण्यासाठी मुळात त्या वाङ्मयप्रकारात सातत्यपूर्ण सकस लिखाण होत राहावं लागतं. आपण अगदी आत्ताच्या काळात डोकावून पाहिलं तर किती प्रसिद्ध कवी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तराबर चर्चेत आहेत? हाताच्या बोटावर मोजण्याएवढेही नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.


कवी, त्यांचे प्रकाशक, कवितेला प्रमोट करणारे मंच, माध्यमे यांच्यात मराठीत तर इतके गट तट आहेत की ते समोरासमोर मैदानात उतरले तर हाणामारी होऊन मोठा हिंसाचार होईल, अशी भीती वाटते. म्हणून मग हे सगळेजण आपापला प्रदेश, आपापले कवी, आपापले समीक्षक, आपापल्या लॉब्या घेऊन मराठी कवितेच्या नावावर गुप्तपणे एकमेकांविरुद्ध कारवाया करत असतात. साठोत्तरी, नव्वदोत्तरी, चौथी नवता, मंचीय कविता, विद्यापीठीय कविता, फेसबुकीय आणि इंटरनेटीस कविता... अशी एक मोठीच धामधूम मराठी साहित्य व्यवहारात नित्यशः चालू असलेली दिसते. ज्याचे त्याचे वकील आणि न्यायालयेही स्वतंत्र आहेत. त्यामुळे शेअर बाजाराच्या निर्देशांकाप्रमाणे कवितेच्या बाजारभावातही चढ-उतार होताना आढळतात. पण इतके करून शेवटी ९ फेब्रुवारी १९०५ रोजी कवी केशवसुतांनी विचारलेला तो प्रश्न पाठलाग करत राहतोच - ''तुम्हांस जगाच्या अंधारात आपल्या बुद्धीचा किरण पाडणे आहे काय? असेल तर तुमचे हृदय उललेले आहे काय? फाटलेले आहे काय?''

**- डॉ. महेश केळुसकर**
भ्रमणध्वनी : ९८६९४८६७७१
maheshkeluskar@gmail.com



Genuine poetry can
communicate before it is understood.

**(T. S. Eliot)**



## अचानक – स्मिता भागवत

भारत – पाकिस्तान फाळणीत वासनेचं तांडव अनुभवलेला या कादंबरीचा नायक – संदीप शहा कोवळ्या वयातच अत्यंत समंजस होतो. प्रखर बुद्धिमत्ता असलेला हा नायक परिस्थितीच्या चटक्यांनी टोकाचा स्वाभिमानी आणि एकांगी बनत जातो. कोवळ्या वयात झालेली कुटुंबाची वाताहत, अत्यंत प्रेमळ आणि कष्टाळू पित्याने केलेली आत्महत्या, दांपत्य जीवनात आलेले दारुण अपयश आणि आपल्या अपत्यांना आपण मायेची ऊब देऊ न शकल्याचा गंड, या सगळ्याची बोच त्याला अस्वस्थ करत राहते. नायकाच्या या मनोवस्थांची चित्रणे लेखिकेने अत्यंत समर्थपणे साकारली आहेत. कादंबरीचे कथानक सत्य घटनेवर आधारित असल्याने नायकाचा मानसिक संघर्ष वाचकाला अस्वस्थ केल्याशिवाय राहत नाही.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

---



## ... पुत्र मानवाचा! – स्मिता भागवत

रखरखीत आयुष्यात ओअॅसिस ठरावं त्याप्रमाणे अंबरीषच्या आयुष्यात आलेली मीना त्याचं अवघं जीवनच बदलून टाकते. पण जितक्या वेगाने त्याच्या आयुष्यात सुखाची पालवी फुटते तितक्याच वेगाने आणि आकस्मिक त्याच्या आयुष्याचं पुन्हा वाळवंट होतं, ते मीनाला झालेल्या अपघाताने! त्यानंतर भेटलेल्या अर्चनाशी झालेली जवळीक आणि मीना शुद्धीत आल्यानंतर नायकाच्या– अंबरीषच्या मनातील आंदोलने लेखिकेने समर्थपणे टिपली आहेत. नायकप्रधान या कादंबरीत स्त्री-पुरुष नात्याची वीण सांधताना मानवी मनातील संघर्ष ठळकपणे साकारला आहे. माणसाच्या आयुष्याची दोर नियतीच्याच हातात असल्याने 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा!' या ओळीचा प्रत्यय या कादंबरीतून येतो.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

---



## आर्त माझ्या बहु पोटी – विजय शं. माळी

''एवढं सगळं असूनही ना 'इथं' कधी रमलो, ना कधी आपलं वाटलं, ना इथल्यांनी तसं कधी जाणवू दिलं. 'तिथं' आपण मनापासून रमतो, ते आपलं वाटतं पण तिथले आपल्याला आपलं मानत नाहीत. माणसं मतलबांना आपलं मानतात तो सोडून इतरांना परकं आणि मग मतलबाविना माणूस परक्या मुलखात परका होतोच पण तो सांभाळता नाही आला तर दस्तुरखुद्द आपल्या घरात, आपल्या मुलखातही. या मानवनिर्मित निसर्गनियमाला माती मात्र आजही अपवाद आहे. जे तिच्या सान्निध्यात आलं ते उभं राहिलं, फुललं फळलं, बहरलं. लडखडत्या पावलात तिनं बळच भरलं. नगण्य अपवाद वगळले तर माणसानं मात्र आपला पाय आडवाच घातला. 'माती' आणि 'माणूस' मग तो रक्ताचा का असेना यातला फरक हाच! मातीला सगळ्यांचीच माया, तिची सारीच लेकरं. मलाही तिच्यासारखं होता येऊ दे. कुणी माझ्याशी कसंही वागलं, कितीही वाईट वर्तन केलं तरी. तिचं मातीपण, तिचं ममत्व, माझ्या रंध्रा रंध्रात उतरू दे. धमन्यातून वाहू दे. शक्य झालं तर सर्वांच्याच. मला कुणी परका मानू नये, उपरा ठरवू नये. मी ही या मातीचा आहे, माझ्या मातीमायचं तुमच्यासारखंच लेकरू!''

आपला गाव आणि तिथल्या मातीवर विलक्षण प्रेम करणाऱ्या मनस्वी नायकाची, जीवनाच्या विविध अंगांना थेटपणे भिडताना विविध प्रश्न उभे करत; समकालीन कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक पर्यावरणाचा अचूक वेध घेणारी; अत्यंत सूक्ष्म, ओघवत्या, चिंतनगर्भ; आपल्या अशा खास शैलीत लिहिलेली, काळजाला भिडणारी महत्त्वपूर्ण कादंबरी.

**मूल्य ६५० रु. सवलतीत ४०० रु.**



otespedia.info



# कविसंमेलने आणि कवितासंग्रह विक्री

हर्षदा सौरभ

कवीचे आयुष्य सोपे असते यासाठी -
की केवळ एक जरी अस्सल कविता लिहिली
तरी मरायची मुभा असते त्याला!
कवीचे आयुष्य अवघड असते यासाठी -
की शेवटच्या श्वासापर्यंत
असे काही लिहिल्याची खात्री नसते त्याला!!

- संदीप खरे

**किती** खऱ्या आहेत या ओळी. पण कवीसाठी इतकी मूल्यवान असणारी कविता वाचकासाठी काय असते? किती महत्व असतं त्याच्यालेखी या कवितेला? केवढा संग्रह असतो, त्यातलं काय भावतं, आणि त्याविषयी त्याचं मत काय असतं? मी स्वत:लाच हे प्रश्न विचारले तेव्हा त्यातून निर्माण झाला हा संवाद.

आमच्या घरात मी आणि माझा नवरा सौरभ आम्हा दोघांकडे मिळून साधारणत: ५०० पुस्तकांचा संग्रह आहे. आमच्या दोघांच्याही वाचनाच्या आवडी भिन्न आहेत. सौरभला मानववंशशास्त्र, चळवळ, आंदोलन-विषयक, सामाजिक, विद्रोही, वैचारिक साहित्य वाचनाची जास्त आवड आहे. माझा ओढा ललित आणि वैचारिक साहित्याकडे जास्त आहे. कविता हा माझा विशेष आवडता प्रांत. ५०० मध्ये साधारणत: २५०-२५० असा आमचा वैयक्तिक संग्रह होईल. सौरभच्या संग्रहात कविताविषयक चार-पाच पुस्तके आहेत. माझ्या संग्रहात ७०-८० कवितासंग्रह आहेत. याशिवाय कवितेवरची नियतकालिके, दिवाळी अंक आणि आता इंटरनेटच्या माध्यमातून कवितावाचन होते.

संत कवी, पंत कवी आणि तंत कवी मी कमी प्रमाणात वाचले आहेत. त्यातही ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास यांच्या रचना भावून जातात. विवेकी विचारसरणी आणि जीवनपद्धत आचरताना वेळोवेळी साहाय्य करतात. तंत कवींपैकी माझी मैना गावाकडं राहिली'सारखी लावणी माझ्या सीमावासीय संस्कारातल्या मनाला चटका लावून जाते. अनेक पोवाडे स्फूर्ती देतात. पण तरीही माझा कल आधुनिक कवींच्या कविता वाचण्याकडे जास्त आहे.

आधुनिक कवींमध्येही वेगवेगळे प्रवाह आहेत. केशवसुतांनी आधुनिक मराठी काव्याची तुतारी फुंकली. नंतर त्यात रविकिरण मंडळ, स्त्रीवादी कविता, ग्रामीण कविता, विद्रोही कविता, गीते, मर्ढेकरांचे नवं काव्य, साठोत्तरी कविता, अरुण कोलटकरांच्या कविता, दिलीप चित्रेंच्या कविता, नव्वदोत्तरी कविता, इंटरनेटवरचे कवी असे विविध प्रवाह आले. विशेषत्वाने वाचलेल्या कवींविषयी सांगताना मी ही विभागणी समकालीन कवी आणि त्या आधीचे कवी अशा प्रकारे सांगेन.

समकालीनच्या आधीचे कवी पाहता मी वाचलेले कवी कुसुमाग्रज, बालकवी, पाडगांवकर, बोरकर, आरती प्रभू, अनिल, इंदिरा संत, मर्ढेकर, विंदा करंदीकर, वसंत बापट, शांता शेळके, नारायण सुर्वे, माधव ज्यूलियन, सुरेश भट केशवकुमार असे सांगता येतील. त्यात विशेषत्वाने मी वाचलेल्या कवींविषयी बोलताना पहिला उल्लेख मी करेन- कुसुमाग्रजांचा.

त्यांच्या कवितेबद्दल त्यांच्याच भाषेत सांगायचे झाल्यास-

समिधाच सख्या या, त्यात कसा ओलावा,
कोठून फुलापरि वा मकरन्द मिळावा?
जात्याच रुक्ष या, एकच त्या आकांक्षा,
तव आंतर अग्नी क्षणभर तरि फुलवावा ।।

हे आंतरअग्नी फुलवण्याचं सामर्थ्य मला माझ्या जीवनात अनेक वेळा बळ देतं. 'किनारा तुला पामराला' म्हणणारा आशावाद, किरणांचा पसारा उधळून काळोखावर लेणी खोदणारा देवदूत, स्वत:शीच दोन ध्रुवांचे अंतर राखणारा मी, आग्र्याच्या किल्ल्यात पोलादाच्या तुकड्यावर फुटून पडणारी बिलोरी ऐश्वर्याची काच, कोण गेला आणि कोण राहिला, याचे कोडे जन्मभरासाठी मागे ठेवणारे स्वत:चे पिशाच, येशूच्या काळजात अजून एक जखम करणारी जालियानवाला बाग घटना, रात्रीच्या गर्भातला उद्याचा उष:काल, गळ्यातील चांदण्यांचे हात, परमेश्वराच्या पाउलचिन्हांनाच विचारलेली त्याच्या अस्तित्वाची शंका, विज्ञानाची शिडी लावून चढता येणाऱ्या चंद्राशी नाते नसलेला नटखट, सोंगी-ढोंगी चंद्र, आकाशमातीच्या संघर्षातलं जखमांचं देणं, आषाढघनाशी झुंजणाऱ्या वादळवातासारखे झुंजणारे अहि-नकुल अशी कुसुमाग्रजांची प्रत्येक कविता सामाजिक संबंध जोडत राहते. आंतर अग्नी फुलवत राहते. सामान्यजनांचे दिव्यत्वाशी नाते जोडते. म्हणूनच वसंत बापट म्हणाले असावेत :

हे कुसुमाग्रज, तुम्ही रहिवासी गगनाचे,

परि कृतार्थ केली मराठी माती;
या मातीमधल्या अगण्य अणुरेणूंची,
जोडलीत साऱ्या नक्षत्रांशी नाती

जीवनात मला पदोपदी मार्ग दाखवणाऱ्या, सोबत करणाऱ्या कवितांमध्ये अनिलांच्या कविताही प्रामुख्याने येतात. अनिलांनी दशपदीची सुरवात केली. 'चिनी निर्वासित मुलास' हा दीर्घकाव्याचा प्रयोग केला. पण मला विशेषत: 'सांगाती' हा काव्यसंग्रह जास्त आवडतो. जीवनात निर्णय घेतल्यावर होणाऱ्या धाकधुकीच्या क्षणी रोबर्ट फ्रॉस्टच्या 'The road not taken'शी साधर्म्य सांगणारी त्यांची 'दोन वाटा' आठवते, 'हाती हात धरून चालवणारा तू कोण? जेथे जातो तेथे माझा काय म्हणून सांगाती?' असं ठामपणे विचारणारी 'सांगाती' स्वावलंबी बनवते. स्वातंत्र्यानंतर अवघ्या पाच वर्षांत सारेच दीप कसे मंदावले आता' मनात खळबळ निर्माण करते. 'तसे काहीच जवळ नव्हते, फक्त हाती हात होते' म्हणणारी 'आणीबाणी' संकटात बळ देते, 'हृदयावरची विचारांची धूळ जेथे हळूहळू निवळत जाते' त्या तळ्याकाठी' मन शांत होते, निर्वेद क्षण हा रितेपणाचा, आपला आपण थांग घेण्याचा, तटस्थ मीही तटस्थ पसारा, अंधारी रात्र, सागर किनारा' ही कविता तर एका 'तटस्थ' अवस्थेला नेऊन पोहचवते.

इंदिरा संतांच्या कवितेशी तर 'कविता म्हणजे काय' हे कळण्याच्या आधीपासूनचा संबंध. चार-पाच वर्षांची असताना मी बाबांना विचारलं होतं, 'शाळा का असते?' त्यांनी उत्तर म्हणून इंदिरा संतांच्या कवितेतील ओळी सांगितल्या,

बाटचाल ही पुढची दुस्तर
सुसह्य व्हावी म्हणून इथे तर
नाल खुरांना घेती ठोकून
नाल  खुरांना घेती ठोकून...

इंदिरा संतांच्या कवितेवर आत्ममग्नपणाची टीका झाली आहे. पण मला त्यांच्या कवितेतली तरलता खूप भावते. दैनंदिन  जीवनातील साध्या साध्या वस्तूंशी सहज नाती जोडत ही कविता भावभावनात रमते. या कवितेत कधी सुखदु:खांमधून कळ निघून गेलेली 'ही अशी, ती तशी' येते, तर कधी शिक्षिकेची तगमग व्यक्त करणारी 'कुटुंबातली नीटस पोर येते', कधी लुतभरू कुत्र्याने पाणी पिल्यावर उजळलेले पल्वल (डबके) येते तर कधी मुरलीरव माझ्यास्तव मानणारी 'कुब्जा'. कधी 'चिमुकली पाहुणी' येते तर कधी 'अवेळी धिंगाणा घालणारा पाउस'. कधी 'मध्यमवर्गीय गार्गी' येते तर विटीदांडूच्या खेळात रंगलेला  बाळ'. कधी चंद्र हातच्याला घेतल्यावरही 'बाकी' उरते, तर कधी वसुंधरेने हृदयाशी धरलेला 'शेला' येतो, कधी लाल मऊ धुळीत उमटणारी 'खूण' तर कधी 'पेले तुरुतुरु येतात.' कधी काटकोनात कर्ण साधून मारलेल्या शापितेच्या 'फेऱ्या' तर कधी  पत्राच्या घडीघडीतून उलगडणारी सुवासिक 'वीज.' भोवतालचे सजीव, निर्जीव सारेच त्यांच्या कवितेतून आपले बनून फेर धरतात.

विशेषत्वाने वाचलेल्या कवींमध्ये मंगेश पाडगांवकर आल्याशिवाय कसे राहतील? त्यांच्या प्रेमकविता, भावगीते, बोलगाणी, बालकविता आणि मोरूच्या कविता प्रचंड गाजल्या. पण त्याबरोबरच मला त्यांच्यातला

**हॉटेल, मॉल, हिंदी चित्रपट, गाड्या, मोबाइल यावर सढळहस्ते पैसे खर्च करून ते मिरवण्यात येतात. तितकी प्रतिष्ठा कवितासंग्रह विकत घेण्याला आहे असा विचार कितीजण करतील?**

**"PERHAPS NO PERSON CAN BE A POET, OR EVEN ENJOY POETRY, WITHOUT A CERTAIN UNSOUNDNESS OF MIND."**

**THOMAS B. MACAULAY**

**आपली कविता उत्साहात सादर करणारे अनेक कवी प्रत्यक्षात किती वाचतात हा मोठा प्रश्न. सोशल मीडियावरही प्रसिद्ध असणाऱ्या अनेक कवींशी संवाद साधल्यावर लक्षात येतं की त्याचं वाचन पन्नास वर्षांपूर्वीच्या गाजलेल्या कवितांपुरतं मर्यादित असतं. आत्ता कोण कोण लिहितात, कसं लिहितात ते त्यांना सांगता येत नाही.**

सलाम' लिहिणारा बंडखोर जास्त भावतो. आणीबाणीच्या काळात 'कोठेही कापावी, कुणीही छापावी, अशी घराणेदार, नम्र, साधी, सोपी कविता' किंवा 'भिंतीची सवय होईल, सवयीची भिंत होईल' हे लिहिण्याचं त्याचं सामर्थ्य मला भारावून टाकतं. सावधान खाली मान, बंद डोळे बंद कान'मधला उपहास काळीज भेदून जातो. पण अशा कविता लिहिणारे पाडगांवकर स्वभावत: आनंदयात्री आहेत. जीवनावर ते शतदा प्रेम करतात. त्यांना गाणे वाटेत भेटते. झऱ्यातून सतारी वाजताना ऐकू येतात, सुखाला मधुर सुवासाची भोवळ येते, गतजन्मीची ओळख सांगत गंधित वारा येतो. आणि तरीही इतक्या सुखातही त्यांच्यातला जिप्सी मात्र असुखीच राहतो.

समकालीन कवींमध्ये मी विशेषत्वाने वाचलेले कवी आहेत प्रशांत असनारे, किरण येले, सतीश सोळांकूरकर, संदेश ढगे, श्रीकांत कोरान्ने, चंद्रशेखर सानेकर, अजय कांडर, आसावरी काकडे, कल्पना दुधाळ, अंजली कुलकर्णी, संगीता बर्वे, संदीप खरे, सौमित्र, प्रदीप निफाडकर, अशोक बागवे, अरुण म्हात्रे, अविनाश ओगले, महेश केळुसकर, दासू वैद्य, हेमंत गोविंद जोगळेकर, प्रवीण दवणे, लक्ष्मीकांत प्रामाणिक, मंदाकिनी पाटील, सिसिलिया कार्व्हालो, अजीम नवाज राही, ऐश्वर्य पाटेकर. बालाजी सुतार, सुनीति लिमये, चैताली आहेर, प्रणव सखदेव, गीतेश गजानन शिंदे ही वेगळ्या वाटेने लिहिणारी अगदी अलीकडची पिढीही भावते.

यातील अनेकांच्या कविता प्रामुख्याने मुक्तछंदात आहेत. आणि कवितेतून ते विशेषत: एक विचार मांडतात. वर्णनात्मक कविता, छंद मात्रांची कविता, भाषाप्रभुत्व दाखवणाऱ्या कविता याहीपेक्षा विचार, कल्पना, भावना या कवितांमधून प्रामुख्याने मांडल्या जातात. प्रशांत असनारेंचा 'मीच माझा मोर' हा संग्रह, किरण येलेंचा 'बाईच्या कविता', सोळांकूरकरांचा 'सांगण्यासारखं' अजय कांडरांचा 'हत्ती इलो' आसावरी काकडेंचा 'आरसा', अंजली कुलकर्णींचा 'बदलत गेलेली सही', संगीता बर्वेंचा 'दिवसाच्या वाटेवरून', संदीप खरेंची 'नेणिवेची अक्षरे', अविनाश ओगलेंचा 'काजवा', संदेश ढगेंचा 'शेवटचे वृत्त हाती आले तेव्हा', श्रीकांत कोरान्नेंचा 'मारव्याची फुलं' ही अशा कवितेतून एक विशिष्ट विचार, भूमिका मांडणाऱ्या कवितासंग्रहाची काही उदाहरणे.

कविसंमेलनाला रसिकांची नेहमी गर्दी असते पण त्यामानाने कवितासंग्रह विक्रीचे प्रमाण कमी आहे. याबद्दल विचार केल्यावर काही करणे समोर आली.

१. कोणतीही अभिव्यक्ती जास्तीतजास्त इंद्रियांशी अधिकाधिक प्रकारे संवाद साधते तेव्हा ती मेंदूवर अधिक ठसते. वाचतांना आपण डोळ्यांनी वाचतो. मग ते शब्द मेंदूत जातात. आणि मेंदू त्याचा अर्थ लावतो. कविसंमेलनात दृकश्राव्य दोन्ही माध्यमातून आपल्याला कविता भिडत असते. त्यातही ऐकवणाऱ्याची देहबोली, चेहऱ्यावरील भाव, हातवारे, आवाजातले चढ उतार, विरामाच्या जागा हे कविता अधिक परिणामकारकरीत्या पोचवू शकतात.

२. कविसंमेलने बहुतेक वेळेला विनामूल्य बघता येतात. पैसे खर्च करून पुस्तकं-त्यातही कवितासंग्रह-विकत घेण्याची मानसिकता



**Poetry does not belong to those who write it, but to those who need it.**

**(PABLO NERUDA)**

समाजात रुजली नाही. याला पैसे कमी आहेत हेच कारण असेल असे नाही. हॉटेल, मॉल, हिंदी चित्रपट, गाड्या, मोबाइल यावर सढळहस्ते पैसे खर्च करून ते मिरवण्यात येतात. तितकी प्रतिष्ठा कवितासंग्रह विकत घेण्याला आहे असा विचार कितीजण करतील?

३. कविसंमेलनाला असलेली गर्दी अनेकवेळेला तिथे कविता वाचणाऱ्या कवींची आणि त्यांनी हौसेने बरोबर आणलेल्या मित्रमंडळींची असते. 'थोडासा तू मला दाद दे, मी तुला देतो' असाही प्रकार असू शकतो. आपली कविता उत्साहात सादर करणारे अनेक कवी प्रत्यक्षात किती वाचतात हा मोठा प्रश्न. सोशल मीडियावरही प्रसिद्ध असणाऱ्या अनेक कवींशी संवाद साधल्यावर लक्षात येतं की त्याचं वाचन पन्नास वर्षांपूर्वीच्या गाजलेल्या कवितांपुरतं मर्यादित असतं. आत्ता कोण कोण लिहितात, कसं लिहितात ते त्यांना सांगता येत नाही.

४. कवितेच्या आशयापेक्षा अनेकांना परफॉर्मन्स बघणं आवडतं. त्याद्वारे सिलेब्रीटीजना बघणं, दर्जेदार आणि लोकप्रिय यातली गल्लत, एकट्याने वाचण्यापेक्षा सामूहिक आनंद घेण्याची पद्धत ही यामागची कारणं असू शकतात. संमेलनाला असलेली गर्दी ही त्यामुळे अनेकदा पाहणाऱ्यांची असते, वाचणाऱ्यांची नसते.

५. कविसंमेलनात अनेक कवी त्यांची एखाददुसरी कविता वाचणार असतात. तिथे ते सादरीकरणाला त्यांच्या सर्वोत्तम, गाजलेल्या, लोकप्रिय अशा कविताच वाचतात. कवितासंग्रहात मात्र साधारणत: एकाच कवीच्या गाजलेल्या किंवा न गाजलेल्या, उत्तम किंवा उत्तम नसलेल्या अशा अनेक कवितांचं मिश्रण असतं.

६. कविसंमेलनांची जाहिरात जितक्या प्रमाणात आणि जितक्या आकर्षक पद्धतीने होते. तितकी काव्यसंग्रहांची होत नाही.

या मुद्यांवरून असं म्हणता येईल की कविसंमेलने काही अंशी करमणुकीचा कार्यक्रम होत चालली आहेत. पण हेही खरं, की खरे जाणकार वाचक, मग ते अल्प प्रमाणात का असेनात, अजूनही पुस्तके घेतात, वाचतात, त्यावर चर्चा करतात, विचार करतात, स्मरणात ठेवतात आणि त्यांच्या संग्रही ठेवतात. शेवटी पिढ्यान्‌पिढ्या साहित्य हे अशाच लोकांनी तरून नेलंय, इंद्रायणी फक्त प्रतीक होती.

– हर्षदा सौरभ
भ्रमणध्वनी : ९४०४६१२९४८
harshadas17@gmail.com

**कविसंमेलनात अनेक कवी त्यांची एखाददुसरी कविता वाचणार असतात. तिथे ते सादरीकरणाला त्यांच्या सर्वोत्तम, गाजलेल्या, लोकप्रिय अशा कविताच वाचतात. कवितासंग्रहात मात्र साधारणत: एकाच कवीच्या गाजलेल्या किंवा न गाजलेल्या, उत्तम किंवा उत्तम नसलेल्या अशा अनेक कवितांचं मिश्रण असतं.**

॥ग्रंथाली॥

सातवी आवृत्ती प्रसिद्ध....



**हुमान**

**संगीता उत्तम धायगुडे**


संगीता धायगुडे यांचा एकूणच जीवनप्रवास एक 'हुमान' – कोडे आहे. नियतीने घातलेले. 'आंधळी' गावच्या एका डोळस मुलीचे हे आत्मकथन! एकाच वेळी ते मनाला चटका लावणारे... मनाची पकड घेणारे... कोडे घालणारे... आणि कोड्याची उकल करणारे असे झाले आहे.

– डॉ. सिसिलिया कार्व्हालो

**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २२० रु.**

॥ग्रंथाली॥

**आहारसंहिता – श्यामा रानडे**




भारतासह अनेक विकसनशील देशांत हृदयविकार, अतिरक्तदाब, मधुमेह, सांधेदुखी यांसारख्या जीर्णत्वसदृश विकारांचे आणि कर्करोगासारख्या गंभीर विकारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. ह्याचे महत्त्वाचे कारण आहे, लोकांचे चुकीच्या आहारपद्धतीतील खाद्यपदार्थांचे अमर्याद आकर्षण. अशा परिस्थितीत प्रत्येक सुजाण व्यक्तीला सुयोग्य आहार कसा असावा याविषयी निश्चित कल्पना असणे महत्त्वाचे आहे. अनेक विकारांपासून संरक्षण मिळवून आरोग्यसंपन्न व कार्यक्षम जीवनाचा आनंद मिळवण्यास अशा आहाराची निश्चित मदत होईल.

– श्यामा रानडे

**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**



# कवितासंग्रह खरेदीत अनुत्साह का?

**महेश पवार**

**काही घडलं की घ्या कविसंमेलन हा खाक्या गावोगावी चालतो. इंग्रजी, मराठी नवे वर्ष, शिमगा (होळी), रंगपंचमी, दिवाळी, पाडवा, कोजागिरी या दिवशी तर गल्लोगल्ली कवींचे जत्थे कविसंमेलना-साठी फिरताना दिसतात.**

**महाराष्ट्रात** होणारी साहित्य संमेलनं ही महाराष्ट्राची खास वैशिष्ट्यं. अखिल भारतीय, प्रादेशिक, प्रांतिक, उपनगरीय, शारदीय, वासंतिक, महिलांची, बालकुमारांची, नवोदितांची, होतकरूंची, ग्रामीण, दलित, समरसता इत्यादी नाना प्रकारच्या मराठी भाषिक साहित्य संमेलनांचा उरूस कुठे ना कुठे भरतच असतो. या सर्व संमेलनांचे आयोजक, स्वागताध्यक्ष, अध्यक्ष, परिसंवादाचे विषय, मुलाखतकार अगदी सगळं भिन्न भिन्न असतं. दरवेळी तिथं काही ना काही बदलेललं असतं. मात्र, या साहित्य संमेलनातून बदलत नाही ते म्हणजे कवींचा आणि ग्रंथदालनाचा सहभाग. एक वेळ परिसंवाद होणार नाहीत. मुलाखती रंगणार नाहीत. पण कवींच्या कविता झाल्या नाहीत; कविकट्टा ओस पडलाय असं कधीच झालं नाही. पत्रकार म्हणून आतापर्यंत अनेक साहित्य संमेलनांना उपस्थिती दाखविली. वृत्तांकनही केलं. अध्यक्षीय भाषण, वादविवाद, परिसंवाद, मुलाखती हे सगळं कामाचा एक भाग म्हणून मुकाट्याने सहनही केलं. मात्र, माझं मन रमतं ते कविसंमेलन आणि ग्रंथदालनात. जीवनाचं सार अगदी साध्या, सोप्या भाषेत आणि कमी शब्दात मांडणाऱ्या कवींचा मला नेहमीच हेवा वाटतो. दुसरं आवडतं ठिकाण म्हणजे ग्रंथदालन. विविध प्रकाशकांच्या विविधांगी पुस्तकांची आकर्षक, सुबक मांडणी, ग्रंथदालनात होणाऱ्या ओळखी, चर्चा या तर अविस्मरणीयच. व्यासपीठावरील तत्त्ववेत्त्यांची तीच ती रटाळ भाषणं ऐकण्यापेक्षा तत्त्ववेत्त्यांची पुस्तकं वाचून त्यावर प्रतिक्रिया देणाऱ्या सामान्य वाचकांची मतं जाणून घेणं अधिक आवडतं. पण याच अनेक साहित्य संमेलनांत एक दिसून आलं की कविसंमेलनाला भरभरून दाद देणारे रसिक ग्रंथदालनात कवितासंग्रहापासून चार हात लांब असतात. त्यांचा कल असतो तो कथासंग्रह, ऐतिहासिक, आत्मचरित्रांकडे. हा विरोधाभास का?

दरवेळी साहित्य संमेलनासाठी राज्यभरातून कवींच्या कविता मागविल्या जातात. महाबळेश्वर येथे झालेल्या साहित्य संमेलनाचं उदाहरण घ्या. या संमेलनात नवोदितांच्या कविसंमेलनासाठी आयोजकांकडे महाराष्ट्रातून कवितांचा पाऊस पडला. सीमाभागातील अगदी निपाणीपासून ते राज्याच्या कानाकोपऱ्यातील विविध क्षेत्रांतील आणि वयोगटातील कवींच्या कवितांचा खच पडला. हे झालं संमेलनाचं. पण जालनासारख्या ठिकाणी तर कवितेचा पाडवा साजरा करण्यात येतो. हे कुणाला माहीत आहे का? व्यापारी शहर असलेल्या जालन्यात साहित्यिक व सांस्कृतिक चळवळ गतिमान व्हावी या उद्देशानं 'उर्मी'चे संपादक तथा ज्येष्ठ कवी जयराम खेडेकर, कार्यकारी संपादक डॉ. संजीवनी तडेगावकर, कै. नंदकुमार साहनी चॅरिटेबल ट्रस्टचे नवल साहनी आणि विनीत साहनी यांनी १९९८ साली कवितेचा पाडवा सुरू केला. तो आजतागायत अव्याहतपणे सुरू आहे. पुरुषोत्तम पाटील, गजमल माळी, ना. धों. महानोर, गंगाधर पानतावणे, विठ्ठल वाघ, विजया राजाध्यक्ष, भालचंद्र नेमाडे, वसंत आबाजी डहाके, राजन गवस, गो. मा. पवार, प्रभाकर बागले, ना. धों. महानोर, उत्तम कांबळे, सतीश काळसेकर, भगवान देशमुख, सदानंद देशमुख, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, चंद्रमोहन कुलकर्णी या मान्यवरांना येथे सन्मानितही करण्यात आलं आहे. हे सांगण्याचे कारण की कवींच्या कविता इतक्या विपुल प्रमाणात झाल्या आहेत की त्याचा पाडवाही साजरा होतो. संमेलनात कवींना आमंत्रित केलं जातं. छोटी-मोठी कविसंमेलनही आयोजित केली जातात. त्याला रसिकांचा भरभरुन प्रतिसादही लाभतो. पण ही गर्दी नेमकी कवितासंग्रह खरेदी करताना जाते कुठे हा प्रश्न अनेकांना सतावत आहे.

कविसंमेलनात कविता ऐकणारे दर्दी अनेक असतात. कविसंमेलन पार पडल्यानंतर हे दर्दी कवींची आवर्जून भेट घेतात. कविता आवडल्याची दादही देतात. मात्र त्या कवीचा कोणता काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला आहे का? याची विचारणा करत नाहीत. हे असं होतं की एखादा सिनेमा करमणूक म्हणून पहावा आणि नंतर विसरून जावं. महाराष्ट्राच्या या महन्मंगल भूमीत सिनेमा, नाटकांखालोखाल लोकप्रिय असलेला प्रकार म्हणजे कविसंमेलन. सर्व प्रकारच्या कलावंतांच्या तुलनेत कवी हा इसम संख्येच्या दृष्टीने महाराष्ट्रभर सर्वाधिक प्रमाणात आढळतो. त्यामुळे गावोगावी घाऊक कवींचं संमेलन भरवणं हा तेजीचा खेळ झाला आहे. घरटी किमान एक कवी असं सामान्यतः महाराष्ट्रात कवींचं होलसेल प्रमाण असल्याचं कुणीतरी प्राध्यापकानं

'पीएच.डी.'च्या अतोनात अभ्यासपूर्ण प्रबंधात लिहिल्याचं आठवतं. काही घडलं की घ्या कविसंमेलन हा खाक्या गावोगावी चालतो. इंग्रजी, मराठी नवे वर्ष, शिमगा (होळी), रंगपंचमी, दिवाळी, पाडवा, कोजागिरी या दिवशी तर गल्लोगल्ली कवींचे जत्थे कविसंमेलना-साठी फिरताना दिसतात. कविसंमेलने भरवणं तसं सोयीचंच झालंय. कारण, नामचिन कवी सोडल्यास बाकी केवळ कविता वाचू दिली जातेय एवढ्यावरच खूश होऊन स्वखर्चानं फुकट्यात संमेलनाला हजेरी लावतात. मात्र अशांमुळे चांगलं दर्जेदार लिहिणाऱ्या कवींवर अन्याय होत आहे.


लहानपणी शाळेत असताना ज्या कविता अभ्यासाला होत्या त्या अजूनही आठवणींच्या झुल्यावर झुलतात. कवितांची गोडी लागण्याचं हे वय. पण पुढे पुढे ही गोडी कमी होऊ लागली. कारण कथा-कादंबऱ्या यांच्या साठमारीत कविता हरवून गेली. दर्जेदार कवितांचा काळ संपला असं वाटत असतानाच शिरीष पै यांच्या हायकू आणि चंद्रशेखर गोखलेंच्या चारोळ्यांनी पुन्हा एकदा काव्यविश्व व्यापून गेलं. याच काळात मुक्तछंद हा प्रकारही धुडगूस घालत होता. मुक्त छंदाच्या नावाखाली काहीही लिहिले जाऊ लागले. यात केवळ प्रेम, दुःख, विरह या भावनांनाच स्थान देण्यात आलं. सामाजिक आशयघन किंवा मानवी स्वभावाच्या चेतना जागृत करणाऱ्या कविता मागे पडू लागल्या. त्याच त्याच विषयाच्या कविता वाचून वाचकांनाही त्याचा नॉशिया येऊ लागला. कारण त्यात नावीन्यपूर्ण असं काहीच नव्हतं. याच दरम्यान सलील कुलकर्णीसारखा नव्या दमाचा कवी पुढे आला. त्याच्या 'बाप' कवितांनी रसिकांच्या मनाची घालमेल सुरू झाली आणि सुरू झाला नव्या दमाच्या, नव्या कवींचा सुरेल प्रवास. सलीलची 'बाप' कविता वाचताना, ऐकताना अनेकांचे डोळे पाणवले. अनेकांचे मनपरिवर्तन झाले. पण, त्याच्या कवितासंग्रहापेक्षा त्याच्या कवितांच्या सीडीज घरोघरी पोहचल्या. नव्या तंत्रज्ञानाला आपलंस करत सीडीरूपात आपल्या कविता वाचकांपर्यंत पोहचविण्याचा हा नवा फंडा आल्यानेच बहुधा कवितासंग्रहांकडे वाचकांनी पाठ फिरविली असावी. कथाकथन कार्यक्रमाच्याही काही सीडीज आता बाजारात उपलब्ध आहेत. त्यामानानं कथा, कादंबऱ्यांपासून लांब राहिल्याने ती पुस्तकं विकली जात आहेत. पण सध्या इंटरनेट, मोबाइलवर विविध अॅप्सच्या माध्यमातून ती सहज उपलब्ध होत असल्यानं तोही वाचकवर्ग काहीसा कमी झाल्याचं दिसून येतं.

बदलत्या काळात फेसबुक, व्हॉट्स अॅप आणि सोशल मीडियानं बराच धूमाकूळ घातला आहे. कविसंमेलनातून दिसणारे आणि न दिसणारेही असंख्य कवी येथे दररोज हजेरी लावताहेत. कधी एकदा नवीन काही लिहितो आणि ते अपलोड करतो याची सगळ्यांना घाई झालेली दिसते. सोशल मीडियाच्या जगात कवितासंग्रहांची खुंटत चाललेली विक्री मात्र चिंताजनक आहे. वाचकांना चांगली क्वॉलिटी हवी असल्याने काही कवींच्या निवडक कवितांचा कवितासंग्रह प्रसिद्ध करण्याच्या काही प्रकाशकांनी घेतलेल्या निर्णयाचे वाचकांनी स्वागत केले आहेच. एखाद्या कवीचं कॅलिबर कळल्यानंतर त्याच्या पुस्तकाची मागणी वाढते. भले वाचकवर्ग मोठा नसेल पण जो काही आहे तो गुणात्मक आहे. नामचीन कवींच्या कविता संग्रहाला मरण नाही. पण काही नवशिके आणि आर्थिकदृष्ट्या संपन्न असलेली मंडळी सुबत्तेच्या जोरावर एक काय दहा पुस्तकं प्रकाशित करतात. अशी पुस्तकं प्रकाशित करणारे प्रकाशकही हल्ली गल्लोगल्ली आढळून येताहेत. साहित्य संमेलनातून किंवा काव्य संमेलनातून आपली दहा पुस्तकं मिरवणारी आणि ती फुकटात वाटणारी अनेक मंडळी दिसतात. कशासाठी हे सगळं? तर जितकी जास्त पुस्तकं तितकी जास्त प्रतिष्ठा. समाजात अधिक वलय प्राप्त करण्यासाठी, मिरवून घेण्यासाठी हा खटाटोप. तर कविसंमेलने ही काही कवींचे आर्थिक प्राप्तीचे क्षेत्र बनले आहे. अशा बनावटी कवींमुळे प्रतिभावंत कवी मागे पडले जात आहेत. साहित्य संमेलनातून ते वेळोवेळी दिसून आलेच आहे. ते नव्याने सांगण्याची गरज नाही. हेही काव्यसंग्रहांच्या खरेदीला मिळणाऱ्या अल्प प्रतिसादाचे कारण असू शकेल.

**– महेश पवार**

भ्रमणध्वनी : ९९८७२६९४७६
maheshpawar1.2008@gmail.com

**एखाद्या कवीचं कॅलिबर कळल्यानंतर त्याच्या पुस्तकाची मागणी वाढते. भले वाचकवर्ग मोठा नसेल पण जो काही आहे तो गुणात्मक आहे. नामचीन कवींच्या कविता संग्रहाला मरण नाही. पण काही नवशिके आणि आर्थिकदृष्ट्या संपन्न असलेली मंडळी सुबत्तेच्या जोरावर एक काय दहा पुस्तकं प्रकाशित करतात.**



# कविता - शब्दभ्रम की प्रतिभा?


**लखनसिंह कटरे**




**कविता** ही कवीच्या प्रतिभाशक्तीचा उद्‌गार असते, यात संशय नाहीच. तरी कवीने आत्मसात केलेले विचार, अनुभव; त्यावर झालेल्या कवीच्या अंतर्मनाचे, चिंतन-मननाचे संस्कार व त्यानंतर त्यातून प्रकट झालेले शब्दावतार म्हणजे कागदावरील कवीची कविता असते. ती तरीही अस्फूटच असते. त्या शब्दांच्या पलीकडेही कवितेचा विस्तार असतो, तो रसिकाच्या संयोगाने त्या रसिकाच्या/वाचकाच्या मनोभूमिकेनुसार प्रकट होतो; पुन्हा प्रकट होतो. कवितेबद्दलची माझी समज अजूनही विकसनशीलच असल्याने हे विचार अंतिम नसावेत, याबद्दल मलाही संशय नाही. असे जर असेल किंवा माझे हे कविताविषयक (संक्षिप्त) विचार सत्याच्या आसपास असतील तर काव्यरसिकांचे प्रमाण कवींप्रमाणेच अल्प असेल, हे मान्य करणे भाग आहे.

मी बी.एसस्सी.ला असताना त्या वेळी (१९७२-७५ साली) माझ्या सोबतच्या वर्गात ८०-८५ विद्यार्थी होते, त्यातील फक्त तीन-चारजणच कवितेबद्दल गंभीर होते. (त्यातील एक म्हणजे डब्ल्यू. कपूर) बहुतेकजण तर वयाच्या प्रभावात ट ला ट, फ ला फ लावणारेच होते. अशांना 'मी कवी आहे' असा भास लवकरच होतो आणि हा भास लवकर उतरतही नसतो. म्हणूनच कविसंमेलनात 'कवींची' गर्दी होते, परंतु कवितांचा मात्र उणीवच जाणवते. ग्रेस, वसंत आबाजी डहाके, शिरीष गोपाळ देशपांडे, मर्ढेकर, विलास सारंग, आरती प्रभू, कुसुमाग्रज, आ. रा. देशपांडे 'अनिल', मुक्तिबोध, मंगेश पाडगांवकर, विंदा करंदीकर, प्रभा गणोरकर, दि. पु. चित्रे हे माझ्या आवडत्या कवींपैकी आहेत. 'राजपुत्र आणि डार्लिंग' वाचल्यानंतर मला ग्रेसला माझ्या डोक्यावरून उतरून घ्यायला खूप वेळ लागला - वर्षे लागली. 'योगभ्रष्ट' वाचल्यानंतर मी अक्षरशः 'स्वप्नभ्रमित' झालो होतो. माझ्या संग्रहात सुमारे पाच-सहा हजार मराठी, हिंदी, इंग्रजी ग्रंथ/पुस्तके असतील. त्यातील सुमारे दहा टक्के कवितासंग्रह, कविताविषयक पुस्तके असतील. म. सु. पाटील, हरिश्चंद्र थोरात, विलास सारंग, प्रभाकर बागले यांचे काव्यविषयक जाणिवा समृद्ध करणारे लेखन माझ्या संग्रहाची शान आहे.

जन्मजात प्रतिभेला तासून, पुसून तीक्ष्ण




करणे आवश्यक असल्याच्या जाणकारांच्या मताशी मी सहमत आहे. परंतु या विचाराचा गंधही नसलेल्यांकडून कवी म्हणून कविसंमेलनातून गर्दी केली जाते व कविता हकनाक बदनाम होते. मंचीय कविता हा प्रकार 'पसंद अपनी अपनी, खयाल अपना अपना' या म्हणीवर सोपविणेच श्रेयस्कर ठरेल. वस्तुतः एका वाचनात/श्रवणात कविता समजली तर तो शब्दभ्रम असण्याचीच शक्यता जास्त असते, असे माझे मत (वाटल्यास मानभावीपणाचे म्हणा) आहे. त्यामुळेच कविसंमेलनातील रसिकांची गर्दी कवितासंग्रहाच्या वाचकांच्या गर्दीत/संख्येत परीवर्तित होत नाही.

कविता म्हणजे साहित्याचा आद्य प्रकार. तो सरळ-सोपा असणे नैसर्गिकरीत्याच शक्य नसते. याची जाण/जाणीव नसल्याने किंवा जाण/जाणीव अपुरी असल्याने कवींचे (तथाकथित कवींचे) गाजर गवताचे पीक फोफावल्याचे पहावे/भोगावे लागते. असो.

मी अजून तरी कोणत्याही विचारसरणीच्या चक्रव्यूहाला शरण गेलेलो नसल्याने माझ्या भयंकर अज्ञानाची मला नम्र जाणीव आहे. त्यामुळे मी अजून तरी अंतिम निष्कर्षापर्यंत पोहचू शकलेलो नाही. माझा प्रवास मात्र त्या दिशेने सुरू आहे, त्याचेच हे टिपण समजावे.

**- लखनसिंह कटरे**
भ्रमणध्वनी : ७०६६९६८३५०/
९४२२८९१०३२
lskatre55@gmail.com


## ॥ग्रंथाली॥




### इंदिरेची स्मृतिकथा - इंदिराबाई वाडीकर

ज्या मध्यमवर्गाने संस्कृतीतल्या सत्त्वांशाला जपण्यात मोठा सहभाग दिला, त्या मध्यमवर्गाच्या सत्त्वशील अशा जीवनधारणेला इंदिराबाईंच्या स्मृतिकथेत महत्त्वाचा शब्द मिळाला आहे. इंदिराबाईंच्या स्मृतिकथेची नाळ तर समाजाच्या सुख-दुःखाशी जोडलेली आहेच. त्यामध्ये त्या काळातील स्त्रीमनाची नवी स्वप्नेही तरळत आहेत, स्त्रीच्या आंतरिक विश्वाचे दर्शनही त्यातून घडत आहे. म्हणूनच सांस्कृतिक इतिहासाचे धागेदोरे जुळवताना अशा लेखनाला महत्त्व प्राप्त होते.

मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.




### चेकपॉईन्ट चार्ली - डॉ. माधवी मेहेंदळे

डॉ. माधवी मेहेंदळे यांनी लिहिलेली 'चेकपॉईन्ट चार्ली' ही ललित अंगानं जाणारी कादंबरी. लेखिकेला जे सांगायचं आहे ते वाचण्याची वाचकाची उत्सुकता शेवटपर्यंत अबाधित राहते. त्यांनी लिहिलेली कादंबरी फक्त मनोरंजनच करत नाही तर ती जर्मनीचा आख्खा इतिहास खूप वेगळ्या तऱ्हेनं वाचकांच्या डोळ्यांसमोर उभा करते. तसंच या कादंबरीत डॉ. माधवी मेहेंदळे यांच्यातला चित्रकार आणि कवी दोन्हीही अतिशय तरलपणे समोर येतो. सुजाण वाचकांना समृद्ध करणारा असा हा अनुभव ठरावा.

मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.




### प्रेमाचं ऋण - माधवी कवीश्वर

माधवी कवीश्वर यांनी लिहिलेल्या 'प्रेमाचं ऋण' या पुस्तकातील आठवणी कृतज्ञतेचे रेखीव दव आहे. या लेखनात काहीसे आत्मकथन आहे. काही समाजात वावरताना आलेले अनुभव आहेत. यामध्ये काही त्यांचे वैयक्तिक अनुभव आहेत. प्रेमातल्या विविध भावांचे स्व-भावासह चित्रण आहे. छोट्या छोट्या घटनांमधून काही ना काही शिकता येते हा बोध आहे. माधवीताईंच्या संवेदनक्षम मनानं टिपलेल्या अशाच असंख्य अनुभवांचा, सकारात्मक जगण्याचा, रंगीबेरंगी कॅनव्हास म्हणजे 'प्रेमाचं ऋण' हे पुस्तक.

मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.



### नामरंगी रंगले - शशिकांत कवीश्वर

शशिकांत कवीश्वर यांचा 'नामरंगी रंगले' हा लेखसंग्रह विविध विषयांनी नटलेला आहे. ध्यास, परिश्रम, जिज्ञासा, अंतर्मुखता, विज्ञान, श्रद्धा आणि ज्ञानाचा स्पर्श ह्या सात रंगांच्या इंद्रधनुष्याचे चित्र म्हणजे हे पुस्तक किंवा ग्रंथ. खरे तर हा ग्रंथच कारण आकार लहान असला तरी अतर्क जाडया पुस्तकांपेक्षा इथे समाविष्ट असलेला मजकूर जास्त मौल्यवान आहे. या लेखांतून लेखकाने वाचकाशी सुलभ संवाद साधला आहे.

मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.





### श्रमिकाख्यान - संदीप राऊत

मनुष्य जगण्यासाठी किती विविध तऱ्हेची धडपड करतो आणि त्यात रमतोही हे संदीप राऊत यांच्या या पुस्तकात वाचण्यास मिळते. राऊत यांच्या लेखनातून समाजशास्त्रीय माहिती तर अपार मिळत जाते, त्याचप्रमाणे उपेक्षित जीवनाचे विविध पैलू व्यक्त होतात. ते सारंच एकत्र वाचतांना ते कॅलिडिओस्कोपिक परिणामाचे वाटते व त्यामुळेच मनास अचंबित व्हायला होते.

- दिनकर गांगल

मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.




### रचनावादी शिक्षणक्रांती - रमेश पानसे

शिक्षणात बदल करण्याची गरज निर्माण होणे वेगळे आणि तशी शक्यता असणे वेगळे. गरज आणि शक्यता ह्या दोन्हींचा मेळ घालण्याचा योग यावा लागतो. शिक्षणात आमूलाग्र बदल व्हावेत अशी मोठी गरज आज निर्माण झाली आहे आणि त्याचवेळी, असे बदल करता येतील याची शक्यताही निर्माण झाली आहे. देशामधील आर्थिक शक्ती, राजकीय इच्छाशक्ती आणि सामाजिक समंजसता ह्यांनी विचारपूर्वक एकत्र येऊन ह्या क्षणाचा लाभ उचलला पाहिजे. शिक्षणात अपेक्षित क्रांती केली पाहिजे...!!

मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.



# अशा कवींचा लोकांना उबग येतो!

प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे



१९२० ते २००० पर्यंतचा कालखंड पाहता रविकिरण मंडळ, त्यांचे कवी, आचार्य अत्रे यांनी मंचिय कविता पुढे नेली. भा. रा. तांबे यांची गायनप्रधान कविता रवीकिरण मंडळाने चालविली. या मधल्या काळामध्ये विंदा करंदीकर, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, ज. बि. पवार, बसंत बापट, मंगेश पाडगांवकर, सुरेश भट या पहिल्या फळीतील कवींनी मराठी कविता लोकाभिमुख करण्याचे कार्य केले. मराठी कविता मंचावरून वेगवेगळया अंगांनी सादर होऊ लागली. विठ्ठल वाघ, प्रकाश होळकर, अरुण म्हात्रे, अशोक बागवे, नारायण लाळे, सतीश सोळांकुरकर, किरण येले, भगवान निळे, संजय बोरुडे, रामदास फुटाणे, अशोक नायगावकर, विष्णू सूर्या वाघ, डॉ. मनोहर जाधव, हेमंत दिवटे, मंगेश काळे यांसारख्या कवींनी वैविध्यपूर्ण कविता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचवून कवितेला एक वाचकवर्ग निर्माण केला. मंचीय कवितेचे वेगवेगळे आविष्कार त्यातून श्रोत्यांना अनुभवायला मिळाले. गीतलेखनातून अनेक कवी उदयास आले. सुधीर मोघे, जगदीश खेबुडकर, ग. दि. माडगूळकर इत्यादी. मित्रपरासाठी गीतलेखनातून कवींना वेगळे अस्तित्व निर्माण झाले. मराठी गंभीर कवितेची यापेक्षा मोठी परंपरा या शतकात निर्माण झाली. ती ग्रामीण, दलित, आदिवासी, नागर, स्त्रीवादी इत्यादी विविध साहित्यप्रवाहांची होणारी साहित्य संमेलनाने त्याच्या विचारांचा मोठा श्रोतृवर्ग निर्माण झाला. सर्व वाङ्मयप्रकारांमध्ये कवितांचा चाहतावर्ग व लेखन करणारा मोठा वर्ग निर्माण झाला. विभागीय स्तरांवर होणाऱ्या संमेलनांमुळे कविसंमेलनाची अखिल भारतीय साहित्य संमेलनाची असणारी मक्तेदारी मोडीत निघाली. विदर्भ पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, गोवा या प्रदेशांतील कवींचे आत्मभान बाढल्यामुळे कवितेची चळवळ व्यापक झाली. नव्या जोमाने, उत्साहाने मराठी कविता वाचली व लिहिली जाऊ लागली. या काळातील माध्यमेही मर्यादित असल्यामुळे समाजाचा साहित्याकडे पाहण्याचा, केंद्रित होण्याचा दृष्टिकोन निकोप राहिल्यामुळे कवितेला सर्वात जास्त वाचकवर्ग या कालखंडात लाभलेला दिसतो. तसं पाहिलं तर डीडी सह्याद्री, नॅशनल या दोन चॅनलवर मर्यादित स्वरूपाचे कार्यक्रम चालायचे. काव्यगायनाच्या अरुण दातेंच्या 'शुक्रतारा मंदवारा'ने रसिकांमध्ये रंगत आणली. आशाताई, लता मंगेशकर, पंडित हृदयनाथ मंगेशकर, भीमसेन जोशी यांच्या कॅसेट्सनी मराठी मनाची अभंग, विरहण्या, ओव्यांची रंगत कायम राखली. नंतरचा 'नक्षत्रांचे देणे' हा कार्यक्रम श्रोत्यांच्या लक्षात राहिला.


१९९० नंतरच्या कवितेचा श्रोतावर्ग मोठ्या प्रमाणात बदललेला आहे. या काळात आलेले जागतिकीकरणाचे बदल, वाचक, दळणवळण, उद्योग, व्यवसाय, शिक्षण इत्यादी विविध क्षेत्रांत आमूलाग्र स्वरूपात झालेला बदल यामुळे समाजाची मानसिकता बदलली. मनोरंजनाची, प्रबोधनाची नवीन माध्यमे उपलब्ध झाली. जग हे एक खेडे झाले. जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचणे सोपे झाले. माणूस यंत्राशी जोडला गेला. त्याचा परिणाम कवितेवरही झाला. मोबाइल, इंटरनेट, संगणक आल्यापासून क्रांती झाली. याचा दुसरा तोटा असा झाला की एकूणच मुद्रित साहित्यमाध्यमातून वाचकवर्ग तुटला गेला. तो यंत्राशी जोडला गेला. त्यामुळे माणसाची एकाग्रता भंग झाली. ऑनलाइन माहितीचा प्रस्फोट झाला. नव्या माध्यमातून नवी कविता आली. ती संग्रह म्हणून जुन्या कवितेचे नवे 'व्हर्जन' म्हणून आले. 'माय मराठी', 'मराठी माती', 'मराठी वर्ल्ड डॉट कॉम', 'कविता मनामनातली', 'मराठी डॉट कॉम' यांसारख्या वेबसाइटवर जुन्या आणि नव्या कवींच्या कविता दिसू लागल्या. पुस्तक घेऊन कविता वाचण्यापेक्षा सहज उपलब्ध होणारी कविता वाचकाला आवडू लागली. एका क्लीकवर कोणताही कवी उपलब्ध होऊ लागला. प्रतिक्रिया देणे सहज, सोपे, सुलभ झाले. आणि ती कोणाची वैयक्तिक बाबही राहिली नाही.

आज कवितेसाठी जी व्यासपीठे उपलब्ध आहेत ती पाहता येतील. व्हॉट्स अप, फेसबुक, इंटरनेटवरच्या विविध वेबसाइट, विविध ब्लॉग ही सर्व व्हर्च्युअल माध्यमे आहेत. तसे या माध्यमांवर कोणत्याही स्वरूपाचे नियंत्रण नाही. परंतु या माध्यमांमुळे एक क्रांती झाली आहे. ती म्हणजे प्रत्येकाच्या खिशात कविता आली आहे. वाचण्यासाठी सहज, सोपी उपलब्ध झाली आहे.


मागच्या पिढीतील लोकही या माध्यमावर आले आहेत. फेसबुकच्या माध्यमातून जास्तीत जास्त पाच हजार वाचकांपर्यंत पोहचा येते. व्हॉट्स ॲप हे माध्यम ठरावीक समुहापुरते मर्यादीत आहे. याचा वाचकवर्ग प्रचंड आहे. प्रत्येकाला वैयक्तिकरीत्या कविता पाठवता येते. त्याबरोबरच आवडलं तर पुढे फॉरवर्ड करणारा वर्ग प्रचंड आहे. त्यामुळे प्रिंट मीडियाची मक्तेदारी संपुष्टात आली आहे. फेसबुकला जागतिक स्तरावरून वाचक वाचत असतो. यामुळे कोणत्याही सर्वसामान्य कवीला क्षणात अस्तित्व प्राप्त होण्याचा व सर्वसामान्यास प्रतिक्रिया व्यक्त करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. ज्यांनी आपले ब्लॉग तयार केले आहेत त्यांना आवडणाऱ्यांची संख्या पाहता येते. फेसबुक व व्हॉट्स ॲपवर प्रतिक्रिया देता येत असल्यामुळे त्यांची संख्याही कळते. हे पहिलेच असे माध्यम आहे ज्यात वाचकांची संख्या मोजता येते. जुन्या काळात पुस्तक वाचून त्याची प्रतिक्रिया लेखी पत्राच्या माध्यमातून कळविली जायची. हे पत्र म्हणजे एक प्रकारचा ठेवा होता. मेलमुळेही वैयक्तिकरीत्या कितीही साहित्य पाठविता येते. दळणवळणाचा प्रचंड वेळ आणि खर्च या माध्यमांमुळे वाचलेला आहे. या दृष्टीने ही माध्यमे लोकशाहीतून झालेली सार्वत्रिक माध्यमे आहेत. वय, लिंग, जात, धर्म, भेद गाडून सर्वांसाठी खुली असणारी माध्यमे आहेत. यात कोणतीही मोनोपॉली नाही.

व्हॉट्स अप आणि फेसबुक यांवर दोन प्रकारचे वाचक आहेत. एक लेखक-समीक्षक व दुसरे सामान्य रसिक वाचक. काही अभ्यासक यावर दिल्या जाणाऱ्या प्रतिक्रियांना फारसे महत्त्व देत नाहीत. त्यांच्या दृष्टीने प्रतिक्रिया ह्या फक्त प्रतिक्रिया आहेत; ती समीक्षा नव्हे. तर काही कवींनी आपल्या काव्यसंग्रहातही या प्रतिक्रिया घेतल्या आहेत. छान, उत्तम, वा, मस्त ह्या बरबरच्या प्रतिक्रिया आहेत. 'फेसबुक' आणि 'व्हॉट्स अप' हा नुसता बाजार आहे असे त्यांचे मत आहे. दुसऱ्या बाजूस काही लेखकांचे यावर असे म्हणणे आहे की इथे वाचक तात्काळ उपलब्ध आहे तो दुसरीकडे नाही. त्याच्या प्रतिक्रियाही आपणास पाहता येतात. सामान्य वाचक आपली प्रांजळ प्रतिक्रिया व्यक्त करत राहतो. तर लेखक-वाचक यांच्यात मोठ्या प्रमाणात कंपूशाही व साटेलोटे हा प्रकार ग़ज़लेच्या संदर्भात दिसतो. ग़ज़लकारांचे गट मोठ्या प्रमाणावर झाले आहेत. कोण कुणाच्या गटाचा हे पाहून प्रतिक्रिया दिली जाते. चांगले लेखन वाचूनही अनुल्लेखाने टाळले जाते. अनेक प्रकारचे वादविवाद या अनुषंगाने होत राहतात. 'ग़ज़ल शुद्ध असायला पाहिजे' या मताचा पुरस्कार करणारे अभ्यास व गझलकार मात्र स्वतःच्या ग़ज़लांमध्ये नियमांचे पालन करत नाहीत. कुणाची कशी ठरवून गळचेपी करायची याचे साहित्यिक राजकारण त्यामुळे ग़ज़लेविषयी प्रीती निर्माण होण्याऐवजी नवलेखनात प्रवेश करणाऱ्यांना व वाचकांमध्ये संभ्रमाचे वातावरण तयार झाले आहे. ग़ज़ल तंत्रदृष्ट्या, आशयदृष्ट्या, ग़ज़लियतच्या दृष्टीने मतमतांतरे आहेत. अभ्यास असणारे व समीक्षकही हाताच्या बोटावर मोजण्याइतपत आहेत. त्यामुळे आपापले नियम आणि ग़ज़ल घेऊन पळणाऱ्या नव्या

**कुणाची कशी ठरवून गळचेपी करायची याचे साहित्यिक राजकारण त्यामुळे ग़ज़लेविषयी प्रीती निर्माण होण्याऐवजी नवलेखनात प्रवेश करणाऱ्यांना व वाचकांमध्ये संभ्रमाचे वातावरण तयार झाले आहे.**




**ग़ज़ल आणि कविता सादरीकरण करणाऱ्यांमध्ये एक साम्य आहे ते म्हणजे काही ठरावीक कविता व ग़ज़ल बसवलेल्या आहेत. त्याच त्याच पुनःपुन्हा सादर केल्या जातात. त्यांना मास्टरपिस म्हटलं जातं. नंतर नंतर अशा कवींचा लोकांना उबग येतो आणि त्याच त्याच ग़ज़ल आणि कविता किती ऐकायच्या वाचकांचा प्रश्न आहे.**



**Painting is poetry that is seen rather than felt, and poetry is painting that is felt rather than seen.**

**(LEONARDO DA VINCI)**



**कवितांचा वाचकवर्ग निर्माण होण्यामध्ये आजकाल नव्या माध्यमातील पोस्टर पोएट्री उपयोगी ठरू लागली आहे. सरदार जाधव, नंदू गवांदे, विष्णू थोरे, अरविंद शेलार, श्रीधर अंभोरे यांसारख्या चित्रकारांनी कवितेला कलात्मक बनविले आहे.**



ग़ज़लकारांना 'कोण सुरेश भट?' हा प्रश्न पडलेला आहे. मीच त्यामुळे या अहंभावामुळे ग़ज़लेचे निकोप वाङ्मयीन वातावरण तयार होऊ शकले नाही.

ग़ज़लकारांमध्ये एवढा संकुचितपणा वाढू लागला आहे की ते कवींना हीन लेखू लागले आहेत. 'कवितांची कविता म्हणजे ग़ज़ल' असे सुरेश भटांनी म्हटल्यामुळे ग़ज़ल म्हणजे काहीतरी भव्यदिव्य जी कोणालाही वश होत नाही. ग़ज़लेची नशा चढावी लागते. जगावी लागते. भोगावी लागते. श्वास गझल, ध्यास ग़ज़ल असे सगळे प्लेटॉनिक विश्व तयार केल्यामुळे ग़ज़लकार कविसंमेलनासही जात नाहीत. आपापसात वाहवा करण्यात धन्यता मानू लागले आहेत. नारायण सुर्वे यांनी याचे यथार्थ वर्णन केले आहे – 'गाढवाने माकडाची वाहवा करावी माकडाने गाढवाची वाहवा करावी.' ग़ज़ल, मुशायरे, त्याचा असणारा श्रोतावर्ग हा मर्यादित आहे. दर्जेदार मराठी ग़ज़ल म्हणून ग़ज़लेचे कॉन्ट्रॅक्टरही निर्माण झाले आहेत. योग्य ग़ज़लकारांना मानाचे स्थान या मुशायऱ्यांमध्ये मिळतेय असे नाही. आजच्या काळात काही गझलकार मात्र चांगली ग़ज़ल लिहू आणि सादर करतात. त्यांना समाज-मान्यताही मिळालेली आहे. ग़ज़लसंग्रह छापील स्वरूपात अगदी मर्यादित स्वरूपात आहेत. एकंदरीत सामान्य माणसाच्या मनात ग़ज़लबद्दल प्रीती निर्माण होण्यासाठी आपल्या कोनाचा बाहेर जाऊन ग़ज़ल पोहचली पाहिजे. तिचा वाचकवर्ग वाढण्याची गरज आहे. तर काही वाचकांच्या प्रतिक्रिया अशा असतात. ग़ज़ल हा कृत्रिमच प्रकार आहे. टाळले, मोकळे, झाकले अशी काफिया आधीच ठरवून केलेली रचना आहे. ग़ज़लच्या सीडी काही ग़ज़लकारांनी काढलेल्या आहेत. जुने सुरेश भट, इलाही जमादार यांसारख्या ग़ज़लकारांचा चाहता वर्ग अजूनही आहे. ते मैलाचे दगड आहेत. एकंदरीत ग़ज़लचा वाचकवर्ग, श्रोतावर्ग हा खूप मर्यादित आहे असे दिसते. ग़ज़ल, मुशायरे करणाऱ्यांना श्रोता मिळवण्यासाठी भरपूर कसरत करावी लागते. नव्या माध्यमातून वैयक्तिक पातळीवर ते पोहचतात. हिंदी मुशायऱ्यात जशी साद दिली जाते तशी मराठी ग़ज़लेत दिली जात नाही. ग़ज़ल म्हणजे हिंदीतले वा फॅक्टर जसे जमले तसे मराठीतीत जमले का याविषयी अभ्यासकांमध्ये मतभेद आहेत. यात चमत्कृतीला मोठ्या प्रमाणावर महत्त्व आहे.

आजची मंचीय कविता मोठ्या प्रमाणात सादर होते आहे. आज एकही असे साहित्य संमेलन नाही ज्यात कविसंमेलन नाही. महाराष्ट्रात खूप मोठ्या प्रमाणावर कविता लिहिली जाते. तशीच ती दर्जेदार रीतीने सादर होते. ग़ज़ल आणि कविता सादरीकरण करणाऱ्यांमध्ये एक साम्य आहे ते म्हणजे काही ठरावीक कविता व ग़ज़ल बसवलेल्या आहेत. त्याच त्याच पुनःपुन्हा सादर केल्या जातात. त्यांना 'मास्टरपिस' म्हटलं जातं. नंतर नंतर अशा कवींचा लोकांना उबग येतो आणि त्याच त्याच ग़ज़ल आणि कविता किती ऐकायच्या वाचकांचा प्रश्न आहे. काही ऑडियन्स तर एखादा ग़ज़लकार उभा राहिला की तो काय सादर करणार हे सांगतात. काही तुरळक कवी वेगवेगळ्या कविता सादर करतात. भरपूर प्रमाणात कविता लिहिली जात असल्यामुळे ती सगळीच दर्जेदार आहे असं नाही. थीम बेस कविता, वेगवेगळ्या वृत्तातली कविता, वैविध्यपूर्ण कविता, नव्या प्रतिमांची कविता लिहिणारे कवी मोजकेच आहेत. ज्या कवींचा दर्जा आणि गट चांगला आहे त्यांनी आपला श्रोतावर्ग तयार केला आहे. नायगावकरांसारखे कवी कवितेमध्ये निवेदनच जास्त करतात. कवितांचा कार्यक्रम करणारा कवींचा वर्गही मोठ्या प्रमाणात आहे. या मंचीय कवितेत एक म्होरक्या जुना असतो आणि बाकीचे कवी आलटून-पालटून येत असतात. पण लोकांना 'हलकं-फुलकं आवडतं' असं म्हणणारा एक वर्ग आहे आणि 'कवितेने श्रोत्यांना विचार करायला लावले पाहिजे' असा म्हणणारा एक गंभीर कवितेचा वर्ग आहे. ज्यांच्या मते कवितेचा डिस्को किंवा ऑर्केस्ट्रा करू नये. कविता ही एकांतात मनन-चिंतन करण्याची गोष्ट आहे. टाळ्यांसाठी तबावन्या करू नयेत असा आक्षेप आहे. गंभीर असणाऱ्या श्रोत्याची दादही तितकीच महत्त्वाची आहे. मध्यंतरी राजन खान यांनी गावोगावी कवितांचे फड ही योजना राबवली. विविध कार्यक्रम, त्यातून सादर होणारी कविता यामुळे मराठीला चांगले दिवस आले असे म्हणायला हरकत नाही.

चॅनलवर आज कवितांचे भरपूर कार्यक्रम विविध विषयांच्या निमित्ताने होत असतात. महोत्सव, संमेलन, कार्यशाळा, पुस्तक प्रकाशने, यांचेही लाइव्ह चित्रण या वाहिन्या करत असतात. त्यांची स्वतःचा टीआरपी मोजण्याची व्यवस्था आहे. त्यामुळे एखादा कवितांचा कार्यक्रम किती लोकांनी पाहिला हे समजू शकते. त्यातही काही चॅनल हे त्यांच्या काही सिरियलमुळे प्रसिद्ध आहेत. प्रेक्षकांची त्याला पसंती असते. गुढीपाडवा, दिवाळी, दसरा, दुष्काळ, जयंत्या-पुण्यतिथी या निमित्ताने कविसंमेलनांचे बहारदार आयोजन यावर केले जाते. यामुळे सांस्कृतिक चळवळ वाढीस लागली आहे.

कवितांचा वाचकवर्ग निर्माण होण्यामध्ये आजकाल नव्या माध्यमातील पोस्टर पोएट्री उपयोगी ठरू लागली आहे. सरदार जाधव, नंदू गवांदे, विष्णू थोरे, अरविंद शेलार, श्रीधर अंभोरे यांसारख्या चित्रकारांनी कवितेला कलात्मक बनविले आहे. सगळ्यात जास्त वाचकवर्ग जो कवितेला लाभला आहे तो विद्यार्थी आहे. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन, पदव्युत्तर, पीएच.डी. पातळीवर केला जाणारा कवितांचा अभ्यास यामुळे कवितांचे वाचन, पठण, मनन मोठ्या प्रमाणावर होते आहे. 'मराठी भाषा दिवस', 'मातृभाषा दिवस' मोठ्या उत्साहात सगळ्या स्तरांवर साजरा होतो. त्यानिमित्ताने कवितांची पोस्टर्स तयार केली जातात. शुभेच्छापत्रे, भेटपत्रे, ऑनलाइन यातही मोठ्या प्रमाणात कवितांचा वापर आज होतो आहे. त्यामुळे मोठ्या समुहाकडून स्वीकारला गेलेला साहित्यप्रकार जर कोणता असेल; ज्याला सगळ्यात जास्त वाचकवर्ग लाभला आहे असा साहित्यप्रकार कोणता असेल तर तो कविता आहे. अभ्यासक्रमात समाविष्ट केलेल्या साहित्याबद्दल डॉ. नागनाथ कोतापल्ले यांनी असे मत व्यक्त केले की त्यात हितसंबंध महत्त्वाचे असतात.


आज मराठी कवितेचा वाचक हा केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित राहिलेला नाही. जगामध्ये लोकसंख्येच्या दृष्टीने विचार करता मराठी भाषेचा क्रमांक पंधरावा आहे. राष्ट्रीय पातळीवरही मोठ्या प्रमाणावर मराठीचा व्यवहार होतो आहे. नियतकालिके निघतात. सातत्याने लेखन होते. जवळजवळ पाचशे मराठी मंडळे आज जगामध्ये चांगल्या प्रकारे कार्यरत आहेत. त्यात कवितेचा चाहता वर्ग मोठा आहे. मराठीतील अनेक साहित्यिक परदेशात जाऊन कार्यक्रम करत असतात. याबरोबरच वेबसाइट, फेसबुक, ब्लॉगवरचा वाचक हा जगाच्या कानाकोपऱ्यातला आहे. प्रत्येक कवीच्या कवितेला वाचकांचा प्रतिसाद कसा मिळाला याचे मोजमाप करणारी यंत्रणा, साहित्यव्यवहार अस्तित्वात असणे गरजेचे आहे.


**– प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे**
भ्रमणध्वनी : ९९२१८४६१९८
balasaheb.ml@gmail.com









**Painting is silent poetry, and poetry is painting that speaks**

**(PLUTARCH)**



# 'कविता मना-मनातली' एक आधुनिक जडण-घडण...

**गीतेश गजानन शिंदे**

**मुक्तछंद ते अभंग, अष्टाक्षरी ते ओवी, त्रिवेणी ते गजल, हायकू ते दशपदी, चारोळी-पासून रुबाईपर्यंत सर्व रूपातील दर्जेदार कविता या पेजवर वाचायला मिळतात.**

**कवितेचं** बोट धरून अठरा-एकोणीस वर्ष झाली. आपण जे लिहितो त्यालाच कविता म्हणतात यापासून घेतलेल्या शोधातून बहुआयामी वाचनामुळे दिशा गवसली. विविध कविंच्या अनेक संग्रहातून भेटणाऱ्या कवितांनी आजवर संस्कार केले. जगण्याला अर्थ दिला. या शब्दांनी आंजारलं, गोंजारलं आणि विचार करावयास प्रवृत्तही केलं. हे शब्दांचं संचित इतकं मोठं आहे की ते माझ्या एकट्याच्या ओंजळीत सामावू शकणं अशक्य होय. अर्थात मध्यंतरीच्या काळात अनेक स्थित्यंतर झाली.

मराठी शाळा ओस पडू लागल्या नि मराठमोळ्या घरातील नवी पिढी मराठीला व्होकेशनल विषयांचे पर्याय शोधू लागली. वाढत्या स्पर्धेत टिकण्याच्या नादात मराठी कवितेपासून दूर गेली. महाविद्यालयात लिहिलेल्या कविता वहीतच बंद झाल्या. 'फेसबुक' आणि 'व्हॉट्स अप'सारख्या संवादांची साधनं वाढत असतानाच संवाद मात्र खुंटला. आज अशा सोशल मीडियावर कवितांचे असंख्य ग्रुप्स आहेत. कवितांचेच कशाला, आपल्या शाळा महाविद्यालयांच्या ग्रुपमध्येही आपल्या भावना पोहचवण्यासाठी शायरी अथवा कवितांची मदत घेतली जाते. त्यांचा दर्जा चांगलाच असेल किंवा त्यात काव्यगुण असतीलच असे नाही. परंतु सर्वसामान्यांकडून त्यालाही दाद मिळते आणि 'हीच खरी कविता' अशी खूणगाठही मनाशी पक्की होते. अर्थात यात दोष त्यांचा नाही, कारण त्यांच्यापर्यंत चांगल्या कविता शाळेच्या पाठ्यपुस्तकानंतर पोहोचतेच असं नाही. आजही आपल्याला 'बालभारती'मधील काही कविता आठवतात, याचा अर्थ कविता आपल्या मनाच्या तळाशी दडून बसलेल्या असतात आणि त्यावर विस्मृतींची धूळ चढलेली असते. मग अशा कविता आपल्याला पुन्हा अनुभवायला मिळाल्या तर? आजची पिढी हे वाचत नाही - ते करत नाही, हे बोलणं सोपं पण तिने काय करायला हवं हे सांगणं आणि त्यासाठी प्रयत्न करणं कठीण, मग फुकाची ओरड कशाला? या सर्व प्रश्नोत्तरांच्या मोहोळातून जन्म झाला 'कविता मना-मनातली' या काव्य-चळवळीचा.

आजच्या ऑनलाईन पिढीला स्मार्टफोनवर किंवा आयपॅड, लॅपटॉपवर कविता वाचायल्या मिळाल्या तर आणि त्याही दृष्य स्वरूपात? कारण त्यांच्यापाशी पुस्तकांच्या दुकानात जाऊन पुस्तक विकत घ्यायला वेळ आहेच असं नाही. (ही पिढी मात्र अमेझॉन किंवा फ्लिपकार्टच्या माध्यमातून पुस्तकं मात्र घरपोच मागवते!) याच जाणीवेतून साधारणत: तीन वर्षांपूर्वी फेसबुकवर मराठी, हिंदी कविता एका नव्या माध्यमाद्वारे लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी, त्यांच्या रसिकतेला खत-पाणी घालण्यासाठी 'कविता मना-मनातली'ची संकल्पना डोक्यात आली आणि या पेजची सुरुवात संत ज्ञानेश्वरांच्या 'पसायदान'ने झाली. आजवर या पेजच्या माध्यमातून ८५०हून अधिक कविता 'आमच्या मनातील कविता' या फोटो अल्बममध्ये 'काव्य-चित्र' स्वरूपात अनुभवायला मिळतील. कवितेच्या आशयाला, विषयाला अनुसरून काव्य-चित्राचं केलेलं कोलाज एखादी कविता जगभर प्रसिद्ध करण्यासाठी उपयोगी ठरत आहे. या माध्यमातून तरुण पिढी अभिजात साहित्य वाचत नाही याला छेद देण्याचा हा छोटासा प्रयत्न. कारण हीच पिढी या कविता आपल्या फेसबुक वॉलवर शेअर करतेय. संत तुकारामांचे अभंग, कबीराचे दोहे, गालिब, गुलजार, निदा फाजली, बशीर बद्र, धूमिल, केशवसूत, मर्ढेकर, बालकवी, कुसुमाग्रज, मंगेश पाडगावकर, विं. दा. करंदिकर, सुरेश भट, नामदेव ढसाळ, शांता शेळके, इंदिरा संत, अरुणा ढेरे, मलिका अमर शेख, नायगांवकर, संदीप खरे ते आता लिहू घातलेले आश्वासक कवी (यादी खूप मोठी आहे त्यासाठी कृपया पेज पहावे) यांची काव्य-चित्रे आपल्याला संग्रही ठेवता येतील.कवितेला साजेसं एखादं चित्र, छायाचित्र किंवा कॅलिग्राफीच्या माध्यमातून कविता अधिक परिमाणकारकरित्या पेश केल्या जातात. त्यामुळेच कदाचित आजवर १४००० हून अधिक रसिकांना या कवितांच्या मायेचा ओलावा लाभला. जगभरातून अनेक मान्यवर साहित्यिक, कलावंत आणि काव्यरसिक या पेजला फॉलो करत आहेत ही गोष्ट बळ देणारी आहे. एखादी कविता या पेजवर प्रसिद्ध झाल्यावर साधारणत: २० ते २५ हजार रसिक त्याचा आस्वाद घेतात. त्यामुळे लोक वाचत नाहीत ही ओरड चुकीची आहे. त्याऐवजी आपण त्यांच्यापर्यंत पोहचत नाही ही गोष्ट मान्य करावी लागेल.

अर्थात हे सर्व मोफत असल्यामुळेही असेल

प्रिझम आर्टस् प्रस्तुत,



# "कविता मना-मनातली"


## सादरकर्ता : प्रा. गीतेश गजानन शिंदे

कारण कविता लिहिणाऱ्यांची संख्या मोठी असूनही विकत घेऊन वाचणारे मात्र कमीच आहेत. त्यामुळे कवितासंग्रह विकले जात नाहीत, एका संग्रहाची आवृत्ती संपायला आठ-दहा वर्षे जातात ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. पण या माध्यमातून कविता वाचनाची गोडी निर्माण झाल्याचे अनेक वाचकांच्या प्रतिक्रियेद्वारे समजून येते. किमान २५ टक्के वाचक नियमितपणे हे पेज वाचत असल्याचे निदर्शनास आले आहे. अनेक वाचक त्यांना भावलेल्या कविता नमूद करतात. तसेच त्यांना हव्या असलेल्या, स्मरणात असणाऱ्या पण संग्रहाच्या अनुपलब्धतेमुळे पुन्हा वाचनाचा आनंद न घेता येणाऱ्या कवितांबद्दल विचारणा करतात. त्या कवितांचा शोध घेऊन प्रसिध्द करण्याचा माझा प्रयत्न असतोच. या निमित्ताने माझेही वाचन वाढले आहे हे नमूद करावेसे वाटते. कारण या पेजला फॉर्मचे बंधन नाही. मुक्तछंद ते अभंग, अष्टाक्षरी ते ओवी, त्रिवेणी ते गजल, हायकू ते दशपदी, चारोळी-पासून रुबाईपर्यंत सर्व रूपातील दर्जेदार कविता या पेजवर वाचायला मिळतात.

या पेजाचा उद्देश फक्त प्रेम, निसर्ग कविता प्रसारीत करणे किंवा फक्त आनंद सोहळा साजरा करणे नसून त्यास सामाजिक जाणीवांची ठाम भूमिका आहे. या कवितांद्वारे समाजातील विकृतींवर, असमतोलावर आणि दमन करणाऱ्या प्रवृत्तींवर प्रसंगानुरूप भाष्य केलेले आहे, त्याला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला आहे. सामान्यांचा उद्गार होऊ पाहणाऱ्या कितीतरी कविता यावर प्रसिद्ध झाल्या आहेत. उदाहरणार्थ, गेली दोन वर्षे महाराष्ट्र दुष्काळाने होरपळत असताना महानगरांतून पाण्याची चैन कमी व्हावी या जागृतीसाठी दुष्काळ, पाणी-बाणी, गाव-गाड्याच्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या कविता प्रसिद्ध केल्या असता त्यांना अनेक भागांतून चांगला प्रतिसाद मिळाला. दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी या विचारवंतांच्या हत्येनंतर कवितेच्या माध्यमातून तीव्र निषेध नोंदविण्यात आला. कविता हा त्या-त्या काळाचा आलेख मांडत असते. त्यामुळे त्या काळातील परिस्थितीचा अंदाज बांधता येतो. आज ७०-८०च्या दशकातील कवितासुद्धा रसिक त्याच नवेपणाने स्विकारतात, कारण फुलं जरी सुकली असली तरी त्यातील काव्यगंध चिरंतन टिकून राहतो.

प्रत्येक महिन्यातल्या जन्मदिवसाच्या आणि स्मृतिदिनाच्या निमित्ताने त्या दिवशी त्या कविंची आठवण म्हणून त्यांच्या कवितेचं काव्य-चित्र प्रसिद्ध केलं जातं. या पेजवरील कविता वाचून त्या कविंचा काव्यसंग्रह जर कोणी विकत घेतला तर या कार्याचा उद्देश सफल

या पेजाचा उद्देश फक्त प्रेम, निसर्ग कविता प्रसारीत करणे किंवा फक्त आनंद सोहळा साजरा करणे नसून त्यास सामाजिक जाणीवांची ठाम भूमिका आहे.




होईल. निदान कवितेची बाराखडी तर नक्कीच यामुळे नवोदितांना गिरवता येईल. घटत्या वाचक वर्गामुळे अनेक दर्जेदार साहित्यिक अंक नामशेष झाले, काव्य-चळवळी बंद पडल्या. त्यामुळे लिहित्या हातांना दिवाळी अंकांवरच डोळे लावून बसावे लागत आहे. अर्थात त्यातही नवोदितांना जागेअभावी साभार परतचा अनुभव येतो. आज अनेक प्रस्थापित कविंसोबतच नव्या पिढीतील आश्वासक कवींच्या कविता पेजवर प्रसिद्ध होत आहेत. त्यामुळे नक्कीच त्यांचं मनोबल वाढत आहे. तसेच दिवाळी अंकातून प्रकाशित झालेल्या कवितेवरची रसिकांची प्रतिक्रिया त्या कविपर्यंत पोहचतेच असं नाही. परंतु या माध्यमातून रसिकांनी दिलेल्या प्रतिक्रिया कविला थेट वाचता येतात, त्याचे उत्तर त्यांना लगेचच देता येते आणि त्यामुळे एक छानसा संवादही साधला जातो. म्हणजेच कवी आणि रसिकांना जोडणारा हा एक नवा दुवा बनू पाहत आहे.


या सगळ्या उपक्रमामागे कोणतेही अर्थकारण नाही. पेजवर कविता प्रसिद्ध करण्यासाठी कुणाहीकडून मोबदला अथवा वर्गणी घेतली जात नाही. एकखांबी तंबूप्रमाणे हे कार्य करत असताना थोडी दमछाक होतेच. तरीही साधारणत: दररोज या नेमाने कविता प्रकाशित करण्याचा प्रयत्न असतोच. सर्व काव्य-चित्र करण्यासाठी आधी कविता व्यवस्थित निर्दोष टंकलिखित करून त्यास साजेसं चित्र निवडून त्याचं कोलाज जोवर पसंतीस उतरत नाही तोवर ते प्रसिद्ध केलं जात नाही. म्हणूनच काही कवितांचे दोन वा तीन पर्यायही माझ्याकडे उपलब्ध आहेत. त्यातील सर्वोत्तम काव्य-चित्र रसिकांपुढे ठेवण्याचा मनोदय असतो. यामध्ये काही ग्राफीक डिझायनर्स किंवा काव्य-रसिकांची मदत मिळाल्यास ही चळवळ अधिक बळकट होईल.

हिंदीमध्ये 'कविता-कोश' हे उत्कृष्ट संकेतस्थळ आपल्याला इंटरनेटच्या मायाजालात सापडेल. त्यातील हिंदीतील जेष्ठ, श्रेष्ठ कविंच्या कविता आपल्याला वाचायला मिळतात.

भविष्यात 'कविता मना-मनातली' हे संकेतस्थळ सुरू करून काव्य-चित्राच्या माध्यमातून कविता पोहोचवण्याचा प्रयोग करण्याचा मानस आहे. या पलिकडे जात वाढत्या स्मार्टफोन्सची संख्या लक्षात घेता 'कविता मना-मनातली' हे पेज तयार करण्याच्या दृष्टीने विचार सुरु आहे. जेणेकरून रोज एका कवितेचं ऑटोअपडेट या पेजमार्फत आपल्यापर्यंत पोहचेल. जे आपण आपल्या मित्र-मंडळी, आप्तेष्टांसोबत शेअर करू शकाल. तसेच कविता दृक-श्राव्य स्वरूपात कवी, काही अभिनेत्यांकडून रेकॉर्ड करून जास्तीत जास्त लोकापर्यंत कवितेचं सादरीकरण पोहचवण्याचा प्रयत्न असेल. त्याचा कच्चा आराखडा तयार आहे, पण यासाठी जर आर्थिक आणि मनुष्यबळाचं पाठबळ मिळाल्यास या दृष्टीने दमदार पावलं टाकता येतील. तोवर कवितांचा हा प्रसार फेसबुकच्या माध्यमातून 'कविता मना-मनातली' पेजवर अव्याहतपणे होतंच राहील.


**– गीतेश गजानन शिंदे**
भ्रमणध्वनी : ९८२०२७२६४६

**भविष्यात 'कविता मना-मनातली' हे संकेतस्थळ सुरू करून काव्य-चित्राच्या माध्यमातून कविता पोहोचवण्याचा प्रयोग करण्याचा मानस आहे.**



At the touch of love, everyone becomes a poet.

**(PLATO)**



# मेंदूत गिरमीट फिरविणारी कविता

डॉ. सिसिलिया कार्व्हालो

**एखादी** कविता वा कवितासंग्रह आवडतो म्हणजे नेमकं काय? शरीर आणि मनाची रंध्रंरंध्रं पुलकित होणं? की एखाद्या कवितेत/कवितांत जीवनावरचं, वास्तवावरचं भाष्य नेमक्या शब्दात केलेलं असणं, त्यामुळे कविता आवडणं? 'दृश्यं नसलेल्या दृश्यात' हा दिनकर मनवर यांचा कवितासंग्रह 'मला आवडला' असं म्हणताना मला वाचताना नेमकं काय वाटत होतं, हे शब्दात सांगताना अवघड व्हावं असा आवडला. म्हणजे वाचताना 'दृश्य' असं काहीसं आणि 'अदृश्य' असं काहीसं इतक्या जोराने आणि इतक्या वेगाने घाव घालीत गेलं आणि आपण जखमी होत गेल्याचं जाणवत राहिलं. कविता वाचत असताना आपल्यावर दबाव येत जातो. हा दबावही अशा पद्धतीने की धान्य दळताना आधी भरड यावं... नंतर वेगाने भुगा होत जावा तशी अवस्था झाली. एखाद्या अजगराने आपल्याला गिळंकृत करावे आणि अख्खंच्या अख्खं त्याच्या पोटात वावरत असताना आजवर अदृश्य असलेलं, न दिसलेलं... जग दृश्यमान होत जावं आणि नंतर त्या अजगराच्या पोटातच, त्याचं अन्न झालेलो आपण, त्याचं पचन होऊन आपलं सारं अस्तित्वच नामशेष व्हावं असं काहीसं झालं.

एकीकडे अत्यंत तरल, नाजूक अशी मनोहारी दृश्ये. उदा. 'चित्र' नावाची कविता,

फुलपाखराचं चित्र काढलं रंगीबेरंगी
अवतीभवती त्याच्या फुलझाडं काढली नाहीत
फुलपाखराचा जीव उबगला आणि गेलं उडून
(पृष्ठ ५३)

मग यानंतर मासा, कासव, ससा, पक्षी यांची चित्रं काढली. परंतु त्यांना जगण्यासाठी आवश्यक त्या गोष्टी काढल्या नाहीत; म्हणून एकेक करून कागदावरून उडून निघून गेले... मग एके दिवशी कवितागत नायकाने 'पांढऱ्याशुभ्र भिंतीच्या पायाशी एक रेषा काढली... आणि मग याला भिंतीतून सळसळ ऐकू आली आणि मग चमत्कार झाला. कवी लिहितो –

मला अजूनही कळलं नाहीये
भिंतीला केव्हा राहिला गर्भ रेषेचा अन् जन्माला आलं झाड
(पृष्ठ ५४)

मग नंतरच्या दृश्यात भयाण गुहा उलगडत जातात. एकातून एक अशा मुखपृष्ठावर जे अधोरेखित झालेलं आहे; खाली मान घालून बसलेल्या एका (समाज) 'माणसाच्या' समोर एक बहरलेलं छोटंसं झाड आहे आणि पाठीमागे एक गुंतागुतीचं घनदाट अरण्य आहे. तो समुद्राच्या तळाशी बसलाय की जमिनीवर की अंधातरी आहे? आणि या दृश्य-अदृश्यांनी त्याचा पिच्छा पुरवल्यामुळे तो आपलं अस्तित्व लपेटून गुंडाळून बसलाय... हतबल होऊन... एखाद्या पक्वान्नाचा आस्वाद घेता घेता त्यातील तिखटाचा जिभेला चटका बसावा, तशा आहेत दिनकरच्या कविता. आस्वाद घेता घेता कोवळं काळीज जाळून टाकणाऱ्या... लगदा बनविणाऱ्या...

संपूर्ण कवितासंग्रहात न दिसलेली, न दिसणारी... दिसूनही त्याकडे 'कानाडोळा' केलेली अशी अनेक दृश्ये दृश्यमान केलेली आहेत त्यामुळे तीन काळांना- भूत, वर्तमान, भविष्य अशा काळांना-भेदणारी आणि भिडणारी अशी कविता आपल्यापुढे येते. कवी म्हणतो,

या आधीच्या दृश्यात सुरू असलेल्या या गोष्टीला
पुढच्या दृश्यातही शेवट असण्याची शक्यता नसल्यानं
ही गोष्ट अशीच सुरू राहणाराय पुढच्या दृश्यातही (पृष्ठ ४)

किंवा,

तो वाट पाहतोय कित्येक दिवसांपासून
जमिनीवर बसलेला अतृप्त माणूस
दुसऱ्या दृश्यात उडून जाण्याची (पृष्ठ ५)

असे तिन्ही काळ एकमेकात बेमालूमपणे मिसळून टाकण्याची किमया कवीला साधलेली आहे. मग यात कोणकोणती दृश्यं येतात. पाणी, बसमधून प्रवास करणारे, जमीन, झाडे, बाई, भाषा, भूक इत्यादींविषयीची. पंचमहाभूते, सृष्टी याबरोबरच मानवाने निर्माण केलेली व्यवस्था. सामाजिक-धार्मिक-सांस्कृतिक-राजकीय अशा विविध प्रकारच्या व्यवस्था आणि त्यात माणूस आणि माणुसकीचा झालेला चुराडा आणि याहीपेक्षा माणसानेच लावलेला यंत्राचा शोध, त्या यंत्राच्या सहवासात राहून माणसाचंच झालेलं यंत्र आणि साऱ्या वस्तूंना मात्र प्राप्त झालेली जिवंतता अशी सारी दृश्यं कवी आपल्यासमोर साकार साजिवंत करतो... तेव्हा माणसामधील हरवलेली संवेदनशीलता आणि यंत्र-तंत्रयुगाची हालचाल, यातील संघर्षात ही सारी चित्रं दृश्यमान होऊ लागतात.

पंचमहाभूतांना माणसाने आपल्या ताब्यात घेतल्यानंतर माणसाची आणि या सृष्टीची झालेली दयनीय, दारूण, भेसूर अवस्था कवी शब्दांकित करतो. पाण्याचा आवाज ऐकण्यासाठी खोलवर उतरू इच्छिणारा हा कवी आहे. पाण्याविषयीचे कवीने उपस्थित केलेले प्रश्न तोंडचं पाणी पळवणारे आणि आपल्या रक्ताचं पाणी करणारे आहेत.

पाणी स्पृश्य असतं की अस्पृश्य?
पाणी वरचं, खालचं केव्हापास्न झालं.
पाणी, नारळात येणारं, छातीच्या बरगड्यात साचणारं,
फफ्फुसात पू होऊन स्रवणारं... हे कोठून येतं. (पृष्ठ ११)

आणि पृष्ठ १४ वरील 'विशेषण' नामक कवितेत उपस्थित केलेला प्रश्न तर अधिक दाहक आहे, वेगवेगळ्या रंगाचं पाणी, चवीचं पाणी, वेगवेगळे आवाज करीत वाहणारं पाणी, शुद्ध-अशुद्ध पाणी ही विशेषणं आपण समजू शकतो. परंतु 'बाटलं' हे एकच विशेषण असं आहे की,

ज्याचा निव्वळ हात लागला पाण्याला
तरी आपसूकच बाटलं जातं पाणी

हे 'विशेषण' कोठून आलं असावं? असा प्रश्न विचारीत असताना आपल्याला तो विचारप्रवृत्त करतो. पाण्याचे 'व्याकरण' उलगडून दाखविताना दाहक असं जातवास्तव कवी शब्दांकित करतो.

पाण्याच्या पुढं कुणी दिला कितीही पूर्णविराम
तरी थांबत नाही, पाण्याचा प्रवाह...
कंसाच्या बंधनात फार काळ अडवून
तुंबवून ठेवता येत नाही पाणी (पृष्ठ १५)
तहान लागली की, पाणी भेद करीत नाही
तू स्वर आहेस की, व्यंजन आहेस म्हणून..
पाण्याला कितीही समानार्थी शब्द वापरले तरी
त्याची जात कोणती?
हे ठरवता आलेलं नाहीये अद्याप भाषेलाही (पृष्ठ १६)
तर 'उच्चार' या कवितेत,
आम्हाला पाण्याचा उच्चार
समजावून सांगणाऱ्यांना
खरं तर माहीत असत नाही,
की, पाणी हे आमच्यासाठी केव्हाच
पाणी होऊ दिलेलं नाही,
ते आमच्यासाठी अजूनही पानीच आहे
नसानसातून वाहणारं..
त्यांना कोणत्या भाषेत सांगावं की,
पाण्याला 'पानी' म्हटल्यानं धरणीकंप होत नाही
की, आटून जात नाही पाणी सृष्टीतलं... (पृष्ठ २५)
नि गु घाण चिखल वाहून ने आमच्यातून (पृष्ठ १७)
'धर्म' या कवितेत,
पाणी अजूनही विचारत नाही कुणाला जातपात
त्याला एवढंच माहीत असतं की,
पाण्याशिवाय पेटू शकत नाही चूल देवाचीही

या ग्लोबल जगात पाण्याचं खाजगीकरण होत चाललंय, ही कवीची अतीव खंत आहे... वर्णव्यवस्थेच्या उतरंडीतही पाणी असंच कोंडलं गेलं होतं.. आणि ग्लोबलायझेशनच्या काळातही पाणी 'खाजगी' बनवत चाललेत. पाण्याची तहान शमवण्याबरोबरच सत्तेची तहान भागवण्याचा चाललेला प्रयत्न यात सामान्य माणसाचा जाणारा बळी अनेक कवितांत दिसून येतो. त्यामुळेच 'सत्ता'नामक त्यांच्या कवितेत पाणी 'लाचार होऊन बसलंय' असे कवी म्हणतो. (पृष्ठ २२)

कवी पुढे म्हणतो;
जे पाणी वाहत होतं
घोटभर पाणी चाखल्यानं पेटून उठलं होतं
मुक्तीसाठी चवदार तळ्यातलं नि:शब्द पाणी
................
जे पाणी वाहत होतं प्रत्येकाच्या हृदयातून
ते कुठं गेलंय वाहून या वर्तमानात
की आटवलंय कुण्या स्मृतिकारानं
संहितेची वाफ देऊन... (पृष्ठ २३)

आणि आज जागतिकीकरणानंतर आजचं पाण्याचं भयानक वास्तव काय आहे?

भूगर्भातील पाणीसुद्धा सार्वजनिक राहणार नाही
याचीच काळजी घेतली जाईल
सत्तेवर येणाऱ्या प्रत्येक सरकारकडून (पृष्ठ २८)
................
मिनरल वॉटरच्या पाण्यानं
सकाळ संध्याकाळ बाथ करणाऱ्यांना
थोडंच माहीत असणार आहे की,
पाण्याच्या एका थेंबातसुद्धा
सगळं अस्तित्व टिकून असतं आमच्या सगळ्यांचं (पृष्ठ २९)

पाण्याची अशी विविध पोर्ट्रेटस वॉटर कुलर वा ऑइल पेंट व स्केचेसमध्ये काढलेली नाहीत. ही पोर्ट्रेटस शब्दांनी रंगवलेली आहेत आणि ती रक्ताचा रंग घेऊन आल्यामुळे चिरकाल टिकणारी आहेत.

'भुके'ची चित्रेही अशीच पक्क्या रंगाची झालेली आहेत. 'भूक' चिरंतन आहे या पृथ्वीवर (पृष्ठ ८३-९२) असे म्हणत सर्व पृथ्वी चावून चावून खाण्यासाठी कवी उद्युक्त झालेला आहे. ही कवीला कडकडून लागलेली भूक कसली आहे? कवी लिहितो...

ज्यानं ज्यानं मला ठेवलंय उपाशी
ज्यानं ज्यानं माझी पळविली भाकरी
ज्यानं ज्यानं माझ्या वाट्याचं पळविलं आणि
ज्यानं ज्यानं माझ्या पायाखालची हिसकावून घेतलीय भूमी
ज्यानं ज्यानं माझ्या डोक्यावरची हिरावून घेतलीय गर्द सावली
त्या सगळ्यांच्या नरडीचा घोट घेतल्यावरही
थोडीच शमणार आहे माझी भूक (पृष्ठ ९२)

एखाद्या सामाजिक घटकाला भाषेपासून वंचित ठेवल्याचीही खंत कवी व्यक्त करतो त्यामुळे तो भाषेची मोडतोड करू इच्छितो.

मला शब्द न् शब्द करायचेयत गोळा
वाचवायचं आहे वाक्यांना लगदा होण्यापासून
उभयान्वयी अव्ययांना
लिहायचं आहे वाक्याच्या सुरुवातीला (पृष्ठ ९५)

मला शिरावंच लागेल कसंही करून भाषेच्या उदरात (पृष्ठ १०९)

सांगण्यासारखं काय आहे आपल्याजवळ
की, जे सांगता येईल भाषेशिवाय (पृष्ठ ६३)

एके दिवशी कवी अक्षरंच ठोकठाक करायला घेतो. (पृष्ठ ६४)

त्यांना कोणत्या भाषेत सांगावं की
पाण्याला 'पानी' म्हटल्यानं धरणीकंप होत नाही
की, आटून जात नाही पाणी सृष्टीतलं... (पृष्ठ २५)

आपल्याला वाचना न आलेली 'अगम्य लिपी' कागदावर असल्याचे कवी म्हणतो. या सर्व विषयात दडलेले जातवास्तव कवी पृष्ठभागावर आणतो.

बाईच्या चिरंतन, सनातन दु:खाविषयी कवी म्हणतो की,
'दुरून जरी या बायांकडे पाहिलं तरी
कोरड्या नदीला अचानक पूर यावा' तसे होते.
(पृष्ठ ५८-५९)

स्त्रीच्या 'दु:खाचा स्वर' या खळखळण्यातून कवीला ऐकू येतो.

'बसमधील प्रवाशांच्या' कवितांत गाव हरवल्याची खंत जशी आहे... तसेच सामाजिक उच्चनीचतेचे चित्रही आहे. खिडकीतला प्रवासी, जागा मिळालेला प्रवासी, उभा असलेला प्रवासी, खिडकीबाहेरचा प्रवासी, 'आपापल्या हिश्श्याचं आकाश' पाहणारा खिडकीजवळचा प्रवासी (पृष्ठ ३७) ही सारी जातिभेदाचं दर्शन घडविणारी दृश्यं आहेत.

संत ज्ञानेश्वर आणि संत मुक्ताबाईचा संदर्भ देत, व्यवस्थेवरचे भाष्य करीत

मी स्वत:च आता या घराला
लावून घेतली आहे ताटी
लाख अभंग लिहिले मुक्ताईनं
किंवा लाख विनवले तिनं
तरीही मी उघडणार नाहीये ताटी या घराची (पृष्ठ १०५)

असे कवी म्हणतो, तेव्हा त्याची आपल्या भूमिकेवरील घट्ट पकड आणि काहीसा आवश्यक असलेला असा उद्दामपणाही दिसून येतो, म्हणून 'केव्हातरी उघडेलच हे आभाळाचं निद्रिस्त झाकण' या कवितेत कवी भाषेच्या व रचनेच्या साऱ्या मर्यादा ओलांडून आपल्या जीवनाचीच झालेली मोडतोड, गतिमान जीवनात संवेदनाचाच झालेला लगदा आपल्यासमोर आणून ठेवतो. यात कवीला वाटणारी अधिक भीती ही आहे की,

विटांवर विटा रचून वाढवली जात आहे घराची उंची
आणि आता तर प्रत्येकाच्या शरीरातूनच
काहीतरी सडल्याचा कुबट वास येऊ लागलाय (पृष्ठ ७३)

'दृश्य नसलेल्या दृश्यात' या कवितासंग्रहात दिनकर मनवर यांनी धर्मग्रंथातील मिथकांचा यथास्थित समाचार घेतलेला आहे. 'झाडांची गोष्ट'मधून (पृष्ठ ४२) जातवास्तव दृश्यमान करताना 'खांडववना'चा संदर्भ देत कवी म्हणतो, 'म्हटलं तर कृष्णार्जुनाला अग्नीच्या भुकेचं कारण पुढे करून यच्चयावत नाश करायचा होता नागकुळांचा' असे म्हणतो तेव्हा वर्णव्यवस्थेतील कारस्थानं कवी उघडी पाडतो. 'बायबल'च्या जुन्या करारातील ॲडम, इव्ह अन् ज्ञानवृक्ष, सफरचंद्र, 'पुराणा'तील कालसर्प याबरोबरच 'कदाचित माझा संबंधही असेल-नसेल या भाषेशी' या कवितेत तर हिंदू धर्मग्रंथांतील मिथकांचा उल्लेख करीत 'आपल्याविषयी काहीच कसं लिहिलं नाही या ग्रंथांत' याविषयीचा विषाद व्यक्त केलेला आहे.

'अजून बरंच काही बाकी आहे' (पृष्ठ १०) या दृश्यात तर कवीला आश्चर्य वाटतं की, एवढं सारं संपून गेलेलं असूनही अजून बऱ्याच गोष्टी बाकी कशा आहेत? पृथ्वी-आप-तेज-वायू-आकाश ही पंचमहाभूते, भाषा आणि कविताही अजून बाकी आहे... ही गोष्ट त्या सकारात्मकतेकडे घेऊन जाते. हे सारे वाचत असताना आपला मेंदूच गिरमिटाने पोखरला जातोय असे वाटत राहते आणि जीवनावरचे, वास्तवावरचे भाष्य यथार्थ शब्दात अत्यंत जोरसकपणे मांडण्याच्या कवीच्या शैलीचे कौतुक वाटत राहते.

– डॉ. सिसिलिया कार्व्हालो
भ्रमणध्वनी : ९४२२३८५०५०
drceciliacar@gmail.com



Poetry is the unexpected utterance of soul.

(MARK NEPO)



# उण्या व्याजदराचं अर्थतांडव

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

**मान्सून** आला की गवत उगवतं तशी बँकेत पैसे ठेवले तर व्याज मिळण्याची आपल्याला अपेक्षा असते. त्याचे दर केंद्रीय बँकेच्या लहरीवर कमीजास्त होतात एवढंच. परंतु हल्ली जपान व काही युरोपीय देशात बचतदरांचा अपेक्षाभंग झाला आहे. तिथे ठेवलेल्या बचतीपेक्षा ग्राहकाला कमी पैसे परत मिळतात. म्हणजे बँक शिल्लक ठेवण्यासाठी शुल्क आकारते, पण व्याज मात्र देत नाही. याला उणा व्याजदर म्हणतात. तसंच आपण १००० युरोचे किंवा येनचे सरकारी कर्जरोखे विकत घेतले तर १० वर्षांच्या मुदतीनंतर आपल्याला सुमारे ९५० युरो किंवा येन परत मिळतात. या उलट आपल्या देशात त्या काळात मुद्दल दुप्पट होण्याची शक्यता.


सरकारी कर्जरोखे विकत घेण्यात जोखीम फार कमी असते. त्यामुळे त्यावर मिळणारा परतावाही जास्त नसतो. जून १७, २०१६ ला भारत सरकार १० वर्षांच्या कर्जरोख्यावर ७.५ टक्के व्याज देत होते. पण तेच कर्जरोखे मागच्या आठवड्यात जर्मनी व जपाननं उण्या २.० टक्के व्याजदरानं यशस्वीपणे विकले. म्हणजे गुंतवणूकदार पैसे सुरक्षित ठेवण्याच्या सोयीसाठी १० वर्षांनंतर कमी मुद्दल स्वीकारण्यास तयार होते. अशा व्यवहारात गुंतवणूकदाराला दोन तडाखे बसतात. एक म्हणजे त्याला व्याज मिळत नाही व कर्जरोखे विकत घेण्यासाठी फी आकारण्यात येते. दुसरं म्हणजे भाववाढीमुळे पैशाचं मूल्य कमी होतं. म्हणून अशी हानिकारक बचत करणाऱ्या गुंतवणूकदारांचं डोकं बिघडलं असंच म्हणावं लागेल. जपान, जर्मनी व स्वीडननं अब्जावधी डॉलरचे असे व्याजमुक्त कर्जरोखे विकले. त्यासाठी मुबलक गुंतवणूकदार उपलब्ध होते हे विशेष.

याचं कारण असं की संस्थात्मक गुंतवणूकदारांना त्या देशात दुसरा पर्याय नाही. अनेक वित्तसंस्थांकडे किंवा विमा कंपन्यांकडे हप्ते भरणाऱ्यांकडून पैशाचे अखंडित लोंढे नियमितपणे वाहत असतात. खर्च वजा जाता ही शिल्लक त्यांना गुंतवावी लागते. अशा कंपन्यांची काही देणी १० वर्षांनी येतात. हे देणं व गुंतवणूक मुदत यात मुदतसादृश्य साधण्यासाठी कंपनीला उण्या कर्जाचे कर्जरोखे विकत घेणं भाग पडतं. त्यासाठी दुसरा शाश्वत पर्याय नसतो. शेअर बाजारात मुंबईतल्या रस्त्यांएवढे खड्डे असल्यामुळे या चढउताराच्या भीतीमुळे हे गुंतवणूक माध्यम मर्यादित प्रमाणात वापरण्यात येतं. स्थावर संपत्तीमध्ये पुरेशी गुंतवणूक झालेली असते. सोन्याच्या गुंतवणूक मूल्यांवर भारतीय गृहिणींशिवाय दुसऱ्या कुणाचा तेवढा विश्वास बसत नाही. म्हणून गुंतवणुकीत व्यामिश्रता आणण्यासाठी ऊणे व्याजधारी कर्जरोखे विकत घेणं अपरिहार्य ठरतं.

परंतु सामान्य ग्राहकांचं काय? त्याचेवर गुंतवणूक वैविध्याची तेवढी बंधनं नसतात. पण वित्त सल्लागार तसं करावं म्हणून हट्ट धरतात. ठेवलेल्या पैशापेक्षा कमी मुद्दल घेण्याऐवजी त्यांनी बँकेऐवजी घरीच पैसे ठेवण्यास सुरुवात केली. या देशात तिजोऱ्यांचा खप एकदम वाढला. काही अंथरुणच बँक म्हणून वापरू लागले तर काहींनी बगिच्यात खड्डे खोदून पैसे संग्रही ठेवले. सर्वसामान्यात वित्ततज्ज्ञाएवढी अक्कल नसेलही, पण त्याला स्वहित नक्कीच कळतं. आपल्या पैशावर व्याज न मिळणं ही गोष्ट तो मनाविरुद्ध एकदा स्वीकारेल पण ते सांभाळण्यासाठी शुल्क आकारणे थोबाडीत मारल्यासारखं होतं म्हणून त्यांनी बँकांवर बहिष्कार टाकला तर नवल कसलं?

अमेरिकेत अजून तरी उणे व्याजदर आले नाहीत. दहा वर्षांच्या सरकारी कर्जरोख्यावर मागच्या आठवड्यात १.६३ टक्के व्याज मिळत होतं. म्हणून अनेक परदेशी संस्थांनी पैसे अमेरिकेत आणले. पण विनिमय दर सारखे बदलत असल्यामुळे १० वर्षांनंतर कमी की जास्त पैसे मिळतील हे सांगणं कठीण. माझ्या मित्रानं काही वर्षांपूर्वी अहमदाबादमध्ये घर विकत घेतलं. अपेक्षेप्रमाणे त्याची किंमत वाढली, पण ते विकल्यावर त्याला तोटाच झाला कारण त्या काळात रुपयाचं अवमूल्यन झालं. याशिवाय पैसे अमेरिकेत आणण्याची यातायात वेगळी. या सर्व व्यवहारात त्याला नुसती डोकेदुखी झाली.

पण अमेरिकेतला हा १.६३ टक्के दर्शनी व्याजदर युरोप किंवा जपानपेक्षा चांगला वाटत असला तरी वास्तवात तो उणाच आहे असं म्हणावं लागेल. सध्या या देशातली भाववाढ जवळजवळ २ टक्के आहे. म्हणजे १० वर्षांनंतर त्या गुंतवणुकीचं मिळणाऱ्या



बँक ऑफ जपानचे माजी
गव्हर्नर मासाकी शिराकावा



युरोपियन सेंट्रल बँकेचे
गव्हर्नर मरियो ड्राघी

व्याजापेक्षा जास्त अवमूल्यन होईल यात शंका नाही. म्हणजे तो उणा व्याजदर आलाच.

देशवासीयांना हे खरं वाटणार नाही, पण जगभर व्याजाचे दर घटले आहेत. अर्थकारणाचा जागतिक वाढदर फक्त २.४ टक्के असणार असं जागतिक बँकेनं नुकतंच जाहीर केलं. या हडकुळ्या दराला बाळसं यावं म्हणून देशातल्या केंद्रीय बँकांच्या गव्हर्नर्सनी व्याजदर हेतूत: कमी ठेवून औद्योगिक वाढीला पुष्टी देण्याचा विडा उचलला. त्यामुळे रोजगारनिर्मिती होऊन अर्थकारण वाढेल अशी अपेक्षा. भाववाढ अगोदरच कमी असल्यामुळे त्यांना त्याची काळजी नव्हती म्हणून अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हचे गव्हर्नर जॅनेट येलन, युरोपियन सेंट्रल बँकेचे गव्हर्नर मारियो ड्राघी व बँक ऑफ जपानचे गव्हर्नर मासाकी शिराकावा यांनी व्याजदर कमी करण्यासाठी क्वांटिटेटिव्ह इझिंग (Quantitative Easing) नावाचं शस्त्र उपसलं. म्हणजे त्यांनी बाजारात व विशेषत: बँकांकडून अब्जावधी डॉलर्सचे कर्जरोखे विकत घेऊन त्यांना रोख दिली. त्यासाठी या गव्हर्नरजवळ पैसे कुठून आले? अर्थातच हवेतून. त्यांनी अहोरात्र नोटा छापण्यास सुरुवात केली. म्हणजे धनादेश वटवल्यावर जसे पैसे आपल्या खिशात खुळखुळतात तसे कर्जरोखे केंद्रीय बँकेला विकल्यावर बँकांच्या तिजोऱ्या फुगल्या. पतपुरवठा याप्रमाणे वाढल्यामुळे व्याजाचे दर घसरले. परिणामी उद्योजक स्वस्त दरात कर्ज काढून उद्योग विस्तार करतील व अर्थकारणाची वाढ होईल ही अपेक्षा. याचा फायदा घरमालकांना जास्त झाला. गृहकर्ज स्वस्त झाल्यामुळे त्यांनी नवीन कर्ज काढून बचत केली. पण अर्थकारणाला मिळालेली ही चेतावणी हळूहळू कमी परिणामकारक होऊन अमेरिकेनं ती पैसे छापण्याची योजना बंद केली. युरोपमध्ये व जपानमध्ये पैसे हवेतून निर्माण करणं सुरूच आहे. पण या औषधाचे गुण कमी झाले.

मग काय करावं? युरोपी व जपानी गव्हर्नर्सनी आपल्या भात्यातला दुसरा बाण उपसला. व्याजाचे दर अगोदरच शून्यवत असताना त्यांनी ते अधिकच कमी करून उणे केले. औषधाची एक गोळी घेतल्यानं ताप उतरायला दोन तास लागत असतील तर दोन सेवन केल्याने ते काम एका तासात होईल असं त्यांनी गणित केलं. पण शरीर जसं विज्ञानशास्त्राप्रमाणे नेहमीच काम करीत नाही तसं अर्थशास्त्रातही गोष्टी गणितीय मितीनं पुढे सरकत नाही असं त्यांना लवकरात आढळून आलं. गेल्या दोनेक वर्षापासून हे उणे दर अमलात आणले तरी अर्थकारणाची पाहिजे तेवढी वाढ झाली नाही.

याला अनेक कारणं आहेत. उद्योजक आपली कंपनी वाढवण्यासाठी नुसत्या स्वस्त भांडवलाचा विचार करीत नाही. बाजारपेठ, स्पर्धा, ग्राहकांची क्रयशक्ती अशा विविध गोष्टी त्याला लक्षात घ्याव्या लागतात. शिवाय हे कर्ज स्वस्त असलं तरी ते मिळणं कठीण झालं आहे. २००८च्या वित्तजलितकांडात बँका होरपळून गेल्या होत्या. म्हणून आता कर्ज देण्यापूर्वी त्या ग्राहकांची कसून तपासणी करू लागल्या. धुतल्या तांदळासारखं स्वच्छ चरित्र असलेले उद्योजक केसाचा कापूस झालेल्या वृद्धांएवढे विरळ. त्या लेप लावून केस काळे करतात. व्याजदर घटवले तरी मागणी वाढली नाही. शिवाय त्यासाठी लागणारी कागदपत्रे एवढी गुंतागुंती की अनेकांनी हात टेकले. ते टाळण्यासाठी जपानमध्ये तर ग्राहकांनी बँकेऐवजी खाजगी वित्तसंस्थेचा उपयोग करण्यास सुरुवात केली. या संस्था आयफोनवर माहिती मिळवून कर्ज देतात. या सुविधेसाठी

ते १८ टक्के व्याज आकारतात. तेच कर्ज बँका २-३ टक्क्याने देते. तरीही ग्राहक खाजगी वित्तसंस्थाच पसंत करतात. त्यांच्या शाखा ठिकठिकाणी सापडतात. बँकांपेक्षा त्यांची वाढ जास्त होत आहे. तसंच उद्यमारंभी कंपन्यांनाही (Start-up) कर्ज मिळणं कठीण झालं. त्यात मुळातच जास्त जोखीम असते.

याप्रमाणे व्याजदर घसरले तरी कर्जाची मागणी वाढली नाही. त्यामुळे बँकांना कर्जरोखे विकून उपलब्ध झालेल्या रोख रकमेचे काय करावं हा प्रश्न पडला. अशा पैशाचा काही भाग केंद्रीय बँकेत बचत ठेवावा लागतो. पण त्यावर ती बँक उणा व्याजदर आकारत असल्यामुळे व्यापारी बँकांचं नुकसान होतं. त्याचा नफा तर कमी झालाच, पण काही तोट्यात गेल्या. म्हणून त्यांना उणे कर्जाचं धोरण मुळीच आवडत नाही. व्याजदर घटवल्यानं अपेक्षित जादू घडली नाही हे विशेष.

ताप जसा रोगाचं एक लक्षण तसंच हे उणे व्याजदर फसलेल्या सरकारी धोरणाचं दुसरं रूप समजण्यात येतं. अर्थकारणाच्या वाढीला दोन गोष्टींची जरुरी असते. एक म्हणजे मौद्रिक (Monetary) धोरण. ते केंद्रीय बँकेचे गव्हर्नर ठरवतं. पतपुरवठ्याचं नियंत्रण करून ते अल्पकालीन व्याजदरावर प्रभाव पाडतात. यावरून वित्त बाजारपेठ दीर्घकालीन व्याजदर ठरवते. केंद्रीय बँक व्याजदराचं शस्त्र वापरून भाववाढ आटोक्यात तर ठेवतेच, पण रोजगार-निर्मितीसाठी योग्य वातावरण निर्माण करून आपलं कर्तव्य बजावते. परंतु आता त्यांच्या भात्यातले बाण संपून त्यांनी हात टेकले. उणे व्याजदर हा त्यांचा शेवटचा बाण.

म्हणून आता अर्थकारणाची जबाबदारी महसुली (Fiscal) धोरणावर पडते. ते सर्वस्वी राज्यकर्त्यांवर असते. उत्पन्नकरात घट करून, नियंत्रणं सुलभ करून व बाबूशाहीला आटोक्यात ठेवून राज्यकर्ते उद्योग संवर्धनास योग्य वातावरण निर्माण करू शकतात. पण राजकारण्यात हे बदल करण्याची इच्छाशक्ती सापडत नाही. उत्पन्नकर अध्यक्ष केनडी व रेगननी कमी केले होते. दोन्ही वेळा अर्थकारणाला उसळी येऊन सरकारचं कररूपी उत्पन्न वाढलं होतं. पण आता असं केलं तर श्रीमंत अजून धनदांडगे होतात असा आरोप करून डावे तुटून पडतात. तसंच उद्योग नियंत्रण शिथिल केल्यानं भ्रष्टाचार वाढतो असाही दावा केला जातो. या टीका नको म्हणून राजकारणी हे बदल करण्याच्या भानगडीत पडत नसून अर्थकारणाची जबाबदारी केंद्रीय बँकेच्या गव्हर्नरवर सोपवतात. पण त्यांच्या कर्तृत्वानं आता सीमा गाठल्यामुळे अर्थकारणाला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्याजवळ कुठलंच शस्त्र उरलेलं नाही. नोटा छापून व व्याजदर उणे करून त्यांना दमछाक झाली. त्यामुळे लवकरच जगाला जागतिक मंदीला तोंड द्यावं लागेल असं अनेक अर्थतज्ज्ञांचं म्हणणं आहे. नोबेल विजेते व न्यूयॉर्क टाइम्स या दैनिकांचे स्तंभलेखक पॉल क्रुगमन तर म्हणतात की जागतिक अर्थकारणाला मधुमेहाची बिमारी लागली आहे. उणे व्याजदर म्हणजे साखर. ती जशी मधुमेहग्रस्तांना वर्ज्य असते तसंच उणे व्याजदर अर्थवाढीला घातक ठरणार आहे.

कळीचा मुद्दा असा की भारतात उणे दर येतील का? याबाबतीत आपला देश भाग्यवान आहे असंच म्हणावं लागेल. भारतातले व्याजदर एवढ्या अत्युच्च पातळीवर आहेत की त्यांचं उण्या आकड्यात रूपांतर होण्यापूर्वी हिमालय दरीत बुडेल. सध्या अमेरिकेत ३० वर्षांचं स्थिर व्याजदराचं कर्ज ३.७५ टक्क्यानं मिळत असलं आणि बँका ते देण्यास आतूर असल्या तरी त्यांना पुरेसे ग्राहक मिळत



नाही. तरंगत्या व्याजाचे दर तर यापेक्षा कमी. दुसरं म्हणजे या देशात ८० वर्षांचा म्हाताराही ३० वर्षांच्या गृहकर्जासाठी पात्र होऊ शकतो. कर्जाची मुदत निवृत्त वर्षापेक्षा कमी असावी असं बंधन अमेरिकेत नाही. याउलट आपल्या देशात गृहकर्जाची मुदत कमी व व्याजदर जास्त आहे. ३० वर्षांचं व स्थिर व्याजाचं कर्ज देणारी बँक धाडसीच म्हणावी लागेल. एवढ्या उच्च पातळीवरून व्याजदर उण्या दरावर उडी मारण्याची शक्यता जवळजवळ शून्यच.

पण समजा यदाकदाचित असं झालं तर भारतीय ग्राहकाची वागणूक कशी असेल? जपानी किंवा जर्मन माणसासारखं तोही बँकेत पैसे ठेवणार नाही. तिजोरी विकत घेण्याची त्याची सहसा ऐपत नसल्यामुळे तो पैसे कुठे ठेवेल? त्याचं अंथरुण तर फुगेलच; पण तो काळा पैसा असलेल्या राजकारण्यासारखा एखादी जागा विकत घेईल नाही तर सोन्यात गुंतवणूक करेल. त्यामुळे सोन्याची आयात व त्याचे भाव वाढतील. ते लंडनमध्ये ठरवण्यात येत असले तरी भारतीय गृहिणींच्या मुठीत असतात. तिच्या लहरीनुसार ते वर-खाली जातात. तिनं मूठ मोकळी सोडली तर सोन्याच्या आंतरराष्ट्रीय भावाला तेजी येते. सोन्यावरचं तिचं प्रेम कमी झालं तर भाव घसरतात. म्हणून उण्या व्याजदराच्या जगात ती अतिरिक्त धातू विकत घेऊन भावाला टेकू देईल यात शंका नाही.

पण उणा व्याजदर हा पाश्चात्य व जपानी अर्थकारणाला लागलेला एकमेव रोग नाही. घटत्या लोकसंख्येमुळे त्यांचा कामगारवर्ग संकुचित होत आहे. त्याचं योगदान कमी झाल्यामुळे त्यांच्या अर्थकारणाला झळ बसली आहे. हे चित्र आज चीनमध्ये बघायला मिळतं. त्या देशाची लोकसंख्या जगात सर्वात जास्त असली तरी 'एकच पुरे'च्या धोरणामुळे त्यांचा मजूरवर्ग घटला आहे. म्हणून त्या देशानं अलीकडेच हे धोरण बदललं. त्यामुळे त्यांचा वाढदर कमी झाला आहे. सुदैवाने भारताला हा प्रश्न भेडसावत नाही. खरं तर भारताला सांख्यिकीय लाभांशाचा (Demographic Devidend) अजून तेवढा फायदा झाला नाही.

घटत्या मजूरवर्गामुळे अर्थकारणावर काय दुष्परिणाम होतात याची मीमांसा मी दुसऱ्या लेखात केली आहे.

**- डॉ. अनंत पां. लाभसेटवार** (पीएच.डी.)
latalabh@aol.com
(लेखक फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी, कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्ष चेअरमन ऑफ दी बोर्ड होते.)




# हॉर्नबिल फेस्टिव्हल-नागालँड

**आत्माराम परब, नरेंद्र प्रभू**

**एखाद्या** राज्याची संस्कृती आणि कला एकाच ठिकाणी पहायला मिळाली तर काय बहार येईल? विशेषत: ते राज्य जर भिन्न सांस्कृतिक परंपरा जपणारं असेल तर ही गोष्ट अधिकच महत्त्वाची ठरते. नागालँड या राज्याने हॉर्नबिल फेस्टिव्हलच्या निमित्ताने तसा पायंडा पाडला आहे. आपल्या खंडप्राय देशातील सगळ्याच पूर्वोत्तर राज्यांमध्ये अनेक जनजाती आहेत, त्यांच्या भाषाही अनेक आहेत आणि एखाद्या तालुक्याच्या आकाराएवढ्या भागातही अनेक भाषा बोलल्या जातात. प्रत्येक जनजातीची भाषा जशी वेगळी तसा त्यांचा पेहरावही वेगळा आणि सांस्कृतिक परंपरा आणि नृत्य प्रकारही वेगळे. एवढंच नव्हे तर या लोकांनी धारण केलेली शस्त्रंही वेगवेगळी असतात. नागालॅन्डसारख्या छोट्याश्या राज्यातही सतरा प्रमुख आदिवासी जनजाती असून त्यांची जीवन पद्धती भिन्न प्रकारची आहे. अशा विविध जनजाती, त्यांचं रहाणीमान, नृत्यप्रकार, संगीत, घरं, पोशाख या सर्वांचं एकत्रित दर्शन घ्यायचं असेल तर हॉर्नबिल फेस्टिव्हलला हजर रहाण्याशिवाय पर्याय नाही.

'फेस्टिव्हल ऑफ फेस्टिव्हलस' म्हणून नावाजला गेलेला हॉर्नबिल फेस्टिव्हल नागालँडमध्ये दरवर्षी डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात साजरा केला जातो. एवढा उत्साहपूर्ण आणि रंगारंग सोहळा भारताच्या इतर राज्यात क्वचितच होत असेल. आपल्या मायभूमीचं प्राणपणाने रक्षण करण्यात नागा योध्ये सतत आघाडीवर असत. आपल्या याच युद्धपरंपरेचा नागा लोकांना आजही तेवढाच अभिमान वाटतो. दिल्या शब्दाला जागणारे नागा लोक आजही दारी आलेल्या पाहुण्याचं हसतमुखाने स्वागत करायला तयार असतात. म्हणूनच हॉर्नबिल फेस्टिव्हल ही पर्वणी ठरते. आपल्याच नागा बांधवांची खऱ्या अर्थाने ओळख करून घेता येते. भावनांचा बंध अधिक घट्ट होतो.

नागालँड राज्य पर्यटन आणि कला आणि संस्कृती विभागातर्फे आयोजित हॉर्नबिल फेस्टिव्हल नागालँडची राजधानी कोहिमापासून १२ किलोमीटर अंतरावर वसलेल्या किसामा या गावात साजरा केला जातो. कोहिमा इंफाळ रस्त्यावर लागणाऱ्या या गावात हा सोहळा संपन्न होतो जे ठिकाण दिमापूर मणिपूरला हमरस्त्याने जोडलं गेलं आहे. १ डिसेंबर हा नागालँड राज्याचा स्थापना दिवस असून त्या दिवसाचं औचित्य साधून एक आठवडाभर हॉर्नबिल फेस्टिव्हल साजरा केला जातो. पहिल्यांदा राज्यपातळीवर साजऱ्या होणाऱ्या या सणाला मोजकेच लोक हजर रहात. पण आता देशाच्या आणि जगाच्या विविध भागामधून पर्यटक या सोहळ्याला गर्दी करू लागले आहेत. गेली पाच वर्षे 'इशा टूर्स'चे पर्यटक इतर पर्यटनस्थळांबरोबरच या सोहळ्याचा आनंद घेत आले आहेत. पर्यटकांची वाढती संख्या लक्षात घेता सुरुवातीला आठवडाभर चालणारा उत्सव आता दहा दिवस चालवला जातो.

संपूर्ण भारतभर मुख्य भूमीवर पर्यटनाला चालना मिळाली असताना ईशान्येकडच्या राज्यात मात्र अजून म्हणावे तसे पर्यटक जात नाहीत. याचं कारण अजूनही भारतातल्या अन्य प्रांतांतल्या लोकांमध्ये ईशान्य भारताविषयी असलेली भीती. ईशान्येकडच्या राज्यातील पर्यटनाबद्दल समजापेक्षा गैरसमजच जास्त आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ईशान्य भारतात पर्यटन वाढले पाहिजे असा आग्रह धरला आहे. भारतात असलेल्या तीस हजार महाविद्यालयांतून दरवर्षी शंभर विद्यार्थी जरी पूर्वांचलाच्या सफरीवर गेले तरी तिथल्या पर्यटनात खूपच वाढ होईल आणि त्या राज्यांमधील जनतेला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मोलाची मदत अशा पर्यटनातून घडेल असा उपायही पंतप्रधानांनी याबर सुचवला



आहे. केंद्र सरकार पूर्वांचलाबबत किती संवेदनशील आहे आणि नव्या सरकारने ईशान्येकडील राज्यांच्या विकासासाठी जो रोडमॅप तयार केला आहे त्याचं सुतोवाच पंतप्रधानांच्या प्रत्येक भाषणात प्रतिबिंबित होतं. केंद्र सरकारमुळे संपुर्ण ईशान्येकडच्या राज्यात आशादायक वातावरण निर्माण झालं असून ईशान्य राज्यातील जनताही त्याला प्रतिसाद देत आहे.

असं असलं तरी ईशान्य राज्यातील पर्यटन हे तितकं सोपं आहे का अशी शंका अनेकजण व्यक्त करतात आणि त्याचं निराकरण होणं आवश्यक आहे. ईशान्य राज्यातील पर्यटन म्हटलं ही सगळ्यात पहिल्यांदा आठवतं ते आसाममधलं काझिरंगा राष्ट्रीय उद्यान आणि मेघालयातलं चेरापुंजी. गुवाहाटी, कामाख्या मंदीर, तेजपूर, शिलाँग, तळ्यांचं तवांग, माजुली बेट आणि अर्थातच नागालँडचा हॉर्नबिल फेस्टिव्हल. पर्यटनाच्या असंख्य संधी असूनही गेल्या साठ वर्षांत या भागाकडे कुणीही जाणीवपूर्वक पाहिलं नाही. त्यामुळे सर्वसाधारण पर्यटक तिकडे फिरकलाच नाही. सात राष्ट्रीय उद्यानं, एकशेआठ तळ्यांचा अद्‌भूत देखावा दाखवून डोळ्याचं पारणं फेडणारं तळ्यांचं तवांग', पूर्वांचलाचं सांकृतिक केंद्र असलेलं माजुली बेट, छाया-प्रकाशाचा खेळ खेळत राहणारं मेघालय, ब्रह्मपुत्रेचं खोरं असलेलं आसाम, हिमालयाच्या पर्वतरांगांचा सुखद अनुभव देणारा भालूकपाँग, दिरांग, बोमडीला हा प्रदेश, नागालँडमध्ये दरवर्षी तिथल्या सतरा जनजातींचं निवासी गाव वसवून दहा दिवस साजरा होणारा हॉर्नबील फेस्टिव्हल ही ठळक आकर्षणं आणि याहूनही मनोवेधक अशी कितीतरी ठिकाणं या राज्यांमध्ये असून पर्यटकांसाठी हा भाग म्हणजे नंदनवनच आहे.

गेल्या दहा वर्षांत आरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय आणि नागालँडमधलं पर्यटन वाढीस लागलं असून तिथली जनता आणि पर्यटन विभाग आपल्या स्वागताला तयारच असतात. उत्तम व्यवस्था असलेली रिसॉर्टस्, हॉटेलं याबरोबरच सर्वप्रकारच्या खाण्याचा अस्वाद देणारी साखळी खानपानगृह हमरस्त्याशेजारी आढळून येतात. पर्यटकांना ये-जा करण्यासाठी वाहनं आणि रस्ते यांची बऱ्यापैकी असलेली उपलब्धता भारतातील कुठल्याही प्रदेशासारखीच असल्याने आपण फार दुर्गम भागात आलो आहोत असं वाटत नाही.

आपल्या देशात आंतरराष्ट्रीय सीमेच्यालगत जायचं असेल तर पर्यटकांना 'इनर लाइन परमिट' घ्यावं लागतं. इनर लाइन परमिटची मुदत सात दिवस असते आणि नंतर आवश्यकता असेल तर ते वाढवून देण्यात येतं. (इनर लाइन परमिटसाठी एक फोटो आणि मतदार ओळखपत्र किंवा पॅन कार्डसारखं ओळखपत्र सादर करावं लागतं.) त्या राज्याच्या निवासी आयुक्तांकडून अशी परमिट दिली जातात. आता बऱ्याच ठिकाणी या गोष्टींचं सुलभीकरण करण्यात आलं आहे किंवा त्यात बदल केला असून चेकनाक्यावर केवळ नोंदी करून पर्यटकांना त्या भागात प्रवेश दिला जात आहे. (जम्मू

काश्मीर राज्यातल्या नुब्रा खोऱ्यासारख्या ठिकाणी जायचं असेल तर पुर्वी इनर लाइन परमिट घ्यावं लागत होतं. आता ते स्थगित करण्यात आलं आहे.) ईशान्येकडल्या अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय आणि नागालँड या राज्यात देशातील इतर राज्याप्रमाणे आपण विनाव्रत्यय प्रवास करू शकतो.

नागालँडसारख्या राज्यात पर्यटनाला चालना मिळावी म्हणून नागालँडचे राज्यपाल मा. श्री. पद्मनाभ आचार्य हे पदभार सांभाळल्यापासून कार्यरत आहेत. भारताच्या विविध भागामधून ते स्वत: अनेक क्षेत्रातील मान्यवरांना हॉर्नबिल फेस्टिव्हलसाठी आमंत्रित करतात. महाराष्ट्रात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने जशी न्याहरी, घरगुती जेवण आणि निवासाची व्यवस्था स्थानिक जनतेच्या घरांमधून केली आहे त्या धरतीवर नागालँडमध्ये निवासाची व्यवस्था केली गेली तर बाहेरून आलेल्या पर्यटकांना नागालोकांची संस्कृती, रहाणीमान आणि चालीरीती यांची माहिति होईल आणि ते एकमेकांशी जोडले जातील. माननीय राज्यपालांचे त्यादृष्टीनेही प्रयत्न चालू आहेत. 'ईशा टूर्स'चे श्री. आत्माराम परब हे पर्यटनाच्या वेगळ्या वाटा धुंडाळण्यासाठी प्रसिद्ध आहेत. नागालँडसारखा रमणीय प्रदेश त्यांना सतत साद घालत होताच. मळलेल्या वाटांवरच्या पर्यटनाला कंटाळलेल्या पर्यटकांसाठी त्यांनी हिरव्यागार निसर्गाचं वरदान लाभलेल्या नागालँडची निवड केली. हॉर्नबिल फेस्टिव्हलला जाऊन त्यांनी तिथल्या परिस्थितीचा मागोवा घेतला आणि हे स्थळ ईशा टूर्सच्या पर्यटकांना पर्यटनासाठी जोडून दिलं. दरवर्षी वाढत्या संख्येने ईशा टूर्सचे पर्यटक नागालँड, मेघालय, अरुणाचल प्रदेश आणि आसाममध्ये जात आहेत.

शूर योद्धे म्हणून जगभर प्रसिद्ध असलेले नागालोक आजच्या नव्या युगातही आपली जुनी परंपरा जपून आहेत. अतिशय वेगळी आदिवासी संस्कृती असलेल्या या विभिन्न जनजाती, प्रत्येकाची वेगळी संस्कृतिक परंपरा आजच्या आधुनिक जगातसुद्धा कसे जतन करतात ते हॉर्नबिल फेस्टिव्हलच्या माध्यमातून अनुभवता येतं. प्रत्येक जमातीचा पेहराव, दागिने, घरांची ठेवण, शिरस्त्राणं, शस्त्रं, जोडे हे सर्व सांस्कृतिक वैभव पहात राहण्यासारखं आहे.

या महोत्सवात किसामा नावाच्या गावाबाहेरील मोकळ्या जागेत सर्व सतरा जमातींच्या प्रतिनिधींना जागा आखून दिली जाते. या जागेत ही मंडळी पारंपरिक रीतीने आपल्या घराची बांधणी करतात. तिथे काही कुटुंबं त्यांच्या पारंपरिक वेशभूषेत घरातील भांड्याकुंड्यासह रहायला येतात. त्यावेळी त्यांच्याशी संवाद साधता येतो, त्यांच्या नाचगाण्याचा आनंद घेता येतो, मनसोक्त फोटोग्राफी करता येते. प्रत्येक घराच्यासमोरील अंगणात पारंपरिक नृत्यप्रकार चालू असतात. बायका-मुलं आतबाहेर करीत आपली नित्याची कामं उरकत असतात. सगळी घरं शेजारी शेजारी असल्याने एका घरामधून दुसऱ्या घरात जाताना एका संस्कृतीमधून दुसऱ्या भिन्न संस्कृतीमध्ये गेल्याचा भास होत रहातो. प्रत्येकजण आपापली वाद्यं जोरजोरात वाजवत असतो. त्यांची सर्वच नृत्यं ही समूह नृत्यं असतात. लयबध्दतेने चालणारी ही नृत्यं



**नागालँडचे राज्यपाल मा. श्री. पद्मनाभ आचार्य पूर्वांचलाच्या पर्यटनात मोलाचा वाटा उचलल्याबद्दल 'ईशा टूर्स'चे श्री. आत्माराम परब यांना गौरवपत्र प्रदान करताना**

आणि विशिष्ट आवाजामुळे एक प्रकारचा उत्साही माहोल तयार होतो. वातावरणात जोश भरून रहातो. नागालोक हे मुळचे योद्धे आणि शिकारी असल्याने त्यांच्या जवळ शिकारीत मारलेल्या प्राण्यांची शिंगं, हाडं, चामड्यापासून बनवलेल्या अनेक वस्तू पहायला मिळतात. हॉर्नबिल फेस्टिव्हलच्या पहिल्या दिवशी सर्व जमातीचा एक सामूहिक नाच आयोजित केला जातो. याबरोबरच शेजारच्या म्यानमार, थायलंड या देशातून आलेल्या कलाकारांची नृत्यंही या प्रसंगी सदर केली जातात. या महोत्सवादरम्यान काही एकराच्या परिसरात संपूर्ण नागालँडचा फेरफटका मारल्याचा अनुभव गाठीशी बांधता येतो. नागालँडची भौगोलिक रचना पहाता इतरवेळी याच गोष्टीसाठी महिन्याभराचा काळ सहज लागू शकतो.

याच भागात नागालँडच्या कलात्मक वस्तूंचा बाजारही भरतो. तसंच वेगवेगळ्या खाद्यपदार्थांचे स्टॉलही उभारले जातात. एरवी रात्रीच्या वेळी सुमसाम असलेलं हे खेडं या दिवसात मात्र रात्रीही गजबजलेलं असतं. अनेक स्टॉल्स उभारले जातात. पर्यटकांसाठी तसा पहिलाच दिवस महत्त्वाचा ठरतो. त्या दिवशी जवळपास सर्व कलाप्रकार, वस्तू जवळून पहाता येतात. तर असा हा मिनी नागालँड पहायचा असेल तर तिथे गेलं पाहिजे. हे राज्य पर्यटकांसाठी अगदी सुरक्षित आहे. राज्यातील प्रत्येक गावाच्या प्रवेशव्दारावर आम्ही आपले स्वागत करीत आहोत असे फलक लावलेले आहेत. भारतातील इतर पहाडी प्रदेशांप्रमाणेच नागालँडचे लोक खूप प्रेमळ आणि दिलदार आहेत. हिरव्यागार निसर्गाने नटलेला नागालँड आपली वाट पहात आहे.

**– आत्माराम परब, नरेंद्र प्रभू**
info@ishatours.net
भ्रमणध्वनी : ९८९२१८२६५५
दूरध्वनी : ०२२-२५४३७४१७, २५४३७४५८

## ग्रंथालीचा लेडीज स्पेशल' प्रकाशन सोहळा



छाया दातार



प्रा. आशालता कांबळे



संपदा जोगळेकर



नीलम माणगावे



सुजाता लोखंडे



डॉ. वीणा सानेकर

२८ ऑगस्ट २०१६ रोजी ग्रंथाली प्रकाशनाचा प्रकाशन सोहळा सहयोग मंदिर, घंटाळी, ठाणे येथे पार पडला. डॉ. वीणा सानेकर लिखित 'आरसपानी जगताना' (ललित), सुजाता लोखंडे लिखित 'फूटपाथ ते नोटरी' (कादंबरी), आणि नीलम माणगावे लिखित निर्भया लढते आहे' (कथासंग्रह) या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकांचे प्रकाशन अभिनेत्री संपदा जोगळेकर, छाया दातार आणि आशालता कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले.

शिक्षण, माणसं, कुटुंब, समाज अशा विविध पैलूंसह जगण्याचा संवेदनशील वेध घेणाऱ्या आरसपानी जगताना'मधील लेखांचा संपदा जोगळेकर यांनी आपल्या भाषणात सूक्ष्म वेध घेतला. या संग्रहातील लेख म्हणजे आपल्या अवतीभोवतीच्या जगण्यातील लहानसहान विषय असले तरी हळूहळू रुजणाऱ्या सीडबॉम्बप्रमाणे त्यांचे कार्य आहे, असे प्रतिपादन संपदा यांनी केले.

नायकाचा खडतर जीवन प्रवास सांगणारी आणि प्रतिकूल वास्तवाशी लढण्याचे बळ देणाऱ्या फूटपाथ ते नोटरी' या आंबेडकरी कादंबरीचे अवलोकन आशालता कांबळे यांनी केले. तसेच त्यांनी आपल्या भाषणातून आंबेडकरी कादंबऱ्यांचाही विस्तृत आढावा घेतला.

अन्याय - अत्याचारांनी खचून न जाता, सारासार विचार करून त्याविरूद्ध आवाज उठवणाऱ्या 'निर्भया लढते आहे'मधील नायिकांच्या जगण्याचा वेध स्त्रीवादी चळवळीच्या अभ्यासक छाया दातार यांनी घेतला. हा वेध घेताना त्यांनी स्त्रीवादी चळवळ आणि आजच्या बाईच्या जगण्याबद्दल तपशीलात विवेचन केले.

डॉ. वीणा सानेकर, सुजाता लोखंडे, नीलम माणगावे यांनी आपल्या मनोगतातून प्रस्तुत साहित्यकृती लिहिताना आलेले अनुभव मोकळेपणाने कथन केले.

धनश्री धारप यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर अस्मिता पांडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

---



## ज्ञानोत्सव २०१६ चे उद्घाटन

**सियाचेनमधील सैन्य काढणे हा सियाचेन प्रश्नावरील उपाय नाही, असे मत ज्येष्ठ लेखिका अनुराधा गोरे यांनी व्यक्त केले.**

'ज्ञानगंगा'तर्फे आयोजित करण्यात आलेल्या ज्ञानोत्सव या पुस्तक प्रदर्शनाच्या वेळी त्या बोलत होत्या. महापौर प्रशांत जगताप यांच्या हस्ते पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. 'ओळख सियाचेन'ची या पुस्तकाच्या निमित्ताने अनुराधा गोरे यांच्याशी गौरी लागू यांनी संवाद साधला, त्यावेळी गोरे यांनी सियाचेनचा प्रवास उलगडून सांगितला. यावेळी ज्ञानगंगाचे उमेश पाटील उपस्थित होते.

गोरे म्हणाल्या, सियाचेनसारखा महत्त्वाचा प्रदेश आपल्याकडे दुर्लक्षित राहिला आहे. या प्रदेशाला काही जण सियाचेन म्हणतात. मात्र त्याचा मूळ उल्लेख सियाचेन असाच आहे. सिया म्हणजे गुलाब आणि चेन म्हणजे काटेरी. काटेरी गुलाब असतात तो प्रदेश म्हणजे सियाचेन. भारतीय लष्कराचा मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च होतो. सियाचेनमध्ये अनेक आव्हानांना तोंड देऊन भारतीय लष्कर तेथे सतर्क राहत असते. सियाचेनचा प्रश्न सोडविण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती हवी. या भागातील सैन्य काढून काहीही उपयोग नाही, असेही मत गोरे यांनी व्यक्त केले.

महापौर प्रशांत जगताप यांनीही यावेळी वाचनसंस्कृतीचे महत्त्व विशद केले. जगताप म्हणाले वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी ज्ञानगंगा करीत असलेले प्रयत्न स्त्युत्य आहेत. सध्याच्या काळात वाचनाची विविध माध्यमे उपलब्ध असली तरीही पुस्तके वाचण्यातील आनंद वेगळाच आहे, वाचकांनी विकत घेऊन पुस्तके वाचावीत.

कार्यक्रमाला वीणा देव, विजय देव, प्रदीप लोखंडे आदी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. जयदीप पाठकजी यांनी सूत्रसंचालन केले आणि आभार मानले.

# धायगुडेंची जिद्द हे नियतीलाच 'हुमान'!

## सातव्या आवृत्तीचे प्रकाशन

धुळे मनपा आयुक्त संगीता धायगुडे यांचे आत्मचरित्र 'हुमान'च्या सातव्या आवृत्तीचे प्रकाशन २९ ऑगस्ट २०१६ रोजी झाले. त्यावेळी 'स्वतःमधून स्वतःकडे बघावसं वाटतं, ती आहे म्हणून अजून जगावसं वाटतं' या कवितेच्या ओळी सादर करीत संगीता धायगुडे यांची जिद्द हे नियतीलाच पडलेलं 'हुमान' होतं, असे गौरवोद्गार अभिनेते व कवी किशोर कदम यांनी काढले. या कार्यक्रमाला लेखिका संगीता धायगुडेंसह जिल्हाधिकारी दिलीप पांढरपट्टे, महापौर कल्पना महाले, संगीतकार कौशल इनामदार, माध्यमतज्ज्ञ युवराज मोहिते, 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर आदि मान्यवर मंडळी उपस्थित होती. किशोर कदम म्हणाले की, या कार्यक्रमाला संगीता धायगुडे यांनी बोलाविले म्हणून नव्हे तर हुमानमधून मिळालेल्या प्रेरणेला दाद देण्यासाठी आलो. स्त्रियांच्या कर्तृत्वाचे 'उत्तम' उदाहरण संगीता धायगुडे असल्याचेही कदम म्हणाले. तर संगीतकार कौशल इनामदार यांनी मनोगतात, दुःखाची वेश ओलांडून हुमान प्रेरणेच्या पलीकडे जात असल्याची बोलकी प्रतिक्रिया दिली. 'लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी' हे मराठीचा अभिमान सांगणारे गीतही इनामदार यांनी सादर केले. इतक्या अवघड परिस्थितीत आशा मरू न देता जगण्याचे धाडस प्रत्येकालाच जिद्द देणारं ठरतं, असे इनामदार म्हणाले. माध्यमतज्ज्ञ युवराज मोहिते यांनी महिलांनी लिहिलेले आत्मचरित्र पुरुषांच्या आत्मचरित्रापेक्षा अधिक प्रभावशाली ठरते. प्रत्येक दुःखाचा, वेदनेचा अनुभव महिलाच अधिक प्रमाणात घेत असतात, असे स्पष्ट केले. महापौर कल्पना महाले यांनी देखील 'हुमान'ने वाढविला जगण्याचा बहुमान ही कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळविली. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप भाषणात जिल्हाधिकारी दिलीप पांढरपट्टे यांनी पुस्तकाच्या निर्मितीमधील आपला सहभाग व काही शेर सादर केले. सुदेश हिंगलासपूरकर यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जगदीश देवपूरकर यांनी, तर सूत्रसंचालन अपर तहसीलदार ज्योती देवरे यांनी केले. या कार्यक्रमात ज्योती देवरे यांच्या संकल्पनेतून हुमान ग्रुपची स्थापना करण्यात आली. यावेळी मान्यवरांना ग्रुपचे सदस्यत्व बहाल करण्यात आले. तसेच संगीता धायगुडे यांच्या जीवनावरील ध्वनिचित्रफीतही दाखविण्यात आली.

---

## क्षणचित्रे




**ज्योती स्टोअर्स व शंकराचार्य न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने 'लेखक तुमच्या भेटीला' या कार्यक्रमात 'हृदयस्पर्शी माधवबाग' या पुस्तकाच्या पाचव्या आवृत्तीचे प्रकाशन. वसंत खैरनार, मानसी देशमुख, रोहित साने आणि आनंद जोशी.**




**आपटे वाचनमंदिर व इचलकरंजी साहित्य संमेलन स्मृती ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने 'लक्षणीय पद्य साहित्यकृती' हा पुरस्कार या सोहळ्यात विख्यात कवी सुदेश लोटलीकर यांना ८९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते स्वीकारताना सुदेश लोटलीकर**



**रोहित साने यांची मुलाखत घेताना मानसी देशमुख**














## ॥ग्रंथाली॥

## शब्द रुची सप्टेंबर २०१६ कविता विशेषांकाचे औचित्य साधून 'ग्रंथाली'ने प्रसिद्ध केलेले ५० कवितासंग्रह व शब्द रुची मासिकाची वार्षिक वगर्णी मूळ किंमत ५,२५०/- सवलतीत घरपोच १,२५०/- रुपये


| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १. | Net क्या कविता | मिलिंद लांजेवार | १०० |
| २. | निरन्वय | नीरजा | १०० |
| ३. | स्पर्श हरवलेले | डॉ. सुलभा कोरे | १०० |
| ४. | काटेसावर | उषा मेहता | १२५ |
| ५. | प्रत्ययपर्व | मनोहर जाधव | ७० |
| ६. | बाबासाहेब | यशवंत मनोहर | १२५ |
| ७. | कौतुकी | टी.एन. परदेशी | १०० |
| ८. | ओळखीची वाट | नीला सत्यनारायण | १५० |
| ९. | वाटेवरच्या कविता | अशोक नायगावकर | ५० |
| १०. | राधेचा पाऊस | अरुण शेवते | ८० |
| ११. | काही तरी सांगायचंय म्हणून | प्रकाश हरी कार्लेकर | १२५ |
| १२. | दुःख माझे कोवळे | प्रतिभा सराफ | ६० |
| १३. | चॅनेल : डी-स्ट्रॉयरी | श्रीधर तिळवे | १२५ |
| १४. | आईच्या कविता | अरुण शेवते | ७० |
| १५. | ओंजळ काव्यफुलांची | सुभाषचंद्र मयेकर | १२५ |
| १६. | एका उन्हाची कैफियत | चंद्रशेखर सानेकर | ६० |
| १७. | खिडकी उघडी ठेवून | प्रदीप देशपांडे | ७५ |
| १८. | फिदा स्वतःवर | सरोज जोशी | ८० |
| १९. | मळवट | फ.मु. शिंदे | १०० |
| २०. | कविता मनातल्या... | | |
| | कविता कोर्टातल्या... | मृदुला भाटकर | ६० |
| २१. | बेहोशीतच जगणं असतं | श्रीकांत पेटकर | ६० |
| २२. | सुगंध उरले, सुगंध उरणे | संपादन : अरुणा ढेरे | १६० |
| २३. | सैतानाची खूशी | राकेश भडंग | ८० |
| २४. | फुलवेडी | अरुण शेवते | ६० |
| २५. | एक अजब कोलाहल | चंद्रशेखर सानेकर | ८० |


















# ग्रंथाली


| | | | |
|---|---|---|---|
| २६. | प्रिय आयुष्यास सप्रेम नमस्कार | संगीता उत्तम थायगुडे | ८० |
| २७. | तीव्र एकांतातल्या जीर्ण काळोखात | मनोहर जाधव | १२० |
| २८. | कवितेच्या कविता | अरुण शेवते | ७० |
| २९. | बाईच्या कविता | किरण येले | ८० |
| ३०. | तृष्णाकाठ | वैभव देशमुख | १०० |
| ३१. | थांबवू शकत नाही कविता लिहिणं | सायमन मार्टिन | १५० |
| ३२. | गारुड गझलचे | सदानंद डबीर | १२० |
| ३३. | उरल्यासुरल्या जगण्याचं रिमीक्स | गोविंद काजरेकर | ७५ |
| ३४. | बदलत गेलेली सही | अंजली कुळकर्णी | १२० |
| ३५. | या शतकाचा सातबाराच होईल कोरा | शंकरराव दिघे | ८० |
| ३६. | कळा | लक्ष्मण घाडीगांवकर | १२० |
| ३७. | काळिजगुंठा | सदानंद डबीर | ७५ |
| ३८. | चाफ्याचे फूल | जितेंद्र कुवर | १०० |
| ३९. | माझ्या काळाचा अनुवाद | चंद्रशेखर सानेकर | ८० |
| ४०. | वर्तुळ पुसून टाकताना | शारदा नवले | ८० |
| ४१. | अनाहत | ॲड. मंदाकिनी पाटील | १०० |
| ४२. | काळा तुकतुकीत उजेड | किशोर पाठक | १२० |
| ४३. | कॉमन मॅन | हरंब कुळकर्णी | ८० |
| ४४. | पाणीबाणी | संपादन : प्रभाकर साळेगावकर | १६० |
| ४५. | फोडणी | रामदास फुटाणे | १०० |
| ४६. | अरुपाचे रुप | माणिक गुटे | १२५ |
| ४७. | बोलावेंत आम्ही | श्रीकांत देशमुख | १८० |
| ४८. | ही वाट सुनसान कशी | योगीराज बागुल | १०० |
| ४९. | अंतनेत्र | सुदेश लोटलीकर | २५० |
| ५०. | स्वत:तील अवकाश | ज्ञानेश्वर मुळे | १२५ |


























–: संपर्क :–

द्वारा बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली क्र. ९, तळमजला, जे.के. सावंत मार्ग, यशवंतराव चव्हाण नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प.), मुंबई ४०००१६.

दूरध्वनी : २४३०६६२४, २४२१६०५० • Email - granthaliruchee@gmail.com

रोहन प्रकाशन

# ग्रंथपान





**मनं उलगडताना**
**मनातल्या गुंतागुंतीवर मनोविकारांवर टाकलेला प्रकाश**
**डॉ. विजया फडणीस**

मन असे कसे, कांद्याचे पापुद्रे जसे!'

कोण्या अज्ञात कवीच्या या ओळी मनाचं यथार्थ वर्णन करतात. मात्र थांग न लागणाऱ्या मनाची मानसशास्त्रीय संकल्पना आणि पद्धती यांच्याद्वारे चिकित्सा केल्यास अनेक मनोव्यापारांचा वेध घेता येतो. ३५ वर्षांहून अधिक काळ मानसतज्ज्ञ आणि समुपदेशक म्हणून काम करणाऱ्या डॉ. विजया फडणीस यांनी या लेखसंग्रहातून मनुष्यस्वभाव, मनोविकार, मानसोपचाराच्या विविध पद्धती आदींचा वेध घेतला आहे. विशेष म्हणजे फ्रॉइडचे स्वप्नाचे सिद्धान्त, रिॲलिटी थेरपी आदी मानसशास्त्रीय संकल्पना किंवा डिप्रेशनसारखे मनोविकार आदी गोष्टी विशद करताना त्यांनी आपल्या लेखांना अनुभवांची जोड दिली आहे. त्यामुळे हे लेख माहितीपूर्ण, तसंच मर्मदृष्टी देणारे व रंजक झाले आहेत. या लेखांमधून फडणीस यांनी विविध मानसोपचारतंत्राचा वापर कसा करावा, हेही साध्या-सोप्या शब्दांत सांगितलं आहे. त्यामुळे वाचकांबरोबरच मानसशास्त्राचे विद्यार्थी व शिक्षक यांनाही हे पुस्तक नक्कीच उपयुक्त ठरेल.

स्वभावाचे विविध नमुने मांडणारा, सकारात्मक वास्तववादी दृष्टिकोन देणारा मौलिक लेखसंग्रह... मनं उलगडताना!

**पृष्ठे २०४ मूल्य रु. २००**
**'ग्रंथाली' येथे सवलतीत २०० रुपये**




**सुखाने जगण्यासाठी**
**सकारात्मक दृष्टी देणारं मौलिक मार्गदर्शन**
**डॉ. विजया फडणीस**


आजच्या आधुनिक युगात जगण्याचा वेग 4G पेक्षाही वेगवान झाला आहे! परिणामी दैनंदिन जीवनातले ताणतणाव, धावपळ आणि घाईगडबडही कधी नव्हे इतकी वाढली आहे. अशावेळी आपल्यासमोर उभ्या ठाकलेल्या परिस्थितीचं नीट आकलन करून त्यातून मार्ग काढणारेच यशस्वी आणि पर्यायाने सुखी होतात. मात्र त्यासाठी आवश्यक असतं - निरोगी मन:स्वास्थ्य आणि मनोनियंत्रण!

हे जाणूनच विख्यात मानसतज्ज्ञ व समुपदेशक डॉ. विजया फडणीस यांनी या लेखसंग्रहात आपलं मन निरोगी राखण्याचे मौलिक मंत्र उदाहरणांसह सांगितले आहेत. तसंच विचार आणि भावना यांवर नियंत्रण ठेवून आपली वर्तणूक कशी ठेवावी याबद्दल अत्यंत मौलिक अशा सूचना केल्या आहेत, तर काही ठिकाणी त्यासाठी आवश्यक अशा युक्त्या-क्लृप्त्याही सांगितल्या आहेत. त्यांनी या लेखांमधून मानसशास्त्रीय संकल्पना अत्यंत सोप्या शब्दांत समजावून सांगितल्यामुळे वाचकांना आगळी अंतर्दृष्टीही मिळते. स्वभावातील त्रासदायक गोष्टी टाळून स्वविकास साधण्यासाठी, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी उपयुक्त असा लेखसंग्रह...सुखाने जगण्यासाठी!

**पृष्ठे १६० मूल्य रु. १५०**
**'ग्रंथाली' येथे सवलतीत २०० रुपये**




# ग्रंथपान




**युक्रांदचे दिवस**
**विजय दर्प**

सन १९७२-७३ च्या शैक्षणिक वर्षात नोकरीत कायम करावे लागू नये म्हणून नगरच्या कॉलेजने वीस-पंचवीस डेमॉस्ट्रेटर आणि लेक्चरर कामावरून काढून टाकले. ती त्यावेळची प्रथा फ्लोटिंग स्टाफ नावाची. तिच्याविरुद्ध आवाज उठविणारे, आंदोलन करणारे विजय दर्प हे पहिले कार्यकर्ते. पुढे प्राध्यापकांची पुक्टो / एमफुक्टो संघटना स्थापन झाल्या, त्यांचा पायाभरण करणारे हे नगरचे पहिले आंदोलन. स्वतःच्या गरजा वाढवत राहून त्या पुऱ्या करण्यासाठी धडपडत राहण्यापेक्षा प्रचलित सामाजिक अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्यासाठी आपल्या कुवतीनुसार संघर्ष करीत जगायचं, हे जीवनध्येय ठरवून ते युक्रांदशी जोडले गेले, पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून. अर्थातच कुमार सप्तर्षी आणि त्यांच्या युक्रांदचा प्रभाव याला कारणीभूत ठरले. तिथून सुरू झालेल्या कार्यकर्त्याचा प्रवास, आलेले अनुभव, भेटलेल्या व्यक्ती, पाहिलेले परिवर्तन, त्यांचे कथन म्हणजे 'युक्रांदचे दिवस'.


युवक क्रांती दल म्हणजेच युक्रांद, स्वातंत्र्योत्तर काळातील चळवळीचे एक प्रभावी माध्यम, १९६७ साली स्थापन झालेले. लोकशाही समाजवादी क्रांती देशात घडवून आणण्यासाठी अविरत झगडण्याचा संकल्प हा युक्रांदच्या भूमिकेचा गाभा. समाजवादी क्रांती साकार होण्यासाठी देशातील राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि अन्य सत्तास्थानं दलित जातीकडे जाणे ही क्रांतीची प्रथम गरज व कसोटी मानली गेली. ही ध्येयधोरणे विजय दर्प यांनी आपली ध्येयधोरणे म्हणून स्विकारली. आदिवासींची सावकारी शोषणातून मुक्ती, रोजगार या समस्यांना वाचा फोडणे, रास्त भावाने खत मिळणे, दलित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ, शालेय फी वाढ, शेतकरी आंदोलन, अशा अनेक आंदोलनात ते सहभागी झाले, न्याय मिळविला. पण यात लक्षात राहणारे आंदोलन म्हणजे राशीनचे आंदोलन. नगर जिल्ह्यातील राशीन गावातील सरंजामशाही विरोधात जो लढा दिला तो अद्‌भूतपूर्वच म्हणायला हवा. त्यातला पहिला कार्यकर्ता होते ते विजय दर्प. तेथे 'कम्यून' नावाने ओळखली जाणारी समांतर व्यवस्था स्थापन करण्याचा प्रयोग तर अभिनव म्हणावा असाच. पॅरिस येथे १८७१ साली बंडखोरांनी सशस्त्र दलाच्या साहाय्याने स्थापन केलेल्या समाजवादी सरकाराचा संदर्भ या पाठी होता. आणीबाणीच्या काळात स्वैर उधळलेल्या वारूने अनेकांना आपल्या टाचेखाली चिरडण्याचा प्रयत्न केला, त्यातून युक्रांद अपवाद नव्हती. अनेकांच्या वाट्याला तुरुंगवासाचे पावित्र्य विजय दर्प यांनाही पावन करून गेले. मात्र युक्रांदने याही काळात आपली ध्येयधोरणांची अस्त्रे खाली ठेवली नाहीत. मराठवाडा विद्यापीठाची नामांतर चळवळ युक्रांदने एक भूमिका घेऊन चालविली, 'नामांतर कशासाठी? समतेच्या न्यायासाठी!' संयुक्त महाराष्ट्र लढ्यानंतरचा हा सर्वात मोठा लढा होता. ज्यासाठी अनेकांना तुरुंगवास भोगावा लागला, त्यात विजय दर्पही होते.

चळवळीत असल्याने सामाजिक जबाबदारीची जाण आली, आयुष्याला एक नवी दिशा मिळाली. अनिष्ट, अन्यायकारक वाटले ते बदलण्याचा प्रयत्न झाला. समाजातील दुर्बल घटकांसाठी समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या अनेक नेत्यांचा, कार्यकर्त्यांचा परिचय झाला. अरुण लिमये, अनिल अवचट, एसेम जोशी, जॉर्ज फर्नांडिस, जयप्रकाश नारायण सारख्या थोरामोठ्यांचे सान्निध्य लाभले. त्यांच्यामुळे विचारांना वेगळे परिमाण लाभले. देशात धुमसणारा असंतोष, बिहार-गुजरात येथील विद्यार्थी आंदोलने, गोधाकांड आणि त्या निमित्ताने झालेला हिंसाचार व शांतता प्रयत्न, अशा अनेक घटनांचे साक्षीदार होता आले. राजकारणात होणारे बदल, राजकीय पक्षांची चढाओढ आणि पतन यांना जवळून पाहता आले. हे सारे संचित जीवन समृद्ध करणारे ठरले.

सदरचे लेखन हे युक्रांदच्या इतिहासाचे एकपान म्हणता येईल. युक्रांद हे जसे वृद्धिंगत होत गेले, तसा त्यात अनेक मतप्रवाहांचा शिरकाव देखील झाला. राष्ट्रीय पक्षांप्रमाणे त्याचेही विघटन झाले. १९७७ ला जनता पक्षात विलिनीकरण झाले. १९९९ साली पुन्हा युक्रांद पुनर्जीवित झाले. युक्रांदचा संपूर्ण इतिहास यात नाही, परंतु जे आले ते थोडे नसे. कुमार सप्तर्षी यांचे व्यक्तिमत्त्व युक्रांदपासून वेगळे करता येणे शक्य नाही. त्यांच्या ध्येयधोरणापासून ते त्यांच्या कुटुंबावर झालेल्या हल्ल्यापर्यंतचा तपशील, त्यांची जडणघडण यात आलेली आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील गावापासून राजधानीपर्यंतच्या सामाजिक, राजकीय परिवर्तनाचे विश्लेषन करणारे संदर्भपुस्तक म्हणून याचे मोल लक्षात घेण्यासारखे आहे. यात व्यक्त केलेली मते, अवलोकन, चिंतन, भाष्य ही अनुभवाच्या सहाणेवर सिद्ध झालेल्या कार्यकर्त्यांची आहेत. त्याची व्यापकता विविध विचारसरणींच्या अभ्यासातून साकारलेली आहे. त्यामुळे ही गाथा वाचत असताना आपण एका पर्वाचा इतिहास वाचतो आहोत, असेच जाणवत राहते. रविमुकुल यांचे खादीवरील ओळखपत्राच्या फोटोने सजलेले मुखपृष्ठ हे गतकाळाच्या दिवसांना स्मृतीच्या पटलावर ठसवणारे आहे, उजाळा देणारे आहे.

**पृष्ठे १८३, मूल्य २०० रुपये**
**'ग्रंथाली' येथे सवलतीत १६० रुपये**

साधना प्रकाशन



**प्रश्न तुमचा,**
**उत्तर दाभोलकरांचे**
**डॉ. नरेंद्र दाभोलकर**

सुरुवातीची काही वर्षे आय.टी. क्षेत्रात काम केल्यानंतर, आपल्याला मिळालेल्या माहिती-तंत्रज्ञानाचा वापर सामाजिक क्षेत्रातील कार्यासाठी, प्रामुख्याने प्रबोधनासाठी व्हावा अशी धारणा असलेले एक व्यक्तिमत्त्व म्हणजे गिरीश लाड. पाच वर्षांपूर्वी त्यांची डॉ.नरेंद्र दाभोलकरांशी भेट झाली, तेव्हा त्यांना असं जाणवलं की, डॉक्टरांची भाषणं रेकॉर्ड केली आणि ऑडिओ सीडीच्या स्वरूपात उपलब्ध करून दिली तर एका नव्या वर्गाला अंनिसच्या कामाची ओळख होईल. त्यांनी तसा प्रस्ताव डॉ.दाभोलकरांसमोर ठेवला. डॉक्टरांनी तो प्रस्ताव आनंदाने मान्य केला, कारण आपली चळवळ सतत नव्या व तरुण वर्गासमोर गेली पाहिजे अशी त्यांची धारणा होती. त्याप्रमाणे डॉक्टरांची दहा भाषणे ध्वनिमुद्रित करून, त्यांच्या दोन ऑडिओ सीडी तयार करण्यात आल्या. त्या सीडींना मिळालेला प्रतिसाद लक्षात घेऊन, गिरीश लाड यांनी अशी कल्पना मांडली की, डॉक्टरांची एक दीर्घ मुलाखत ऑडिओ-व्हिडिओ स्वरूपात उपलब्ध करून द्यावी. अर्थातच, ही कल्पनाही डॉक्टरांनी उचलून धरली.

बऱ्याच चर्चा-मंथनानंतर आणि सल्ला-मसलतीनंतर त्या मुलाखतीचे रेकॉर्डिंग/शूटिंग ८ एप्रिल २०१३ रोजी करण्याचे ठरले. आधीची कल्पना अशी होती की, सभागृहाऐवजी रेकॉर्डिंग रूममध्ये निवडक दहा-बारा जणांच्या उपस्थितीत ती मुलाखत व्हावी, म्हणजे त्या ध्वनिचित्रफितीचा दर्जा चांगला राहील. परंतु असाही एक मतप्रवाह होता की, 'एखाद्या सभागृहात मोठ्या समूहासमोर ती मुलाखत नैसर्गिकपणे होईल.' वस्तुत: डॉ.दाभोलकर रिकाम्या सभागृहासमोरही तितकेच नैसर्गिकपणे बोलू शकणार होते. कारण फार वर्षांपूर्वी 'साताऱ्यातील एका मोठ्या प्रांगणात भरदुपारी फक्त एका श्रोत्यासमोर मी दोन तास मोठ्या पोटतिडकीने बोललो होतो' अशी आठवण डॉक्टरांनी काही वेळा सांगितली होती. आणि ऑडिओ सीडी तयार करण्यासाठीची दहा भाषणे त्यांनी एकट्या गिरीश लाड यांच्यासमोर पुण्यातील एका स्टुडिओत केली होती. त्यासाठी डॉक्टरांनी सलग दहा दिवस बाहेरचे कार्यक्रम रद्द करून पुण्यातच मुक्काम ठेवला होता. त्यामुळे डॉक्टरांनी भरगच्च सभागृहासमोर मुलाखतीला अधिक पसंती दिली ती नैसर्गिकपणे बोलता यावे म्हणून नाही, तर याचवेळी चारशे-पाचशे लोकांसमोर आपला विचार जाईल या उपयुक्ततेच्या भूमिकेतून!

एस.एम.जोशी सोशलिस्ट फाउंडेशनचे सभागृह श्रोत्यांनी तुडुंब भरले होते. (दिग्दर्शक अमित अभ्यंकर व त्यांची टीम शूटिंगसाठी सज्ज होती.) प्रत्यक्ष मुलाखतीच्यावेळी आम्हा दोघांच्याही हातात २५ प्रश्नांच्या २५ चिठ्ठ्या क्रमाने लावलेल्या होत्या. एकेक प्रश्न विचारून झाला की, ती चिठ्ठी आम्ही खाली सरकवत होतो. त्यामुळे पुढचा प्रश्न कोणता आहे, हे डॉक्टरांना माहीत असायचे. संपूर्ण १०० मिनिटांच्या मुलाखतीमध्ये, 'आमच्या हातात प्रश्नांच्या चिठ्ठ्या आहेत आणि आम्ही त्या पाहतोय' असे दृश्य ना डीव्हीडीमध्ये दिसते आहे, ना प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या प्रेक्षकांना जाणवत होते. त्या एका ओळीच्या प्रश्नाला आधीच्या उत्तराशी आणि बाहेरच्या संदर्भाशी जोडणे आणि ते काम अर्धा ते पाऊण मिनिटांत झाले पाहिजे, इतकेच मी ठरवले होते. आणि प्रत्येक प्रश्नाचे उत्तर तीन ते साडेतीन मिनिटांत झाले पाहिजे, यासाठी डॉक्टरांनी त्यांच्यासमोर घड्याळ लावण्यास सांगितले होते. सार्वजनिक कार्यक्रमात ही मुलाखत होत असल्याने 'रिटेक' घेता येणार नव्हते आणि शूटिंगनंतरही प्रश्नोत्तरांमध्ये 'एडिटिंग' करण्याची वेळ जवळपास आलीच नाही. त्या मुलाखतीत प्रश्न विचारताना मला किंचितसा अभिनय (तटस्थ असल्याचा अविर्भाव) करायचा होता, पण तोही नीट जमला नाही. संपूर्ण मुलाखतीत डॉक्टरांच्या विविध भावमुद्रा मात्र विलक्षण बोलक्या होत्या, त्या त्यांच्यातील स्पोर्टींग स्पिरीटमधून (खूप वर्षे कब्बडी खेळल्यामुळे) आलेल्या होत्या.

ती मुलाखत शूट झाली आणि त्यानंतर चारच महिन्यांनी डॉक्टरांची हत्या झाली. तोपर्यंत डीव्हीडी तयार झालेली नव्हती. ऑक्टोबर २०१३ मध्ये ती तयार झाली. त्यानंतरच्या तीनही वर्षांत ती डीव्हीडी मी एकदाही पाहिली नाही. त्या मुलाखतीचे शब्दांकन करून त्याची पुस्तिका करावी असा विचार तेव्हापासून मनात होता, पण मुलाखत पूर्ण ऐकून तिचे शब्दांकन स्वत: करणे इतकी मानसिक तयारी माझी कधीच झाली नाही. आता डॉक्टरांच्या तिसऱ्या स्मृतिदिनी तरी ती पुस्तिका आली पाहिजे, असे तीव्रतेने वाटले. म्हणून तिचे चांगले शब्दांकन करून घेऊन, त्याच्यावर माझ्या पद्धतीने हात फिरवून ही पुस्तिका तयार केली आहे.

ही पुस्तिका वाचताना दोन गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. एक- यातील प्रत्येक प्रश्नाचे उत्तर तीन ते साडेतीन मिनिटांत द्यायचे होते, त्यामुळे ते उत्तर खूपच संक्षिप्त असणार होते. दोन- परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत जसे सोपे, मध्यम व कठीण असे तीन प्रकारचे प्रश्न असतात, त्याप्रमाणे या २५ प्रश्नांतही तसे तीन प्रकारचे प्रश्न डॉक्टरांनीच जाणीवपूर्वक घेतलेले आहेत. कारण श्रद्धा व अंधश्रद्धा यांच्या-संदर्भातील प्रश्न सामान्यांकडून, असामान्यांकडून व अतिसामान्यांकडूनही विचारले जातात.

वरील दोन्ही मुद्दे लक्षात घेतले तर डॉ.दाभोलकर हे 'क्लास' आणि 'मास' या दोन्ही वर्गासाठी बोलणारे, लिहिणारे, काम करणारे व्यक्तिमत्त्व होते याची खात्री पटेल. अशी माणसे दुर्मिळातील दुर्मिळ असतात, हे लक्षात येईल. आणि महाराष्ट्राने तीन वर्षांपूर्वी काय गमावले आहे, याची जाणीव पुन्हा एकदा तीव्रतेने होईल.

**– विनोद शिरसाठ**

**पृष्ठे ४८, मूल्य ४० रुपये**
**'ग्रंथाली' येथे सवलतीत २५ रुपये**

## ग्रंथपान

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३




गीत, गजल आणि कविता हा प्रांत काबीज करणारी कर्तृत्ववान सुभेदारांची मोठी फौज सध्या मराठीच्या दरबारात मानाच्या आसनावर अधिष्ठित आहे. त्यातले बिनीचे आणि ज्यांच्या प्रतिभेवर रसिक वाचक रयतेची भिस्त आहे, असे त्यात मोजकेच म्हणता येतील. त्यात एक नाव आहे, सदानंद डबीर. 'लेहरा', 'तिने दिलेले फूल', 'खयाल', 'आनंदभैरवी' आणि 'काळीजगुंफा' हे पाच प्रकाशित संग्रह त्यांच्या नावावर आहेत. अनुवाद आणि संपादित साहित्य त्यांच्या नावावर आहे. 'प्रीतराणी मी', 'नमो आदिरूपा' 'कैफियत' यासारखी अनेक गीते आणि गजलांच्या ध्वनिफिती आणि सीडीज त्यांच्या नावावर आहेत. आजचे आघाडीचे सर्वच संगीतकार आणि गायक यांचा स्वर आणि संगीतसाज त्यांच्या गीतांना लाभलेला आहे. अशा या सदानंद डबीरांचा हा दुसरा संग्रह आहे, ज्याच्या संपादनासाठी डॉ. राम पंडित यांचा सृजनस्पर्श लाभलेला आहे. पहिला,'मराठी गजल- सदानंद डबीर' (२००७) आणि आता दुसरा, 'छांदस' (२०१६)

डॉ. राम पंडित हे स्वतः उत्तम कवि आहेत, गजलकार आहेत. गजलचे अभ्यासक आहेत आणि उर्दू या विषयात डॉक्टरेट संपादन केलेले आहेत. उर्दूमधील जवळपास सगळ्याच गजलकारांच्या मैफिलीत त्यांचे स्थान अग्रभागी असते. अशा सृजनशील आणि तितकेच चिकित्सक असलेले पंडित यांच्या संपादनाखालून एखादी कलाकृती आकाराला येते, तेव्हा ती परीसस्पर्श लाभलेली कलाकृती आहे, असे समजण्यास पर्याय नाही. आणि ते भाग्य डबीरांच्या वाट्याला दोन वेळेस यावे, हा तर ज्ञानपीठ मिळाल्यासमान योग म्हणावा लागेल. परंतु त्याचवेळी हेही मान्य करायला हवे, राजेपद भूषविण्यासाठी त्या कुळात जन्माला यावे लागते. डबीरांची साहित्यिक निर्मिती आणि त्यातले त्यांचे उजवेपण कुणालाही हेवा वाटावा, असेच आहे. त्यासाठी डॉ.राम पंडित यांनी या संग्रहाला लिहिलेली प्रस्तावना जरूर वाचावी. ते लिहितात, 'साहित्य असो वा अन्य कोणतीही कला असो, त्यात सृजनकर्त्याच्या प्रतिभेचा एक उत्कर्षबिंदू निहित असतो. लेखक जेव्हा एकाच फॉर्ममध्ये आपल्या समग्र प्रतिभेचा विनियोग करतो तेव्हा त्या उत्कर्षबिंदूनंतर उतार लागणे क्रमप्राप्त आहे. डबीरांनी हे सत्य जाणले व त्यामुळे त्यांनी आपली सृजनप्रक्रिया एकसुरी होऊ दिली नाही. विधावैविध्य, विषयवैविध्य व विचारवैविध्य ही त्यांच्या पद्यरचनेची त्रिपुटी म्हणता येईल.'

छांदस या संग्रहात डबीरांच्या पाचही संग्रहातील निवडक पद्यरचनांचा समावेश करण्यात आला आहे. प्रत्येक रचनेच्या तळाला, ती कोणत्या संग्रहातून निवडली आहे आणि तो संग्रह कोणत्या साली प्रकाशित झाला आहे, त्याची नोंद दिलेली आहे. त्याचप्रमाणे गीतांच्या तळाला त्याचे गायक आणि संगीतकार यांची नावे दिलेली आहेत. संग्रहाचा ताल आणि तोल कायम राहावा म्हणून गजल, कविता आणि गीत अशी तीन भागात संग्रहाची मांडणी केलेली आहे. काही अप्रकाशित 'शब्दशलाकां'चाही यात समावेश आहे. अर्थातच यात गजलांची संख्या अधिक आहे, आणि त्या साऱ्याच वाचकाला भावतील, अशाच आहेत. डबीर आणि डॉ. पंडित यांचा पिंड गजलकारांचा असल्याने त्यांनी हे झुकते माप गजलच्या पारड्यात टाकलेले असावे. परंतु एकूण मांडणी पाहता, कवीची समग्र सृजनक्षमता अधोरेखित करण्याचा उद्देश संपादन करताना नजरेसमोर ठेवलेला यातून दिसून येतो.

डबीरांच्या काव्यात गेयता आहे, वाचकाला भुरळ पडावी अशी शब्दरचना, कल्पनांचा आविष्कार आहे, तशी काळजाचा पटकन ठाव घेण्याची उत्कटता आहे. सावल्या या गजलमधला हा एक शेर,

सांजयात्रेला निघाल्या लांबणाऱ्या सावल्या
थांबलेल्या माणसांच्या हालणाऱ्या सावल्या.

एकूण रचनांचा वेध घेतला तर त्यात कुठे उदास, निराशा या कवटाळलेले दुःख यांच्या अंधारलेल्या घागरींचे सागर केलेले दिसून येत नाहीत. उलट जगण्यातली उत्कटता, आनंद यासारख्या हृदयात सूर्य ठेवणाऱ्या आशादायी प्रकाशाचे वर्णन करतात,

अंधारलेल्या मनाला सांगायला हवे
हृदयात सूर्य आता ठेवून बघ जरा.

कवी जणू वाचकांशी संवाद करीत आहेत, अशा तऱ्हेने मनातले गुपित उघड करतात,

मी उन्हाचे शब्द केले सावल्यांचे सूर केले
गीत माझे गाउनी मी दुःख माझे दूर केले

'छांदस': 'लालित्यपूर्ण काव्ययात्रा' असे या संग्रहाचे नामकरण डॉ. पंडित यांनी केलेले आहे, ते सार्थ असल्याचा आनंद हा संग्रह देतो. तळातून ध्वनिलहरींसारखा उचंबळत येणारा मुखपृष्ठावरील रंगांचा अलवारपणा संगीतकार मिलिंद जोशी यांनी सुंदरपणे साकारला आहे.

**मूल्य २०० रु. • सवलतीत १२० रु.**

## ग्रंथपान

तरल, निखळ आणि सहजसुंदर आविष्काराचे रूप कसे असू शकते, त्याचे उदाहरण म्हणून दाखवायचे झाले तर 'राधेचा पाऊस' या अरुण शेवते यांच्या कवितासंग्रहाचे नाव पुढे करता येईल. प्रीतीचा अलवार हुंकार, स्नेहाची आर्द्र रिमझिम, मैत्रीचा अतूट धागा आणि मनामनात कोसळणारा पाऊस, साद घालणारा निसर्ग, पानाफुलांची जवळीक, अशा कितीतरी जाणिवांचे, भावनांचे, वास्तवाचे, अस्तित्वाचे पडसाद कवितांच्या ओळींतून उमटत जातात आणि त्या वाचत असताना आपल्याच मनात त्यांच्या अंकुरांचे हुंकार सजग होऊ लागतात.

हा पाऊस राधेचा नसून प्रत्येकाच्या मनातला पाऊस होतो. 'ज्याच्या मनात असते राधा, पाऊस कुठेही भेटतो त्यांना.'




अरुण शेवते यांची ओळख, 'ऋतुरंग' पलीकडे गेलेली आहे. रसिकमान्यतेची मोहर उमटलेल्या कवितांचे पंधरा संग्रह त्यांच्या नावावर आहेत. मालिका – कविता या काव्यप्रकारावर स्वतःची मुद्रा कोरलेल्या या कवीचा 'राधेचा पाऊस' हा संग्रह त्यापैकी दहावा आहे. सुप्रसिद्ध साहित्यिका विजया राजाध्यक्षांची या संग्रहाला प्रस्तावना लाभली आहे. त्या नमूद करतात, 'मराठी मालिका-कवितांना थोडीफार परंपरा आहेच, पण तुम्ही या रूपबंधाला दशकपूर्तीपर्यंत अधिक सश्रद्ध करत गेला आहात.' स्वतः शेवते या विषयी लिहितात, 'मालिका कवितेचं रूप माझ्या मनात असतं. फुलपाखरू जसं आपल्याबरोबर रंग घेऊन फिरत असतं, तसं मनाचं फुलपाखरूही रंगात न्हाहत असतं. एका कवितेने दुसऱ्या कवितेशी साधलेला संवाद असतो. एक कविता दुसऱ्या कवितेला हाक मारत असते.' आणि आपण या कविता वाचत असताना तोच अनुभव येतो. एक कविता पूर्ण होत असताना ती दुसऱ्या कवितेचा हात हाती घेते, हातात हात घेत साखळी घेतलेल्या मुलींसारखी. त्यामुळे या कवितांना शीर्षक नाहीत, अनुक्रमणिका नाही. आहे ती कविता, पावसाची कविता, राधेच्या पावसाची कविता. पाऊस, अनेक रूपात भेटलेला पाऊस, पावसात चिंब होणे, त्याचे गात्रागात्रात उतरणे, प्रवाह, समुद्र, पावसात उभी असणारी झाडे, झाडांवर असलेले पक्षी, पक्ष्यांची घरटी, छत्री, रात्र, मृगनक्षत्र, अशी ही मालिका आणि त्यात स्वतःचे चिंब होणे. किती तरल, किती हळूवार!

'राधेचा पाऊस कवीला हिंडून आणतो सगळीकडे. तो वेडावून टाकतो. दिवसाचं सारं विसरायला लावणारा रात्रीचा पाऊस कवीला आवडतो, कुशीत घेऊन बसलेला. राधेच्या पावसाला कधीच अंत नाही. परंतु हा राधेचा पाऊस सगळ्यांच्या नशिबात नसतो. तो असतो, ज्याच्या कपाळावर मोरपिसाची जन्मखूण असलेल्याच्या नशिबात. मात्र...असेही आहे, ज्यांच्या मनात असते राधा, पाऊस कुठेही भेटतो त्यांना.

'छत्री मिटून राहते घराच्या कोनाड्यात शिंपल्यात मोती असावा तशी.' 'छत्रीला न्हाणं येतं.. वर्षभर ती कुमारिकाच असते.. अल्लड अल्लड..' तशीच दुसरी सुंदर कल्पना पहा, ' पाऊस लपतो झाडाच्या कुशीत. फांद्या, पानं, फुलं पावासाची ओटी भरतात. पाऊस सवाष्ण असतो झाडांसाठी...' आणि प्रखर वास्तवाची जाणीव कवी करून देतात, ' पाऊस थांबल्यावर आपणही थांबतो, मृत्युपत्र लिहायला त्याच दिवशी सुरुवात होते.'

राधा आणि पाऊस, पाऊस आणि राधा, राधा आणि कवी, कवी आणि पाऊस. असा हा सुंदर मिलाफ आहे. त्यातली तरलता मोहवून टाकणारी आहे. त्यातल्या हळूवार कल्पना आनंदाच्या सरी कोसळवणाऱ्या आहेत. राधा स्वतः पावसात भिजायला जात नाही, कृष्णच तिच्यासाठी पाऊस आहे, किती मनोरम कल्पना! पाऊस येणार हे पाखरांना अगोदर कळते. कारण त्यांच्यातले नातेच तसे असते. मनातल्या कविता राधेच्या होतात, राधा कविता होते या नात्यासारखे. यातला भाव किती परिचित किती अपरिचित, ही नाजूक वीण वाचून झाल्यावरही मनापासून दूर होत नाही. कवी म्हणतात, 'राधा, राधिका, राधे..तिची सगळी नावं मी गोंदवून घेतली स्वप्नात माझ्या.' कवितासंग्रह वाचून झाल्यानंतर वाचक म्हणून आपलीही तशीच अवस्था होते, राधा आणि तिचा पाऊस आपल्या मनावर गोंदला गेला आहे, असे वाटत राहते.

या संग्रहाला कवी गुलजार यांच्या शाबासकीचा पाऊस लाभलेला आहे. या संग्रहाचा लेखनप्रवास अवघ्या वीस दिवसांचा आहे. यावरून लक्षात यावे, कवी राधेच्या पावसात किती चिंब ओथंबून गेलेले आहेत. हेच ओथंबणे आणि मनाचा विभोर झालेला मोर मुखपृष्ठावर नाचतो आहे. हळव्या रंगातले सतीश भावसारांचे हे मुखपृष्ठ मनाला चिंब करणारे आहे.

**मूल्य ८० रु. • सवलतीत ५० रु.**

# ग्रंथपान

आरस्पानी चित्राचे खुलणारे रंग पाहिले की नजर समाधानाच्या रंगात चिंब होते. येणाऱ्या सरी जशा निरागस तसा त्यांना झेलण्याचा सोहळाही निरागसच. चिंब होताना जणू आपणच आरस्पानी होत जातो. तसा अनुभव एखादं लेखन वाचत असताना येतो, क्वचितच. तो अनुभव देणारे लेखन खूप दिवसांनी हातात आले, ते म्हणजे उषा मेहता यांचा कवितासंग्रह, 'काटेसावर'. काय आहे ही काटेसावर? 'अशीही येते कविता, जशी दुःखितांच्या ह्रदयातील शलाका, आणि कधी येते बोचकारत, काटेरी फांदी जणू ओरबाडते, फाडतेही दांभिकांचे मुखवटे, आणि मग हीच बया फुलवते क्रांतीचा अंगार...'




या संग्रहाला विजया राजाध्यक्ष यांची मर्मग्राही प्रस्तावना लाभलेली आहे. कवितेविषयी किती कसदारपणे सांगता येते, तेही मोजक्या शब्दात, याचे उदाहरण म्हणजे ही प्रस्तावना. ती वाचून झाल्यानंतर एक स्तब्धता येते, गुहेत शिरण्यापूर्वी जाणवते तशी. आत प्रवेश केल्यानंतर मात्र जाणवते, ही तर लेणी आहेत, इसवीसनापूर्वी निर्माण झालेली, दररोज याच वाटेवरून प्रवास करूनही आपल्याला अज्ञात राहिलेली. होय, तसेच म्हणावे लागेल. आज आपल्याभोवतीचे एकूण वातावरण आणि परिस्थितीचे अवलोकन करा, डोळे उघडे ठेवून, पुढे पाऊल टाकण्याची हिंमत होणार नाही, मन संवेदनाक्षम असेल तर. क्रूर, भयप्रद, हिंसाचारी, ओरबाडणारे, मूल्यांचे विघटन करणारे, संवेदना हरवलेले, असे भयानक वातावरण. ज्याकडे पाहणे कुणाला शक्य आहे? फुटपाथवर उद्ध्वस्त होऊन बसलेली बाई माझी कोण लागते? असा प्रश्न कवयित्री उपस्थित करीत नाहीत, आपल्या बोथट संवेदनांचे फक्त एक टोक उघड करून दाखवतात. दुःखाझबिःखी या कवितेत कवयित्री म्हणतात, 'नजरच मारली प्रयत्नपूर्वक की झालं मग!' ए चाईल्ड गिव्हज बर्थ टू मदर या कवितेत त्या म्हणतात, 'चालू लागतात आया पुन्हा बाया बनून अगतिकतेच्या रस्त्यावरून.' यातून या भेसूर अगतिकतेचे दर्शन होते. परंतु त्याचवेळी यावर उपाय काय, याचे उत्तर त्या मी घाबरते दुःखाना, या कवितेतून देतात, 'काढीनही मी माझा नख्या पंजाबाहेर, चवताळलेल्या मांजरीसारखी खेळवीन असल्या हलकटांना, कुरतडणारे उंदीर मेले, प्राणांतिक जखमा करीन त्यांच्या नरड्यांना...' हे केवळ बाईपणाचे स्त्रीवादी लेखन नाही. वास्तववादी लेखन आहे. जगण्याचं चिंध्या उडवणारं वास्तव, सिमेंटच्या असह्य धुळीसारखं भुळभुळत आंधळं करत जाणारं वास्तव.

संग्रहातील कवितांचा एकूण आवाका पाहिला तर तो खूप मोठा आहे. निराशेला गाडून टाकणारा आशावाद आहे. कसेही वाहत गेलो तरी कुठेतरी किनारा लागेल याचा विश्वास आहे. सिग्नल तोडणाऱ्याला अडवणारा सभ्यपणा आहे. जीवन संपवू पाहणाऱ्यांना नंदनवनात उतरवणारी गाडी आहे. रडून तरी काय होतं? गाण्यातून जगण फुलतं, हे आश्वासन आहे. अनेक कवितांमधून हुबेहूब चित्र कॅनव्हासवर उतरवली आहेत. हे चित्र मानवाचे, मनाचे, क्रूरतेचे, निसर्गाचे, दिसणाऱ्या दृष्याचे, भयाचे, सतारियाचे, ज्येष्ठांचे, समुद्र किनारी आलेल्या आमेन या मृत बालकाचे. आणि माधव मनोहर यांच्यासोबत केलेल्या भ्रमणाचे. 'सुमधुर किलबिलाट, बहुतेक, फांद्याफांद्यांवर मंगेशकर भावंडं गप्पा मारायला आलेली!' कवितेविषयी आहे, लिखानाविषयी आहे, स्वःच स्वतःशी केलेला संवाद आहे. भास-आभासाचे अनुभव आहेत. त्यामुळे या सगळ्या कविता लिहिल्या आहेत, असे वाटण्याऐवजी त्या अनुभवल्या आहेत, त्यांच्या भावना, संवेदना आणि एकूण मनाच्या व्यापाराशी त्या एकरूप झालेल्या आहेत. त्या आपल्यासमोर जशाच्या तशा उभ्या राहतात. त्यामुळेच त्या केवळ कवयित्रीच्या न राहता, आपल्या होतात. आपणही कधी हे सारे अनुभवले आहे, पाहिले आहे, त्या स्मृती जाग्या होतात. आणि हेही जाणवते, त्यावेळी आपण इतके बधीर का होतो?


या कवितांमध्ये काही अप्रूप वाटावीत अशा शब्दकळांची गुंफण झालेली आहे, नक्षीदार वेलबुट्टीवर चांदण्याची फुले उमलावीत तशी. 'शोषणमुक्त, खिल्लीदार,' 'शून्यभकास डोळ्यांची', 'चिरफाळलेल्या जमिनीवर', 'हळदिवं उन्न', 'ओला शुभ्रगार अंधार', 'काळगंगेतून बाहेर'. हा उषा मेहतांचा सहावा कवितासंग्रह. वाचक याचे नक्कीच स्वागत करतील. या संग्रहाचे मुखपृष्ठ हे काटेसावरचेच आहे. त्यातला अंगावर काटा आणणारा काटेरीपणा ठळकपणे लक्षात येतो. त्यावरील उमललेली फूले निसर्गाकडे, कोमलतेकडे घेऊन जाणारी आहेत. त्यामुळे संग्रहाचे शीर्षक आणि त्यासाठी चितारलेले चित्र आतल्या आशयाचे प्रतिबिंब म्हणता येईल. आत कवितांना अनुरूप अशी रेखाटने आहेत. हीसुद्धा कवितेच्या आशयाला उठाव देतात, गीताला संगीत उठाव देते तशी. त्यासाठी मिलिंद मुळीक यांचे अभिनंदन!

**मूल्य १२५ रु. • सवलतीत ७५ रु.**

## ग्रंथपान

### कविता मनातल्या कविता कोर्टातल्या

स्मिता भागवत




'जाडजूड पुस्तकांखाली लांब लांब भाषणात काहीतरी हरवतंय- संपतंय.

पुराव्याचं कलेवर हातात घेऊन भोकड पसरणाऱ्या मला हे सर्व चुकून

'ऑनरेबल' 'ऑनरेबल' का म्हणतोहत? 'डिसेबल' 'अनेबल ' असताना!'

शहाण्या माणसाने न्यायालयाची पायरी चढू नये म्हणतात. ही सूचना अनुभवावर आधारित असलेली. ही सूचना केवळ पक्षकारांसाठी नसून ती अवघ्या सुज्ञांसाठी लागू आहे, अगदी न्यायाधीश महोदयांपर्यंत, असे म्हटले तर ते अन्याय्य होणार नाही. न्यायालयाच्या दगडी भिंतीशी जोडलेले 'न्याय' नावाचे नाते किती निष्ठूर असते, दगडासारखे, हे कळण्यासाठी फार शहाणे असण्याची गरज नाही. अशा दगडांच्यासोबत आलेले सगळेच दगड नसतात, हेही तितकेच सत्य. अन्यथा न्यायदानाचे पवित्र दान हाती असलेल्या व्यक्तीला आपण कुठल्या सिंहासनावर आहोत, मस्तकावर धारण केलेला मुकुट कसा आभूषित आहे, याचे भान इतरांना करून देण्याची आवश्यकता भासती ना.

मृदुला भाटकर, न्यायमूर्ती यांचा 'कविता मनातल्या कविता कोर्टातल्या' हा कवितासंग्रह नुकताच ग्रंथालीच्या वतीने प्रकाशित झालेला. तसा आकाराने लहानसा. सहज म्हणून वाचायला घेतला. साधारणपणे कविता मनाची सगळी स्पंदनेच टिपत असते, व्यक्त करीत असते. मग मनातल्या कविता, हा काय प्रकार आहे, तसेच कोर्ट हा विषय कवितांमधून कसा अवतरला असेल, कावळ्याच्या घरट्यातून कोकिळीची बाळे जन्माला यावीत तशी, हे कुतूहल यापाठी होते. कवितासंग्रहाची विभागणी शीर्षकाप्रमाणे दोन भागात केलेली आहे. त्यामुळे सरमिसळीला वाव राहिला नाही, हे बरे वाटले. काही कविता तशा लहान लहान. एक भाव टिपणाऱ्या. परंतु सगळ्या भावनेला कवेत घेणाऱ्या. हेमिंग्वेच्या सहा शब्दांची कथा, या प्रकाराचे स्मरण करून देणाऱ्या. आठवण, सोप्पं, डोळेभेट, संकेत, बंद, बाळमूठ या कविता या कुळातल्या म्हणता येतील. वाचकाला स्वतःच्या अनुभवांचे शालूशेले उलगडायला लावणाऱ्या. हळूवार आणि तितक्याच अलवार. कविता वाचत गेलो, नाही, अनुभवत गेलो. मनांच्या कवितांमधून एकेक स्पंदन अलगद असे अवतरत आले, किरणांची कोवळी पाखरे अंगणात यावीत, कवडसे टिपीत तसे. नकळत त्यांच्या नितळ कोवळेपणाशी एकरूप होत गेलो. संकेत या कवितेत 'जशी दिवसाला रातीची शपथ होती, असण्याला तुझ्या नसण्याची माझ्या आण होती!' 'प्रेम' या कवितेत 'मन उभं जळतं कुठे? प्रेमाचं फूल सुकतं तिथे.' साथ कवितेत 'दिसल्या चेहऱ्यावर तुझ्या खुणा हद्दपारीच्या माझ्या, दुःख संपण्याचे नव्हते नाकारल्याचा घाव मोठा!' 'आई' या कवितेत 'वहीत पिंपळपान जपताना वहीच होते पिंपळपान!' 'बाळमूठ' कवितेत 'तुझ्या मुठीत डोकावलं तेव्हा सारं जग दिसलं!'

या अशा तरल आणि जाणिवाचे भावविश्व जाग्या करणाऱ्या पारदर्शी ओळी नकळत आपला ठाव घेत जातात. एकटेपणाचे असह्य होणारे घाव, नोटेच्या नौकेत विहार करणारे सुखाचे इमले, मरताना एक सुईदेखील घेऊन जाता येत नाही सोबत, तरी माणसाचा चाललेला हव्यासाचा क्रूरपणा, दांभिकपणा, वास्तवाचे सुटत चाललेले भान, अपेक्षा. या साऱ्या कल्पना केवळ स्वतःपुरत्या मर्यादित नाहीत. भोवतालचे जगणे, माणसाचे हरवत चाललेले माणूसपण, आशा-निराशेचा खेळ कवयित्रीने मनाच्या कवितांमधून वाचकांच्या समोर उलगडला आहे.

कोर्ट म्हटले की पक्षकार, वकील, साक्षीदार, न्यायाधीश, पट्टेवाला, पुरावे , कागदांचे गाठोडे, हे सर्वांना परिचित असलेले वातावरण. परंतु कवयित्री केवळ यांचे वर्णन करीत नाही, तर यांच्याआड दबलेली घुसमट, सत्यासाठी चाललेली धडपड, काळेकोट आणि पुराव्यांचे ओझे यांच्यातून झडणाऱ्या निरर्थक फैरी, तटस्थपणा, अपराधीपण, त्यांच्या संवेदनक्षम मनाला सतत सल देणारा भाव त्या व्यक्त करतात. साक्षीदार या कवितेत साक्षीदारांच्या ओठांचे निरीक्षण अस्वस्थ करणारे आहे. पुरावा या कवितेतील 'श्री. पूर्वग्रह अन सौ. सहानुभूती' हे सत्य न पचवता येणारे आहे. तारीख या कवितेतील वारंवार पडणाऱ्या तारखा म्हणजे 'मी वाट पाहतो, ती वाट पाहते, सर्वजण वाट पाहतात. आजचा खेळ उद्या पुन्हा ..' किती जीवघेणा असतो हा प्रवास? कागद हा सगळ्यात महत्त्वाचा दस्तऐवज. 'कोर्ट बी कागूद अन न्याव बी कागूदच!' हे सारं उघड्या डोळ्यांनी पाहत असलेले न्यायाधीश शेवटी हताशपणा व्यक्त करतात, 'या प्रचंड कागदालयाखाली दबून दबून शोकगीत गात डिस्पोझलचं, बासष्टाव्या वर्षी एक प्रेत बाहेर येतंय न्यायमूर्तींचं, एक 'ऑनरेबल डेडबॉडी'! थक्कच झालो. न्यायदान करणारा हाही शेवटी माणूस आहे. त्यालाही भावभावना, संवेदना असतात, याचा अनुभव देणारा हा संग्रह आहे. दगडीभिंतींच्या आड हळवा प्रवाह दडलेला आहे, कातळातून वाहणाऱ्या निर्झरासारखा. न्यायदानाचे प्रतीक असलेली ताजव्यांची श्यामल प्रतिकृती, तिला व्यक्त करणारी मऊ धवल पीसकलम, हळव्या मनाची नाजूक पुष्पे, यातून साकारलेले निलेश जाधव यांचे मुखपृष्ठ उत्तम. तशीच औचित्यपूर्ण रेखाटणे!

**मूल्य ६० रु. • सवलतीत ३५ रु.**

## प्रकाशन समारंभ क्षणचित्रे





'निर्भया लढते आहे', 'फुटपाथ ते नोटरी' आणि 'आरसपानी जगताना या तीन पुस्तकांच्या प्रकाशनसमयी धनश्री धारप, डॉ. वीणा सानेकर, संपदा जोगळेकर, छाया दातार, प्रा. आशालता कांबळे, सुजाता लोखंडे आणि नीलम माणगावे




निवेदन करताना अस्मिता पांडे





'हुमान'च्या सातव्या आवृत्तीचे प्रकाशन करताना युवराज मोहिते संगीता धायगुडे महापौर कल्पना महाले दिलीप पांढरपट्टे किशोर कदम कौशल इनामदार आणि सुदेश हिंगलासपूरकर




न्यायमूर्ती बी.एन. या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन करताना भारत गजेंद्रगडकर, न्यायमूर्ती बी.एन. देशमुख, शरद पवार आणि न्यायमूर्ती अरविंद सावंत

RNI No. MAHMAR/2013/50137
Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Published on 10th & 11th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, तुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. १, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.